इतिहास



रशिया.

हें पुस्तक अनेक इंग्रजीग्रंथांधारें,

विष्णु रघुनाथ नातू बी. ए.

यांनीं रचिलें.

(नकाशे व चित्रांसहित)

दामोदर लक्ष्मण दिवेकर

यांनां

पुणें येथें

"आर्यभूषण" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

(या पुस्तकासंबंधी सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यांनें आपल्याकडे ठेविले आहेत.)

सन १८८९.

किंमत १॥ सवारुपया, खेरीज टपालखर्च.

प्रस्तावना.

अफगाण सरहद्दप्रकरण जेव्हां अगदीं हातघाईवर आलें हो
व सर्वांच्या मुखांतून 'रशियन लोक कोण आहेत, कसे आहेत इ
प्रश्न ऐकूं येत होते, तेव्हां मलाही साहजिकरीत्या त्याविषय
वरील इंग्लिश ग्रंथ पहाण्याची इच्छा झाली. यावेळीं या वि
याबद्दर वर्तमानपत्रांतून व लोकांच्या संभाषणांतून जे विचार ब
हेर पडत, त्यांवरून, जें राष्ट्र युरोपांतील प्रमुख राष्ट्रां
गणलें जातें, ज्याचा अधिकार अर्ध्या एशियाखंडावर चालतो व
आमचें शेजारी व प्रतिस्पर्धी झाल्यामुळें ज्याच्या कारस्थानां
हिंदुस्थान व इंग्लंद या देशांचें सर्व लक्ष गुंतलें आहे, त्याच्याविषयीं इकडे जितकी माहिती असावी तितकी नाहीं, असें दिसून आ
ती उणीव अंशतः तरी दूर करण्यासाठीं, मीं मिळविलेली माहि
पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचा विचार माझ्या मनात आला.

आमच्या देशांत युरोपांतील अनेक राजकीय गोष्टींचा फैला
होत आहे व गोडीही वाढत आहे हें पाहून, रशियन लोकांचे
चेष्टा, ज्ञान, सामाजिक व राजकीय स्थिति इत्यादि हकिगत दे
तांना, त्या गोष्टींचा जेथें जेथें उल्लेख आला आहे तेथें मुद्दाम
जास्त माहिती दिली आहे; व पुस्तकाच्या शेवटीं रशियाचें म
ध्यएशियेंतील राज्य, ह्या देशाचा अफगाणिस्थानाशीं जडलेल
संबंध, आणि सरहद्दप्रकरण, ह्यांचें खरें स्वरूपही थोडक्यांत दिलें
आहे. पुस्तकाला चार नकाशे जोडिले असून, अफगाणिस्थान
नकाशांत आमच्या देशाच्या संरक्षणासाठीं ह्मणून सरहद्दीं
होणारे रेलवे व रस्ते दाखविले आहेत.

पुणें, मे मधुरा.
ता० २३ नवंबर
१८८५

वि० र० नातू.

LIST OF AUTHORITIES CHIEFLY REFERRED.

'Russia Past & Present.' by Chester, from the original German. 1881.

'Russia' by M. Wallace M. A. 2 vols. 1878.

'Russia' by Morfill, 1882.

'Russian Life and Customs.' by S. Eyre, 1878.

'History of Russia,' a translation, from the original French by M. Rambaud. 2 vols. 1879.

'The Statesman's Year Book' for 1885.

'The Russians in Central Asia' a translation from the original German by F. Von Hellawald. 1874.

'England & Russia in the East.' by Sir H. Rawlinson, 875.

'Travels in the Russian Central Asia' by the Rev. H. Lansdell.

'Ride to Khiva' by Capt. Burnbey.

'The Russo-Afgan Question' by Malleson, 1885.

'The Russians at the gates of Herat' by C. Marvin, 1885.

'India's Dnger and England's Duty' by R. Russell, 1885.

'Correspondence relating to the affairs of Central Asia & Maps'—from the Parliamentary Blue Books. 1884 &. 1885.

&. &. &.



अमीर अबदुल रहिमान.

रशिया.

प्रकरण १ लें.

सामान्य वर्णन–विस्तार- लोकसंख्या–देशस्वरूप– हवा–उत्पन्न–लोक व जाती–धर्म इ०.

कोणत्याही देशाची चांगली ओळख होण्यासाठीं व विशेषतः तेथील लोक, त्यांच्या चाली व रीति, तेथील राज्यव्यवस्था आणि व्यापारधंदे, इत्यादि गोष्टींची माहिती मिळविण्यापूर्वी, त्या देशाचें स्पष्ट स्वरूप कळलें पाहिजे. तो देश कसा व कोठें आहे, तेथील हवा कशी आहे व तिचा परिणाम तेथील राहिवाशी लोकांवर कोणत्या प्रकारचा झाला आहे, त्या देशाचें स्वरूप कसें आहे, ह्यांविषयीं व तेथील पर्वत, नद्या, सरोवरें इत्यादिकांची रचना आणि तेथील उत्पन्न, पीकपाणी, खनिज संपत्ति, व्यापार व दळणवळणाचीं साधनें ह्यां सर्वांबद्दल प्रथमतः सामान्य माहिती असणें अवश्य आहे; ही माहिती झाली म्हणजे त्या देशाचें स्वरूप स्थूलमानानें लक्षांत येऊं शकेल. एवढें झाल्यावर नंतर जी विशेष विस्तारानें माहिती मिळवावयाची तिचा बोध सुलभ होईल. ह्या उद्देशानें, या प्रकरणांत रशियन राज्याचें सामान्य वर्णन व ठोकळ माहिती दिली आहे. तसेंच या भागांत ज्या गोष्टींचें फक्त दिग्दर्शनच केलें आहे त्यांची विशेष हकीगत योग्य स्थळीं पुढें दिली आहे. या भागांत रशियाची मर्यादा, विस्तार, लोकसंख्या, रचना, हवा, उत्पन्न इ० विषय देऊन, धर्म, धर्मसंबंधी आचार व समजुती कशा आहेत, हेंही सांगितलें आहे.

पृथ्वीवरील जमिनीच्या सप्तमांशांत रुसांच्या श्वेत झाराचा अम्मल चालतो. अमेरिकेंतील रशियन प्रदेश विकल्यापासून, हें विस्तीर्ण राज्य जुन्या महाद्वीपाच्या उत्तरभागांत मात्र पसरलें आहे. याचा विस्तार, उत्तर अक्षांश ३८ पासून ७८

पर्यंत व पूर्व रेखांश १८ पासूनें पश्चिम रेखांश आहे. या राज्याचें क्षेत्रफळ ८५,२०,००० चौरस मैल आहे; परंतु येवढ्या अफाट मुलखांत लोकवस्ती फारच पातळ आहे; याचें कारण युरोपियन रशियाच्या उत्तरेकडील सगळा जंगली प्रदेश, सैबेरिया व ड्वीना नदीपासून थेट चीनच्या हद्दीपर्यंत पसरलेलीं अफाट व रुक्ष मैदानें, ह्यांमध्यें लोकवस्ती अगदींच थोडी असल्यामुळें सरासरीनें पहातां मैलीं १२ मनुष्यें पडतात.

रशियाच्या राज्यांत १०,२६,००,००० लोकसंख्या आहे असा अदमास केला आहे. अगदीं विश्वसनीय आंकडा मिळणें कठीणच आहे, कारण एशियाखंडांतील रशियन प्रजेची गणना करणें संभवतही नाहीं. युरोपांतील रूसदेशांत मैलीं ४० मनुष्यें येतात व हें प्रमाण इतर देशांच्या वस्तीशीं तोलून पहातां फारच कमी आहे. आमच्या देशांतच मैलाला २२० संख्या बसते.

युरोपियन रशियाचें क्षेत्रफळ २०,४१,००० चौरस मैल आहे. याच्या पूर्वेस सैबिरिया, उरलनदी व कास्पियन समुद्र; दक्षिणेस इराण, काळा समुद्र व टर्की (युरोपांतील तुर्कस्थान); पश्चिमेस आस्त्रिया, प्रशिया, बॉलतिक समुद्र व स्विडन आणि उत्तरेस उत्तरसागर व नार्वे आहेत. रशियन राज्य हल्लीं इंग्लंदाच्या १७८ पट व हिंदुस्थानाच्या १० पट मोठें आहे. तथापि त्यांतील पुष्कळ प्रदेश वैराण असल्यामुळें लोकसंख्या थोडी आहे. दक्षिण सीमेवरील उंच काकेसस, पूर्वेकडील खनिजपदार्थसंपन्न उरल पर्वत व पश्चिमेकडे, रशियांतील मोठ्या नद्यांचा ज्यांत उगम होतो अशा वालदाई नामक टेंकड्या, ह्यां खेरीज रूसदेश म्हणजे केवळ एक प्रचंड सपाट मैदान आहे. या देशाच्या बाजूंवर जर हे पर्वत नसते तर रशियाचा प्रदेश अगदीं वाळवंट बनला असता, परंतु या पर्वतांतून निघणाऱ्या नद्यांमुळें त्या देशास सुपिकता आली आहे इतकेंच नव्हे, तर ह्या नद्याच तेथें दळणवळणाचीं मुख्य साधनें झालीं. रूस देशांतील दक्षिणेकडील प्रदेशांत रुक्ष मैदानें व रखरखीत वाळवंटें मात्र

आढळतात, परंतु काकेसस पर्वताच्या उतरणीवरून वहाणाऱ्या लहान लहान प्रवाहांनीं कोठें कोठें जमीनीस सुपीकता व थंडाई आली आहे. उत्तरेकडून वहात आलेल्या वोल्गा, डॉन, निपर वगैरे नद्यांस दक्षिण भागीं दुसऱ्या शाखा मिळत नाहींत म्हटलें तरी चालेल.

रशियांतील नद्या युरोपांतील इतर नद्यांहून मोठ्या आहेत व त्यांतही वोल्गा सर्वांत मोठी आहे. ही नदी रशियांत वळणावळणांनीं वाहून कास्पियन समुद्रास मिळते. हिच्या मुखाजवळ आस्त्राखान नामक एक मोठें व्यापाराचें बंदर आहे. हा कास्पियन समुद्र वस्तुतः सरोवरच असल्यामुळें व्यापाराच्या फारसा उपयोगी नाहीं; तथापि तो रूस लोकांस एशियाशीं संबंध ठेवण्याचें द्वार झाल्यापासून महत्वास आला आहे. दक्षिण खेरीज करून इतर तीरांवर रूसांचाच अंमल आलीकडे झाल्यामुळें या समुद्रांत रशियाचीं पुष्कळ गलबतें हिंडतात; तथापि पाणी उथळ व मधून मधून वाळूचे ढीग जमल्यामुळें व त्यांत वारंवार तुफानें होतात म्हणून, हा समुद्र गलबतांस बऱ्याच धोक्याचा आहे. एशिया खंडांत रशियाचें प्रस्थ माजल्यापासून आलीकडे या समुद्रांत त्यांचें लहानसें आरमार असून व्यापाऱ्यांच्या ही पुष्कळ आगबोटी त्यांतून फिरूं लागल्या आहेत. याच्या पूर्वेकडील किनाऱ्यावर मिकेलोव्हस्क व चिक्श्लियार, आणि पश्चिमेकडील किनाऱ्यावर बाकू, ह्या बंदरांपर्यंत आगगाडीचे फांटे आले आहेत; यामुळें याच्या तीरावरील बंदरांचा व्यापार दिवसोंदिवस चढत्या कळेस लागला आहे. कास्पियन समुद्राच्या तीरावर नफतेल फार सांपडतें व आलीकडे तेथें कित्येक आगबोटींत दगडी कोळशाबद्दल या तेलाचेंच सर्पण उपयोगांत आणितात. या तेलाच्या झऱ्यांमुळें या सरोवराचें पाणी कडवट लागतें. या सरोवरास अगर समुद्रास, उरल व वोल्गा या दोन मोठ्या नद्या मिळतात व यांशिवाय काकेसस प्रदेशांतूनही दुसऱ्या कांहीं लहान नद्या मिळतात. तसेंच इतिहासप्रसिद्ध आक्सस नदी जी हल्लीं ऑरल सरोवरास मिळते तीही याच समुद्रांत पडत होती,

परंतु कांहीं भूगर्भ व कृत्रिम कारणांनीं तिचा प्रवाह उत्तरेकडे वळला असा तर्क आहे.

वोल्गानदी युरोपांतील सर्व नद्यांहून लांबीनें जास्त आहे; उगमापासून तिची लांबी सुमारें २४०० मैल आहे. हिच्या तीरावर मोठमोठीं शहरें आहेत व प्राचीन काळीं मोंगल राज्याचीं मुख्य शहरें याच नदीच्या तीरावर होतीं. हिला मिळणाऱ्या नद्याही मोठ्या आहेत, त्यांत पूर्वेकडून मिळणारी कामा व दक्षिणेकडून येणारी ओका, यांची लांबी अनुक्रमें १२०० व ७०० मैलां जवळ आहे. वोल्गानदी दोनतीन मोठीं वळणें घेऊन कास्पियन समुद्रांत पडते. तिच्या मुखाजवळ तिचें पात्र फार रुंद झालें आहे व त्यांत लहानलहान पुष्कळ बेटें आहेत. काळ्या समुद्रास मिळणाऱ्या नद्यांपैकीं डॉन नदीचा उगम टुलाप्रांतांतील एका दलदलींत होतो. या नदीचें पात्र अगदीं उथळ असून त्यांत वाळूच्या भाटी जमतात ह्मणून गलबतें चालणें कठीण पडतें. या नदीच्या प्रवाहांतून अझॉफ समुद्रांत (काळ्या समुद्राच्याच एका भागांत) इतकी रेती जाते कीं कांहीं वर्षांनीं तो समुद्र होऊन जाण्याची भीति आहे. या नदीच्या कांठीं टुला, अझॉफ, वॉरनेज इ० शहरें आहेत. दुसरी मोठी नदी नीपर. हिचा उगम ही वोल्गानदीच्या उगमा जवळच वालदाई टेंकड्यांत आहे. रशियांत या टेंकड्यांपासूनच बहुतेक मोठ्या नद्या निघतात व तेथील पाणलोटाचा प्रदेश ह्याच टेंकड्या होत. निपर नदी खर्सन शहरानजीक काळ्या समुद्रास मिळते. तेथून जवळच ओदेसा नामक प्रख्यात बंदर व आरमाराचें ठिकाण आहे. या नदीच्या कांठीं रूस देशाची प्राचीन राजधानी व पुण्यक्षेत्र कीफ नामक शहर आहे. नीपर व डॉन नद्यांच्या मधल्या दुआबांत रशियांतील कोसॉक नामक लढाऊ जात रहाते. या नीपर नदीचेंही पात्र फार खोल नाहीं. या दोन नद्यां खेरीज निस्तब्ग, कुबन इ० दुसऱ्या कांहीं लहानलहान नद्या त्याच समुद्रास मिळतात. बॉल्तक समुद्रास मिळणाऱ्या नेवा नदीचा वोल्गा आणि निपर यांचा कालव्यांनीं संबंध जोडिला आहे. त्य

मुळें आलीकडे देशांतल्यादेशांत व्यापार व रहदारीला फार सुलभ झालें आहे. बॉल्तिक समुद्रास द्वीना नांवाची दुसरी एक नदी मिळते तिचे ही कालवे काढून निपर नदीला मिळविले आहेत. आर्तिक सागराचा एक भाग, श्वेतसमुद्र, रूस देशाच्या उत्तरेस आहे, त्यांत द्वीना नांवाचीच दुसरी एक नदी पडते. ती शिवाय त्या सागरास मिळणाऱ्या पेचोरा, मेझेन वगैरे नद्या आहेत. त्या मोठ्या आहेत, परंतु जंगली व दलदलीच्या प्रदेशांतून वहातात व त्यांच्या कांठांवर वस्ती नाहीं आणि वर्षांतून बहुतेक महिने त्या गोठून जातात, सबब त्यांचा व्यापारास मुळींच उपयोग नाहीं.

त्या देशांत व्यापाराचीं व दळणवणळ ठेवण्याचीं मुख्य साधनें या नद्या आहेत. यांचें कारण त्यांचे प्रवाह सपाट प्रदेशांतून वहात असल्यामुळें त्यांस फार ओढ नसते हें आहे. आगगाडी, व सडका होण्यापूर्वी पृथ्वीवरील देशांत मनुष्यांला नद्यांचा फारच उपयोग होई ही गोष्ट प्रसिद्धच आहे. ज्या प्रदेशांस समुद्र किंवा नद्या, यांचें सांनिध्य नसे ते देश व्यापार, सुधारणा इत्यादि सर्व गोष्टींत मागें रहात हें आफ्रिकाखंडाच्या सद्यःस्थितीवरून व्यक्त होईल. आक्सस, तैग्रीस, भागिरथी, नाइल ह्या नद्यांच्या तीरावरच प्राचीनकाळीं मानवी सुधारणा होती हें इतिहासप्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणें १९ व्या शतकांतील दळणवळणाचीं द्वारें सांपडण्यापूर्वी, रूसदेशांत काळ्या समुद्राशीं व अंतस्थ चालणारा सर्व व्यापार व व्यवहार या नद्यांमुळें सुलभ झाला होता. अलीकडे आगगाड्या झाल्या तथापि या नद्यांतील रहदारी कमी न होतां आगबोटींपासून ती वाढलीच आहे. रूसदेशांतील नद्यांचीं पात्रें उथळ असल्यामुळें पूर्वी गलबतें चालविणें थोडें कठीण पडे व तीं ओढण्याकरतां त्यांस घोडेही बांधीत, परंतु आतां वाफेच्या लहान बोटींचाच घोड्या ऐवजीं उपयोग करतात. मागच्या शतकांत पश्चिम युरोपांतील ज्ञानाचा प्रकाश पडल्यापासून रशियामध्यें जी सुधारणा झाली तिचा प्रसार या नद्यांच्या द्वारें फारच झाला.

उन्हाळ्यांमध्यें या नद्यांचें पाणी कमी होतें, परंतु थेंडेच दिवसांत बर्फ वितळून त्यांचीं पात्रें फुगतात व तेव्हां त्यांतून मोठ्या बारद्वानाचीं गलबतें देखील विन प्रयासानें चालतात. गलबतांतूनच माल पाठविणें फार सोईचें होतें, कारण आगगाडीपेक्षां अशानें थोडा खर्च येतो. उरलपर्वतापासून वोल्गा नदीवरील निज्ननोव्हगोरोड शहरापर्यंत ह्मणजे सुमारें १२०० मैलांच्या अंतरावर खंडी सवाखंडी माल पाठविण्यास कायतो वारा-तेरा रुपये नोर पडतो.

रूमदेशाच्या स्वरूपांत नद्यांचें जसें महत्व आहे त्याप्रमाणेंच सरोवरांचेंही महत्व आहे. येथील नद्यांप्रमाणें सरोवरेंही युरोपांतील इतर सरोवरांहून फार मोठीं आहेत व त्यांत लादोगा हें फारच मोठें आहे. तसेंच ओनेगा, पायपस्, इलमेन् हीं ही बरींच मोठीं आहेत; यांखेरीज दुसरीं लहान लहान सरोवरें फिन्लंद प्रदेशांत अनेक आहेत.

रशियासारखीं मोठीं जंगलें व रानें इतर युरोपियन देशांत आढळत नाहींत.

रशियांतील एकंदर देखावा दोन प्रकारचा आहे. एक सपाट मोकळा मैदान व दुसरा—दाट जंगलें. हीं जंगलें उत्तरेकडून मध्यप्रदेशाकडे वाढत गेलीं आहेत. अगदीं उत्तरेस लार्च नामक एक प्रकारचीं खुरटीं झुडपें उगवतात, परंतु जसजसें खालीं दक्षिणेकडे यावें तसतसें या रानांचें स्वरूप भयंकर होत जातें. हीं अगदीं दाट असून, त्यांत लाईम, एल्म, सिकॉमोर व ओक इत्यादि युरोपियन वृक्ष, फार उंच वाढलेले आढळतात. रशियामध्यें उष्णदेशांत सांपडणारीं सिंह, वाघ वगैरे हिंसक जनावरें जरी नाहींत तथापि या रानांतून आस्वलें, लांडगे, कोल्हे व हरणें यांच्या झुंडीच्याझुंडी आढळतात. मास्कोशहराच्या दक्षिणेकडे रानें कमीकमी होत जातात, व हळुहळू गवताळ कुरणांस व रुक्ष वाळवंटांस सुरवात होते. या प्रदेशांत, पुढें वनस्पतीचें दर्शनही होत नाहीं. रशियामध्यें डोंगर व पर्वत नाहींत ह्मणून इमारतींस किंवा रस्ते बांधण्यास दगड

मिळत नाहींत, परंतु जंगलांतून लांकूड मात्र पाहिजे तितकें मिळतें.

राशियाच्या हवेंतही कांहीं चमत्कार दिसतो. या देशांत ऋतूंची पालट एकदम होते. वसंतऋतु तर नाहींच झटला तरी चालेल. पर्जन्यकाळांतील भयंकर वादळें व मेघपटलें संपतात न संपतात तों लागलाच कडक हिंवाळ्यास प्रारंभ होतो. युरोपखंडांतील पश्चिमेकडील समुद्रकांठच्या देशांस अतूलांतिक महासागरांतील गल्फस्त्रीम नामक अंतर्प्रवाहाची उष्णता मिळते, परंतु स्विदन व नार्वे देशांतील पर्वतांच्या भितीनें रूसदेशाला तिचा कांहींच अंश पोंचत नाहीं. तसेंच उत्तरेकडे एखादा सुद्धां पर्वत नसल्यामुळें आर्तिक समुद्रांतून येणाऱ्या अतिथंड व झोंचणाऱ्या वाऱ्यांना कांहींच प्रतिबंध होत नाहीं. उन्हाळ्यांत मध्यएशियेंतील, इराण व अरबस्थानांतिल रखरखीत वाळवंटांतून येणारे उष्ण वारे तर सर्व मुलखांस भाजून सोडतात. थंडीच्या दिवसांत बर्फाचा वर्षाव चालला असतो व उन्हाळ्यांत ऊन तापत असतें. ६९ अक्षांशापासून उत्तरेकडील प्रदेश वर्षांतून ९ महिने हिमाच्छादित असतो. एकंदरींत, राशियांतील हवा फार कडक असून तींत थंडीचें तर प्राबल्य फार आहे; या थंडीची कल्पनाही आह्मां उष्ण हवेंत रहाणाऱ्या लोकांना करतां येणार नाहीं. या देशांत वहाणारे उत्तर व दक्षिण वारे फार दुरून आल्यामुळें त्यांत ओलावा मुळींच नसतो. त्यामुळें तेथें पर्जन्य थोडा पडतो व हवा सदोदित रुक्ष असते. वर्षांतून ९ महिने ज्या देशांत बर्फ पडत असतें तेथें लोकांना सदोदित उर्णामय वस्त्रें वापरावीं लागतात हें साहजीकच आहे. हिंवाळ्यास प्रारंभ झाला ह्मणजे या देशांतून उत्तरेकडील थंड वारे सोसाट्यानें वाहूं लागतात व आकाशांतून एकसारखी हिमवृष्टि होत असते. या वाऱ्यांत जर शरीराचा एखादा भाग उघडा राहिला तर तो गळून पडण्यासारखी थंडी झोंबते. विशेषतः नाकाला जर हे थंड वारे लागले तर तें तुकडा पाडण्यासारखें कडकडीत होऊन जातें व त्याला स्पर्श ही कळत

नाहीं. ह्या स्थितींतच उपाय केल्याशिवाय फार वेळ राहिल्यास ही कडक थंडी काळजापर्यंत पोंचून रुधिराभिसरण बंद पडतें व मनुष्य प्राणास मुकतो. या थंडीनें जर नाक गोठलें तर त्याला बर्फाच्याच तुकड्यानीं खूप चोळलें ह्मणजे शुद्धि येते.

लापलंद व सैबेरिया वगैरे जे भाग आर्क्तिक महासागराच्या जवळ आहेत, ते ध्रुवानजीक असल्यामुळें तेथें रात्रींचें व दिवसांचें प्रमाण फारच वाढतें. सहा सहा महिनेपर्यंत या प्रदेशांत सूर्यदर्शन होत नाहीं. व त्याचप्रमाणें कांहीं महिने सूर्य सतत दिसतो. या मोठ्या दिवसांत त्या प्रदेशांत सूर्याचे किरण सरळ नसून, वक्र व तिरकस पडतात, ह्मणून तेथें त्याच्या तेजाची उष्णता अगदीं मंद असते. आमच्या उष्णकटिबंधांत जर दिनमान सहा महिन्याचें असतें तर सूर्याच्या प्रखर तेजानें सर्व वस्तु जळून गेल्या असत्या. या अगदीं उत्तरेकडील प्रदेशांत जेव्हां सूर्य दिसत नाहींसा होतो तेव्हां त्या दीर्घ रात्रींत, आकाशांत 'आरोरा बोरिआलिस (उत्तर तेज)' नामक एक प्रकारच्या तेजाचें कडें दिसतें, त्याच्या प्रकाशानेंच लोक आपला व्यवहार चालवितात. रशियांतील उत्तरेकडील व रूसांच्या ताब्यांतील सैबिरिया देशांत हिंवाळ्याला प्रारंभ झाला ह्मणजे तेथील नद्या, नाले, सरोवरें वगैरे सर्व जलाशय थिजून जातात व सृष्टीचा देखावा उदास दिसतो. जेथें नजर फेंकावी तेथें सर्व हिममय पांढरें शुभ्र दिसतें. हें बर्फ सुमारें सात आठ महिनेपर्यंत टिकतें. एखादेवेळेस तर थंडीचा असा कडका पडतो कीं श्वासोसास करणें ही कठीण पडतें, पाखरें मरून खालीं पडतात, खिडक्यांचीं भिंगें तडतडून फुटतात व जमीनीला व तीवर सांचलेल्या बर्फालाही मोठ्या भेगा पडतात. यावेळीं हवा ओलसर व धुंद होते, आकाशांत सदोदित ढगें असतात व केव्हां केव्हां तर भयंकर वादळें ही होतात.

रूस देशाच्या जमिनीचें उत्पन्न व सुपीकतेवर लिहतांना, त्या देशाचा इतिहास लिहणाऱ्या रांबो नामक एका फेंचाने चार भाग किंवा देशांतील जमीनीचे पट्टे कल्पिले आहेत.

पट्टे सारखे नसून, ते नैऋत्येकडून ईशान्येकडे जातात. यांत उत्तरेकडचा व सर्वांत मोठा पट्टा जंगलांचा आहे. याच्या उत्तरेकडील बाजूस मोठमोठ्या दलदली व बर्फानें झांकलेले प्रदेश असून दक्षिण बाजूस मास्को व नोवगोरोड वगैरे प्रांतांतील शेतजमीन आहे. दुसरा पट्टा काळ्या जमीनीचा आहे, तो रशियाच्या पश्चिमेकडील हद्दीपासून काकेससपर्वतापर्यंत पसरला आहे. ही जमीन फारच सुपीक आहे व तिचा विस्तार फ्रान्स देशाएवढा आहे. याच्या उत्पन्नावरच फक्त ३ कोटी लोकांचा निर्वाह होतो व फार प्राचीन काळापासून, तो, पूर्वयुरोपाला धान्य पुरविण्याचें कोठारच आहे. या जमिनीच्या दक्षिणेस तिसरा पट्टा आहे, त्यांतील जमीन सपाट असून तीवर गवत उगवतें. हा पट्टा काळ्या समुद्रापर्यंत पसरला आहे. यांतील जमीन सुपीक आहे, तथापि खताशिवाय उत्तम पीक येणार नाहीं. ह्या पट्ट्यांत जेथें जेथें गवताचीं कुरणें आहेत तेथें तेथें गुरें पाळून रहाणाऱ्या जाती आढळतात. रशियांतील शूर कोसॉक लोकांचें जन्मस्थान हीच भूमि होय. वसंतऋतूंत हा भाग हिरवागार दिसतो परंतु उष्णकाळांत तो अगदीं जळलेला दिसतो. चवथा पट्टा ह्मणजे निवळ वाळवंटांचा होय. हीं वाळवंटें क्रिमियाच्या उत्तरेस व कास्पियन समुद्राच्या किनाऱ्यावर आहेत. या चार पट्ट्यां पैकीं उत्तरे कडील जंगली पट्ट्यांत जेथें झाडेंझुडपें तोडून जमीन लागवडीस आणितात तेथें जवस, सातु, राय, ओट वगैरे कनिष्ठ धान्यें पिकतात. मधल्या काळ्या सुपीक पट्ट्यांत गहूं, तंबाखु, ताग, ऊंस आणि द्राक्षें हीं उत्तम पिकतात. रशियांत गहूं फार पिकतो व त्यापैकीं पुष्कळ बाह्य देशांत विकायास पाठवितात. परंतु आलीकडे अमेरिकेंतील व आमच्या देशांतील गहूं जाऊं लागल्यापासून रूस देशांतील गव्हांचा खप कमी होऊं लागला आहे. यावरून व्यापाराच्या संबंधानें सुद्धां हिंदुस्थानाशीं रशियाची चढाओढ चालली आहे हें दिसून येईल. तिसऱ्या भागांत लाखों घोडे, गुरेंढोरें मेंढरें यांचे कळप चरत असतात. रशियांत मधाचें उत्पन्न फार आहे व तेथील लोकांना माशा बाळगून मध उत्पन्न कर-

ण्यांत बराच फायदा होतो. साखरेऐवजीं हे लोक मधाचाच उपयोग करितात. उत्तरेकडील थंड प्रदेशांत रेनडीर नामक जनावरांचा फारच उपयोग होतो. वाळवंटांत जशीं उंटें उपयोगी पडतात त्याचप्रमाणें बर्फावर रेनडीरें आहेत.

रशियाला खनिज पदार्थांचा मुख्य पुरवठा उरल पर्वतांतून व सैबिरियांतून होतो. मास्को शहराच्या आसपास, उरल पर्वतांत व डान आणि विस्तुला नद्यांच्याकांठीं दगडी कोळसा उत्पन्न होतो. उत्तरेकडील कांहीं सरोवरांतून व उरल पर्वताकडे पर्म नांवाच्या प्रांतांत मिठाचें उत्पन्न फार होतें. रूसदेशांत जेवढ्या मिठाच्या खाणी आहेत तशा कोठेंही नाहींत.

रशियांत दळणवळणाचीं साधनें नद्या व कालवे आहेत असें मागें सांगितलेंच आहे, तथापि हल्लीं वाफेच्या गाड्या व आगबोटी झाल्यापासून त्या देशांत प्रवासास व व्यापारास पुष्कळ सोयी झाल्या आहेत. रशियांत, बांधलेले सडकेचे रस्ते फार नाहींत व आहेत तेही चांगले नाहींत. एक मोठी सडक पितर्सबर्ग शहरापासून मास्को शहराकडे जाते व दुसरी मोठी उरलपर्वतावरून सैबिरियांत जाते. बाकी पुष्कळ रस्ते आहेत, परंतु ते फार वाईट आहेत. त्यांत चिखल व खांचखळगे जागोजाग आढळतात. रशियांतील पायरस्त्यांची अशी वाईट स्थिति असण्याचें मुख्य कारण तेथें दगड मिळत नाहींत हें वर सांगितलेंच आहे. ज्या रस्त्यानें टपाल जाण्याची सोय आहे त्यानें जाणें असल्यास प्रवाशासाठीं रशियांत फार सोयी केल्या आहेत. प्रवाशानें पास काढते वेळींच आपणाला किती घोडे पाहिजेत तें सांगावें म्हणजे पोस्टखात्यांतील लोक ती व्यवस्था ठेवतात व प्रवाशांची कधींही हरकत करीत नाहींत. प्रत्येक टप्प्यावर प्रवाशांसाठीं चहाची तजवीज केलेली असते. ही सोय फक्त रूसदेशांतच आहे असें नाहीं, तर रशियाच्या अमलाखालील सैबेरिया व तुर्कस्थान वगैरे प्रदेशांतही केली आहे. रशियांतील तारायंत्र, आगगाड्या, व्यापार, कलाकौशल्यें, कारखाने वगैरे गोष्टींची माहिती पुढें प्रसंगानुसार दिली आहे, तेव्हां ती

या स्थलीं देण्याचें कारण नाहीं. या भागांत राशियांतील लोक, त्यांचा धर्म, धर्मसंबंधीं समजुती व आचार देऊन नंतर दुसऱ्या भागाला हातीं घेऊं.

राशियांतील लोकांत तीन भेद आहेत; त्यांपैकीं पहिल्या प्रकारांत मोडणाऱ्या रूसलोकांस व्हाले (श्रेष्ठ) रूस ह्मणतात. हेच लोक प्राचीन काळीं त्या देशांत गेलेल्या स्लॉवनामक आर्यांचे वंशज आहेत असें ह्मणतात. यांची संख्या ४ कोटींजवळ असून त्यांची वस्ती मास्कोच्या आसपासच्या प्रदेशांत मुख्यत्वेंकरून आहे. दुसरा भेद ह्मणजे मालो (कनिष्ठ) रूस हा आहे, व तिसरा बेलो (श्वेत) रूस हा आहे. यांशिवाय रूसदेशांत, पोलंदांतील पोल, लॉपलंदांतील लॉप, व आर्मीनियन, सर्काशियन, यहुदी, मुसलमान धर्माचे मोंगल व तार्तार आणि व्यापारधंद्याच्या उद्देशानें आलेले जर्मन वगैरे इतर युरोपियन लोक पुष्कळ आहेत. सगळ्या लोकसंख्येपैकीं शेंकडा ८८ मनुष्यें आर्यशाखेंतील आहेत. बाकीचे लोक त्युरेनियन व सेमेतिक शाखांपैकीं आहेत. यांसंबंधी विशेष माहिती पुढील प्रकरणांत दिली आहे.

रूसदेशामध्यें जरी सर्व धर्मांचे लोक आढळतात तथापि तेथील राजाचा व रूसलोकांचा धर्म ख्रिस्ती आहे व त्याला ग्रीक चर्च ह्मणतात. ग्रीक चर्च हा ख्रिस्ती धर्माचा एक प्रसिद्ध पंथ आहे. रोमच्या पोपाचा अधिकार इकडे चालत नाहीं व रोमन क्याथोलिक लोकांप्रमाणें हे लोक पोपास "श्रेष्ठ, पूज्य, अच्युत," अशा अर्थाचा सन्मान ही देत नाहींत. ख्रीस्ती धर्मांत जे अनेक पंथ आहेत त्यांपैकी ग्रीक चर्च हा पंथ युरोपांतील पूर्वेकडील देशांतून चालतो. पश्चिमयुरोपांत चालणारे ख्रिस्ती पंथ व हा पंथ, यांमध्यें आचारविचारांत व मतांत पुष्कळ फेर आहे.

रोमन राज्यावर रानटी लोकांच्या स्वाऱ्या झाल्यानंतर त्या राज्याच्या दोन गाद्या झाल्या; एक गादी रोमची व दुसरी कान्स्तांतिनोपल येथील. पुढें या दोन्ही ठिकाणीं चालणाऱ्या रोम-

न राज्यांत धर्मसंबंधीं वादविवाद चालू होऊन इ० स० १०५४ त रोम व पूर्वेकडील कान्स्तांतिनोपल येथील ख्रिस्तीधर्माच्या दुफळ्या झाल्या. रोम येथील धर्माध्यक्ष (बिशप) आपणास मोठे म्हणवूं लागले व ते पारलौकिक व ऐहिक राजकीय विषयांत ढवळाढवळ करूं लागले व शेवटीं त्यांनां आपली सत्ता व अधिकार फारच वाढविला. रोमच्या बिशपांनीं आपणास 'पोप' हा किताब घेतला व त्यांच्या धाकाखालीं पश्चिमयुरोपांतील राजे थरथरां कांपूं लागले. इकडे कान्स्तांतिनोपलच्या बिशपांची सत्ता वाढली नाहीं व त्यांनीं ऐहिक राजकीय मसलतींतही गडबड कधीं केली नाहीं. पश्चिमेकडील ख्रिस्ती धर्माचीं पुस्तकें लॅातीन भाषेंत असत व पूर्वेकडील पुस्तकें ग्रीक भाषेंत असत; ह्यासाठींच पूर्वेकडील धर्माला ग्रीक चर्च ह्मणूं लागले. ग्रीक चर्च हा धर्म सुद्धां अनेक भोळ्या समजुतीच्या मंत्रतंत्रादि आचारांनीं भरला आहे. यांत मूर्तिपूजा जरी नाहीं तथापि रूसलोक 'इकान' नामक चित्राची पूजा करितात. हें चित्र प्रत्येक रूसाच्या घरांत असावयाचेंच ग्रीक चर्चपंथांत उपासतापास, शुभाशुभ दिवस, पवित्र स्थानें, तिर्थे, यात्रा, साधु, संत, जागृत देवस्थानें इत्यादि सर्व प्रकार आहेत. कनिष्ठ प्रतीच्या अज्ञान लोकांत तर सर्व तऱ्हेच्या समजुती व धर्मभोळेपणाच्या गोष्टी आढळतात.

इ० सनाच्या ११ व्या शतकापासून रशियांतील धर्मावर कान्स्तांतिनोपलच्या बिशपाची सत्ता चालत होती ती बदलून इ० स० १९८९ त रूसलोकांनीं आपलें धर्मसंस्थान स्वतंत्र केलें. आतां धर्मसंबंधीं व्यवस्था, राज्यांत ज्या चार मोठ्या सभा आहेत त्यांपैकीं 'पवित्र धर्मपरिषद्' अशा अर्थाच्या एका सभेकडे सोंपविली आहे, तथापि तीवर झाराचा अधिकार चालतो व सर्व सूत्रें तोच हालवितो. ह्यामुळें धर्म व राज्य–विषयक सर्व अधिकार पुण्यश्वत झाराच्या हातांत आहेत. झाराच्या जुलमी सत्तेस या धर्मसंबंधी अधिकारानें तर विशेष बळकटी आली आहे. धर्मसभेवर एक मुख्य अध्यक्ष असतो; त्यास पांटिफ् (आचार्य)

ही संज्ञा आहे. बादशहाच्या हातांतच सर्व गुरुकिल्ली अस-ल्यामुळें या पांटिफचा अधिकार फक्त नांवाचा आहे. आमच्या देशांत धर्मोपदेशकांचें व धर्माचें रक्षण लोकांच्या खासगी देण-ग्यांतून व औदार्यानें होतें, परंतु युरोपखंडांतील देशांतून विद्या-खातें, न्यायखातें वगैरे राज्यव्यवस्थेचीं जशीं इतर खातीं अस-तात तसेंच एक धर्मखातें असतें. ह्याचा खर्च राज्याच्या ख-र्चांतून चालतो. राजकीय खात्यांतून जसे लहानमोठे अनेक अधिकारी असतात तसेच धर्मखात्यांतही बिशप, आर्चबिशप वगैरे अनेक अधिकारी असतात; यांचीं वेतनें व कामें ठरविलेलीं असतात. रशियामध्यें असेंच धर्मखातें आहे. त्यांतील मोठमो-ठ्या हुद्यांच्या धर्मोपदेशकांची नेमणूक खुद्द झारच करतो, तथापि एखाद्या मनुष्याची निवड करतांना इतर धर्माधिकाऱ्यांचें अनुमो-दन घ्यावें लागतें. धर्मसंबंधानें मोठे वादविवाद प्रथम पांटिफा-कडे जातात; त्याच्याकडूही निर्णय न झाल्यास ग्रीकचर्चाचीं दुसरीं धर्मपीठें, जरुशलेम, कान्स्तांतिनोपल इ० ठिकाणीं आहेत, तेथी-ल मतें विचारून निर्णय करितात.

रोमन क्याथोलिक धर्मांत सर्व धर्मकृत्यें लॉतीन भाषेंतच झालीं पाहिजेत असा नियम आहे, परंतु रशियांत चालणाऱ्या ग्रीक च-र्चपंथाचीं कृत्यें देशभाषेंतच होतात. रोमन क्याथोलिक धर्मा-प्रमाणें मोक्षसाधन होण्यास धर्मोपदेशकाचीच मध्यस्ती लागते, परंतु रूसधर्मांत पांद्र्यांच्या वशिल्याशिवाय ईश्वरप्राप्ती हो-ते ! ईश्वराची प्रार्थना अशीच करावी व तशीच करावी, असे कडक नियम या धर्मांत नाहींत; तथापि ख्रिस्ती धर्माचा प्रोते-स्तंत नामक जो सुधारलेला सांप्रदाय आहे त्यापेक्षां रूस धर्मांत हजारों वेडगळ समजुती व मंत्रतंत्र भरले आहेत. आमच्या लोकां-प्रमाणेंच रूसलोकांस उठतांबसतां, निजतां,—प्रत्येक प्रसंगीं धर्माचें लचांड आहेच. परंतु अलीकडे इकडल्याप्रमाणें तिकडेही नवीन विद्येचा प्रवेश झाल्यामुळें बरेच लोक धर्मास एकीकडे ठेवितात ! तथापि धर्मानें बांधले गेलेल्या लोकांची संख्या फारच मोठी आहे.

मुलकी वगैरे राजकीय खात्यांसंबंधानें जसे देशाचे विभाग

कल्पिले आहेत त्याप्रमाणें धर्मखात्यासाठींही केले आहेत. त्यांत लहान लहान खेड्यापाड्यांतून जी भटमंडळी असते त्यांस 'श्वेत' ही संज्ञा आहे व शहरांच्या ठिकाणीं जे मोठ्या पगाराचे धर्मोपदेशक असतात त्यांस 'कृष्ण' म्हणतात. यांपैकीं पहिल्या वर्गांतील भटमंडळीस लग्नें केलींच पाहिजेत असा नियम घालून दिला आहे, परंतु दुसऱ्या म्हणजे 'कृष्ण' वर्गांत येणाऱ्यांस कांहीं हा नियम लागू नाहीं. रशियांतील भटमंडळी बहुधा अक्षरशत्रु असते, व त्यांत उच्च प्रतीचें शिक्षण फारच थोडें असतें. अविवाहित संत व संतिणी ह्यांस रहाण्यासाठीं त्या देशांत अनेक मठ व विहारें बांधलीं आहेत. रशियामध्यें सरकारी पैशानें सुमारें तीन लाख धर्मोपदेशक पोशिले जातात. या धर्मखात्याकडे पूर्वी फार पैसा खर्च होत असे, परंतु पीतर धी ग्रेत झारापासून तो कमी केला इतकेंच नाहीं, तर पुष्कळ दिवस जमलेली देवळांची संपत्ती लुटून तिचा राजकीय कामांकडे खर्च करण्यासही कांहीं पुण्यश्वेत धार्मिक झार चुकले नाहींत! हल्लीं धर्मखात्याकडे रशियनसरकार दोनकोट रुपये खर्चितें.

रशियन लोक अतिशय धर्मभोळे आहेत. त्यांना वर्षांतून पुष्कळ दिवस उपास करावे लागतात व प्रत्येक कृत्यामध्यें कांहीं तरी धर्मसंबंधी आन्हिक असतेंच. रशियामध्यें शेकडों देवालयें व पूज्य स्थानें आहेत व त्यांत कीफ, मास्को व कान्स्तांतिनोपल हीं तर फारच पूज्य आहेत. आमची जशी काशी त्याप्रमाणेंच मास्को शहर रूस धर्माचें अतिपवित्र स्थान आहे. त्या नगरीस 'माता', 'पुण्यभूमी', 'सुधासौधा' इत्यादि अर्थांचीं नांवें आहेत. या शहरांत व आसपास कांहीं जागृत देवालयें, तीर्थ व साधुसंतांच्या समाध्या असून त्यांच्या यात्रा करण्याकरतां हजारों धार्मिक व भाविक रूस लोक तेथें जातात. तुर्की लोकांशीं जेव्हां लढाई झाली व श्वेतझाराचे बावटे कान्स्तांतिनोपलच्या तटबंदीजवळ येऊन ठपले तेव्हां राजकीय महत्वाकांक्षी रूस लोकांस आनंद झालाच, परंतु भाविक लोकांसही तें पवित्र स्थान मिळणार म्हणून अत्यानंद झाला. मोठमोठ्या शहरांतून

जातांना रस्त्यांत पुष्कळ देवळें लागतात त्यांपुढें भाविक लोक प्रत्येक वेळीं गुढगे टेंकितात व नमन करितात. प्रवासास जाणें, कांहीं उद्योग हातीं घेणें, शेत लावणें व कापणें, वगैरे गोष्टींत कांहीं मंत्रतंत्र व शुभ मुहूर्त पाहिजेच. भाविक व जुन्या तऱ्हेच्या रशियन गृहस्थांचा बहुतेक काळ धर्मकृत्यांत जातो. हे लोक भुतेंखेतें, मंत्र गंडे, ताईत जादुटोणा, किमया, भविष्यें वगैर गोष्टींत पूर्ण विश्वास ठेवितात. यांशिवाय नवसपानस तर आहेतच ! अर्धवेडे, भविष्य सांगणारे व कांहीं तर वेडेंविद्रें बडबडणारे लोक साधु मानले जाऊन त्यांच्या पाठीस शेकडों बाया व भाविक भक्त लागतात. अविवाहित राहून मठांमध्यें देवकृत्यांतच जन्म घालविणाऱ्या स्त्रिया रशियांत पुष्कळ आहेत.

रशियन लोक इतके धर्मभोळे आहेत तथापि त्यांचा इतर धर्मांस उपद्रव नाहीं. खुद्द रशियांतच कांहीं भागांत चर्चें व मशिदी जवळ जवळ असतात तथापि तंटे होत नाहींत. त्याचप्रमाणें आपला धर्म जुलमानें दुसऱ्यावर लादावा अशाबद्दल प्रयत्न रूसलोक करतात अशी ही माहिती मिळत नाहीं. तथापि यहुदी लोकांस मात्र रूसधर्माचे लोक पाण्यांत पहातात यामुळें यहुदी लोक बहुतकरून शहरांतच रहातात; त्याचप्रमाणें त्यांच्याच धर्मांत जे पंथ निघाले, त्यांचा छळ अतिशय झाल्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. रशियन लोक धार्मिक असल्यामुळें त्यांच्या दानधर्मावरच शेंकडों भिकारी पोट भरतात. अतिथी म्हणजे पवित्र असें ते मानितात व त्याचप्रमाणें त्यांचें वर्तनही असतें. खुद्द रूसदेशांत १८७९ सालीं निरनिराळ्या धर्मांची लोकसंख्या पुढें दिल्याप्रमाणें होती.

	कोटी.	लक्ष.
रूस ग्रीकचर्च धर्माचे	६	४०
रोमनक्याथोलिक		८९
प्रातस्तंत		२०
याहुदी		२०
मुसलमान		२०
हिंदु, बौद्ध वगैरे		$\frac{१}{२}$

प्रकरण २ रें.

देशाच्या स्वरूपाचे व हवेचे रूस लोकांवर परिणाम—आर्यलोकांचा युरोपांत प्रवेश—मोंगलांच्या स्वाऱ्या, प्राचीन इतिहास—पारतंत्र्य—ऊर्जित स्थिति—पितर धि ग्रेट—युरोपाची स्थिति—क्याथराईन—रशियाचा उत्कर्ष—फ्रेंचराज्यक्रांति—व नेपोलियनाचीं युद्धें—झार निकोलस—क्रिमिया व तुर्कस्थान एथील लढाया इ०

या प्रकरणांत रूस लोकांचा प्राचीन काळापासून आजपर्यंतचा इतिहास थोडक्यांत दिला आहे.

युरोपखण्डाचे सामान्यतः त्याच्या स्वरूपावरून दोन भाग कल्पिले पाहिजेत. सर्व खण्डाचें क्षेत्रफळ ठोकळ प्रमाणानें ४० लक्ष चौ. मैल आहे; त्यापैकीं १८ लक्ष चौ. मैल पश्चिम युरोपांत व २२ लक्ष चौ. मैल पूर्वेकडील भागांत येतात. रशिया खेरीज करून इतर राष्ट्रें पश्चिमभागांत आहेत व सगळा पूर्वभाग श्वेतझारांच्या ताब्यांत आहे. पश्चिमेकडील भागांतील लोकांच्या स्थितिमध्यें व पूर्वभागांतील लोकांच्या स्थितीमध्यें जो एवढा भेद झाला आहे त्याचें कारण देशांच्या स्वरूपांत, हवेंत व लोकांच्या अन्नांत शोधिलें पाहिजे. झारांच्या अंमलाखालीं युरोपाचा जो मोठा भाग एकवटला आहे तो त्यांच्या राजकारस्थानांमुळें तर खराच, परंतु त्या भागाचें स्वरूप व रचना हीं अशीं आहेत कीं तेथील लोकांमध्यें साहजिकच ऐक्य व्हावें. पश्चिमयुरोपाचे किनारे सरळ नसून त्यांत जागोजाग शेकडों अखातें, उपसागर, खाड्या, वांकणें वगैरे आहेत, यामुळें तेथील लोकांस समुद्राचें सांनिध्य झालें आहे. पश्चिमयुरोपाच्या किनाऱ्याची लांबी, त्याच्या क्षेत्राच्या मानानें फार मोठी आहे; परंतु रशियाचा विस्तार मोठा असून ही समुद्रकि-

नारा फार थोडा आहे, व त्यांत ही जो आहे त्यापैकीं पुष्कळ निरुपयोगी आहे. पश्चिमयुरोपांतील प्रत्येक देशास समुद्र जवळ आहे, परंतु रशियाच्या मैदानांत रहाणाऱ्या लोकांस समुद्राची कल्पनाही नाहीं. उत्तरेकडे बर्फाच्छादित हिमसागर, पश्चिमेस बालतिक समुद्र, व दक्षिणेस काळा समुद्र हींच कायतीं रशियाला बाह्य देशांशीं संबंध ठेवण्याचीं द्वारें आहेत. उत्तरसागर तर हिममय व निर्जन प्रदेशास लागून असल्यामुळें त्याचा उपयोग नाहीं. त्याचप्रमाणें बालतिक समुद्र कांहीं महिने खरीज करून थिजलेला असतो. या थिजलेल्या समुद्रावरून स्विदनच्या प्रख्यात चार्लस राजाचीं सैन्यें चालत गेलीं आहेत ! फक्त जून पासून सप्टेंबर महिन्यापर्यंत या समुद्रांतून गलबतें चालतात. दक्षिणेकडे, कास्पियनसमुद्राचा सुद्धां बराच भाग कांहीं महिने गोठून जातो; बाकी काळा समुद्र मात्र रशियाच्या उपयोगीं पडण्यासारखा आहे. इतक्यावरून पश्चिम युरोपापेक्षां व्यापाराचीं व दळणवळण ठेवण्याचीं साधनें रशियांला कमी आहेत हें उघड दिसेल.

पश्चिम युरोपाची जमीन सपाट मैदान नसून त्यांत जागोजाग मोठमोठे पर्वत आहेत. हिमालयाच्या खालोखाल मोठा पर्वत आल्पस् ह्मणून आहे त्याच्या शाखा फ्रान्स, इटाली, जर्मनी व आस्त्रिया या देशांत पसरल्या आहेत. शिवाय स्पेन, आस्त्रिया, हंगारी, स्विदन, नार्वे इत्यादि देशांतसुद्धां लहान मोठ्या पर्वतांच्या पुष्कळ रांगा आहेत, यास्तव त्या प्रदेशांस स्वरूपवैचित्र्य प्राप्त झालें आहे. परंतु रूसदेशाचा प्रकार अगदीं भिन्न आहे; त्या अफाट देशाच्या हद्दींवर मात्र कांहीं पर्वत आहेत. त्यांत दक्षिणेकडील काकेसस पर्वताची रांग बरीच उंच आहे, परंतु युरोपाची हद्द जी उरलपर्वत त्याची सरासरी उंची आमच्या इकडील सह्याद्रिइतकी आहे. या पर्वतांतून उत्पन्न झालेल्या नद्या मोठ्या नाहींत यामुळें यांचा वास्तविक उपयोग रूसदेशास विशेष नाहीं. त्या देशांतील बहुतेक मोठ्या नद्या ३०० फूट उंचीच्या टेंकड्यांतून निघतात. यावरून पश्चिम

युरोपांतील स्वरूपांत व रूसदेशाच्या स्वरूपांत हा दुसरा भेद आहे, हेंही स्पष्ट दिसेल. रूसदेश ह्मणजे एक मोठें मैदान असून त्याच्या स्वरूपांत वैचित्र्य नाहीं. सपाट मैदान असल्यामुळें ध्रुवाकडून वाहणारे थंड वारे अव्याहत चालतात हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. त्याशिवाय समुद्रकिनारा फार नसल्यामुळें, समुद्राच्या खाऱ्या वाऱ्यांनीं हवेंत जी ऊब येते ती रूसदेशाच्या हवेंत येत नाहीं. यामुळें रशियाच्या हवेंत काय चमत्कार झाले आहेत तें मागें सांगितलेंच आहे. सेंतपितर्सबर्ग शहरांत दिनमानाचें प्रमाण दोन महिन्यांपासून पांच तासांपर्यंत लहान होतें; उत्तरेकडील प्रदेशांत दीर्घ रात्रींतून आकाशांतील तेजाचा प्रकाश सदा पडतो व दक्षिणेकडील रखरखित वाळवंटांतून मृगजळ तरंगत असतें; उत्तरेकडे सदोदित थंडी असते व दक्षिणेकडे प्रखर उन्हाळा असतो. तसेंच हा देश सपाट असल्यामुळें भूगर्भांतील खनिज पदार्थांचे थर क्षितिजाशीं समांतर आहेत. ज्या देशांत उंचनीच प्रदेश असतात, तेथें ह्या थरांची रचनाही तशीच होते, यामुळें डोंगराळ प्रदेशांतून खनिज पदार्थ मनुष्याच्या उपयोगीं पडण्यासारखे हाताजवळ वर आलेले असतात. या कारणांमुळें रशियांत दगड मिळत नाहींत. लांकूड मात्र मुबलक आहे. पश्चिम युरोपाला जर शिलामय ह्मटलें तर या पूर्व भागास काष्ठमय हें विशेषण शोभेल. रशियांतील शहरें व गांवें, सर्व लांकडी असल्यामुळें तेथें आगीचें फार भय असतें. मास्को शहराचा होम पुष्कळदां झाला आहे. पीतर धी ग्रेतानें सेंतपीतर्सबर्ग शहर मोठ्या खर्चानें दगडानें बांधून वसविलें आहे. रशियामध्यें आगी इतक्या वरचेवर लागतात कीं, दर सात वर्षांनीं त्या देशांतील शहरें व गांवें नवीं होतात, अशा अर्थाची त्यांच्या भाषेंत ह्मणच पडली आहे.

एवढ्या विस्तीर्ण, परंतु ज्याला समुद्रकिनारा थोडा, अशा देशाला नद्यांचें महत्व असलें पाहिजे. रशियाला नद्यांपासून केवढ्या सोई झाल्या आहेत हें मागें सांगितलेंच आहे व ही

गोष्ट इतिहासावरूनही सिद्ध होणार आहे. जेव्हां जेव्हां रूस देशांतील राजांना स्वारीशिकारीस बाहेर पडावें लागे, तेव्हां ते हिंवाळ्यांत तरी निश्चत असत किंवा हिंवाळा संपल्यावर नदी तीरांनीं जात. कारण हिंवाळ्यांत त्या देशांत नीपर नदीपासून उरल-पर्वतापर्यंत व काळ्या समुद्रापासून उत्तरेकडे श्वेत समुद्रापर्यंत सर्व प्रदेश गुळगुळीत बर्फानें झांकून जातो तेव्हां त्यावरून विन चाकी गाड्यांतून प्रवास करणें फार सुलभ होतें, परंतु उन्हाळ्यांत नौकांचाच उपयोग करणें भाग पडे. ज्या मार्गांनीं या स्वाऱ्या होत त्याच मार्गांनीं व्यापार व धंदे चालत. रूस देशाच्या प्राचीन इतिहासांतील बहुतेक गोष्टी नद्यांच्या तिरांवरच घडल्या व त्या देशांत नद्यांच्या थडयांवरून प्रथम वसाहति झाल्या. रूस लोकांची मोठमोठीं संस्थानें या नद्यांच्या बाजूवरच होतीं. प्राचीनकाळचें नोवगोरोड, कीफ, काझान, वगैरे शहरें मोठ्या नद्यांवरच्च वसलीं आहेत व हल्लींही तोच प्रकार दिसतो. ८ व्या शतकांत रशियाची राजधानी नोवगोरोड नेवानदीवर होती: एकहजार वर्षांनीं नेवेच्या तिरावरच सेंतपीतर्सबर्ग वसलें. या देशांत मोठमोठ्या नद्यांच्या उगमाचें स्थान एकच असून त्या सर्व दिशांकडे जातात व आतां तर कालव्यांचे योगें त्या एकत्र झाल्या आहेत.

रशियाच्या प्राचीन इतिहासाच्या गोष्टी नीपर नदीच्या कांठांवर घडल्या. नोवगोरोडच्या दक्षिणेस कीफही दुसरी राजधानी तिच्या कांठीं झाली, व रूसांची दक्षिणेकडील सुधारलेल्या ग्रीक लोकांशीं ओळख झाली आणि काळ्या समुद्राशीं व कान्स्तांतिनोपलशीं त्यांचा व्यवहार याच नदीनें सुरू झाला. सर्वांत मोठी जी वोल्गा, जिला रूस लोक 'माता' म्हणतात, तिचा तर रशियन इतिहासाशीं फारच संबंध आहे. तिच्या कांठांवर जो व्यापार धंदा चालतो तसा त्या देशांत दुसऱ्या कोठेंही चालत नाहीं. तिला मिळणाऱ्या ओका नामक एका मोठ्या नदीच्या संगमावर निज्ननोवगोरोड शहर वसलें आहे. तेथें वार्षिक जत्रा भरते व त्यावेळीं युरोपांतून व एशियेंतून लाखों मनुष्य जमतें आणि तेथें कोट्यावधि रुपयांची घंडामोड

होते. वोल्गा ह्मणजे रशियन लोकांना एक समुद्रच आहे. तिचें पात्र रुंद आहे व त्यांत पाणीहि पुष्कळ असतें. परंतु जर ती नदी थंडीच्या दिवसांत न थिजती, तर तिच्या कांठीं अतिशय व्यापार चालता. तिच्या कांठांवर हल्लीं २ लाख मजूर व कारागीर उद्योग करितातः तींत १९ हजार गलबतें व पांचशें आगबोटी उन्हाळ्यांत हमेशा खेळत असतात. तिच्या तीरावरील कोस्त्रोमा, निज्ननोवगोरोड, समारा, कझान, सारातव्ह, आस्त्राखान वगैरे शहरांतून व्यापाराची गजबज चालली असते. या नदीच्या योगानें रुसांचा एशियेशीं संबंध जुळला व नेवा नदीच्या योगानें त्यांचा सुधारलेल्या पाश्चिम युरोपाशीं व्यवहार सुरू झाला.

रशियांतील नदीप्रवाहांच्या मार्गांनींच तेथील इतिहासांतील मोठमोठ्या गोष्टी घडल्या हें पुढील इतिहासावरून वाचकांस कळेल. हें जें स्वरूपवर्णन पुनः दिलें त्यावरून वाचकांस उघड दिसेल कीं पश्चिम यूरोपापेक्षां पूर्व यूरोप सर्व प्रकारें भिन्न आहे. यामुळेंच तेथील राहिवाशांच्या आचारविचारांत व चालचर्येंत भेद दिसून येतो. तो भेद कोणता वगैरे माहिती हें पुस्तक वाचतांना क्रमाक्रमानें पुढें कळून येईल.

कोणत्याही देशाच्या इतिहासाचा अभ्यास करतांना प्रथमतः त्या देशांच्या स्वरूपाचे व हवेचे परिणाम तद्देशीयांवर काय झाले आहेत तें कळलें ह्मणजे तेथील इतिहासांतील गोष्टींचीं सांगड नीट बसवितां येते. रशियाला समुद्र नसल्यामुळें व तेथील हवाही फार कडक असल्यामुळें तेथील लोकांच्या अंगीं युरोपांतील इतर लोकांपेक्षां व्यापाराचें धाडस कमी आहे हें उघड आहे, व त्याप्रमाणेंच ज्ञानमार्गांतही त्या लोकांचें मागें पाऊल पडण्याचें व्यक्त कारण हेंच होय. तथापि रशियाला सभ्यांची स्थिति प्राप्त होण्यास यांशिवाय जीं अन्य कारणें झालीं तीं पुढें दिलीं आहेत.

भाषाशास्त्राचा अभ्यास सुरू झाल्यापासून युरोपियन पंडितांनीं असें एक प्रमाण सिद्ध केलें आहे कीं,—जुन्या व प्राचीन

काळापासून भिन्न आणि अलिप्त राहिलेल्या लोकांच्या भाषांतून, मनुष्याच्या रानटी स्थितींत सुद्धां ज्या शब्दांची गरज लागते, असे कांहीं शब्द एकाच रूपाचे सांपडल्यास, त्या भाषा बोलणारे लोक कधीं तरी पुरातनकाळीं एक असावे. या विचारावर वाद करीत न बसतां हें प्रमाण घेऊन चालूं तर संस्कृत, झेंद, ग्रीक लातिन, या व यांपासून निघालेल्या मराठी व बंगाली, फ्रेंच, जर्मन व इंग्लिश इत्यादि अनेक प्राकृत भाषा बोलणाऱ्या लोकांचे पुराणपूर्वज एकाच कुटुंबांतून निघाले आहेत असें मानावें लागतें, व यानांच आर्य म्हणतात. वेदांपासून आम्हीं आमच्या पूर्वजांस आर्य म्हणत आलों. अलीकडे युरोपियन लोकांस संस्कृत भाषा मिळतांच त्यांनींही वरील नियमाच्या अनुमानानें आपले पूर्वजही आर्यच होते असा तर्क बांधिला आहे. या आर्यांच्या सामाजिक संबंधाची अत्यंत महत्वाची माहिती आमल्या पूज्य वेदांतील सूक्तांवरून व पार्शी लोकांच्या झेंदावस्ता नामक पवित्र ग्रंथावरून काढतां येते. आर्यलोक मूळचे हिंदुस्थानच्या वायव्य दिशेकडून इकडे आले असें म्हणण्यास बरेच दाखले सांपडले आहेत, त्यांवरून त्यांची वस्ती हिंदुकुशपर्वताच्या दक्षिण उतरणीपासून आक्सस नदीच्या किनाऱ्यापर्यंत पसरली असावी असें अनुमान बांधिलें आहे. आर्य लोकांनीं आपल्या मूळस्थानांत असतांच स्वास्थ्याचें धंदे आरंभिले असावे. वेदांवरून तर गृह, नगर, दुर्ग, राजा, ब्राह्मण, यज्ञ, यजमान, कृषिकर्म, इत्यादि गोष्टी आर्यांना माहित होत्या असें दिसतें. त्यांच्या कुटुंबरचनेंत बापाचा किंवा दुसऱ्या वडिलांचा कडक अम्मल असे, व अशाच कुटुंबांतील यजमानांचा अम्मल सामाजिक गोष्टींमध्यें चाले. परंतु पुढें कांहीं काळ लोटल्यावर बाहुशक्तीवर व दुसऱ्या कांहीं अन्य प्रकारांनीं एक क्षत्रिय वर्ग बनला, व त्यांतूनच पुढें कित्येक पुरुष स्वतःच्या धूर्ततेनें, शक्तीनें, लबाडीनें व चातुर्यानें दुसऱ्यांवर आपला पगडा बसवून, राजे झाले. परंतु आमच्या पूर्वजांच्या समाजांची—गाई पाळून चारा मिळेल तेथें स्थलांतर करणें व मृगया किंवा लुटीवर उदरनिर्वाह करणें

—इत्यादि गुराखी किंवा पारध्यांसारखी आयुष्यवृत्ति संपून, अशी सुधारलेली रचना होण्यास किती काळ लागला असेल याची कल्पना करतां येत नाहीं. तथापि बैबलनामक बालिश कथांनीं भरलेल्या ख्रिस्ती धर्मपुस्तकांत मनुष्योत्पत्तीचा जो काळ दिला आहे त्याच्या पूर्वीच आर्यांच्या सामाजिक रचनेंत घडामोडी होऊं लागल्या होत्या असें ह्मणतां येतें. आतां या आर्यांच्या ज्या टोळ्या युरोपांत व इराणांत शिरल्या त्यांचा कालक्रम देण्यास साधारण प्रमाणें दारवाडिणें कठीण आहे. तथापि युरोपांतील आर्य जातींच्या प्राचीन विश्वसनीय इतिहासावरून त्यांची सामाजिक रचना त्या काळीं कशी होती, आतां कशी आहे व आतां जो भेद दिसतो तो होण्यास मध्यंतरी किती वायव्या ओलांडाव्या लागल्या, हा वृत्तांत मिळेल तर आर्यलोकांची टोळी ग्रीक देशांत कोणत्या स्थितींत असतांना शिरली हें अनुमान बांधतां येईल.

रशियांत, इराणांत व हिंदुस्थानांत शिरलेल्या आर्यांच्या संबंधानें हाच प्रश्न विचारला ह्मणजे त्या देशांत आर्य कोणत्या स्थितींत शिरले हें कळेल. आमच्या देशांतील जुनाट समाजरचनेबद्दल श्रुति—स्मृतींवरून, इतिहासपुराणावरून व दंतकथांवरून जे दाखले मिळतात त्यांवरून क्षत्रिय वर्ग बनून राजांचा अंमल चालू झाल्यावर आर्य इकडे आले असावे. आमचें असें ही मत आहे कीं, आर्य लोक या देशांत आल्यावरच त्यांनीं इतर रानटी दस्यु वगैरे लोकांपासून भेद दाखविण्यासाठीं, आपणांस आर्य (श्रेष्ठ—सुधारलेले) ही संज्ञा लावली. युरोपांत ज्या टोळ्या गेल्या त्यानीं या संज्ञेचा जरी उपयोग केला नसला तथापि या चोहोंकडे फांकलेल्या सर्व टोळ्या एकाच स्थलाच्या असत त्यांच्या भाषेच्या आधारावरून आणि त्यांच्या मानसिक प्रवृत्तीच्या लक्षणांवरून अनुमान बांधतां येतें. युरोपांत गेलेल्या आर्यलोकांपैकीं रशियांत गेलेल्या टोळीस राजा माहित नसावा असें दिसतें. कुटुंबांतील मुख्यांच्या सामान्य मतावर अद्यापि ही त्यांची समाजव्यवस्था अवलंबून

आहे. तसेंच राशियांत नोवगोरोद येथें जें प्राचीन काळी स्लॉव लोकांचें राज्य होतें त्यांत राजा नसून सर्व व्यवस्था लोकांतील धुरीणांकडेच असे.या धुरीणांला आणि त्याबरोबर कुटुंबांतील मुख्यांनांही एकीकडे कोपऱ्यांत घालवून स्वतः अंमल चालविणारे राजे होण्यास राशियांत फार काळ लोटला; म्हणूनच अद्यापि राशियन ग्रामरचनेंत कुटुंबांतील मुख्यांचाच हात फार आढळतो. युरोपाच्या दक्षिणेस जे आर्य गेले ते जास्त सुधारले होते. त्यांनीं ग्रीस, इतालि वगैरे देशांत आपली पूर्ण सत्ता बसवून मानवी सुधारणेची पुष्कळ वृद्धि केली. राशियांत गेलेल्या स्लॉव नामक आर्य लोकांस या सुधारणेचा संसर्ग पोंचला नाहीं. विशेषतः त्यांवर त्युरेनियत नामक अनार्य शाखेच्या अडाणी लोकांनीं वारंवार स्वाऱ्या केल्यामुळें त्यांना सुधारणा करतां आली नाहीं परंतु उलट ते जास्त रानटी बनले. या स्लॉव लोकांविषयीं साधार माहिती इ० स. च्या सहाव्या शतकापासून थोडी थोडी मिळते. तेव्हां हे स्लॉव नामक लोक राशियांत रहात होते, असें ग्रीक ग्रंथावरून कळतें.

लोकसंख्या जास्त झाल्यामुळें उदरनिर्वाहासाठीं आर्यलोकांच्या तीन मोठ्या झुंडी युरोपांत शिरल्या, त्यांत "सेल्त" संज्ञेखालीं येणारी टोळी मध्ययुरोपांतून पार जाऊन पश्चिमसागराच्या किनाऱ्यावर पोंचली.त्यांच्यामागून त्युतान नामक दुसरी टोळी आली. तिचा अंमल युरोपांतील दक्षिणेकडील व उत्तरेकडील प्रदेशांपर्यंत होऊन त्यांनीं मार्गांत आढळणाऱ्या व आपल्या अगोदर आलेल्या, सेल्त लोकांस पश्चिमेकडे हांकिलें. शिवाय कित्येक त्युरेनियन अनार्य लोकांबरोबरही त्यांना युद्धप्रसंग करावे लागले. यांच्याबरोबर किंवा मागाहून तिसरी एक आर्यांची टोळी युरोपांत शिरली व तिनें आपला प्रवेश हल्लींच्या राशियाखालीं मोडणाऱ्या प्रदेशांत केला. या टोळीस स्लॉव ही सामान्य संज्ञा आहे. या स्लॉव शब्दाचा, स्लेव्ह म्हणजे दास असा अर्थ असावा असा तर्क करण्याचें कारण नाहीं. स्लेव्ह हा दास्यवाचक शब्द जरी स्लॉव या पदापासूनच निघाला आहे तथापि

तो अर्थ मूळचा नसून नंतर आलेला आहे. कारण कांहीं काळपर्यंत युरोपांत स्लॉव लोकांतलेच गुलाम फार असत. स्लॉव या शब्दाचा हा पुढें झालेला वाईट अर्थ लक्षांत न घेतां, एवढें खरें आहे कीं, स्लॉव हे स्वतंत्र लोक आर्यशाखेचेच असून त्यांनीं आपल्याबरोबर बरीच आर्यसुधारणा रशियांत नेली होती. आर्यलोक जेथें जेथें गेले तेथील मूळच्या रहिवाशांस त्यांनीं जिंकलें व आपलें वर्चस्व स्थापन केलें. त्याच प्रमाणें स्लॉव लोकांनीं रशियांतील डॉन, वोल्गा, निपर वगैरे नद्यांच्या तीरांवर आढळलेल्या फिन व लॉप नामक अनार्य त्युरेनियन लोकांस उत्तरेकडील कोपऱ्यांत हांकवून दिलें.

आर्यांच्या ज्या टोळ्या युरोपांत गेल्या त्यांत स्लॉव नांवाची टोळी फार मोठी होती. या टोळीनें, पश्चिमेस एल्ब नदीपासून दक्षिणेस दान्यूब नदी व काळासमुद्र ह्यांपर्यंत रेघा मारिली असतां पूर्वेकडे व उत्तरेकडे जो विस्तीर्ण प्रदेश सांपडतो, तो काबीज केला होता. हे लोक स्वोर्ग (स्वर्ग ?) नामक एका श्रेष्ठ देवाचें व शिवाय पुष्कळ अन्य क्षुद्रदेवतांचें स्तवन करीत आणि त्यांस यज्ञ देत. कुटुंबांत वडिलांची सत्ता असून सर्व कुटुंबें मिळून एक व्होलोस्त किंवा ग्रामसभा होत असे. गांवाची सर्व जमीन लोकांकडे असून गांवास गोरोद (नगर) ह्मणत. बैझन्टाईन (कान्स्तांतिनोपल) च्या इतिहासांवरून असें दिसतें कीं हे स्लॉव नांवाचे आर्यलोक बलाढ्य, शूर व क्रूरकर्मे होते. परंतु अतिथींचें आदरातिथ्य करण्याविषयीं ते फारच उत्सुक असत. पति मरण पावल्यावर त्याच्या शवावरोबर स्त्रियांनीं सहगमन करण्याची चाल त्या लोकांत होती; तसेंच ज्यास्त मुली झाल्या तर त्यांचे प्राण घेण्याची दुष्ट व क्रूर चालही होती.

आर्यलोक जिकडे गेले तिकडे त्यांनीं आपली सत्ता स्थापून सुधारणा केली. परंतु रशियांत गेलेल्या स्लॉव लोकांस त्युरेनियन लोकांच्या अंमलाखालीं पुनः यावें लागलें. हून, फिन, लॉप इत्यादि अनार्य रानटी लोकांबरोबर त्यांस यूद्धें करावीं

लागलीं व त्यांच्या सहवासानें स्लॉवलोकही रानटी बनले आणि त्यांना दिवसेंदिवस ज्यास्त शत्रु उद्भवले. या स्लॉवलोकांनीं नोवगोरोद व कीफ हीं शहरें वसविलीं होतीं. हिंदुस्थान, इराण, ग्रीस, रोम इत्यादि ठिकाणीं गेलेल्या आर्यांनीं मानसिक व जडपदार्थविषयक शास्त्रांमध्यें फार सुधारणा केली, परंतु या स्लॉवलोकांची गति मागें फिरली. ग्रीस व रोम येथें सुधारणेची जी परमावधि झाली तिचा गंधही यांस लागला नाहीं. पुढें इ० स० ८६२ पासून या लोकांच्या इतिहासाचा थांग लागतो. याच्यापूर्वीच सुधारलेलीं ग्रीक व रोमन राष्ट्रें कालचक्राच्या फेऱ्यांत सांपडून लयास गेलीं होतीं. ग्रीसदेशास मासिदोनच्या रानटी लोकांनीं जिंकलें व रोमनलोकांस गॉथ, वांदाल, हून इत्यादि रानटीच लोकांनीं नाहींसें केलें. या दोन राष्ट्रांच्या भरभराटीच्या वेळीं स्लॉवलोक कोठें होते याची वार्ताही नव्हती.

नोवगोरोद वगैरे शहरांची व्यवस्था सार्वजनिक मतानें होत असे, परंतु पुढें आपसांत कलह होऊन दुफळ्या झाल्या. तेव्हां एका पक्षानें बाल्तिक समुद्राच्या किनाऱ्यावरील, त्युरेनियन अनार्य लोकांपैकीं एका रानटी जातीच्या "रूस" नामक कुटुंबाला मदतीस बोलाविलें. या कुटुंबांत तिघे भाऊ होते, त्यांत वडिलाचें नांव रुरिक असें होतें. या भावांनीं ही आयती संधि सांपडतांच आपल्या इष्टमित्रांस गोळा करून स्लॉव लोकांवर स्वारी केली. त्यांनीं जो मुलुख जिंकला त्यास 'रुस्काया' हें नांव दिलें व त्या नांवापासूनच 'रशिया' हें नांव निघालें. ही गोष्ट इ० स० ८६२ च्या सुमारास घडली. रुरिक ह्यानें नोवगोरोद शहर घेऊन त्यास तटबंदी केली, इतक्यांत त्याच्याच जातीपैकीं दुसऱ्या कांहीं लोकांनीं त्याच्या संमतीनेंच स्लॉवांचें दुसरें शहर कीफ हें काबीज केलें. या घराण्याचा अंमल दिवसेंदिवस वाढत गेला व त्यांनीं कान्स्तांतिनोपल येथें जी रोमन बादशाही स्थापन झाली होती तीवर स्वाऱ्या करण्यास प्रारंभ केला. इ० सनाच्या नवव्या शतकांत युरोपखंडात रानटी लोकांनीं अनर्थ उडवून दिला

होता. जुन्या रोमन राज्याचा नाश झालाच होता, त्याप्रमाणेंच पूर्वेकडील रोमन राज्यावर वरील प्रसंग गुदरला होता; परंतु या स्वाऱ्यांत रानटी लोकांस कांहीं लाभ न होतां त्यांचा नाश झाला. हा नाश झाल्यापासून या रानटी लोकांत ख्रिस्ति धर्माबद्दल भक्ति उत्पन्न झाली व तो धर्म माहीत करण्याविषयीं ते खटपट करूं लागले. ही जी हकीकत दिली त्यावरून दिसेल कीं रशियनांचें पहिलें राजघराणें स्लॉव लोकांपैकीं नसून त्युरेनियनांपैकीं होतें. अलीकडे मात्र रशियांत इतिहासाचें ज्ञान झाल्यापासून स्लॉव शब्दाला महत्व चढलें आहे. स्लॉव जाती एक आहे व त्याबद्दल सर्वांस पूर्ण अभिमान असावा असें प्रतिपादन करणारे लोक रशियांत पुष्कळ निघाले आहेत. तेच आतां रशियांतील जुन्या मतांचे पक्षपाती आहेत. स्लॉव लोकांच्याच चाली व रीति उत्तम, त्या सोडून जात्याभिमानी लोकांनीं पाश्चात्यांच्या चाली घेऊं नये, असें ते प्रतिपादन करतात. या मतांच्या लोकांस स्लॉवोफिल् (स्लॉवांचे मित्र) असें म्हणतात.

रानटी रूस घराण्याचा अंमल बसून जेव्हां स्लॉव लोक हतवीर्य झाले तेव्हांपासून त्यांस सुद्धां 'रशियन' ही सामान्य संज्ञा देण्याचा प्रचार पडला आहे. हल्लीं रशियांतील लोकसंख्येंत स्लॉवांचें प्रमाण शेंकडा पाउणशें आहे, तथापि सर्वांस 'रशियन' म्हणतात.

रुरिकच्या मागून जे राजे गादीवर आरूढ झाले त्यांनीं आपला अम्मल दक्षिणेकडे पुष्कळ पसरिला व त्यांची हद्द, हल्लीं बलगेरिया, सर्विया नांवाखालीं मोडणाऱ्या देशांत पोंचली. या कारणामुळेंच अद्यापि युरोपांतील तुर्कस्थानांत स्लॉवलोक फार आहेत. या स्लावांच्या अभिमानास पडून व त्यांना मुसलमान सुलतानापासून जो जाच पोंचतो तो न व्हावा म्हणून, रशियांतील स्लॉवोफिल् पक्षाच्या लोकांनीं, तुर्कस्थानाशीं लढाई करण्याचें झारास उत्तेजन दिलें. म्हणून १८७७।७८ त तुर्कस्थानाचा व रशियाचा संग्राम झाला. या लढाईचें हें एकच कारण नाहीं, परंतु ह्याचा अंश बराच होता.

रशियन लोकांच्या इतिहासांत दुसरी पायरी ह्मणजे ख्रिस्ती धर्माचा स्वीकार. रूरिकच्या वंशजांनीं कान्स्तांतिनोपलवर स्वाऱ्या करण्याची सुरवात केल्यामुळें त्यांची व ख्रिस्तीलोकांची ओळख झाली व त्या धर्माचा स्वीकार करण्याची त्यास इच्छा झाली. अ-खेरीस रूरिकच्या गादीवर बसलेल्या व्लादिमर नामक राजानें इ. स. ९८८ त या नवीन धर्माचा स्वीकार केला. त्यानें ज्या दिवशीं बाप्तिस्मा घेतला त्याच दिवशीं त्याच्या प्रजेपैकीं दुस-ऱ्या २०,००० लोकांनीं येशूच्या कळपांत जुलुमानें प्रवेश केला. ह्या धर्माचा अंगीकार करण्यापूर्वी त्या राजाच्या मनांत मुसलमान धर्मांत शिरण्याचा बेत होता; परंतु दारु पिण्याची परवानगी पाहिजे होती ह्मणून त्यास ख्रिस्तीधर्मच बरा वाटला.ह्या राजानें धर्मां तर केल्यावर आपल्या पूर्व धर्माच्या मूर्तींचा विध्वंस केला, देवळें मोडलीं व चोहोंकडे क्रूस उभारिले. बल्गेरिया देशांत मुसल-मान लोकांचा प्रवेश झाला ह्मणून सांगितलें, त्यांना ही आपल्या कळपांत ओढण्यासाठीं त्यानें उपदेशकांस पाठविलें. व्लादिमर यानें धर्माबरोबरच कास्तांतिनोपल येथील ग्रीक ख्रिस्त्यांची सुधा-रणाही आपल्या देशांत नेली व ख्रिस्तीधर्माच्या मंक (महंत, भिक्षु.) लोकांस नेऊन लोकशिक्षणास प्रारंभ केला. ख्रिस्तीधर्मा-चा अंगीकार केल्यामुळेंच या रानटी रशियनांस थोडें ज्ञानाचें वारें लागलें. या काळापासून पुढें रशियांत दोन भाषा सुरू झा-ल्या, एक रशियन व दुसरी स्लॉव भाषा. या दुसरींतच ख्रिस्ती-धर्माचीं पुस्तकें लिहिलीं आहेत. हा राजा इ० स० १०१५ त मरण पावला. तेव्हांपासून रूस लोक त्याला देवाप्रमाणें मानतात.

ह्या ठिकाणीं, जगाच्या सुधारलेल्या भागांत ज्या उलाढाली झाल्या त्यांचा थोडा उल्लेख करून, वाचकांपुढें त्या काळाचें ल-हानसें चित्र मांडावें असा आमचा उद्देश आहे.

इसवीसनाच्या पांचव्या शतकापासून १२व्या शतकापर्यंत जगा-मध्यें व विशेषतः युरोपामध्यें राजकीय व धर्मसंबंधी मोठमोठ्या घडामोडी झाल्या, तशा त्या काळापासून पुढें झालेल्या दिसत नाहींत. या घडामोडींचा समाजांवर जो कांहीं बराबाईट परिणाम

झाला तो अद्यापि ही दृष्टोपत्तीस येत आहे. अशा इतिहास दृष्ट्या महत्वाच्या कालांत जगामध्यें जीं पूर्वीं नावाजलेलीं राज्यें होतीं तीं लयास गेलीं व त्याप्रमाणें प्राचीन प्रसिद्ध धर्मांचा लोप होऊन त्यांच्या जागीं सध्याच्या धर्मांची योजना झाली. ग्रीक लोकांचें नावाजलेलें राज्य जाऊन कांहीं काल गेला नाहीं तोंच जगद्विख्यात रोमक पत्तनाचा ऱ्हास झाला व तोही अज्ञान रानटी लोकांकडून ! रोमनलोकांच्या राज्याचे याच सुमारास दोन विभाग झाले; त्यांपैकीं कान्स्तांतिनोपल या ठिकाणीं बादशाही चालू झाली. इ. सनाच्या पांचव्या शतकांत रोमन पादशहांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारिला. इटालि देशांत रोम येथें व पूर्वेकडे कान्स्तांतिनोपल येथें कांहीं कालपर्यंत रोमन राज्य रडतखडत चाललें होतें. त्यांत पूर्व विभागच जरा जोरावर होता. परंतु पश्चिमेकडील विभागास ज्याप्रमाणें जर्मन जातींनीं स्वाऱ्या करून नाहींसें केलें, त्याचप्रमाणें पूर्वेकडील गादीस इराणांतल्या पारसिक लोकांपासून उपद्रव पोंचला. इराणांतलें पूर्वीचें बलाढ्य पारशी राज्य मासिदोनच्या शिकंदर बादशहानें लयास नेल्यावर, पुढें कांहीं काळानें सुमारें इ. सनाच्या तिसऱ्या शतकांत त्यांनीं पुनः डोकें वर काढिलें, व नशारवान, खुसरु वगैरे शूर पुरुषांच्या पराक्रमानें त्यांच्या राज्याच्या सीमा पुनः भूमध्य व काळ्या समुद्रांपर्यंत पोंचल्या.या गोष्टी इ. सनाच्या पांचव्या व सहाव्या शतकांत चालल्या आहेत, इतक्यांत कान्स्तांतिनोपल येथील रोमन राज्याचा, पारसिक राज्याचा व पारशी धर्माचा विध्वंस करणारा एक नवीन शत्रु आरबस्थानाच्या वाळवंटांत जन्मास आला.त्याची शक्ति नुक्ती वाढत होती. जगांतल्या प्रख्यात प्राचीन राज्यांचा व धर्मांचा पराजय करूनच न थांबतां, एका बाजूस पूर्वसागरापासून दुसरीकडे पश्चिमसागरापर्यंत जे जे देश आले त्यांचें स्वातंत्र्य हरण करून, आपलें वर्चस्व स्थापन करणारी कोणी अपूर्व भयंकर शक्ति, या दिशेकडून येईल अशी शंकाही कोणास आली नवती. उंट व घोडे बाळगून खजुरीच्या बनांतून स्वैच्छ हिंडणारे व आपापसांत लुटी करून उदरनिर्वाह करणारे रानवट आरब,

एका धर्माच्या बंधनानें एकत्र होऊंन, एकाच उद्देशानें हां हां ह्मणतां बावटळीसारखे पसरून चोहोंकडे आपला अमंल बसवतील, अशी गोष्ट संभवनीय दिसली नसती. परंतु लोकांना एकत्र करून त्यांचा एक उद्देश करण्याविषयीं जे गुण अवश्य ते महंमद पैगंबराच्या अंगीं पूर्ण वसत होते. महंमदानें ईश्वरी प्रेरणेनें कुराण रचिलें हें जरी कबूल न केलें तरी अलोट बुद्धि व लोकांचें चित्त ओढून घेणारे गुण, त्याच्या अंगीं होते हें कबूल केलेंच पाहिजे. धर्माच्या उडीवर मुसलमान लोकांनीं पुढें एकदोन शतकांतच एशिया, युरोप व आफ्रिका या तीन खंडांत आपल्या अर्धचंद्रांकित हिरव्या झेंड्याखालीं पुष्कळ राज्यें स्थापिलीं. त्यांनीं कान्स्तांतिनोपल शहरासही शह दिला, तथापि तें ताब्यांत येण्यास बरींच शतकें लागलीं. इराणांतील पारशी राज्य व पारशी धर्म त्यानीं नाहींसा करून अफगाणिस्थानांतून हिंदुस्थानांत प्रवेश केला. तसेंच पश्चिमेकडे रोमन राज्यापैकीं सिरिया, पालेंस्तैन, इजिप्त, कार्थेज, व युरोपांत स्पेन हे देश ताब्यांत आणिले. गॉल किंवा फ्रान्स देशांत ते शिरले होते परंतु तेथें त्यांच्या शीघ्र गतीस पहिला प्रतिबंध भेटला.

मुसलमानांनीं ही गडबड चालवली होती तों इटालींतील रोमन राज्याचा व कान्स्तांतिनोपल येथील रोमन राज्याचा बेबनाव झाला. हीं दोन राज्यें फक्त राजकीय गोष्टींतच भिन्न झालीं असें नव्हे, तर त्यांच्या धर्मांतही इ० सनाच्या आठव्या शतकाच्या अखेरीस दुफळ्या झाल्या. जगाच्या एवढ्या भागावर जी ही राजकीय गडबड उडाली, व धर्मसंबंधानें ज्या ह्या उलाढाली झाल्या त्याप्रमाणें या कालांत आमच्या महाराष्ट्रांतही बरेच फेरफार झाले. इ० सनाच्या आठव्या शतकांत मराठ्यांच्या (महारट्टांच्या) पूर्वजांनीं ह्मणजे राष्ट्रकूटांनीं, दोनशें वर्षें चाललेल्या चालुक्य राज्याचा शेवट केला व मराठी राज्याची स्थापना केली या प्राचीन मराठ्यांनींही हिंदुस्थानांत चोहोंकडे स्वाऱ्या करून माळवा व गुजराथ वगैरे उत्तरेकडील देश धरून दक्षिणेस कावेरी नदीपर्यंत आपला अम्मल बसविला, आणि आपल्या

सत्तेखालीं प्रजेला संरक्षण व शांतता मिळून, विद्या व कलाकौशल्यें कशीं उदयास आलीं ह्याची साक्ष, १९ व्या शतकांतल्या सुधारलेल्या लोकांस देण्यासाठींच जणुं, वेरूळावरील कैलासभुवन हें अत्युत्कृष्ट देवालय बांधिलें. या राष्ट्रकूटांचा अंमल दोनअडीचशें वर्षें चालून इ० सनाच्या १० व्या शतकांत चालुक्यांनीं आपलें राज्य पुनः स्थापन केलें. रशियाच्या व्लादिमर राजानें ज्या वेळेस ख्रिस्ती धर्माचा अंगीकार केला त्या वेळीं महाराष्ट्रांत चालुक्यांचा तैलप राजा राज्य करीत होता.

या राजकीय गोष्टींशिवाय धर्मसंबंधानेंही हिंदुस्थानांत या काळीं मोठ्या महत्वाच्या गोष्टी घडून आल्या. बुद्धानें सुरू केलेला बौद्धधर्म, ब्राह्मणांच्या वैदिक धर्मास मागें ढकलून सुमारें एकहजार वर्षें भरतखंडांत अव्याहत चालला होता, त्याला उतरती कळा लागली. श्री शंकराचार्यांनीं त्यावर आपल्या विलक्षण बुद्धिमत्तेच्या योगानें, तर्कशास्त्राच्या व तात्विक विचारांच्या कोट्यांचा भडिमार सुरू केला व रामेश्वरापासून हिमालयापर्यंत वाग्युद्धांत अनेक स्थळीं त्याचा पराभव करून त्यास घायाळ व हतवीर्य केलें. त्याचप्रमाणें, शंकराचार्यांनीं बौद्धधर्माच्या सहवासानें मलिन झालेल्या वैदिक धर्माचा उद्धार करून त्यास नूतन बळकटी आणली. बुद्धाच्या धर्माला हा एकच शत्रु नसून जैनधर्म हा दुसरा शत्रु उद्भवला, व विशेषतः महाराष्ट्रांतर जैन धर्माचेंच फार प्राबल्य झालें. या दोन शत्रुपुढें टिकाव धरण्याचें कठीण पडूनें, ज्याप्रमाणें पारशी धर्मानें आपला देश सोडिला, त्याचप्रमाणें बौद्ध धर्मानें आपलें जन्मस्थान व आपल्या वैभवाची साक्ष देणारी भरतभूमि सोडून सिंव्हलद्वीप, ब्रह्मदेश, तिबेट व चीन या देशांत आपलें प्रस्थ मांडिलें. अस्तु.

वर रोमन राज्याची हकीगत आठव्या शतकाच्या अखेरीपर्यंत आणून पोंचविली आहे. या वेळीं रोमच्या व कान्स्तांतिनोपलच्या राज्याचे व धर्माचे भेद झाले. या काळापासून पुढें युरोपांतील पश्चिमभागांत जीं नवीं राज्यें बनलीं व ज्या स्वरू-

पानें ख्रिस्तीधर्म चालू झाला, त्यांचा पूर्वेकडील राज्यांशीं व ख्रिस्ती धर्माशीं कांहींच संबंध उरला नाहीं. नवव्या व दहाव्या शतकांत पश्चिमेंतील राज्याचे तुकडे होऊन फ्रान्स, नार्मंदी, जर्मनी वगैरे नवीन राज्यें झालीं. या कालांतच उत्तरेकडील लोकांनीं युरोपाच्या दक्षिणेस स्वाऱ्या करून आपला अम्मल बसविला. राशियांत जें रुरिक घराणें स्लॉव लोकांवर स्थापन झालें तेंही त्याच दिशेकडून आलें होतें. तसेंच स्लॉव लोकांचींही पोलांद, बोहेमिया वगैरे नवीन राज्यें बनलीं. राशियाच्या बाजूनें त्यांनीं रोमन लोकांच्या पूर्वेकडील राज्यावर स्वाऱ्या करून सर्विया, बलगेरिया वगैरे दान्युब नदीच्या तीरावरील भागांत आपल्या वसाहति केल्या इत्यादि मजकूर मागें सांगितला आहे.

ख्रिस्ती धर्म स्थापन झाल्यापासून पांचव्या शतकापर्यंत त्यामध्यें कांहींच शक्ति नव्हती. रोमन बादशहा बहुधा त्या धर्माच्या लोकांचा छळ करीत. परंतु रोमन बादशाही बुडाल्यावर व तिचे तुकडे झाल्यावर त्या धर्माचा प्रसार जलद होऊं लागला. याचें मुख्य कारण पुढील बादशहानींच तो धर्म घेतला,हें वर सांगितलें आहे. रोमचें राज्य लयास गेल्यावर जेव्हां रानटी जातींनीं युरोपांत पुंडाई मांडिली तेव्हां हा धर्म कसा टिकला ही गोष्ट आश्चर्याची आहे. परंतु त्याची अंतस्थ व्यवस्था उत्तम होती, तिच्या मुळेंच तो टिकला. या धर्माचा जेव्हां छळ सुरू होता तेव्हां आपल्या संरक्षणाकरितां व आपल्या नीट व्यवस्थेकरतां त्या धर्मांत निरनिराळे अधिकारी व सभा स्थापून, निरनिराळे आचार व कर्में, ह्यांच्या बंधनांनीं त्याचा एकोपा राखिला; अशा अंतस्थ व्यवस्थेमुळें त्या धर्माचे लोकांत एकी वाढून त्याचा एक सबळ व स्वतंत्र पक्ष बनला. रोमन लोकांचा ऱ्हास झाल्यावर रानटी व मूर्तिपूजक जर्मन जातींस या धर्माची गोडी लागली व त्याचा प्रसार होऊं लागला. कांहीं काळानें इटालींत ख्रिस्ती धर्माच्या हातांत धर्म संबंधी सत्ता आलीच, परंतु राजकीय सत्ताही आली. पुढें त्या धर्माचीं तत्वें, आचार, व तंत्रें इ० संबंधानें पूर्वेक-

डील व इटालींतील ख्रिस्त्यांमध्यें वादविवाद सुरू झाले. पूर्वेकडील ख्रिस्त्यांनीं ग्रीक लोकांचे आचारविचार घेतले होते व धर्मामध्यें ही तात्विक वाद करण्याकडे त्यांची प्रवृत्ति वळली. या वादांपासून ज्या शंका निघत त्या निःसीम ख्रिस्त्यांना न आवडून त्यांचा द्वेष वाढत चालला. ह्या वादाचा शेवट असा झाला कीं ख्रिस्ती धर्मांत रोम येथील रोमन क्याथलीक चर्च व पूर्वेकडील ग्रीक चर्च, असे मोठे भेद झाले. तेव्हांपासून रोमच्या बिशपांनीं 'पोप' हा किताब उचलला व राजकीय गोष्टींत ढवळाढवळ करण्यास प्रारंभ करून शेवटीं पोपाच्या हातांत दोनही सत्ता आणिल्या. परंतु पुर्वेकडील ग्रीक चर्चांतील लोकांनीं राजकीय सत्ता बिशपांच्या हातांत न देतां, धर्मसंबंधानें ही लोकांस पुष्कळ स्वातंत्र्य दिलें. रोम येथील ख्रिस्ती धर्माच्या प्रसारानें युरोपावर बरेच उपकार झाले; त्यांपैकीं रोमन सुधारणेचें व विद्येचें संरक्षण, हा मोठा होय. परंतु जेव्हां पोपांची सत्ता वाढत चाललो तेव्हां धर्मसंबंधानें ते फारच कडक व जुलमी झाले व स्वतंत्र विचार करणाऱ्या लोकांचा त्यांनीं छळ सुरू केला. ख्रिस्ती धर्मानें मानवी विचारास दाबून टाकण्याचे प्रयत्न ११ व्या शतकापासून एकसारखे चालविले त्यामुळें कांहीं शतकेंपर्यंत युरोपांत अज्ञान पसरलें; परंतु १६ व्या शतकांत लूथर पुढें आल्यापासून स्वतंत्र विचारास मोकळीक मिळाली.

जेव्हां रानटीलोक सुधारलेल्या लोकांवर स्वाऱ्या करितात तेव्हां त्यांचा जय झाला तरी, त्यांनीं जिंकलेल्या लोकांचे धर्म व आचार घेतल्याचीं उदाहरणें इतिहासांत अनेक आहेत. त्याच नियमानें राशियाच्या व्लादिमर राजानें ग्रीकचर्चांत प्रवेश करून आपला जुना धर्म सोडिला. ग्रीकचर्च धर्माचा, मूर्तिपूजक रूसलोकांत प्रवेश होण्यास जरी हें प्रत्यक्ष कारण झालें नाहीं, तथापि व्लादिमर राजास ही इच्छा होण्यास हेंच तत्व पर्यायानें कारण झालें. ह्या धर्माचा स्वीकार करण्यापूर्वी त्या राजाचें जें आचरण होतें त्यावरून त्याच्या मनावर ख्रिस्तीधर्माच्या तत्वांचा ठसा बसला म्हणण्यापेक्षां त्या धर्माच्या बाह्य

स्वरूपाच्या भपक्यानेंच तो भुलून गेला असें संभवतें. कारण त्यानें शेकडों निरपराध्यांचे व आपल्या आप्तांचे प्राण घेतले होते, पुष्कळ स्त्रियांचें पातिव्रत्य नष्ट केलें होतें आणि आपली विषयवासना पूर्ण करण्याकरितां दोनतीन स्थळीं मिळून एकंदर २९०० नाटकशाळा राखिल्या होत्या ! अशा प्रकारानें ज्यानें आपलें आयुष्य नेलें त्याला पुढें आपल्या कृतकर्माचा पश्चात्ताप वाटून, आपल्या पूर्वधर्माच्या मूर्तींची भक्ति त्यानें आरंभिली. कीफ शहरामध्यें त्यानें शेकडों देवालयें बांधिलीं व त्यांत स्लॉव धर्माच्या मूर्ति स्थापिल्या. परंतु पुढें थोडक्याच काळानें त्यानें तो धर्म सोडिला व ख्रिस्तीधर्माचा स्वीकार केला, हें मागें आलेंच आहे.

क्याथोलिक धर्माचा स्वीकार न करतां ग्रीकचर्चसंप्रदाय घेतला, त्याचा खरा उपयोग एका रशियन इतिहासकाराच्याच म्हणण्याप्रमाणें असा झाला कीं, त्या देशांत राजकीय व पारमार्थिक तत्वांचा अधिकाराबद्दल लढा पडला नाहीं व रूसदेशांतील राजांच्या अधिकारांत धर्मानें ढवळाढवळ केली नाहीं. पश्चिम युरोपांत या संबंधानें कांहीं शतकेंपर्यंत या दोन्ही अधिकारांचा झगडा चालू होता व तो अद्यापिही विझाला नाहीं. रशियाला हा फायदा झाला त्याप्रमाणें तोटेही झाले ते असे कीं, ज्या वेळेस त्या देशावर तार्तार मोंगल लोकांची झडप पडली तेव्हां या धर्मभेदामुळेंच युरोपांतील एकही राज्य त्या देशाच्या साह्यार्थ पुढें सरसावलें नाहीं; शिवाय स्लॉवलोकांपैकीं पोलांद वगैरे कांहीं ठिकाणच्या लोकांनीं रोमन क्याथोलिक धर्म स्वीकारल्यामुळें आपल्या जातींतच द्वेष उद्भवला. त्या दिवसापासून इंग्लिशांना जसें ऐर्लंद, त्याचप्रमाणें पोलांद हें रुसांना झालें आहे. तिसरा सर्वांत मोठा तोटा म्हणजे हाच कीं सोळाव्या शतकांत पश्चिमयुरोपांत विद्या व ज्ञानवृद्धीची जी चळवळ सुरू झाली तीपासून रूसदेश अलिप्त राहिला ह्यामुळेंच तेथील लोक विद्येनें व ज्ञानानें इतर युरोपिअन राष्ट्रांतील लोकांपेक्षां फार मागें राहिले व तसे ते अद्यापिही आहेत.

ख्रिस्ती धर्म झाल्यापासून तेथें अनेक बायकांशीं विवाह करण्याची चाल अगदीं मोडली व रुसांच्या गृहस्थितींत बरीच सुधारणा झाली. त्यांचा क्रूर स्वभाव जाऊन ते लोक जरा थंड झाले. यापुढें झालेले कांहीं रूस राजे तर हिंदुस्थानांतील प्राचीन राजांच्या रीतीप्रमाणें, वृद्धापकाळीं आपल्या पुत्रांवर राज्यभार टाकून अरण्यांत जाऊन तपाचरण करूं लागले !

ग्रीकचर्च धर्माबरोबर जर ख्रिस्ती राष्ट्रांची राज्यरीती उचलली असती तर रूस देश आज कधींच ज्ञानसंपन्न व बलाढ्य झाला असता; परंतु एक राजा मृत्यु पावल्यावर त्याच्या पुत्रांत राज्याचे सारखे भाग करण्याची जुनी चाल सुटली नाहीं, यामुळें व्लादिमर राजा मरण पावतांच रुसांच्या राज्याची एकी मोडली व त्याचे तुकडे तुकडे झाले. यरोस्लाव नामक एक राजा मागून गादीवर बसला त्यानें मात्र कांहीं दिवस राज्यास एकवटलें होतें व त्यानेंच त्या देशांत एक कायद्याचें पुस्तक तयार केलें. रूस लोकांचा पहिला कायदा काय तो हाच. आमच्या जशा स्मृति त्याप्रमाणें त्या लोकांची ही स्मृति होय. या कायद्याचे पुस्तकांतील नियम कांहीं चमत्कारिक आहेत. त्यांवरून आपला जर कोणी अपराध केला तर सरकाराच्या मदतीशिवाय स्वतः सूड घेण्याची परवानगी होती; दण्ड घेण्याची पद्धति फार असून शारीर शिक्षा थोडी असे; अग्नींत किंवा तप्त तेलांत हात घालून दिव्य करून अपराध शाबीत करणें व पंचायतीनें निवाडे तोडणें वगैरे अनेक जुन्या न्यायपद्धति चालू होत्या; सर्वांत विशेष गोष्ट अशी आढळते कीं, देहदंडाची शिक्षा कोणत्याही अपराधास लागू नवती. या राजाच्या कारकीर्दींत रूस देशांत ऐक्य होतें परंतु तें नाहींसें होण्याचा समय ठेपला होता. तो मरण पावतांच गादीवर वारसा सांगणारे राजघराण्यांतील निरनिराळे पुरुष आपसांत लढूं लागले व अखेरीस त्या राज्याचे शेकडों तुकडे झाले. इ० स० १०९४ पासून इ. स० १२२४ त जेव्हां तार्तार लोकांच्या स्वा-

ऱ्या सुरू झाल्या तोंपर्यंत जो काळ गेला त्यांत रूस देशांत अंदाधुंदी पसरली होती. पश्चिम युरोपांत याच कालीं बडे लोक व राजे यांच्या, आपसांत लढाया सुरू झाल्या होत्या. ही संधी पाहून रूस देशावर पश्चिमेकडून लिथ्युनीयन व पोलांदचे पोल लोकांनीं स्वाऱ्या करून बराच मुलुख बळकाविला. यापेक्षां त्या देशावर नंतर दुसरें एक परचक्र आलें त्याच्या मानानें वरील स्वाऱ्या कांहींच नवत्या. हें भयंकर परचक्र ह्मणजे एशिया खण्डांतून निघालेल्या तार्तार लोकांच्या झुंडी. या क्रूर व रानटी लोकांनीं १२१२ त त्या देशावर पहिली स्वारी केली. त्यावेळीं शेकडों गांव जाळून फस्त केले व लाखों रुसांची कत्तल उडविली.

हे लोक कोण होते, आले कोठून, हें मुद्दां त्या रूस लोकांना ठाऊक नवतें. या मोंगल लोकांचीं प्रचंड सैन्यें जेव्हां युरोपांत उतरलीं तेव्हां तेथील सर्व राष्ट्रांस धाक पडला, मग त्यांच्या तडाख्यांत सांपडलेल्या रुसांची काय स्थिति झाली असेल त्याची कल्पनाही करवत नाहीं. हे मोंगल व तार्तार लोक आलताई पर्वताच्या दक्षिण उतरणीवर रहात असत. ते घोड्यावर बसणारे पटाईत होते व त्यांच्याजवळ लक्षावधि गुरेंमेढरें होतीं. ते एका ठिकाणीं न राहतां चारापाणी मिळेल तेथें जात. या लोकांच्या निरनिराळ्या टोळ्या प्रख्यात झेंगीसखानानें एकत्र केल्यापासून त्यांचें मोठें सैन्य बनलें. खानाच्या कारकीर्दींतच त्यांनीं चीनच्या राज्यावर स्वाऱ्या केल्या व एशियेंतील मोंगोलिया, बुखारा, अफगाणिस्थान, इराण, तुर्कस्थान हे देश काबीज केले. झेंगीसखानानें युरोपांत स्वारी केली व रूसदेशाच्या दक्षिणेकडील प्रदेश काबीज केला. काकेसस पर्वतावरून रूसदेशांत त्याचीं सैन्यें उतरलीं व एका स्वारींतच रुसांचा मोड झाला. हे मोंगल-लोक त्या वेळेपर्यंत मुसलमान धर्माचे अनुयायी झाले नव्हते.

या वेळीं रिवस्ती व मुसलमान लोकांत धर्मयुद्धें चाललीं होतीं, इतक्यांत या दोघानांही मोंगल सामान्य शत्रु उद्भवले. एशिया व युरोप या दोन्हीं खंडांत झेंगीसखानाच्या नांवाचा

दरारा पडला व हा नवीन शत्रु कोठून आला याचा सवांस सारखाच अचंबा पडला. ह्या खानाचें राज्य भूमध्यसमुद्रापासून पासिफिक महासागरापर्यंत पसरलें. इ० स० १२२७त तो मरण पावल्यावर त्याच्या पुत्रांनींही तोच क्रम आरंभिला व तेरावें शतक त्यांच्या गडबडींतच गेलें. याच शतकांत प्रख्यात तैमुरलंगाची आमच्या देशावर स्वारी झाली. जेथें जेथें हे तार्तार लोक गेले तेथें तेथें त्यानीं सर्व मुलुख जाळून लुटून उजाड केला व क्रूरपणाचीं अनन्वित कृत्यें केलीं. बातुखान नामक झेंगीसाच्या मुलानें १२३७ त रूसदेशावर पुनः स्वारी केली व कझान, मास्को, व्लादिमर हीं शहरें घेऊन, थोड्याच काळानें कीफ शहर घेतलें व तेथील राजवाडे, देवालयें, मठ, सर्व जाळून टाकिले व शेंकडों स्त्रियांस गुलाम करून नेलें त्यानें वोल्गानदीच्या तीरावर सराई नामक शहरांत आपली राजधानी केली. त्यानें एका स्वारींत तर आपलीं सैन्यें जर्मनीवर नेलीं व मार्गांत येणारीं पोलांद व हंगरीचीं राज्यें घेतलीं. यामुळें युरोपांत चोहोंकडे भय पडलें, परंतु मोंगल लोकांनीं पुढें जास्त स्वाऱ्या केल्या नाहींत. त्यांनीं वोल्गानदीवर काझानें शहरीं आपली राजधानी स्थापन केली व पुढें दोन शतकें रूसदेश आपल्या ताब्यांत ठेविला. रूसदेशाची एकी होऊन भरभराट होण्याचीं चिन्हें नाहींशीं झालीं व ते लोक सर्व प्रकारें मागें पडले.

मोंगल लोकांनीं रूसलोकांचा एकदम कसा पराभव केला हें आश्चर्य नाहीं; कारण बातुखानापाशीं पांचलक्ष लढाऊ स्वार होते, त्यानें राशियन लोकांस एकाएकीं गांठलें आणि विशेषतः रूसदेशांतील संस्थानांचे आपसांत झगडे चालले होते. या तार्तारलोकांनीं आपलीं राज्यें स्थापन केल्यावर मुसलमान धर्माचा स्वीकार केला त्यामुळें त्या धर्माला फारच बळ आलें. मोंगलांच्या वेळीं रूसदेशांतील कांहीं राज्यें मांडलिक नात्यानें जीव धरून राहिलीं होतीं व एकदोन वेळां तर त्यांनीं मोंगलांविरुद्ध बंडही केलें होतें. परंतु त्यांत त्यांचा पुरा

नाश झाला. तार्तारलोकांनीं राजकीय संबंधानें आपल्याकडे फक्त सार्वभौमत्व घेतलें, बाकी त्या देशांतील कायदेकानु, रीतरिवाज व पूर्वींचीं राज्यें हीं अगदीं नाहींशीं न करतां कायमच ठेवलीं. त्यांचा मुख्य उद्देश पैसा मिळविण्याचा होता; त्यांच्या खंडण्या व कर वेळेवर पोंचले म्हणजे ते लोक कांहीं विशेष गडबड करीत नसत.

तार्तारखानांच्या अंमलापासून रशियावर जे परिणाम झाले त्यांत मुख्य हे कीं, रशियनलोक ज्ञानमार्गांत मागें राहिले; मास्को येथील मांडलिक संस्थानिकांस एकसत्ताक व जुलमी राज्यपद्धतीची संवय लागली आणि तेथील लोकांना पूर्वीपासून जे राजकीय हक्क होते त्यांचें विस्मरण झालें.

रशियांत जीं मांडलिक संस्थानें राहिलीं होतीं त्यांची मोठी गादी, मोंगलांच्या अमलांत, मास्को येथें होती. येथील राजांनीं मोंगलांना आपल्या देशांतून घालविण्याचे बरेच वेळां प्रयत्न केले परंतु ते निष्फळ झाले. १४ व्या शतकाच्या उत्तरार्धांत झेंगीसखानाप्रमाणें दुसरा एक तार्तार सरदार प्रख्यातीस आला. हा प्रसिद्ध तैमूरलंग होय. यानें सर्व एशिया जिंकून कान्स्तांतिनोपलच्या बादशहाचा पराभव केला, परंतु तो युरोपांत शिरला नाहीं हें तेथील राष्ट्रांचें नशीबच समजावयाचें. तैमूरलंगाच्या स्वाऱ्यांपासून इतर देशांस उपद्रव झाला, तथापि रूसदेशास एक फायदा झाला. तैमूराच्या मुलांची, सराई वगैरे ठिकाणच्या मोंगललोकांशीं लढाई सुरू झाली. त्या लढाईंत रशियावर ज्यांनीं आपला इतका पगडा बसविला होता त्यांची दुर्दशा उडाली हें पाहून मास्को येथील संस्थानिकांनीं आपली सत्ता वाढविण्याचा क्रम चालविला. मोंगल लोकांत आपसांत लढाया सुरू झाल्यामुळें मास्कोच्या राजांनीं आपलें डोकें वर काढिलें व हळू हळू आपल्या देशावर खिळून बसलेल्या परकी लोकांस घालवून देण्याचा प्रयत्न चालविला. अखेरीस मास्को येथील राजघराण्यांतील प्रख्यात **इवान धि ग्रेत** राजाच्या हातून मोंगलांच्या अंमलाचा शेवट झाला. या

राजानें प्रथमतः आपल्या लोकांस युक्तीनें व लबाडीनें एक करून, मुसलमानांशीं लढाई न करतां, त्यांचे आपसांत तंटे लाविले व काझान व सराई येथील मोंगलांच्या गाद्यांवर एका मागून एक स्वाऱ्या करून त्यांना जेरीस आणिलें. आपल्या देशाला स्वातंत्र्य देऊनच तो स्वस्थ बसला नाहीं, तर देशांतील लहान राज्यें जीं फक्त देशाच्या दुर्बलतेस मात्र कारण होतीं तीं सगळीं धुळीस मिळवून चोहोंकडे आपली सत्ता बसविली. त्यानें प्रख्यात नोवगोरोड शहरांतील प्रजासत्ताक राज्याचा नाश केला व पश्चिमेंतील युरोपियन राजांशीं राजकीय पत्रव्यवहार सुरू केले. त्यानें राशियाला स्वतंत्र करून सर्व सत्ता एकवटली व आपल्या एकसत्ताक, करड्या अंमलाखालीं बंडें व दंगेधोपे बंद केले. इवानचें लग्न कान्स्तांतिनोपलच्या शेवटल्या ख्रिस्ती बादशहाच्या मुलीशीं लागल्यामुळें तिकडून राशियांत विद्या व कलाकौशल्यांचा पुनः प्रवेश झाला. त्यानें रूसदेशाच्या राज्याचे पुनः तुकडे न व्हावे म्हणून राज्याच्या वांटण्या करण्याची जुनी रीत मोडून टाकिली; आपल्या देशाच्या लोकांस देशाभिमानाची गोडी लाविली, त्यांस सुधारणेच्या पंथास लाविलें व परदेशांतून चांगले सुशिक्षित लोक राशियांत आणून त्यांस कलाकौशल्यांचें ज्ञान करून देण्याविषयीं प्रयत्न चालविले. इवान यानें ४३ वर्षें राज्य केलें व तो इ० स० १५०५त मरण पावला. तेव्हां त्याच्या मागें त्याचा पुत्र गादीवर बसला व त्यानें ही रूस देशास एकछत्राखालीं आणण्याविषयीं प्रयत्न सुरू ठेवले. त्याच्या मागून त्याचा मुलगा इवान नांवाचाच गादीवर बसला. यानें इ० स० १५३३ पासून १५८४ पर्यंत राज्य केलें, व आपल्या भयंकर कृत्यांवरून **'उग्र झार इवान'** ही पदवी मिळविली. राशियाच्या राजांनीं 'झार' हें पद ह्याच्याच कारकिर्दीपासून धारण केलें. ही पदवी पूर्वी काझान येथील मोंगल राजे आपल्या नांवाला जोडीत होते. इवान राजा लहानपणामध्येंच आपल्या पदरच्या सरदारांच्या संगतीनें फार क्रूर व दुष्ट स्व-

भावाचा झाला. गादीवर येतांच त्यानें नोवगोरोड शहरांतील लोकांची कत्तल केली व बंडाच्या संशयावरून किंवा फक्त रागाच्या आवेशांत, जे लोक त्यानें मारले त्यांच्या रक्ताचे पाट देशांतून चोंहोकडे वाहूं लागले. त्यानें आपल्या देशांतील बारीकसारीक शत्रु नाहींसे करून, स्विदन व पोलांद देशांशीं लढाया चालविल्या आणि पूर्वेकडील तार्तार लोकांचें निर्मूळ केलें. काझान व अस्त्राखान या ठिकाणीं जीं नांवाचीं मुसलमानी संस्थानें होतीं तीं घेऊन आपल्या राज्याची हद्द कास्पियन समुद्रापर्यंत नेली. राशियाचें राज्य एवढें मोठें झालें तरी त्याला समुद्रांचें द्वार नवतें, कारण बाल्तिक समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर स्विदन व पोलांद येथील राजांचा अंमल होता व काळ्या समुद्रावर क्रिमिया नामक द्वीपकल्पांत एक मुसलमान खान राज्य करीत होता. यावेळीं फक्त उत्तरेकडील श्वेत समुद्रानेंच कायतो थोडा बहुत व्यापार चाले, व या व्यापाराच्या संबंधानेंच इवान झारानें इंग्लंद देशच्या एलिझाबेथ राणीशीं तह केला.

राशियाच्या व्लादिमर राजानें ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केल्यापासून इवान झारानें राशियाचें एकसत्ताक राज्य केलें तोंपर्यंत जीं पांच सहा शतकें गेलीं त्यांत जगाच्या इतिहासांत मोठ्या उलाढाली झाल्या. याच सुमारास ह्मणजे १६ शतकांत युरोप एशिया या दोनीं खंडांत प्राचीन काळच्या गोष्टी जाऊन नवीन नवीन पुष्कळ फेरफार झाले व खऱ्या अर्वाचीन काळच्या इतिहासास प्रारंभ झाला. युरोपांत १० व्या शतकापासून ख्रिस्ती धर्माचा पगडा फार बसत चालला, व विशेषतः रोम येथील पोपांचें फार प्राबल्य झालें. या पुढें दोन चार शतकें ख्रिस्ती धर्मानें परधर्मी लोकांवर लढाया चालविल्या व आपल्या धर्माच्या लोकांत जे कोणी ज्ञानमार्गांत शिरून विचार शक्तीचा उपयोग करीत त्यांचा छळ मांडला. मानवी ज्ञानाचा ठेवा काय तो अह्मांकडे, बैबलांतच सर्व ज्ञान भरलें आहे व मनुष्यानें धर्मोपदेशकांच्या सांगण्याबाहेर स्वतः विचार करणें ह्मणजे महापातक केलें अशा तऱ्हेचीं तत्वें बाहेर पडलीं! रोमचे

पोप राजकीय उठाठेवी करूं लागले, व त्यांनीं मठांतून बादशाही थाट व चैनीचे विलास सुरू केले. ब्रह्मचर्याची शपथ विसरून पाद्र्यांनीं गोकुळ माजविलें! या काळाला युरोपांत 'कृष्ण युगें' किंवा अज्ञानाचा काळ असें म्हणतात. ह्यांत ख्रिस्ती धर्माच्या भट्ट मंडळीनें सर्व ज्ञानाचा निधि आपल्या ताब्यांत घेतला व मन मानेल तसें वर्तन सुरू केलें. पूर्वेकडे युरोपांत ग्रीक चर्च धर्माची मुख्य गादी कान्स्तांतिनोपल येथें होती, परंतु तेथील रोमन बादशाहीचा शेवट होऊन इ० त० १४५३ त मुसलमानांनीं आपलें हिरवें निशाण त्या शहरावर रोविलें. मुसलमानांनीं युरोपांत पुष्कळ मुलुख मिळविला व एशियेंत रोमन लोकांचा जेथें अंमल होता ते प्रदेशही घेतले. ख्रिस्ती लोकांनीं जिवावर उदार होऊन कांहीं शतकेंपर्यंत जीं धर्मयुद्धें चालविलीं होतीं त्यांपासून जरुशलेम तर मिळालें नाहींच, परंतु अखेरीस त्या धर्माचें दुसरें पवित्र स्थान कान्स्तांतिनोपल सुद्धां मुसलमानांच्या ताब्यांत आलें. त्या काळापासून पुढें ग्रीक चर्च धर्माचें मुख्य स्थान मास्को शहर झालें. मुसलमानांनीं आठव्या व नवव्या शतकांत स्पेन येथें एक बलिष्ठ राज्य स्थापन केलें होतें व तेथील कालिफांच्या आश्रया खालीं विद्या व कलाकौशल्यें उदयास येत होतीं. तें राज्य व एशिया खंडांतील बगदाद शहरीं जें कालिफांचें संपन्न राज्य होतें, त्यांचा शेवट अनुक्रमें ख्रिस्ती लोकांनीं व तैमूरलगानें केला. तथापि एशिया खंडांत मुसलमान धर्म कायमच राहिला. कान्स्तांतिनोपल घेतल्यामुळें युरोपांत एका बाजूस जो प्रदेश काबीज केला, त्याबद्दलच जणु स्पेन देश त्यांच्या हातचा गेला. या पुढें मुसलमानांनीं युरोपांत ज्यास्त गडबड केली नाहीं, परंतु तुर्कस्थानाची मालकी एकोणिसाव्या शतकापर्यंत त्यांच्याकडेच राहिली, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. आतां या पुढें तो देश आस्त्रिया, जर्मनी व रशिया यांच्या भक्ष्यस्थानीं पडतो कीं काय हें पहाणें आहे. परंतु इंग्लंद जोंपर्यंत त्या देशाला आपलें पाठबळ देईल, तोंपर्यंत कांहीं भीति दिसत नाहीं.

एशिया खंडांत पारसिक व बौद्धधर्म हद्दपार कसे झाले हें सांगितलेंच आहे. त्यापासून आलीकडील पांचसहा शतकांत धर्मसंबंधी मोठी गोष्ट झणजे मुसलमानधर्माचा प्रसार या खंडांत फार झाला ही होय. आमच्या देशांत तर मुसलमानांनीं स्वाऱ्या करून अखेरीस, रशियांतून जेव्हां त्यानां घालवून दिलें त्याच सुमारास, बाबर यानें दिल्ली येथें मोंगल घराण्याची गादी स्थापन केली. आमच्या महारांष्ट्रांत जैन धर्माला उतरती कळा लागून त्याचा बहुतेक लोप झाला होता व लिंगाईत धर्माचें पिलूं बाहेर पडलें होतें. बौद्ध, जैन, व लिंगायत हे धर्म ब्राह्मणधर्माविरूद्ध बंडें होतीं, परंतु त्यांचा जय कधींच न होतां शंकराचार्यांचा ब्राह्मणधर्म टिकाव धरून राहिला.

या काळाच्या अखेरीस सोळाव्या शतकांत रोम येथील पोपांच्या सत्तेला एकदम धक्का बसला व प्रातेस्तंतपंथ लूथरानें सुरू केला. त्यामुळें पोपांचें बंड मोडलें व ज्ञानवृद्धि होऊं लागली.

राजकीय संबंधानें पहातां, हल्ली जीं राज्यें युरोपांत पहातों त्यांची स्थापना झाली. पश्चिम युरोपांत रोमची नांवाची बादशाही होती ती जाऊन स्पेन, पोर्चुगाल, इंग्लंद, जर्मनी व फ्रान्स येथें स्वतंत्र राज्यें झालीं. या काळांत त्या भागांत मनुष्यांचें लक्ष नवीन शोधांकडे लागलें. व्यापारासाठीं युरोपीयन लोक गलबतें हाकारून आमच्या देशास प्रथम आले आणि कोलंबसानें अमेरिका शोधून काढिली. आमच्या देशाच्या दुर्भाग्यास ११ व्या शतकांतच प्रारंभ झाला होता. मुसलमानांनीं सारख्या स्वाऱ्या करून पूर्वींचीं रजपूत घराणीं पायाखालीं घातलीं. आमच्या खुद्द महाराष्ट्रांत चालुक्य जाऊन मागून चाललेलें यादव घराणें ही अखेरीस मुसलमानांनीं नाहींसें करून टाकिलें, व पुढें दक्षिणेंत विजापुरासारखीं नवीं राज्यें झालीं. या देशांत मुसलमानांचा अम्मल झाल्यापासून येथील ज्ञान, विद्या व कलाकौशल्यें इत्यादि गोष्टींचा इतिहास संपला ! सोळाव्या शतकांत युरोपांत ज्ञानवृद्धीच्या इमारतीचा पाया मजबूत झाला व आमच्या खंडांत

सर्व जमीनदोस्त झालें. या पुढें आमच्या खंडांत नवीन शोधांचें नांव ही काढण्यास स्थळ उरलें नाहीं.

युरोपांत सत्तेचा व बुद्धीचा वाद पडून बुद्धीनें आपला पक्ष जिंकला. या काळास युरोपांत ' उर्जितकाळ ' ह्मणतात. ख्रिस्तीधर्मानें जें अज्ञानपटल घातलें होतें तें दूर झालें व तेथील लोकांनीं ऐहिक व पारलौकिक विषयांस विभक्त केलें व त्याप्रमाणेंच आपलें वर्तन सुरू केलें. पश्चिम युरोपांत मानवी ज्ञान वाढविण्याविषयीं अनेक प्रयत्न सुरू झाले, त्यांत विद्यापीठें व मुद्रण कला (छापण्याची युक्ती), यांचे मनुष्यावर अतिशय उपकार झाले.

एवढी गडबड जगांत जी झाली तिचा इतिहास याहून जास्त विस्तारानें देणें योग्य होतें, परंतु स्थलसंकोचास्तव येथें देतां येत नाहीं. पश्चिमयुरोपांत जी ज्ञानवृद्धि झाली तिचा अंशही रशियांत गेला नाहीं, परंतु रूसलोकांनीं आपलें स्वातंत्र्य स्थापिलें ही गोष्ट त्यांना मोठीच होय. सन १५८४ त इवान मरण पावल्यावरून देशांत पुनः गडबडी सुरू झाल्या व गादीविषयीं तंटे पडले, यामुळें रूसदेश पुनः खालीं बसतो असें दिसलें. परंतु सन १६१३ रूसदेशांतील सरदारांनीं एक नवीन झार निवडिला व आपल्या देशाचें स्वातंत्र्य व एकी राखिली. रूसदेशच्या गादीवर हल्लीं जें घराणें आहे तें हेंच होय. या निवडलेल्या झाराचें नांव रोमनॉफ होतें, त्यानें मोडीगुलाबीनें आपल्या देशांत झालेल्या अनेक फळ्या एक केल्या. त्याचा मुलगा अलेक्सिस यानें इ० १६४५ पासून १६७६ पर्यंत राज्य केलें. त्यानें पोलांदापासून कांहीं मुलूख परत घेऊन आपल्या राज्यास जोडिला. त्याचा मुलगा फिओडार यानें कांहीं वर्षें राज्य केल्यावर त्याच्यामागें इ० १६८२ त गादीच्या वारशाबद्दल तंटे लागले, परंतु शेवटीं अलेक्सिसच्या दुसऱ्या बायकोचा मुलगा जो पुढें पितर धि येत झाला, तो इ० स० १६८९ त ह्मणजे, ज्या वर्षीं संभाजी राजाचा औरंगजेबानें वध केला त्या वर्षीं मास्को येथें तक्तनशीन झाला.

पितर धि ग्रेत बरोबर राशियाच्या उत्कर्षास प्रारंभ झाला. इतके दिवस राशिया एशिया खंण्डातीलच एक देश होता. परंतु पितरपासून त्याचा पश्चिम युरोपाशीं संबंध जुळला व तिकडील सुधारणेचा प्रवेश राशियांत झाला. पितरचीं सर्व कृत्यें येथें देण्यास जागा नाहीं, तसेंच आपल्या लोकांस सुधारण्याकरतां त्यानें जे अनेक प्रयत्न केले त्यांचा उल्लेख या पुस्तकांत पुढें अनेक ठिकाणीं केला आहे यामुळें ती हकीगत येथें देत नाहीं.

राशियाचें हल्लीं जें एवढें प्रस्थ माजलें त्याचें मुख्य कारण पितरचा उद्योग. पितरनें धर्म, समाज, गृह स्थिति, उद्योग, विद्या, कला कौशल्य, या सर्वांत सुधारणा करण्याविषयीं प्रयत्न केले. त्यानें लोकांचे पोषास सुद्धां फिरविले व पश्चिम युरोपांतील लोकांचें सर्व गोष्टींत अनुकरण केलें. राशियाच्या आरमाराचा पाया त्यानें घातला व स्वतः तयार केलेल्या आरमाराच्या सहाय्यानें क्रिमियाच्या खानाकडून अझॉफ जिंकून, रूस लोकांसाठीं काळा समुद्र मोकळा केला. त्यानें युरोपांतून प्रवास करून आल्यावर, आपल्या फौजेंत सुधारणा केली व त्यांस नवीं हत्यारें आणि पोषाख देऊन फ्रान्सांतील युद्धकला शिकविली. राशियाचे सैन्य पितरच्याच कारकिर्दींत वाढलें. त्यानें पोलांद पासून कांहीं मुलुख मिळविला. त्याचें स्विदनच्या बाराव्या चार्लस राजाशीं बरेच वर्षें युद्ध होऊन त्या प्रख्यात शूर राजाचा त्यानें पल्तोवाच्या लढाईंत पराजय करून त्याचे बॉल्तिकसमुद्रावरील प्रांत आपल्या राज्यास जोडिले. या नवीन जयापासून रुसांना बाल्तिक समुद्र मिळाला व युरोपाशीं दळणवळण ठेवण्याची सोई झाली. बालतिकसमुद्राचें महत्व पितरच्या ध्यानांत आलेंच होतें व रूस देशांत पश्चिमेकडिल सुधारणा त्याच द्वारानें येईल अशी त्याची खात्री झाली; या साठीं त्यानें १७०३ सालीं त्या समुद्राच्या कांठावर सेंत पितर्सबर्ग शहर स्थापन केलें. रूसदेशांतील कांहीं धाडशी सरदारांनीं थोड्या वर्षांपूर्वीच एशियाखंडाच्या उत्तरेकडील थंडप्रदेश जो सैबिरिया, तो जिंकिला होता; तथापि पितरच्या मनांत व्यापार वाढविण्याचा हेतु होता व

तो साधण्यासाठीं सैबिरिया देश निरुपयोगी होता ह्मणून त्यानें काास्पियन समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर थोडेसें सैन्य पाठविलें. तो किनारा मिळाला ह्मणजे मध्यएशियेंतील बोखारा, खिवा, समरकंद वगैरे प्रदेशांशीं व्यापार सुरू करितां येईल असें त्यास वाटलें. परंतु ह्या उद्योगांत त्यास यश आलें नाहीं. तथापि या शतकांत त्याची इच्छा पूर्ण झाली आहे. पितरचें चरित्र फारच मनोरंजक आहे व तें वाचावें अशी आमची वाचकांस शिफारस आहे. पितरच्या काळापासून राशियाचें, युरोपियन राजकीय मसलतींत व कारस्थानांत आंग दिसूं लागलें. तो १७२५त मरण पावला.

त्यानें ज्या सुधारणा केल्या त्या रूस लोकांस आवडल्या नाहींत व त्यास ते अधार्मिक आणि स्वदेशशत्रु मानूं लागले. एकदोन वेळां तर बंडें झालीं, परंतु बंडखोरांस अति क्रूर शिक्षा देऊन त्यानें राशियन झाराचा सर्वत्र दरारा बसविला. पितरच्या काळा पासून आलीकडील झारांची हकीकत विस्तारानें देण्याचें कारण नाहीं. या पुस्तकांत ती पुष्कळ दिली आहे, ह्मणून हा भाग आतां थोडक्यांत आटोपता घेऊं.

पितरच्या मागें त्याच्या गादीवर त्याची बायको क्याथराइन ही बसली, व तिच्या मागून पितरचा नातू दुसरा पितर हा बसला. परंतु तो मेल्यावर गादीवर बसण्यास कोणीच जवळचा पुरुष उरला नाहीं तेव्हां पितर धि ग्रेतची पुतणी ऑन १७३० त गादीवर बसली. तिनें दहा वर्षें राज्य केलें.

ऑनच्या कारकिर्दींत तिच्या दरबारांत जर्मनलोक फार शिरले होते. त्यांचा राशियन बडेलोकांस मत्सर होऊन त्यांनीं ऑनच्या मागून एलिझाबेथ गादीवर बसतांच परकीयांस हद्दपार केलें. एलिझाबेथ १७६२ त मरण पावली. तिच्या मागून तिचा पितर नांवाचा पुतण्या गादीवर बसला. परंतु सहा महिन्यांतच त्यास बंडखोरांनीं ठार मारून टाकिलें. तेव्हां राज्याचीं सर्व सूत्रें त्याची बायको **क्याथराईन** इजकडे आलीं. ही प्रख्यात बाई गादीवर येईपर्यंत राशियाला युरोपांत नवीन मुलूख मिळाला

नाहीं, परंतु पितर धि ग्रेतच्या इच्छेप्रमाणें अंतस्थ व्यवस्था व बंदोबस्त मात्र नीट चाललीं होतीं.

क्याथराईनचें राज्य तिच्या कारकिर्दींत पुष्कळ भरभराटीस आलें. तिनें आपल्या दरबारास फ्रेंचांच्या प्रख्यात दरबाराचा थाट आणिला. ही राणी मोठी महत्वाकांक्षिणी होती; तिनें युरोपांतील राजकीय गडबडींत मन घालून राशियाला बराच फायदा करून घेतला. हिच्या काळांतच पोलांदच्या स्वतंत्र राज्यास जर्मनी, आस्त्रिया आणि राशिया या तीन देशांनीं आपसांत वाटून घेतलें यामुळें राशियाचा मध्ययुरोपांत प्रवेश झाला. पोलांदचे तुकडे करण्यांत या तीन राष्ट्रांनीं नीति गुंडाळून ठेविली होती हें सांगणेंच नको. स्वातंत्र्य मिळाल्यापासून व आपल्या देशांतील तंटे नाहींसे होतांच राशियाला तर एशियेंत व युरोपांत मुलूख संपादण्याची फारच आकांक्षा सुटली. सैबिरिया जिंकून याच सुमारास राशियन कोसाक शिपाई आमूर नदीच्या कांठानें पासिफिक महासागरापर्यंत पोंचले होते; त्यांनीं चीनच्या राज्याशीं व्यापार वगैरे करण्याविषयीं याच सुमारास एक तह केला. क्याथराईन हिनें आपल्या फौजा काळ्या-समुद्रावर पाठवून तुर्कस्थानाशीं लढाया सुरू केल्या व क्रिमिया जिंकून तेथें आपला अम्मल सुरू केला. ती सन १७९६ त मरण पावली.

क्याथराइनच्या लांब कारकीर्दींत युरोपांत व इतर खंडांत बऱ्याच गडबडी झाल्या. अमेरिकेंत इंग्लिशांच्या वसाहति होत्या त्या स्वतंत्र झाल्या, व हिंदुस्थानांत फ्रेंचांचा मोड होऊन इंग्लंदाचा उत्कर्ष सुरू झाला. या वेळीं ह्मणजे १८ व्या शतकांत युरोपांत व विशेषतः फ्रान्स देशांत, धर्म व राजकीय विषयांवर नवीन मतें निघालीं. राजांच्या जुलमी व मनगटाच्या जोरावर चाललेल्या सत्तेविरुद्ध, लिहण्या बोलण्यांत सुद्धां बंडें दिसूं लागलीं. मनुष्यांच्या हक्कांचें व स्वातंत्र्याचें प्रतिपादन करणारी रूसू, वालतेर प्रभृति मंडळी पुढें आली. या मंडळीच्या उपदेशानें युरोपांतील खालच्या प्रतीच्या लोकांच्या मनांत आ-

पलें स्वातंत्र्य मिळविण्याविषयीं इच्छा उत्पन्न झाली. या काळांत वालतेरच्या लेखांस युरोपांतील निरनिराळ्या दरबारांत फारच मान मिळे परंतु त्याचा काय परिणाम होईल हें कोणाच्या ध्यानांत नवतें. खुद्द क्याथराईन राणी त्याच्याशीं पत्रव्यवहार ठेवीत होती. परंतु या नवीन मतांचा पहिला परिणाम अमेरिकेंतील स्वातंत्र्याची लढाई;व दुसरा-फ्रान्स देशांतील प्रसिद्ध बंड, राज्यक्रांती व लोकसत्ताकराज्याची स्थापना. हे झाल्याबरोबर युरोपांतील जुलमी राजांचे डोळे उघडले. क्याथराईन हिनें फ्रेंचांविरुद्ध मसलती चालविल्या. ती मरण पावल्यावर तिचा मुलगा पॉल हा गादीवर बसला. त्यानें प्रथम बोनापार्तीविरुद्ध जीं युरोपांतील राज्यें एकत्र झालीं होतीं त्यांशीं तह केला; परंतु पुढें त्यानें आपले बेत फिरविले व फ्रेंचांशीं सख्य करून नेपोलियनाच्या उपदेशानें इंग्लिशांना हिंदुस्थानांतून हुसकून देण्याच्या खटपटी चालविल्या. परंतु हे त्याचे बेत जागच्याजागींच राहिले. कारण इ० स० १८०१ त त्याचा खून झाला. त्याचा मुलगा अलेक्झांदर; ह्यानें झार पद मिळतांच फ्रेंचांच्या विरुद्ध राष्ट्रांशीं सलुखी केली. फ्रेंचांशीं लढाई चालविली त्यांत त्याचा मोडच होत गेला, तथापि फिन्लंद वगैरे प्रदेश मिळवून त्यानें आपल्या राज्याची हद्द बाल्तिकसमुद्राच्या उत्तरेस नेली. त्याच प्रमाणें त्यानें इराणच्या शहाशीं लढाई करून काळा समुद्र व कास्पियन समुद्र यांमधील प्रदेश रशियन राज्यास जोडिला. व तसेंच तुर्कस्थानाशींही लढाई करून आपले ध्वज दान्यूबनदीच्या जवळजवळ नेले. याप्रमाणें त्याच्या कारकिर्दींत रूस देशाचा विस्तार युरोपांत फार झाला. त्यानें जर्मनी व इंग्लंद या देशांशीं सख्य केल्यावर नेपोलियनाला के अति राग आला. नेपोलियनानें सर्व युरोप पादाक्रांत केला परंतु ति एक रूस देश राहिला होता तो जिंकावा या हेतूनें त्यानें स० न्न १८१२ त रशियावर मोठी फौज घेऊन स्वारी केली. मास्को- स· शहरापर्यंत त्याचें सैन्य पोंचलें तरी रूस लोकांनीं त्यास कांहीं- वा च हरकत केली नाहीं, परंतु त्या शहरांत तो जातांच, त्या लो.

कांचा देशाभिमान जागृत झाला. नेपोलियन त्या शहरांत येतांच तेथील लोकांनीं शहराला आग लाविली व फ्रेंच शिपायांस रहाण्यासही जागा ठेविली नाहीं. रशियांत कांहीं उपाय चालेनासा होऊन नेपोलियन मागें परतला व त्यानें आणलेली एकंदर प्रचंड सेना थंडीनें व कोसॉक लोकांच्या हल्ल्यांनीं प्राणास मुकली. नेपोलियनाच्या सर्व भरभराटीस रशियांत जो जबरदस्त धक्का पोंचला त्यानें त्याची युरोपांत चोहोंकडे अप्रतिष्टा झाली व अखेरीस त्याला सेंतहेलेना बेटांत कैदेंत मरावें लागलें. या स्वारीपासून तर रशियाच्या शक्तीची युरोपांत फारच छाप बसली.

झार अलेक्झांदर यानें प्रथमप्रथम कांहीं कायदे चांगले करून आपल्या प्रजेस बरीच मोकळीक दिली होती, परंतु पुढें त्यानें मोठा जुलूम चालवून लोकमताची मुळींच पर्वा ठेविली नाहीं. तो स० १८२५ त मरण पावल्यावर त्याच्या मागें त्याचा धाकटा भाऊ निकलस हा गादीवर बसला. त्याच्या कारकीर्दींतील गोष्टी अगदीं आलीकडील असल्यामुळें थोड्या विस्तारानें दिल्या पाहिजेत. त्यानें तुर्कस्थानाच्या संबंधानें चुरस वाढवून लढाईवर प्रकरण आणिलें. त्यांत इंग्लंद व फ्रान्स या देशांनीं तुर्कस्थानाचा पक्ष घेऊन लढाई चालविली; हिलाच क्रिमियाची लढाई ह्मणतात.

क्रिमियाची लढाई होण्यापूर्वी रशियन लोकांना आपलें सामर्थ्य फार, आपण सर्वांत शूर, आपणाबरोबर युद्धांत कोणी टिकणार नाहीं असें वाटत असे. परंतु त्या लढाईंत जेव्हां फ्रान्स, टर्की व इंग्लंड या तिघांनीं त्यांचा पराभव करून त्यांस जेरीस आणलें तेव्हां रशियन लोकांचे डोळ्यावर आलेली मदांधता जाऊन आपलें खरें स्वरूप त्यांस दिसून आलें. आपण पूर्वी जो आपल्या सैन्याचा, वीर्याचा व देशांतील अंतःस्थिती चांगली असा डौल मारीत होतों तो वृथाभिमान होय, अशी त्यांची खात्री झाली. जेव्हां इनकरमन, आणि मालकाफ् येथें फटफाजिती होऊन पळ काढावा लागला तेव्हां रशियनांचे डोळे उघडले

व आपण जें समजत होतों तें सर्व व्यर्थ असें त्यांच्यां नजरेस आलें.

निकलस झारानें जी कडक राज्यपद्धति सुरू ठेविली होती ती लोकमतें निरर्थक ठरली व लोकांमध्यें विशेष चळवळ दिसूं लागली. बादशाही अंमलाचें खडतर जूं झुगारून देण्याचा प्रयत्न गुप्त मंडळयांनीं १८२९ च्या डिसेंबरांत केला होता परंतु तो व्यर्थ झाला. निकलसाचा स्वभाव त्याचा भाऊ जो अलेक्झांडर याच्याहून अगदीं भिन्न होता. तो मोठा धीट, हेकेखोर, सरळमार्गी असा होता. लोकमत जसें जसें बदलत जाईल त्याप्रमाणें हळूहळू सावधगिरीनें राज्यांत फेरफार व सुधारणा केली पाहिजे असें त्यास अगदीं वाटत नव्हतें. मनुष्य तेवढा स्वतंत्र, त्याला योग्य हक्क जे असतील ते दिले पाहिजेत, त्याला न्यायानें वागविला पाहिजे, हें जें तत्ववेत्त्यांचें म्हणणें त्याचा त्यास फार तिटकारा होता. गादीवर येण्याच्यापूर्वी तो कामगार लोकांस म्हणत असे कीं तुम्हीं आपले लष्करी नोकरीचें जें कर्तव्यकर्म तेवढें नीट बजावा; ह्या तत्ववेत्यांच्या ज्या वेडगळ समजुती व अप्रौढ विचार त्यांजविषयीं विचार करून आपल्या मेंदूस व्यर्थ त्रास देऊं नका ! हा गादीवर यावयाचे पूर्वी, फौजेंतील लोक वरिष्ट अम्मलदारांच्या हुकूम जुमानीत नसत. आणि ते बादशाही बुडविण्याच्या हेतूनें लष्करांतील लोकांस भलभलता उपदेश करून त्यांस राजनिष्टाभ्रष्ट करण्यास प्रवृत्त झाले होते. हें निकलसाला अगदीं आवडलें नाहीं. तो जुलमी साम्राज्याचा रक्षक व स्वतंत्रताशत्रु होता. सर्व युरोपांत प्रजासत्ता व राजसत्ता या दोहोंचें भांडण चाललें आहे असें त्याचे दृष्टोत्पत्तीस आलें. जेथें जेथें प्रजासत्ताचा जोर होण्याचा सुमार दिसे तेथील राजांस हा मदत देऊन, प्रजासत्ता प्रतिपादकांस शिक्षा करवीत असे ! इतर देशांत लोकांमध्यें चाललेली चळवळ पाहून आपलेही लोक आपणाविरुद्ध वागण्यास शिकतील असें त्यास वाटून, त्यानें आपल्या देशांत बाहेरून पु-

स्तकें देखील येणें बंद केलें. अन्यराष्ट्रांत प्रसिद्ध झालेलीं व हो-णारीं पुस्तकें व वर्तमानपत्रें आपल्या देशांत येऊं न देण्याविषयी त्यानें हुकूम फर्माविला. आपल्या देशांतच जे लोक कांहीं वर्त-मानपत्रांदिकांत लेख देत असत, त्यांवर कडक नजर ठेवून कांहीं कमजास्त त्यांचे हातून लिहिण्यांत आलें तर त्यांस तो एकदम शासन करी. त्यानें युनिव्हर्सिटींतले लोकांची संख्या कमी केली, राजनीतिशास्त्र व अर्थशास्त्र शिकविणारे गुरूंच्या जागा कमी केल्या आणि लष्करी शाळा वाढविल्या. रशियन लोकांस रशि-यांतून बाहेर देशीं जाणें बंद केलें व बाहेरून आंत येणारे लो-कांवर पोलिसास सक्त नजर ठेवण्यास सांगितलें. अशा रीतीनें रशियांत बंड होणार नाहीं असें त्यास वाटे !

१८४० च्या सुमारास, प्रत्येक ठिकाणीं सुधारणा झाली पा-हिजे, कालानुरूप वर्तन ठेवलें पाहिजे, प्रजेस जास्त स्वतंत्रता दिली पाहिजे, आपलें पाऊल हरऐक रीतीनें पुढें पडणें जरूर आहे, असें प्रतिपादन करणारे नव्या तरतरीचे लोक पुढें येऊं लाग-ले. फ्रेंच ग्रंथ वाचून त्यांचें मन विकास पावल्यामुळें, बादशाही अंमलांतील जुलूम, न्यायसभांचें अधमाचरण, लोकांच्या पैशाचा मनमानेल तसा व्यय, बडेलोकांचें वर्तन व स्वतंत्रमत प्रति-पादकांवर सरकारची करडी नजर, हीं त्यांस पूर्णपणें कळूं लाग-लीं. परंतु राजाबद्दल जीं आपलीं मतें तीं, निर्भीडपणें व मोकळे मनानें उघड करतां येईनात यास्तव तीं संभाषणांत व हस्तलिखित पुस्तकांतून ते प्रगट करूं लागले.

क्रिमियाची लढाई संपते न संपते इतक्यांत निकलस वारला व त्याचे पाठी मागून दुसरा आलेक्झांदर हा १८५५ त तक्तनशी-न झाला. हा फार दयाळू होता. देशाचें नांव राखावें अशी त्यास फार इच्छा होती. आपल्या पाठीमागच्या झारानें चो-होंकडे जी लष्करी तऱ्हा अमलांत आणली होती ती कांहीं उपयोगाची नाहीं, लोकांनीं आपले राज्यव्यवस्थेसंबंधी विचार मोकळेपणीं प्रगट करावे, त्यांना कारभारांत थोडासा हात घा-लण्यास परवानगी असावी, आपलीं गाऱ्हाणीं काय असतील तीं

प्रांजल अंतःकरणानें त्यांनीं सांगावीं हें त्यास फार आवडत असे. निकलसानें लोकांचीं तोंडें दाबून त्यांस कोणत्याही संबंधानें हूं कीं चूं करूं दिलें नाहीं, हें फार अश्लाघ्य होतें असें त्यास आढळून आलें. तथापि लोकांनीं विनाकारण बडबड केली तर ती त्यास सहन होत नसे. आपण जगामध्यें एक यःकश्चित् प्राणी आहों, आपल्या शिरावर लोकरक्षणाची फार जबाबदारी आहे, व जर खरोखर लोकांचें हित कर्तव्य आहे तर त्यांचा सल्ला वरचेवर घेतला पाहिजे, असे त्याचे विचार होते.

१८९९ त लढाई संपून जेव्हां तह झाला तेव्हांपासूनच निकलसाचे कडक पद्धतींत बरेच फेरफार होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. दुसरा अलेक्झांदर गादीवर आरूढ होण्याचे वेळेस जो सरकारी जाहीरनामा प्रसिद्ध झाला त्यांत, " सरकार व लोक या दोघांच्या प्रयत्नांनीं " कारभारांत सुधारणा करण्याची बादशाहाची फार इच्छा आहे, असें लिहिलें होतें. आजपर्यंत सरकारचा जो अगदीं गुप्त व्यवहार चालत होता तो जाऊन कांहीं सरकारी प्रकरणांवर चर्चा करण्याची लोकांस मोकळीक मिळाली. चोहोंकडे जो जुलूम चालला होता तो पुष्कळ कमी केला, कालेजमध्यें कांहीं नियमित विद्यार्थि द्यावे यासंबंधानें जे नियम होते ते मोडून टाकले, परदेशांत जाण्यायेण्याची मोकळीक दिली व वर्तमानपत्रांस बरेंच स्वातंत्र्य दिलें, अशा अनेक सुधारणा त्यानें केल्या.

हीं शुभचिन्हें पाहून लोकांना अतिशय आनंद झाला. आतां आपल्या देशाचा ऊर्जितकाळ खचित आला, व ही संधी व्यर्थ न घालवितां खरोखर जें वाईट आहे त्याचे उच्छेदनार्थ काय उपाय योजिले पाहिजेत ते प्रसिद्धपणें पुढें आणावे, असें पुढारी लोकांस वाटूं लागलें. निकलसाच्या अमदानींत राज्यकारणासंबंधी मतें बोलण्यास परवानगी नसल्यामुळें कादंबऱ्या व नाटकें लिहिणें, अध्यात्म, तर्क, न्याय इत्यादि शास्त्रांवर वादविवाद चालविणें, हेंच लोकांचें काम होऊन बसलें होतें. परंतु अलेक्झांदरचा जाहीरनामा बाहेर पडल्यापासून वर्तमानप-

त्रांचें व मासिकपुस्तकांचें स्वरूप अगदीं बदललें. अलेक्झांदर राज्यपद विराजित झाल्यापासून बुद्धिचें तेज चोहोंकडे फांकूं लागलें, व यांत्रिक सुधारणा, आगगाड्या, ड्यांका (पेढ्या), व्यापार स्वातंत्र्य, शिक्षण, कृषिकर्म, स्थानिकस्वराज्य या विषयांवर मासिकपुस्तकांतून लेख येऊं लागले.

अलेक्झांदर यानें आपल्या लोकांस सुख होण्यासाठीं जे उपाय केले त्यांत मोठा दास्यविमोचन हा होय. परंतु सर्फ लोकांच्या संबंधानें पुढें एक स्वतंत्र भाग लिहिला आहे, तेव्हां येथें त्याबद्दल कांहींच विशेष देत नाहीं. दान्यूब नदीच्या कांठावरील ख्रिस्ती संस्थानांवर तुर्कस्थानाकडून जो जुलूम होत होता तो दूर करण्याच्या हेतूनें व विशेषतः कान्स्तांतिनोपलावर प्राचीन काळापासून रशियाचा डोळा आहेच, तेव्हां तो ही लाग साधावा झणून १८७७ त तुर्कस्थानाशीं रशियाची लढाई सुरू झाली. या लढाईंत ज्या गोष्टी झाल्या त्या आमच्या बहुतेक चकांस स्मरतच असतील. 'रोगी मनुष्य' असें युरोपांत तुर्कस्थानास झणतात; तथापि या रोग्यानें ही रूस लोकांना चांगला हात दाखविला. परंतु अखेरीस रुसांनीं जय मिळवून बर्लिनच्या तहाप्रमाणें तुर्कस्थानचा पुष्कळ मुलूख संपादन केला. या मिळविलेल्या प्रदेशांत रशियाला काळ्या समुद्राच्या पूर्वकिनाऱ्यावरील बाटुम बंदर मिळालें. ही जागा आतां मोठी मजबूत केली आहे व तेथून कास्पियन समुद्रापर्यंत एक आगगाडीचा रस्ता काढला आहे.

तुर्कस्थानाशीं लढाई होण्यापूर्वी, रशियाच्या राज्यास जुलुमानें जोडलेल्या पोलांद देशांत मोठें बंड झालें. त्यांत बंडखोरांचा पराभव करून व कडक शिक्षा देऊन न थांबता, अलेक्झांदर यानें तेथें व्यवस्था करण्यासाठीं फारच कडक कायदे केले आणि पोललोकांस चोहोंकडून खिळून टाकिलें.

तथापि, आपल्या देशांतील लोकांकरतां त्यानें पुष्कळ चांगल्या गोष्टी केल्या असतांही, निहिलिस्त लोकांनीं त्याच्या जिवाला चैन पडूं दिलें नाहीं व अखेरीस १८८० च्या मार्च महिन्यांत

त्याच्या वाड्यास सुरूंग लाऊन उडविलें व त्यांतच तो जळून मेला. या निहिलिस्त लोकांबद्दल माहिती पुढें दिली आहे.

एकोणिसाव्या शतकास प्रारंभ झाल्यापासून एशियाखंडांत रूस लोकांनीं कोणतीं कारस्थानें मांडिलीं व कोणते देश जिंकले आणि त्यांनीं आपली हद्द अफगाणिस्थानापर्यंत कशी आणिली ही सर्व हकीकत या पुस्तकाच्या अखेरीस विस्तारानें दिली आहे.

१८८० त दुसरा अलेक्झांदर मारला गेल्यावर त्याचा मुलगा, तिसरा अलेक्झांदर गादीवर बसला व हल्लीं तोच राज्य करीत आहे.

प्रकरण ३ रें.

राज्यव्यवस्था—राना, काल्पस्य कारणम्—पोलीसचा जुलूम—कारागृहें—पाश्चात्य राष्ट्रांची युद्ध सामग्री—रशियाची फौज—कोसॉक्स—आरमार—विद्याखातें—रशियाची दिवाळखोरी—रेलवे, तारायंत्र, पोस्ट इ० इ०.

सांप्रत जगामध्यें तीन प्रकारची राज्यव्यवस्था चालते. ज्या देशांत राजा नसून सर्व राजकीय अधिकार देशांतील लोकांकडे असतात त्या राज्यपद्धतीस प्रजासत्ताक किंवा लोकसत्ताक ह्मणतात. जेथें राजा असतो परंतु कायदे करणें व पैशाची व्यवस्था करणें वगैरे महत्वाचे हक्क लोकांकडे असतात आणि जेथें ठाकमोठ्या राजकीय गोष्टी लोकमतावर अवलंबून असतात, त्या राज्यपद्धतीस 'नियंत्रित एकसत्ताक' ह्मणतात. ज्या देशांत राजा करील तें प्रमाण व जेथें लोकांचें राजकीय कामांत मुळींच अंग नसतें त्या राज्यरीतीस 'अनियंत्रित एकसत्ताक' ह्मणतात. या तीन राज्यपद्धति, ज्या त्या ठिकाणच्या लोकांचें ज्ञान व सुधारणा ह्यांच्या मानानें आढळतात. अज्ञान पक्ष अर्ध सुधारलेल्या लोकांत अनियंत्रित एकसत्ताक राज्यें आढ-

ळतात व ह्यांचे प्रत्यंतर एशियाखंडात मिळतें. या डांतिल चीन, जपान, ब्रह्मदेश, हिंदुस्थान, अफगाणिस्थान, इराण, तुर्कस्थान वगैरे देशांत अनियंत्रित एकसत्ताक राज्यें आहेत. या देशांतील प्रजांस राजकीय कामांत हात घालण्याचा अधिकार नाहीं. फक्त आमच्या देशांत, इंग्लिशलोकांच्या उदार बुद्धीमुळें मिळालेल्या, स्थानिकस्वराज्य, म्युनिसिपालिट्या इत्यादि हक्कांशिवाय, वर्तमानपत्रांच्या स्वातंत्र्यापासून लोकमतालाही बळकटी येत आहे; तथापि या देशांतील बडीं संस्थानें अनियंत्रित एकसत्ताक राज्यांचीं चांगलीं उदाहरणें आहेत. युरोपखंडांत बहुतकरून नियंत्रित राज्यसत्ता आढळते. इंग्लंड वगैरे देशांत राजाकडे थोडेच हक्क आहेत. अशा देशांत प्रत्येक महत्वाच्या राजकीय गोष्टींत लोकांचा हात फार असतो. युरोपांत फ्रान्स व स्वित्झर्लंद या दोन देशांत प्रजासत्ताक राज्यें आहेत; अमेरिकाखंडांत कानडा व ब्रेझील या दोन देशांशिवाय एकंदर लहान मोठीं १८ स्वतंत्र लोकसत्ताक राज्यें आहेत. यावरून अमेरिकाखंडांतील लोकांस राजांची सत्ता मुळींच आवडत नाहीं असें दिसतें.

कोणत्याही देशांतील राजकीय व सामाजिक व्यवस्था चांगली किंवा वाईट असणें हें त्या देशच्या लोकांच्या शहाणपणावर व सुधारणेवर अवलंबून असतें. युरोपांत नियंत्रित राज्यपद्धतीचा प्रसार बराच आहे तथापि रूस देशांत अनियंत्रित एकसत्ताक राज्य आहे. तेथील लोक कमी सुधारले आहेत व त्यानां आपले हक्क समजून घेण्याची योग्यता नाहीं, असें उघड दिसतें; तथापि या शतकांतील रूस लोकांविषयीं असें मत एकदम देववत नाहीं. दिवसोंदिवस त्यांना आपले हक्क कळूं लागले आहेत व ते मिळविण्यासाठीं त्यांनीं हरप्रयत्न चालविले आहेत परंतु राशियन झारांना जुलमी व मन मानेल तशी राज्य व्यवस्था करण्याची संवय असल्यामुळें आपल्या प्रजेस योग्य हक्क देण्याला ते आपला हात फारच आखरता धरितात. पुढें दिलेल्या हकिगतीवरून रशियन सरकारच्या जुलुमापासून तेथील

प्रजेस किती उपद्रव होतो हें सहज लक्षांत येईल. आपल्याच देशांतील व आपल्याच जातीच्या प्रजेवर जर रूस सरकार अनन्वित जुलुम करतें, तर दुर्दैवानें त्यांच्या हातांत सांपडलेल्या पोलांद, सिर्काशिया, तुर्कस्थान वगैरे देशांतील लोकांच्या स्थितीची कल्पनाही येत नाहीं. ज्या देशांत सरकारच्या कोणत्याही कृत्यावर कोणी ब्र काढला पुरे, कीं त्यास कारागृहांतल्या यमयातना सोसाव्या लागतात, त्या सरकाराच्या ताब्यांत असलेल्या परकी राष्ट्रांत केवढा जुलूम चालत असेल हें अनुमान करणें सोपें आहे. पोलंदांत वारंवार बंडें होण्याचें कारण रूस सरकारचा जुलूमच होय. रशियन सरकारच्या जुलुमाचें भयंकर चित्र पुढील हकीगतीवरून कळेल.

रशियांत पितर धि ग्रेतच्या पूर्वीची राज्यरीति व्यवस्थित व ठरीव नव्हती; एक कायदा चोहोंकडे लागूं नव्हता, प्रांताप्रांतांत निराळ्या चाली व निराळ्या शिस्ती असत; त्या काळीं दिवाणी व मुलकी कामाचे शिरस्ते ठरले नव्हते, व चोहोंकडे अडाणी तऱ्हा चालू होती. परंतु युरोपांतून प्रवास करून आल्यावर आपल्या देशाची अव्यवस्था पाहून पिटर धि ग्रेट याला फार वाईट वाटलें; व आपल्या लोकांच्या उन्नतीकडे कायाचांगनेकरून श्रम करणाऱ्या या महापुरुषानें रशियांतील राज्यव्यवस्था नीट करावी असा निश्चय केला. त्याच्या पूर्वीच्या झारांची अशा गोष्टीकडे कधींच नजर पोंचली नाहीं. आपला करडा अंमल चोहोंकडे चालूं असला म्हणजे सर्व झालें असें त्यांस वाटे. कायदे व नमुने ठरवून टाकले म्हणजे आपणास वेळ प्रसंग पडेल त्यावेळीं पाहिजे तसें वागणें कठिण जाईल ही त्यांस मोठी अडचण भासे, व असें बांधून घेणें त्यांना अर्थात्च पसंत होईना ! पण रशियन लोकांच्या नशीबानेंच उचल घेतल्यामुळें त्यांस पिटर सारखा थोर मनाचा राजा मिळाला. लोकांचें हित हेंच राज्याचें हित, व राज्याचें हित तेंच राजाच्या खास कारण आहे, असें त्याच्या अंतःकरणांत पक्कें बिंबलें होतें. पर त्यानें आपला सगळा जन्म लोकहिताकडे खर्च केला. आपलें

पोट भरलें ह्मणजे तिकडे प्रजा उपासानें मेली अगर चोरांनीं लुटली तरी फिकिर नाहीं, असा जुलमी राजांचा साधारण क्रम असतो; पण पिटरचें वर्त्तन याहून अगदीं उलट होतें. युरोपांतील सुधारलेल्या राष्ट्रांचा प्रत्यक्ष दाखला पाहून आल्यावर, तेथील-प्रमाणेंच आपल्या देशाची राज्यव्यवस्था, फौजफाटा, आरमार व्यापारधंदे, कलाकौशल्यें व लोकशिक्षणाची पद्धति करावी असा त्यानें मनाचा पुरा संकल्प केला, व त्या उद्योगास तो लागला. या झाराच्या राज्यव्यवस्थेचें पहिलें तत्व, कीं बादशहा करील तें प्रमाण व त्याची मर्जी कायदा. हें तत्व कायम राखून चोहोंकडे नीट बंदोबस्त व्हावा, व कायदे व शिरस्ते ठरविलेले असावे असा पिटराचा उद्देश होता; याप्रमाणेंच ह्ल्लींची राशियन राज्यपद्धति आहे. दिवसानुदिवस वर्तमानपत्रें, ग्रंथ वगैरे द्वारांनीं लोकमतास विशेष बळकटी येत चालली आहे व रूस सरकारासही त्याकडे लक्ष द्यावें लागतें. पितरनें जी राज्यव्यवस्था केली तिचें तात्पर्य हेंच कीं, प्रांतांतून व तालुक्यांतून जो बंदोबस्त ठेवावयाचा व जे कामदार नेमावयाचे त्यांचें सर्व चालन मुख्य केंद्रस्थान जो बादशहा झार, त्यापासून झालें पाहिजे; तो जे ठराव करील त्याप्रमाणें चोहोंकडे बंदोबस्त व व्यवस्था चालली पाहिजे. लोकांच्या हातांत कांहींच सत्ता ठेविली नाहीं. स्थानिकस्वराज्य वगैरे, कांहीं चांगल्या गोष्टी आलीकडे सुरू झाल्या आहेत, तथापि त्यांचा वास्तविक थोडाच उपयोग होतो, हें पुढील प्रकरणांत सांगितलें आहे त्यावरून लक्षांत येईल. राशियांत अगदीं खालच्या शिपायापासून कामदारांची जी परंपरा लागते तिची शेवटली पायरी ह्मणजे खुद्द झार. 'कर्तुमकर्तुम्' शक्ति काय तो त्याच्याकडे व तो किल्ली फिरवील त्याप्रमाणें सर्व राज्ययंत्र चालावयाचें. ज्याला या पृथ्वीवर असें कां ह्मणून विचारण्याची कोणाची छाती नाहीं त्याला झार ह्मणावें, अशी झार शब्दाची व्याख्या पितरनें दिली आहे. राज्यांत अगदीं शिखरावर बादशहा नंतर त्याच्याखालीं प्रधानमंडळी, त्यांच्या हाताखालीं सुभ्यां-

रील व प्रांतांवरील अधिकारी, व त्यांच्या खालीं जिल्ह्यांचे व तालुक्यांचे कामदार, याप्रमाणें अगदीं तळापर्यंत सर्व व्यवस्था आहे. कोणाला स्वतंत्र अधिकार नाहीं. प्रत्येकानें झार साहेबांच्या मर्जीप्रमाणेंच वागलें पाहिजे. ही राज्यपद्धति जरी चालू आहे तथापि आलीकडे मात्र झारांनीं ' मन मानेल तो कायदा ' हें तत्व थोडें कमी केलें आहे, व कांहीं ठरीव नियमांप्रमाणें राज्य चालवावयाचें असें त्यांनीं बांधून घेतलें आहे. तथापि या नियमांपासून लोकांस कांहीं विशेष हक्क मिळाले आहेत असें नाहीं. या नियमांपैकीं पहिला नियम असा आहे कीं, बादशाही तक्ताचा वारसा वडील वंशाकडे असावा व पुरुष नसल्यास तें तक्त बायकांस मिळावें. हा ठराव झार पालच्या कारकीर्दीत १७९७ त पास झाला. याच्या पूर्वीं पिटरचा ठराव असा होता कीं, गादीवर असलेल्या बादशहानें राजघराण्यापैकीं पाहिजे त्या योग्य इसमास आपल्या मागें झार नेमावें; दुसरा नियम असा आहे कीं, ग्रीकचर्च म्हणून जो ख्रिस्ती धर्माचा एक संप्रदाय रशियांत चालतो त्याच धर्मानुमाणें बादशहा व त्याच्या कुटुंबानें चाललें पाहिजे. राजपुत्रांचे विवाह बादशहाच्या संमतीनें झालें असले तरच त्यांच्या संततीस गादीचा वारसा पोंचेल असाही एक ठराव आहे. जो गादीचा अगदीं जवळचा वारस असतो तो १६ व्यावर्षीं वयांत येतो व बाकीचे वारस २० व्या वर्षीं येतात.

राज्याची व्यवस्था करण्याचें काम चार कौन्सिलां (सभां) कडे सोंपविलें असतें; परंतु त्यांवर सर्व अधिकार बादशहाचा असतो. बादशहाचे जवळ एक मंत्रिमंडळ असतें व त्यांच्या सल्लयानें ठरेल त्याप्रमाणें राज्यव्यवस्था चालते. हीं जीं चार कौन्सिलें सांगितलीं, त्यांत पहिले कौन्सिलास ' कौन्सिल ऑफ दि एंपायर ' असें म्हणतात. त्यांत एक अध्यक्ष म्हणजे प्रेसिडेंट असतो; त्यांत अमुकच सभासद असावे अशी संख्या ठरलेली नाहीं. हे सभासद बादशहानेंच नेमलेले असतात. १८७६ स या सभेंत ४२ इसम होते; यांखेरीज या सभेंत प्रधान अगर

मंत्रिमंडळीस व राजपुत्रांस बसण्याचा हक्क आहे. या सभेकडे दिवाणी, मुलकी, व कायदे करणें अशीं तीन कामें असतात. या सभेपैकींच कांहीं सभासद या तीन कामांकडे वांटले असतात. व त्यांच्या या तीन कामाकरितां तीन मंडळ्या आहेत, त्यांच्याकडे वेगळीं वेगळीं कामें सोंपविलीं असतात; त्या मंडळ्यांतही एकेक प्रेसिडेंट असतो. शिवाय या तिन्ही मंडळ्यांचीही एकत्र सभा भरते. राज्यसभेचें (कौन्सिल आफ् धि एंपायर) मुख्य काम राज्यांतील व्यवस्था व देखरेख ठेवावी हें असतें. कायदे करावयाचें, किंवा त्यांत प्रसंगाप्रमाणें वेळोवेळीं फरक करण्याची सूचना करण्याचें काम याच सभेकडे आहे. बादशहाच्या जवळ जी खासगी मंत्रिसभा असते तिच्याशीं या 'स्टेट कौन्सलाचा' प्रत्यक्ष संबंध असतो.

राज्यांतील दुसरी मोठी सभा (कौन्सिल) म्हणजे सूलींग-सेनेट किंवा न्यायसभा. मसलत देणें व कारभार करणें म्हणजे अनुक्रमें नियमाक व प्रवर्तक हीं राज्यव्यवस्थेचीं दोन्हीं अंगें या सभेकडे आहेत. यांखेरीज ही सभा राशियांतील न्यायाची मुख्य अदालत आहे. राज्यांतील खालच्या सर्व कोर्टांवर पुनः ठराव करण्याचें काम या सभेकडे आहे. या सभेच्या आठ मंडळ्या आहेत त्यांपैकीं पांच पिटर्सबर्ग येथें, व ३ मास्को येथें असतात. खालच्या कोर्टांतून जे खटले व प्रकरणें पुनः चौकशीकरितां येतील, त्यांची व्यवस्था लावण्याचा अधिकार या प्रत्येक मंडळीला आहे. या मंडळ्यांशिवाय दुसरीं अपीलकोर्टें आहेत, पण त्यांच्यावरही बादशहाकडे पुनः अपील करण्याची परवानगी आहे. या सभेंतले लोक मोठे इभ्रतेचे व वजनदार असतात. प्रत्येक मंडळीवर कायद्यांत निपुण असा एक प्रेसिडेंट असतो व प्रत्येक कामांत त्याची सही लागते. या सगळ्या मंडळ्यांची जेव्हां सभा भरते, तेव्हां अध्यक्षस्थान 'मुख्य न्यायाधीश' म्हणून जो न्यायखात्याबद्दल प्रधान असतो त्याच्याकडे येतें. बादशहाचा प्रतिनिधि या नात्यानेंच तो वागतो. यांखेरीज राज्याच्या जमाखर्चावर नजर ठेवण्याचें व कांहीं खा-

त्यांतून अधिकारी नेमण्याचें काम या सभेकडे असतें; जेव्हां कांहीं चूक नजरेस पडते किंवा उणीव दिसते तेव्हां ही सभा बादशहाकडे त्याबद्दल रिपोर्ट पाठवितें.

राज्यांतील तिसरी सभा म्हणजे धर्मसभा होय. या सभेविषयीं सर्व माहिती पहिल्या प्रकरणांत दिली आहे.

मंत्रिसभा म्हणून चौथी सभा आहे, तींत प्रधानमंडळी बसते; त्यांच्यावर बादशहाची खुद्द देखरेख असते. हे प्रधान ११ आहेत व त्यांच्याकडे निरनिराळीं खातीं आहेत तीं येणेंप्रमाणें:—

१. खानगी—व दरबारसंबंधी—खातें.
२. बाह्यदेशांशीं तह, बोलणेंचालणें वगैरे संबंध ठेवणें.
३. सैन्य, फौजफाटा.
४. आरमार.
५. राज्यांतील अंतस्थ व्यवस्था ठेवण्याचें खातें.
६. विद्याखातें.
७ जमाबंदीखातें.
८ न्यायखातें.
९ बादशाही जमिनींची व्यवस्था करण्याचें खातें.
१० लोकोपयोगीं कामें करणें (तलाव, रस्ते, रेलवे वगैरे बांधणें वगैरे)
११ साधारण देखरेख करण्याचें खातें.

हीं जीं ११ खातीं सांगितलीं त्यांच्यावर एकेक प्रधान असून त्यांच्या हाताखालींही त्यांचे दुय्यम वगैरे असतात.

यांशिवाय खुद्द झाराच्या मदतीस दोन लहान सभा आहेत त्यांत मंत्रिच असतात. या दोन सभांकडे धर्म व स्त्रीशिक्षण यांची व्यवस्था ठेवण्याचें काम असतें आणि तिसरी एक सभा आहे तिजकडे खुद्द झाराकडे आलेल्या प्रकरणांची चौकशी करण्याचें काम आहे

रशियन सरकारानें राज्यव्यवस्थेकरितां आपल्या सर्व राज्याचे सुभे, इलाखे व जिल्हे असे तीन भेद केले आहेत. सुभा किंवा जनरल गव्हर्नमेंट ज्याला म्हणतात ते मोठे असतात व

त्या प्रत्येकावर बादशहानें नेमलेला व्हाइसराय असतो. असे सुभे—पोलांद, फिन्लांद व काकेशियन पर्वताजवळचे प्रांत सोडून, खुद्द युरोपखंडांत—,१४ आहेत. त्यांत गव्हर्नमेंटें (इलाखे) ६८ व ६२५ जिल्हे आहेत. यांशिवाय यांत गणना केली नाहीं असे मुलुखाचे मुलूख पडले आहेत; परंतु त्यांत लोकवस्ती अतिशय कमी असल्यामुळें त्यांची विशेष व्यवस्था करण्याचें कारणच राहत नाहीं. अशा वैराण मुलुखांस 'ओब्लास्त' असें म्हणतात.

इलाख्यावर जो गव्हरनर असतो तो बादशहाचाच प्रतिनिधि या नात्यानें राज्य चालवितो; यामुळें सर्व अधिकार त्याच्या हातांत असतात. फौजदारी, दिवाणी व मुलकी वगैरे सर्व खात्यांवर त्याचा अम्मल असतो. जे जे म्हणून त्या सुभ्यांत सरकारचे कामदार असतात त्यांना तोच वरिष्ठ आहे. सर्व प्रकारचे रिपोर्ट, सर्व खात्यांतून त्याच्याकडे करावयाचे; कोर्टांचे ठराव फिरविण्याचा व पास करण्याचा, तसेंच कांहीं खटल्यांत क्षमा करण्याचाही अधिकार त्यास दिला असतो; त्याच्या हाताखालीं मुलकी काम पहाण्यासाठीं दुसरा एक बडा अधिकारी असतो; त्याला फक्त 'सिव्हिल गव्हर्नर' असा हुद्दा आहे. याच्या हाताखालीं सुद्धां एक व्हाइस गव्हर्नर असतो व जमाबंदीची व्यवस्था त्याच्याकडे असते. सुभ्यांचा सगळा जमाखर्च तपासण्याकरितां व बजेट तयार करण्याकरितां एक मंडळी असते.

प्रत्येक इलाख्याचा आकार सारखा नसतो इतकेंच नाहीं, तर वस्तीचें प्रमाण धरून सुद्धां हे इलाखे ठराविलेले नाहींत. पूर्वीं तेथें नेमलेल्या गव्हर्नरांचा अधिकार अतिशयच मोठा असे, यामुळें ते लोकांवर पाहिजे तसा अम्मल चालवीत; परंतु गव्हर्नरांचे अधिकार आतां कायद्यानें ठरवून दिले आहेत, यामुळें जुलूम कमी आहे. त्यांच्या हातांतून दिवाणी न्यायखातें तर अगदींच काढून टाकलें आहे व अलीकडे लोकांस लोकलसेल्फ् गव्हर्मेंट (स्थानिकस्वराज्य) मिळाल्यापासून तर त्यांचा बराच अधिकार कमी झाला आहे. झेमस्तो अगर 'लोकलबोर्ड' हे राशियानें नुकेच केले आहेत; यांशिवाय सरकारचे शेंकडों ठराव व हुकूम

वारंवार जातच असतात; व वर्तमानपत्रांचा फैलाव झाल्यामुळें लोकमताची भीति ही वाढली. या सर्व कारणांनीं रशियन गव्हर्नरांचा बेबंद अम्मल अगदीं कमी झाला आहे, व हल्लीं त्यांपैकीं पुष्कळ इसम हुशार, इमानी व सुशिक्षित आहेत. जीं निरनिराळीं ११ खातीं मागें दिलीं आहेत त्यांपैकीं 'अंतस्थ व्यवस्था ठेवणाऱ्या' खात्यांतून गव्हर्नरची नेमणूक होते व त्याला आपल्या कामाची जबाबदारी त्या खात्यांतील प्रधानाकडे द्यावी लागते.

याशिवाय निरनिराळ्या खात्यांवरील प्रधानांचे कामदारही प्रत्येक सुभ्याच्या व इलाख्याच्या मुख्य ठिकाणीं नेमले असतात. हीं एवढीं अवाढव्य खातीं चालण्यास कामदारांची एक फौजच झाली आहे. हे सरकारी कामदार, बहुतकरून बडे लोक व धर्मोपदेशक ह्या दोन वर्गांतून येतात. सरकारी कामदारांस 'चिनोव्हनिक' हें एक जातिवाचक नांव आहे. त्याचा अर्थ सरकारी नोकरांचा वर्ग; ज्यांना 'चिन्न' म्हणजे सरकारी नोकरीचा दर्जा आहे ते सर्व या वर्गांत येतात. पितर यानें कामदारांच्या १४ पायऱ्या किंवा दर्जे केले आहेत. ज्यांच्या कांहीं परीक्षा झाल्या नाहींत व ज्यांचा मोठा वशिलाही नाहीं त्यांना खालच्या पायरीवरूनच हळूहळू मोठ्या हुद्यावर चढावें लागतें. दुसरी एक अशी गमत आहे कीं दर्जाप्रमाणें हातांत अधिकार नस. तो. अमुक एक वर्षें सरकारी नोकरींत घातलीं, म्हणजे अमुक एक 'चिन्न' किंवा हुद्दा मिळावयाचाच, परंतु त्या हुद्याप्रमाणें हातांत अधिकार येत नाहीं व नांवच्या बड्या हुद्देवाल्यास खालच्याच एखाद्या जाग्यावर रेंगाळावें लागतें.

ही जी एकसत्ताक राज्यपद्धति रशियांत सुरू आहे ती दिवसेंदिवस तेथील लोकांस अप्रिय होत चालली आहे, व हल्लींच्या चिन्हांवरून तर असें दिसतें कीं, थोड्याच वर्षांत रूस सरकारानें आपल्या प्रजेस जर जास्त हक्क दिले नाहींत तर निहिलिस्त वगैरे गुप्त मंडळ्या विशेष जोरावतील व झारांच्या जुलमी सत्तेविरुद्ध भयंकर बंडेंही होतील. हीं बंडें होऊं नयेत म्हणूनच रूस

सरकार, स्वाऱ्या व परदेशांशीं दुसरीं कांहीं कारस्थानें उपस्थित करून, आपल्या चेतलेल्या प्रजेचें लक्ष अन्य ठिकाणीं ओढण्याविषयीं सारखे प्रयत्न चालवितें. रशियामध्यें पाश्चात्य युरोपांतील नियंत्रित राज्यरीतींची लोकांस बरीच गोडी लागली आहे, म्हणून रूससरकार आपल्या व्हाईसराय व गवर्नरांच्या हातांतील अधिकार कमी करीत आहे आणि लोकांसच पुष्कळ हक्क देत आहे.

ऐतिहासिक दृष्टीनें पहातां रशियांत जी अनियंत्रित राज्यपद्धति होती तिच्यापासून त्या देशांतील लोकांवर बरेच उपकार झाले आहेत. रशियाचा झार, पहिला अलेक्झांदर म्हणे कीं, 'प्रजेच्या हितार्थ चालविलेली अनियंत्रित एकसत्ताक राज्यपद्धति उत्तम होय.' हें म्हणणें खरें आहे; परंतु ज्या देशांतील लोकांस राजकीय गोष्टींत मन घालण्याची योग्यता आली नाहीं त्यांपुतेंच हें तत्व चांगलें. ज्या देशांतील लोकांस विद्येचा व सुधारणेचा ठेवा मिळाला आहे व जेथील प्रजा आपल्या हक्कांबद्दल भांडत आहे, तेथें ते हक्क न देणें हा रूस झारांचा पराकाष्ठेचा जुलूम आहे. ज्यावेळेस रशियांत लहानमोठीं संस्थानें होतीं, परकी मोंगलांच्या अमलापासून लोकांत पाणी उरलें नवतें व अज्ञानाधंकार पसरला होता, तेव्हां झारांची एकसत्ताक अनियंत्रित राज्यपद्धति रशियन लोकांस अनेक प्रकारें उपयुक्त झाली. एकसत्ताक राज्याखालीं आपसांतले झगडे बंद झाले व देशास स्वास्थ्य मिळालें, व पितरसारख्या जुलमी राजानेंच सुधारणा केली म्हणून रूसलोकांनीं डोकें वर काढिलें.

झारांच्या करड्या अंमलाखालीं असल्यामुळें रूसलोकांस परशत्रूची भीति उरली नाहीं व त्यांस स्वातंत्र्याची अभिरुचि लागली. आपण स्वतंत्र लोक आहों, हें राष्ट्र आमचें आहे व याच्या रक्षणार्थ आपणास झटलें पाहिजे इत्यादि देशाभिमानाचे विचार एकसत्ताक अंमलाखालीं त्यांच्या मनांत येऊं लागले. तथापि असा एक सामान्य नियम आहे, कीं कोणतीही गोष्ट सर्वकाळच हितावह होत नाहीं. लहानपणचीं आंगडीं जाणत्या

मुलास उपयोगीं पडणार नाहींत. झारांचा कडक अंमल कांहीं काळपर्यंत लोकांस राजकीय व राष्ट्रीय शिक्षण देण्यासाठीं फारच हितावह झाला, परंतु लोकांचें ज्ञान वाढून, त्यांस संस्कार पावलेल्या व सुधारलेल्या राष्ट्रांत जसजसें स्थान मिळूं लागलें त्याप्रमाणें तेथील राज्यपद्धतिही फिरविली पाहिजे. झारांना तो प्रसंग लवकरच येईल. आधींच त्यांना या गोष्टीचा अनुभव आला आहे. निकोलसाच्या जुलुमाला त्रासलेल्या रशियन लोकांनीं खटपट करून बरेच हितावह कायदे करून करून घेतले आहेत; त्यांनीं स्थानिक व्यवस्थेचे हक्क संपादिले, न्यायखात्यांत सुधारणा करविली व एकदम २½ कोटि गुलामांना स्वातंत्र्य मिळाविलें. कोणत्याही राष्ट्राला हा नियम लागू पडतो कीं, जसजसा लोकांचा ज्ञानोत्कर्ष होतो, तसतसे ते राजांच्या जुलुमांतून मुक्त होतात व राजांनाही आपल्या हितावर दृष्टि देऊन त्यांचीं मागणीं द्यावीं लागतात. याला मोठें उदाहरण इंग्लंदाचा सगळा इतिहासच आहे. तेथील लोकांनीं राजांची सत्ता क्रमाक्रमानें करी छाटून काढिली व आपले हक्क कसे संपादिले हा इतिहास जगप्रसिद्ध आहे.

तोच प्रकार रशियांत अलीकडे दिसूं लागला आहे. आतां ही एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, सारखीच ज्ञानवृद्धि झाली तथापि भिन्न भिन्न राष्ट्रांची सुधारणा सारख्याच तऱ्हेची होत नाहीं; कारण प्रत्येक राष्ट्राच्या लोकांचा नैसर्गिक स्वभाव व त्यांच्या देशाचें स्थानमाहात्म्य, यांचे परिणाम थोडे थोडे तरी त्यांचा सुधारणेवर झाले पाहिजेत. फ्रान्स, इंग्लंद व जर्मनी ह्या देशांस अलीकडील शास्त्रीय ज्ञान जरी सारखेंच मिळालें आहे तरी त्या देशांतील लोकांच्या आचारांत, मानसिक विचारांत व राज्यपद्धतींत भेद राहिलेच पाहिजेत ; व ते दूर करणें मानवी शक्तीच्या पलीकडे आहे. असे भेद असणें सृष्टीच्या नियमांतलेच आहे. असो.

तात्पर्य काय, कीं रशियांत जरी अलीकडील मानसिक व भौतिक ज्ञाननिधि प्राप्त झाला, तथापि ते लोक, आपापल्या स्व-

भावानें, राज्यपद्धतीनें वगैरे, तो ठेवा मिळालेल्या दुसऱ्या राष्ट्रांतील लोकांप्रमाणेंच होतील, असें ह्मणणें ह्मणजे केवळ चुकीचें आहे. ज्ञानसंस्काराचा परिणाम सर्व लोकांवर सारखा कांहीं होणार नाहीं. उद्यां जर आपण आफ्रिकेंतील वैराणासरु प्रदेशांतील आरबांस हल्लींचें सर्व शास्त्रीय शिक्षण दिलें, तर ते लोक इंग्रजांप्रमाणें उद्योगी किंवा अमेरिकन लोकांप्रमाणें शोधक होतीलच, असें ह्मणणें साहस आहे. दोन आणि दोन चार हा हिशेब व्यवहारांत लागू पडत नाहीं; कारण ही बेरीज होते. वेळीं व्यवहारांत दुसऱ्या लहानमोठ्या शेंकडों गोष्टींचें अंग शिरतें; व केव्हां केव्हां दोन आणि दोन तीन व केव्हां केव्हां पांचही होतात. आमच्या लोकांनीं ही गोष्ट पक्की लक्षांत ठेविली पाहिजे.

ही गोष्ट लक्षांत न आणल्यामुळेंच रशियन झारांनीं ज्या सुधारणा परदेशाहून आपल्या देशांत उसन्या आणल्या व ज्या आपल्या प्रजेनें स्वीकाराव्या म्हणून त्यांनीं गोडीगुलाबीनें, धमकीनें अगर जुलुमानें सुद्धां खटपट केली, त्यांचें बीजारोपण झालें नाहीं.

इतकेंच नाहीं, तर कांहीं वर्षें रशियनलोक झारांस शत्रुप्रमाणें मानीत; पण आतां तेथील लोकांस असें समजूं लागलें आहे कीं, झारांची सत्ता करडी होती म्हणून त्यांस हे दिवस दिसताहेत. त्यांच्या एकसत्ताक अमलानेंच रशियन लोकांची ज्ञानवृद्धि होत आहे. रशियानें जें अवाढव्य राज्य संपादन करून पृथ्वीवरील बलाढ्य राष्ट्रांत आपली छाप बसविली आहे, तें तरी त्यांच्या झारांच्याच उद्योगाचें फळ आहे. परंतु फायद्यांप्रमाणें एक तोटाही विसरतां नये तो हा कीं, कांहीं वर्षेंपर्यंत झारांनीं आपल्या प्रजेचें केवळ 'मायबाप' या नात्यानें पालन केलें. त्यांनीं आपली प्रजा अर्भक व अज्ञ समजून त्यांचीं सर्व कामें करण्याची जबाबदारी आपणावर घेतली. त्यांना राजकीय मसलतींत मन घालूं दिलें नाहीं, एवढेंच नव्हे तर त्यांना आपल्या गांवची व्यवस्था वगैरे लहानलहान स्थानिक अधिकार

ह्यां पुतें दिले नाहींत. सर्व त्यांच्याकरितां सरकारानें करावें, यांनीं ह्मणून आपणांकरितां कांहींच करूं नये. त्यांना आपलें हित कळत नाहीं असें समजूनच रशियन झार आपल्या प्रजेशीं मन मानेल तसे वागत होते, व ह्याच तत्वावर त्यांनीं नेमलेल्या कामदार लोकांचें ही वर्तन असे. सरकार व प्रजा हीं अगदीं भिन्न आहेत, अशी त्यांची समजूत होती. सरकारचें हित व प्रजेचें हित हीं एकच आहेत; प्रजेचें हित त्यांतच सरकारचें हित आहे असें त्यांच्या स्वप्नांतही येत नव्हतें. सरकारच्या व प्रजेच्या हक्कांचा जेथें तंटा येई, तेथें प्रजेच्या हक्कांची सदोदित पायमल्ली होई; व तेव्हां सुद्धां त्या झारांना वाटे कीं, आह्मी करतों हें सर्व लोकांच्या हिताकरितांच करितों ! झारांच्या अनियंत्रित अमलापासून जे फायदे झाले, त्यांत हा एक मोठा तोटा झाला. कारण जरी कांहीं काळपर्यंत झारांचें 'राजा करील तें प्रमाण' हें तत्व हितावह होतें, तथापि तें बंद करण्याचे दिवस आले असतांही त्यांनीं आपल्या प्रजेस पुष्कळ काळपर्यंत हक्क व अधिकार दिले नाहींत; पण हल्लीं हा मनु रशियांत फिरला आहेः लोकमतास बळकटी येत आहे व त्यांस अधिकारही मिळत आहेत.

पितरच्या कारकीर्दींत व अलीकडेही रशियन कामदारलांच, लबाडी व जुलूम करण्यांत विशेष गुंतलेले
या असत. रशियांत जीं सगळीं राज्यसूत्रें हालावयाचीं तीं
पिटर्सबर्ग शहरांतून हाललीं पाहिजेत; स्थानिक सरकारांस
च्या स्वतःच्या जबाबदारीवर कांहीं करतां येत नाहीं, यामुळें
यां शेंकडों गोष्टी विलंबानें होतात. आधींच राज्य फार अफाट असल्यामुळें स्थानिक सरकारचे रिपोर्ट वगैरे जात तोंपर्यंतच फार
ग्या वेळ लागतो व शेवटीं पिटर्सबर्ग येथें प्रधानमंडळीला योग्य वाटेल तशी व्यवस्था होते. या दुसऱ्या गोष्टीनें ज्याठिकाणांकरितां किंवा ज्या प्रांतांकरितां प्रधानमंडळी कायदा अगर
ठराव करिते त्या प्रांतांचें,—ते फार दूर असल्यामुळें,—त्यांना कांहीं ज्ञान नसतें; तेथल्या लोकांच्या अडचणी व गरजा यांचा

त्यांस कांहींच अनुभव नसतो, यामुळें लोकांस बराच त्रास होतो. स्थानिक अधिकाऱ्यांसच जरा जास्त मोकळिक असली ह्मणजे त्यांस आपल्या अमलांतल्या लोकांची माहिती चांगली असते व त्यामुळें लोकांस खरोखर हितावह कायदे मिळतात. पण खुद्द सरकारचा आपल्या कामदारांवर सुद्धां पाहिजे तितका विश्वास नाहीं. प्रत्येक कामांत शेंकडों तऱ्हेचे नियम ठरवून त्यांस बांधून टाकलें आहे, यामुळें जो तो आपल्या कामाची जबाबदारी आपल्या वरिष्ठांवर संपवितो व आपण मोकळा होतो; या क्रमानें अखेरीस सर्व प्रकरणांचीं पुडकीं राजधानींत येऊन पडतात. तेथून जेव्हां मंत्रिमंडळाकडून ठराव निघतील तेव्हां काय तें शेवटचें ठरतें.

ज्या देशांत स्थानिक अधिकार लोकांकडे नसतो, कामदारांच्या बुद्धीवर कोणतेंही काम संपवलें नसतें व प्रत्येक गोष्टींत त्याला आपल्या वरिष्ठाकडे पहावें लागतें, तेथें वर सांगितलेल्या सर्व अडचणी उद्भवतात.

तेव्हां हल्लीं रशियादेशांत सरकारी नोकरांची अशी स्थिति आहे; असें होण्याचें कारण उघडच आहे. पूर्वीं प्रांतांवरील गव्हरनरांस फारच अधिकार दिले होते; त्याचा परिणाम लोकांवर जुलूम करणें, लांच खाणें व सरकारासच फसाविणें हा झाला; तेव्हां त्यांच्यावर डोळा रहावा व सरकारचेंही नुकसान होऊं नये, ह्मणून त्यांच्या हातांतले स्वतंत्र अधिकार काढून घेतले व सरकारी हुकुमाशिवाय त्यांनीं कांहीं करूं नये असे कडक नियम करून टाकिले. या उलट वर्तनाचे वाईट परिणाम काय ते वर आलेच आहेत. इतकें करूनही कामदार लोक सरकारच्या डोळ्यांत धूळ टाकितात, असें बादशहा झार निकलस यास कळल्यावरून त्यानें 'झँडारमेरि', नांवाचें एक नवीन खातें काढलें. या खात्यांचे काम एवढेंच कीं, त्यांनीं राज्यांत चोहोंकडे हिंडून कामदारांच्या व लोकांच्या वर्तनावर नजर ठेवावी, आणि कोठें कांहीं वाईट स्थिति असल्यास मुख्य सरकारास ताबडतोब कळवावें. या खात्या-

पासून कांहींच फायदा झाला नाहीं. कामदारांच्या गैरवर्तणुकी-बद्दल कागाळ्या करण्याचें सोडून, सरकारच्या विरुद्ध कोणी बोलला किंवा कोणी राजकीय मसलतींत असला तर राजद्रोहाचा आरोप त्याच्यावर आणून, ते गुप्त पोलीस, तेवढी बातमी मात्र वर कळवीत; यामुळें हल्लीं हें खातें एका तऱ्हेचें पोलीसखातेंच झालें आहे. पोलीसखातें वेगळें आहेंच, पण हे कामदार त्यां-ना आणखी मदत करितात. हें विचित्रखातें रशियांत अद्यापि आहे, व या खात्यांतील एखाददुसरा मनुष्य प्रत्येक शहरांतून असतो. तूर्त या खात्याचा उपयोग म्हणजे राजद्रोह, बंडें, गुप्त मंडळ्या ह्यांचा बातमी काढणें एवढाच आहे. या खात्यांतील लोकांस, पाहिजे त्या मनुष्यास संशयावरून एकदम पोलिसा-च्या ताब्यांत देतां येतें; यामुळें हा एक लोकांवर मोठा जुलूमच होत आहे. हें खातें ज्या वाईट गोष्टी दूर करण्यासाठीं काढलें होतें त्या मात्र तशाच आहेत ! !

एवढ्यावरून तात्पर्य निघतें कीं, सरकारच्या शेंकडों ठरा-वांनीं निरनिराळ्या खात्यांतल्या लबाड्या व हयगयी कांहीं दूर होत नाहींत. अलीकडील रशियन बादशाहाच्या कायद्यांतून व आचरणांतून सुद्धां लोकांचें हित व्हावें अशी मनापासून इच्छा आहे असें दिसतें, पण इच्छा पुरी करण्याचे त्यांचे उपा-य वेडगळपणाचे आहेत. मागें सांगितलेंच आहे कीं, लोकांक-रितां सर्व गोष्टी सरकारानें करावयाचा जसा कांहीं मक्ताच घे-तला आहे व यामुळें रशियन सरकार आपल्या लोकांसाठीं ज्या खटपटी करतें, त्या सर्व आपल्या कोत्या शहाणपणावरच बस-विलेल्या असतात ; परंतु खरोखरच जर राज्ययंत्र सुरळीत चा-लावें, लबाड्या कमी व्हाव्या, नोकरांनीं आपल्या कामांत दक्ष रहावें ही इच्छा असेल तर अलीकडे जे सुशिक्षित लोक पुढें येत आहेत त्यांच्या हातांतच अधिकार दिले पाहिजेत. त्याप्र-माणें पुष्कळ अधिकार त्यांस हळु हळु मिळत आहेत हें सांगि-तलेंच आहे. लोकांचीच नजर जेव्हां कामदारांवर लागेल तेव्हां व्यवस्था नीट राहील. लोकमतास बळकटी आली म्हणजे हें

साहजीकच होणार आहे. अलीकडे तो प्रकार राशियांत दिसूं लागला आहेच. ' **मनःपूतं समाचरेत्** ' ह्या महा श्रुतिवर या काळांत बादशहा फारसा भरंवसा ठेवीत नाहींत व त्यांना ठेवतांही येत नाहीं. ' **राजा कालस्य कारणम्** ' ह्याच्या उलट-च दिवसानुदिवस सुधारलेल्या राष्ट्रांचा क्रम चालू आहे. काळ फिरेल त्या मानानें राजांना व सरकारांना आपलें वर्तन फिरवावें लागतें. सुधारलेल्या देशांत लोकांच्या ज्ञानाच्या व सुधारणेच्या पायरीप्रमाणें त्यांस हक्क द्यावे लागतात.

राशियांतलें क्रिमिनल कोड सौम्य आहे ह्मणून व १८६४ सालापासून कोर्टाला जुरी मिळाल्यामुळें, तेथील प्रजेवर जुलूम होऊं नये असें प्रथम दर्शनीं वाटतें, परंतु चांगले कायदे असून-ही, सरकाराच्या मर्जीस आल्यास, ते निरुपयोगी कसे होतात, ह्याबद्दल राशियाचें उत्तम उदाहरण आहे. राशियन पोलीस-खात्याचा जुलूम सर्व जगाला जाहीर आहे. राशियन सरकारास असें वाटलें, कीं चांगले, सौम्य व उदारपणाचे कायदे केल्यानें प्रजा जास्तच हक्क मागते, ह्मणून सगळेच वाईट करावे! तें सरकार जुलमी असल्यामुळें व दिवसेंदिवस रूसलोकांचें ज्ञान वाढत जाऊन त्यांना आपली स्थिति कळल्यामुळें, झारांस आपल्या वर्तनावर काय टीका होईल, कोण फितूर करील, कोठें बंडें होतील इत्यादि अनेक विवंचना पडतात. सरकारच्या वर्तनावर कोण कुरकुर करतो; सुधारणा होण्याविषयीं कोण खटपटींत आहे, वगैरे चौकशी करण्याकरतां तेथील पोलिसास फार अधिकार दिले आहेत. सरकारी कामदाराविरुद्ध जरा तक्रार केली किंवा त्याचा हुकूम तोडला तर अशा अपराधास साधारण शिक्षा न देतां रूसदेशांत त्या गुन्ह्याला ' बंडाच्या ' सदराखालीं घातलें आहे ! ! संशयावरून किंवा द्वेषावरून, सैबिरियांतील खाणींत किंवा एकाद्या कोंदट, ओलसर व घाणेरड्या कारागृहांत, राहिलेलें आयुष्य घालविण्याची कोणावर पाळी येईल, याचा कांहीं नेम नाहीं ! ! सुधारलेल्या सर्व देशांत नीतीनें वागणाऱ्या मनुष्यास कायद्यांची भीति बा-

ळगण्याचें कारण उरत नाहीं, परंतु रशियांतील पोलीस कोणाही भल्या माणसाची अब्रू काढण्यास समर्थ आहे. परवाने घेऊन त्या देशांत प्रवास करण्यास गेलेल्या पुष्कळ मोठ्या परकीय मनुष्यांस संशयावरून रूस पोलिसानें एकाएकीं कैद केल्याचीं उदाहरणें पुष्कळ देतां येतील. आमचे नामदार व्हाइसराय यांचे विद्वान् प्रायव्हेट सेक्रेटरी मि० मॉकेंझीवॉलेस व सैबिरियांतील आणि रशियन मध्यएशियेंतील प्रख्यात प्रवासी रेवेंरेंड लॉन्सडेल, यांनाही रशियन पोलिसाचा तडाखा चुकला नाहीं. यांपैकीं दुसऱ्या गृहस्थाला निहिलिस्ट लोकांचा साथीदार, ह्या संशयावरून एकदम कैद केलें होतें ! या पोलिसामुळें त्या देशांतील लोकांचें वर्तन सर्वदा कावेंरेंबावेंरें व भ्यालेल्यासारखें दिसतें. प्रत्यक्ष राजद्रोह, किंवा राजकीय विषयावर फक्त वाटाघाट केली म्हणून प्रतिवर्षीं सैबिरियांत हजारों लोकांस हद्दपार करतात. राजद्रोहाच्या किंवा राजकीय गुन्ह्यांची मुळींच चौकशी होत नाहीं. कित्येक मोठ्या खटल्यांतून चौकशी होते ती दारें झांकून होते ! कोर्टांत काय झालें यांची वार्ताही बाहेर न पडण्याविषयीं खबरदारी घेतली जाते. केव्हां केव्हां पोलिसाचें क्रूर वर्तन किंवा सरकारचा जुलूम ह्यांवर आरोपी टीका करीत, परंतु ती टीका वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाल्यास लोकांस राग येईल यासाठीं, सरकारी कामदारांनीं मुद्दाम तयार केलेले रिपोर्ट मात्र वर्तमानपत्रांस मिळत. केव्हां केव्हां तर खटले कधीं निघतात, त्यांची चौकशी केव्हां होते, याचा पत्ताही लागत नाहीं! ज्यांना फाशींची शिक्षा झालेली असते त्यांना ती बजावण्यापूर्वी देखील क्रूर यातना सोसाव्या लागतात. एकदां एका प्रसिद्ध गुन्हेगारानें, फाशीं देते वेळीं तमाशा पहाण्यास जमलेल्या लोकांस आपले विच्छिन्न झालेले अवयव दाखविले व पोलिसानें आपले कसे हाल केले तेंही सांगितलें, तेव्हां सरकारच्या बेबंद वर्तनावर बराच गवगवा झाला. तेव्हांपासून फांशीं देणें तें गुप्त रीतीनें द्यावें असा ठराव झाला !! अशा प्रकारचे हालहाल करण्यांत रूस झारांना काय वाटत असेल तें असो. रशियन

सरकारास अलीकडील शास्त्रीय सुधारणेचें ज्ञान झाल्यापासून त्या ज्ञानाचा उपयोग आपल्या प्रजेचे छळ करण्यांत होत आहे. संशयावरून कैद केलेल्या इसमांकडून कबुली करण्यासाठीं विजेच्या शक्तीनें त्यांच्या अंगास कळा लावितात. ! अशा प्रकारच्या दुष्ट राज्यपद्धतीस रशियनलोक त्रासले आहेत यांत आश्चर्य तें कोणतें ! पूर्वी फ्रान्सांत जशा कोऱ्या चिठ्या काढून पाहिजे त्याला बास्टिलच्या भयंकर किल्ल्यांत आणीत, त्याप्रमाणेंच रशियन पोलीस पाहिजे त्या मनुष्यास कुटुंबांतून काढून सैबिरियांत टाकूं शकतो. राज्यांतील अंमलबजावणीचें काम या दुष्ट पोलिसाकडेच आहे, यामुळें त्यांचा हातांत किती अधिकार ठेविला आहे हें पुसावयास नको. या पोलीसखात्याचे दोन भाग आहेत; एक गुप्त पोलीस व दुसरा शहर व गांव पोलीस. ' गुप्त ' च असल्यामुळें पहिल्या वर्गाच्या पोलिसाची चांगली माहिती मिळत नाहीं. १८६४ सालापासून राजकीय गुन्ह्यांपुरताच अधिकार त्यांच्याकडे ठेविला आहे. परंतु राजकीय गुन्ह्याखालीं पाहिजे तो अपराध रशियांत येतो! या पोलिसाचें नांव काढतांच रूसलोकांच्या पोटांत धस्स होतें. गुप्तांचें निमंत्रण म्हणजे मृत्यूची चिठ्ठी असें त्यांस वाटतें. फक्त रशियांतच हा त्रास आहे असें नाहीं; तर जेथें म्हणून रशियन लोक गेले असतील तेथें त्यांच्या पाठीवर हे यमदूत आहेतच ! ज्या इसमांच्या योग्यतेपासून अगर मतापासून झारांच्या राज्यास उपद्रव होईल असें वाटतें त्यांच्या पाठीवर गुप्तांची देखरेख असते आणि ते काय करतात, काय बोलतात वगैरे त्यांच्या वर्तनाचें इत्थंभूत टांचण, झारांकडे जातें.

गुप्त पोलिसाचें हें वर्णन झालें. पण शहर पोलिसालाही अधिकार फार आहेत. त्यांच्या हातांत लोकांच्या गृहकृत्यांत व खासगी कामांत ढवळाढवळ करण्याचा पूर्ण अधिकार आहे, व विशेषतः परवानें देण्याचें काम त्यांच्याकडे असल्यामुळें त्यांचें फारच जमतें. शहरांतले रहिवाश्यास पोलिसाशीं प्रसंग कधीं तरी आलाच पाहिजे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाणें,

घर बदलणें, पत्रें पाठविणें व घेणें, व्यापारधंदे करणें वगैरे व्यवहारिक अनेक गोष्टींत हात घालणें असल्यास पोलिसास पूरी सवड ठेविली आहे.

रशियन तुरुंगांची भयंकर स्थिति वाचूनच अंगावर कांटा उभा रहातो. मग ज्या हतभाग्यांना तेथें प्रत्यक्ष अनुभव घ्यावा लागतो, त्यांची स्थिति काय होत असेल ही कल्पना नको ! चौकशी होण्यापूर्वीच महिनेच्या महिनेपर्यंत प्रथम आरोपी लोकांस कारागृहांत रहावें लागतें. तुरुंग लहान असून त्यांत स्वच्छ हवेचा प्रवेश बिलकुल होत नाहीं व ते बहुधा ओलसर व दमट असतात. जेथें २०० कैदी रहाण्याची सोय केली असते, त्यांत ७००।८०० कैद्यांस खेंचून भरतात ! राजकीय अपराध्यांस एकांतवासाची शिक्षा देतात. ह्या एकांतवासांत त्यांना कांहीं काम नसतें व त्यांना पुस्तकें तर मिळावयाचीं नाहींत, परंतु एखाद्यानें जमिनीवर भूमितीच्या रेघा काढून कर्मणूक केली तरी सुद्धां शिपायांकडून लागलाच मार चो वसतो. या निरुद्योगी आयुष्यांत कैद्यांस एकांतवासाचा व चौ अंधारकोठड्यांचा इतका त्रास येतो कीं बहुतेक कैदी कारागृहांत तच मरतात, वेडे होतात किंवा मरणोन्मुख होऊन बाहेर येतात. स्त्रियांचे सुद्धां अशा तऱ्हेचे हालहाल करितात व याहूनही विशेष शरमेची गोष्ट म्हणजे, त्यांच्या अब्रूची बिलकुल चाड ठेवीत नाहींत. तुरुंगावरचे अधिकारी म्हणजे केवळ राक्षस असतात व ते कैद्यांचा अनेक प्रकारें छळ करतात. कैद्यांचें अन्न थोडें अमतें इतकेंच नाहीं तर तें पुनः वाईट असतें; जेलरलोकच त्यांत हात मारतात. दरवर्षी ज्यांना सैबिरियांत पाठवितात त्यांना प्रथम कांहीं महिनेपर्यंत पायानें प्रवास करून कष्ट सोसावे लागतात व शेवटीं खाणींत काम करावें लागतें; तेव्हां तर चाबकांचा मार चालला असतो.

१८७४ सालापासून रशियाच्या फौजेंत फेरफार केले आहेत व नवीन पद्धति सुरू केली आहे. युरोपियन राष्ट्रांपैकीं इंग्लंद शिवाय करून आस्त्रिया, इटाली, जर्मनी, फ्रान्स व रशि-

या या देशांत प्रत्येक पुरुषानें फौजेंत शिरलेंच माहिजे असे सक्तीचे कायदे केले आहेत. परंतु ह्या सामान्य नियमास कांहीं अपवाद आहेत. ज्या कुटुंबांत एकच पुरुष असतो किंवा जो शरिरानें अशक्त किंवा व्यंग असतो त्याला ही जुलमी शिपायगिरी चुकते. त्याचप्रमाणें युनिव्हर्सिटीच्या अमूक एक परीक्षा झाल्या असल्यासही त्रास सुटतो.

आलीकडे सुधारणेचा कळस होऊन सुद्धां, युरोपियन राष्ट्रें लढायांची तयारी जास्त ठेवूं लागलीं आहेत. १९ व्या शतकांतील इतर सुधारणेबरोबर मनुष्यांच्या रक्ताचा स्राव करण्याचीं साधनें वाढावीं हें साहजिकच दिसतें ! प्राचीन काळीं लोकांवर धर्माचा जुलूस असे. आतां फौजेंत शिरण्याबद्दल जुलूम होत आहे. पूर्वीं युरोपांत गुलामगिरी फार होती. आतां जर्मनी, रशिया वगैरे देशांत जन्मास येणें म्हणजेच गुलामगिरी आहे. बंदूक उचलण्याचें ज्यास सामर्थ्य आहे अशा सर्वजणांनीं हडेलहफू केलेंच पाहिजे. राष्ट्रांतल्या लोकांचीं जुलुमानें बडी फौज तयार करण्याची सुरुवात प्रथम फ्रान्स व जर्मनी या देशांत झाली. या शतकांत या कामीं जर्मनीनें तर कमालच केली आहे. तें सगळें राष्ट्रच फौज आहे म्हटलें तरी चालेल.

एथ्वीवरील इतर जीवजंतूंत जसा जिवनार्थ कलह चालतो तसा मनुष्यांतही चालतो. कितीही यंत्रें शोधलीं, कायदे सुधारले किंवा नीतिशास्त्राचीं पुस्तकें पठण करविलीं, तथापि मानवी स्वभाव व पशुस्वभाव यांमधील सामान्य धर्म जातील असें म्हणणें धाष्टर्च आहे.

महत्वाकांक्षा व पोट हीं जोपर्यंत आहेत तोंपर्यंत लढाया चालणारच. युरोपांतील राष्ट्रांत जी चढाओढ सुरू झाली आहे तिचा मूल पाया एका मोठ्या तत्वांत आहे. अर्थशास्त्रांत जो एक नियम आहे कीं, लोकांची उडी अन्नावर पडते, तो अगदीं खरा आहे. लोकवस्ति वाढत चालल्यामुळें पोटाची सोय करण्यासाठीं युरोपियन राष्ट्रांस परदेशांत वसाहति करणें भाग पडलें व त्यासाठीं जो तो आपला स्वार्थ पाहूं लागला, म्हणून मत्सर वाढून

जें तें राष्ट्र आपल्या शेजाऱ्याच्या पुढें जाण्याविषयीं खटपट करूं लागलें. या खटपटीपासून त्यांना मोठ्या फौजा बाळगणें जरूर पडलें. यांशिवाय जुलुमी बादशाहांच्या खासगी द्वेषांमुळें व महत्वाकांक्षेसाठीं ही ते फौजा वाढवूं लागले. युरोपांतील राष्ट्रांच्या चढाओढीमुळें एशिया व इतर खंडांतील लोकांच्या हक्कांची पायमल्ली होत आहे; परंतु त्या गोष्टीला ख्रिस्तीधर्म किंवा १९ व्या शतकांतील सुधारणा हीं कांहींच अडथळा करूं शकणार नाहींत. हजारों वर्षं ज्यांनीं स्वातंत्र्याचा उपभोग घेतला, अशा मध्यएशियेंतील राष्ट्रांवर रूसलोकांनीं शस्त्र उगारिलें व त्यांच्यावर आपली सुधारणा स्थापन केली. या सुधारणेच्या व भूतदयेच्या कामासाठींच उझबेग लोकांच्या रक्ताचे पाट वाहविले !! नाहीं तर त्यांना सैबिरियांतील खाणी, बंदुकींचा मारा, कुलपी गोळ्यांची ऊब व उपासमरीचें सौख्य इ० रशियन सुधारणा कशी कळती ! परंतु वास्तविक सुधारणा व लोकहित हीं फक्त नांवाचीं बाहुलीं आहेत. खरें तत्व तर पोट आहे. जर्मनीनें या शतकांत युद्धकला फारच वाढविली व शांतता ठेवण्याचे हेतूनें लक्षावधि लोकांचे प्राण घेतले. राष्ट्रांच्या कायद्यांत असें सांगितलें आहे कीं, लढाई करण्याचा उद्देश शांतता ठेवणें हा होय, परंतु हल्लींच्या क्रमावरून तर उलट प्रकार दिसतो. शांतता कशाकरतां, तर लढाईची उत्तम तयारी ठेवण्याकरितां, असें म्हटलें तर हल्लीं शोभलें जाईल.

फौजेंत शिरण्याविषयीं युरोपांत जो जुलूम होत आहे, तो इंग्लंद पहिल्या प्रतीचें बलाढ्य राष्ट्र असूनही, त्यांत नाहीं. पूर्वीपासून लोकांच्या स्वातंत्र्यास इंग्लंदानें जितका मान दिला तितका दुसऱ्या कोणत्या ही राष्ट्रानें दिला नाहीं. फ्रेंचांनीं प्रजासत्ताक राज्य स्थापन केलें परंतु त्यांत स्वातंत्र्य किंवा मनुष्याचे हक्क तर मिळाले नाहींतच, परंतु हें नांवाचें स्वातंत्र्य देण्याच्या डौलानें, सगळ्या युरोपांतल्या करून लाखों मनुष्यांचे निष्कारण प्राण मात्र घेतले.

त्यांच्या त्रासांतून सोडविण्यासाठीं एका इंग्लंदानें मात्र कंबर बांधली व फ्रेंचांची योग्य खोड मोडली. नेपोलियनची कारकीर्द संपतांच १८१५ त, जर्मनी, राशिया व फ्रान्स इत्यादि देशांतील जुलमी एकसत्ताक बादशहांनीं आपसांत असा ठराव केला कीं, यापुढें आपल्या प्रजांस बिलकुल स्वातंत्र्य द्यावयाचें नाहीं. या उद्देशानें त्यांनीं वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य बंद केलें व राजकीय विषयांवर उघड बोलण्याचालण्याचीही सक्त मनाई केली. फ्रेंचांच्या,—प्रजासत्ताक—परंतु खरोखर जुलुमी राज्याची खोड जिरविल्यावर पुढें जो हा प्रकार सुरू झाला, त्यांतून इंग्लंदानें आपलें आंग काढिलें. कारण अशा जुलुमी राज्यव्यवस्थेचा इंग्लिशांस मनापासून कंटाळा आहे. लोकांचें बोलण्याचें व लिहिण्याचें स्वातंत्र्य नाहींसें करणें इंग्लिश लोकांना मुळींच आवडत नाहीं, यामुळें युरोपांतील बादशहांच्या जुलुमी ठरावांत त्यांनीं आपलें आंग ठेविलें नाहीं. गुलामांस सोडविण्यासाठीं सुद्धां जर कोट्यावधि रुपये इंग्लंदानें खर्च केले तर फौजेंत शिरण्याच्या जुलमाचा त्यांस राग असावा हें साहाजिकच आहे. इंग्लंदानें आपल्या ताब्यांतील लोकांस उदारबुद्धीनें जें स्वातंत्र्य दिलें आहे, तें, युरोपांतील कांहीं राष्ट्रें आपल्या प्रजेलाहीं देत नाहींत, ही गोष्ट लक्षांत बाळगण्यासारखी आहे. रशियाच्या शेजारामुळें यापुढें मात्र जुलुमानें शिपाई करण्याचें इंग्लिशांना भाग न पडो, एवढीच इच्छा आहे.

सन १८७४ पर्यंत प्रत्येकानें लष्करांत राहिलेंच पाहिजे, असा कायदा रशियांत नव्हता. त्यापूर्वी शेतकरी, कारागीर, व्हालंटिअर (खुषीनें गेलेले) व थोडे मारून मुटकून आणलेले लोक हेच फौजेंत असत. परंतु वरील सालीं जर्मनीच्या अनुकरणाप्रमाणें झारांनीं एक नवीन कायदा केला, त्या अन्वयें २१ वें वर्ष लागलें म्हणजे फौजेंत शिरावेंच लागतें, व एकंदर १५ वर्षें नोकरी करावी लागते व त्यांपैकीं सहा वर्षें सज्ज फौजेंत घालवावीं लागतात. रशियन फौजेचे दोन प्रकार आहेत; एक रेग्युलर फौज व दुसरी मिलिशिया. यांपैकीं मिलिशिया फक्त

लढाईचे वेळीं मात्र बोलाविताात. रेग्युलर फौजेपैकीं कांहीं सज्ज असते व कांहीं शिलकेंत ठेविली असते. सरकारी ठरावाप्रमाणें दर वर्षीं अमूक एक लोक फौजेंत नवीन घ्यावे असें ठरलें असतें. मग तेवढी नवीन भरती करण्यासाठीं, २१ वर्षांच्या पुरुषांच्या नांवाच्या चिठ्या टाकून, ज्यांचीं नावें निघतील त्यांस फौजेंत घेतात. प्रत्येक इसमास कधीं तरी बंदूक उचलणें भाग पडतें. या सामान्य नियमास मागें सांगितलेले मात्र कांहीं अपवाद आहेत. पुढील कोष्टकांवरून रशियन फौजेचें प्रमाण कळेल:—

ऑक्टिव आर्मि (तयार फौज).	शांततेच्या वेळीं		लढाईच्या वेळीं	
	ऑफिसर.	शिपाई.	ऑफिसर	शिपाई.
कामदार—	१,८२०	१,६०८	३,१५०	३,४९४
११२पायदळ पलटणी	१२,०९६	३,६५,५६८	१५,१६८	७,६४,९२६
५४पलटणी रैफल—	९३०	२७,९३९	१,१३०	५३,७२३
५६पलटणी व २ स्क्वाड्रन घोडे स्वार	२,१२१	५९,४६२	२,०४३	५३,८६१
५१ब्रिगेड्स, आर्टिलरी(तोफखाना)	१,९१६	५७,२८५	१,८१८	७८,४८१
३०(घोड्यांचा तोफखाना, ब्याटरीस्	१४१	४,१७१	१५४	६,२५८
एन्जिनिअर्स	७४२	१६,७३१	७६५	२९,६२९
एकंदर	१९,७७४	५,३२,७६४	२४,२२८	९,८६,३७३
शिल्लक				
पायदळ	३,१९६	६०,७७०	८,६११	५,३७,८७५
तोफखाना	३९	६,९७८	५७६	१९,८००
एन्जिनिअर्स	२	१,०३८	१०४	५६९
एकंदर	३,५३६	६८,७८६	९,२९१	५,६३,३७३

	शांततेच्या वेळीं.		लढाईच्या वेळा.	
	ऑफिसर.	शिपाई.	ऑफिसर.	शिपाई.
—शिवाय—				
डेपो ट्रूप्स	३५१	११,७६४	१८,५४४	७१,०८८
लोकल— ,,	१,६२५	५९,६२५	१९८३	९१०६७
इन्स्ट्रक्शन ,,	५९	१,१३२	६	२१५
कोसॉक्स—,,	१,९८४	४९,९६२	३३५६	१,४१,१६९
इरेग्युलर—,,	१३९	४,६३७	१४३	६,१८८
एकूण बेरीज	२,७४६८	७,२९,७७०	४१५५१,	१८,७६,३५३

या शिवाय किरकोळ सैन्य पुष्कळ आहे, तें सर्व मिळून शांततेच्या वेळीं ७,७०,००० होतें व लढाईच्या वेळीं २२,००,००० होतें; व प्रसंगींच लढाईच्या कामीं उपयोगास आणतां येईल अशी संख्या धरली तर ३२,००,०८० होते. फक्त रूस देशांत लढाईच्या ऐन प्रसंगीं उपयोगी येण्यासारखे घोडे किती आहेत, ही गणना १८८३त केली त्यावरून, १॥ कोट घोडे मिळतील असा अंदाज केला आहे.

रशियाच्या दक्षिण भागीं निपर व दॉन या नद्यांच्या तीरांवर प्राचीन काळापासून कोसाक नांवाची एक लढाऊ जात रहात होती. हे लोक जन्मतःच शिपाई असतात ह्मटलें तरी चालेल. शेत भात करून ते तार्तार लोकांशीं लढाई देत. पुढें कांहीं रूस संस्थानांनीं व पोलांदच्या राजांनीं त्यांस चाकरीस ठेविलें होतें आणि चाकरीबद्दल त्यांस मुलुख तोडून दिला होता. हे हत्यार बंद लोक आपापल्या निवडलेल्या मुख्यांच्या हाताखालीं राहून, जेव्हां आसपासचीं संस्थानें त्यांस आपल्या मदतीस बोलावीत तेव्हां ते जात. पुढें मास्कोच्या राजांनीं जेव्हां रूस देश सर्व एक केला, तेव्हां त्या लोकांला आपल्या प्रजेहून कांहीं ज्यास्त हक्क दिले, कारण त्यांची लढाईमध्यें फार गरज लागे. या हक्कांबद्दल ह्मारांस गरज लागेल तेव्हां,

त्यांनीं शस्त्रें घेऊन निघावें असा ठराव होता. लढाईच्या वेळीं त्यांच्यावर झारांची सत्ता न चालतां त्यांच्या मुख्यांचीच चाले. पुढें हळु हळु रशियन राज्याच्या वृद्धिबरोबर ही जातही उरल नदीकडे पसरत गेली. सैबिरिया देश कोसाक लोकांनींच जिंकिला व तेथें आपल्या वसाहति केल्या. अलीकडे तर मध्यएशियेंतील रशियन राज्यांत, पॉसिफिक महासागराच्या किनाऱ्यावर आणि आमूर नदीच्या तीरीं कोसॉक लोकांच्या वसाहती आहेत. अशा वसाहती करण्यांत झारांचे दोन उद्देश आहेत; एक तर मुलुख लांगवडीस येतो व दुसरा ही फौज आपला अंमल राखण्यास जवळ तयार असते. त्या वसाहतींत हे लोक स्वस्थतेचे वेळीं कृषिकर्म करितात, परंतु लढाईच्या प्रसंगीं आपल्या टोळ्या तयार करून झारांच्या फौजेस मिळतात. या लोकांस सरकारी कर व दुसरे कांहीं उपद्रव सोसावे लागत नाहींत, परंतु त्यांस लढाईच्या प्रसंगाखेरीज पगार ही मिळत नाहीं. कोसाक लोकांच्या फौजेंत झारांनीं अलीकडे बरीच व्यवस्था केली आहे, तथापि 'रेग्युलर' फौजेंत शिरण्याला ते लोक कबूल नाहींत. कोसाक लोकांवर झारांचा पूर्ण अंमल कधींच बसला नवता; परंतु गोडीगुलाबीनें वागवून त्यांच्याकडून त्यानीं मोठमोठी कामें करून घेतलीं. हे लोक शूर, दांडगे, धीट व कितीही श्रम झाला तरी सोसणारे आहेत, अशी युरोपांत ख्याती आहे. हे घोड्यावर बसणारे पटाईत असून मराठे लोकांच्या फौजेप्रमाणें टोळ्याटोळ्यांनीं छापे घालून शत्रूला जेरीस आणितात. नेपोलियन बोनापार्तीनें रशियावर जेव्हां स्वारी केली तेव्हां तर या लोकांनीं आपलें नांव युरोपभर गाजविलें. लुटारू व वावटळीसारखें पळणारें हें पेंढार फ्रेंचांच्या समूळ नाशास कारण झालें. 'कोसाक आले' म्हटलें, कीं नेपालियनाच्या अनुभविक शिपायांचीही गाळण होई.

रशियांत लढाईच्या ऐन प्रसंगीं सगळा भार कोसाक लोकांवर असतो. या लोकांस लढाई असली म्हणजे मोठा उत्साह वाटतो. स्वारींत असले म्हणजे ते लोक पोटाला धड न मिळालें

तेरी कैंट्टे सोसून लढतात. एशिया खंडांतील प्रदेशांवर जेव्हां लढाया चालत तेव्हां पुढें हेच असत. तुर्कस्थानाबरोबर झालेल्या लढाईंत या लोकांनीं फारच शौर्य दाखविलें. तेव्हां बालकन पहाडांच्या बर्फांत सुद्धां ते निजत. राशियांत एकंदर कोसाकांच्या १० टोळ्या आहेत. जेव्हां गरज लागेल तेव्हां बोलाविल्यापासून १० दिवसांच्या आंत, कांहीं ठरीव संख्येस, स्वतःचा पोषाख, घोडे व शस्त्रें घेऊन लढाईस निघावें लागतें. लढाई शिकण्याचें कामही त्यांच्या स्वतःवरच सोंपाविलें आहे.

साधारण मानानें पहातां राशियन राज्यांत हे लोक स्वतंत्रच आहेत असें म्हटलें तरी चालेल. पूर्वीपासून त्यांना ताबेदारी व पारतंत्र्य फारसें माहित नाहीं, आणि त्यांस गुलामगिरी तर कधींच करावी लागली नाहीं. त्यांच्याकडे तोडून दिलेल्या जमिनीचा थोडा तरी भाग प्रत्येक इसमास मिळतो व आपली आंतलीं व्यवस्था तेच स्वतः ठेवितात. सोळावें वर्ष संपलें म्हणजे यांच्या शिपायगिरीस प्रारंभ होतो, व तशा तयारींत त्यांस २५ वर्षे काढावीं लागतात. तथापि लढाई नसली म्हणजे शेतभात करण्याची त्यांस मोकळीक आहे. वयाच्या ४२ वे वर्षापासून ४७ वे वर्षापर्यंत त्यांस शिल्लक फौजेंत गणतात. त्यानंतर मात्र बंदूक उचलण्याचें त्यांस कारण पडत नाहीं, व तेव्हांपासून ते लढाईच्या प्रसंगांतून चुकतात. दान नदीवरील कोसाकांस कर द्यावे लागत नाहींत व उलट झाराकडूनच त्यांस खंडणी पोंचते व त्यापैकीं लढाईंत कामास आलेल्या पुरुषांच्या पोरक्या पोरास व विधवांस पेनशन मिळतें. जेव्हां तशीच जरूर पडेल तेव्हां ४ लक्ष कोसाक–फौज राशियास मिळेल. या फौजेचा मोठा भाग स्वार आहेत, व यांच्याकडे सुमारें चारशें तोफा आहेत.

राशियाजवळ २२ लक्ष लढाऊ मनुष्यें आहेत म्हणून वर सांगितलें, त्याप्रमाणें युरोपांतील इतर प्रमुख राष्ट्रांपाशीं एकंदर लढाऊ माणसें किती आहेत हें वाचकांस कळावें म्हणून पुढील आंकडे दिले आहेत.

देश.	शांततेच्या वेळचीं-फौज.	लढाईंच्या वेळचीं फौज.	प्रसंगच आल्यास लढाऊ मनुष्यें.
जर्मनी.....	४,००,०००	२६,९०,०००	९७,००,०००
फ्रान्स.....	५,२९,०००	२९,००,०००	३७,९०,०००
रशिया.....	७,७०,०००	२१,००,०००	३२,००,०००
इटाली.....	७,९०,०००	२१,००,०००	.....
आस्त्रिया....	३,००,०००	१०,३९,०००	.....
इंग्लंड.....	१,८०,०००	९,९०,०००	.....

या आंकड्यांवरूनच त्या त्या राष्ट्रांची शक्ति कळते असें समजूं नये. इंग्लंदाची फौज थोडी आहे खरी तथापि इंग्लंदाच्या सामर्थ्याची सर्व मदार आरमारावर आहे. इंग्लंदाच्या आरमाराबरोबर पृथ्वीवरील एकाही राष्ट्राचें आरमार नाहीं.

रशियाच्या आरमारांत दोन भाग आहेत, त्यांपैकीं एक भाग बाल्तिक समुद्रांत व दुसरा काळ्यासमुद्रांत आहे. बाल्तिक डिविजनांत लहान मोठीं २०९ लढाऊ गलबतें आहेत व त्यांपैकीं २३ लोखंडानें मढवलेलीं आहेत. याच भागांत ९६ टार्पेडो आहेत. काळ्यासमुद्रांत ९९ गलबतें असून त्यांत ९ लोखंडी आहेत व शिवाय १२ टार्पेडोच्या बोटी आहेत. या सगळ्या गलबतांवर एकंदर ६७१ तोफा आहेत. या गलबतांपैकीं ६ फर्स्टक्लास लोखंडी गलबतें आहेत.

पितर धि ग्रेतपागून रशियनलोक समुद्रावर आपलें वर्चस्व स्थापण्याविषयीं प्रयत्न करीत आहेत व त्याप्रमाणें आजमित्तिला त्यांचें आरमार बरेंच जमलें आहे. वर सांगितलेल्या गलबतांशिवाय त्यांचीं कांहीं लढाऊ गलबतें, व्लाडिवोस्तोक नामक बंदरांत पासिफिक महासागरावर आहेत व दुसरीं कांहीं कास्पियन समुद्र, आरल सरोवर व श्वेतसमुद्र ह्यांत आहेत. रशियाला समुद्राचें साधन चांगलें नाहीं हें मागें सांगितलेंच आहे. अलीकडे बेहरिंग सामुद्रधुनीपासून थेट कोरियाच्या हद्दीपर्यंत पासिफिक महासागराचा किनारा रशियाच्या ताब्यांत आला

आहे व कोरियाच्या दक्षिणेस एक लहानसें बेट होतें तेंही नुक्तें काबीज करून तेथें मोठें बंदर तयार करण्याविषयीं खटपट चालली आहे; परंतु रूसदेशापासून हीं स्थळें फारच दूर आहेत तेव्हां रुसांस त्यांचा तादृश उपयोग तेवढाच होणार आहे. राशियाच्या आरमारांपैकीं बाल्तिक समुद्रांतील गलबतें मजबूत असून त्यांना किनाऱ्यावरील बळकट किल्लयांचा आश्रय आहे; शिवाय त्या समुद्रांत 'टार्पेडो' फार आहेत. या सुधारलेल्या काळांत मनुष्यांचा एकदम फडशा उडविणारें महाघातक यंत्र याच्यासारखें दुसरें नसेल. यांत एकदम भडकणारे व आड येणाऱ्या कोणत्याही पदार्थाचा सत्यानाश करणारे कांहीं भयंकर ज्वालाग्राही पदार्थ भरलेले असतात. हे टार्पेडो लहान होड्यांतून असतात त्यामुळें मोठ्या लढाऊ गलबतांजवळ ते केव्हां जातात याचा पत्ताच लागत नाहीं. एकदां त्या गलबतांजवळ ते पोंचले म्हणजे त्यांचा स्वाहा झालाच म्हणून समजावें. या टार्पेडोच्या तडाख्यांत केवढेंही लोखंडी तारूं सांपडलें तरी त्याचा एका क्षणांत फडशा उडतो. तूर्त राशियाकडे असे टार्पेडो फार आहेत व त्या लोकांनीं ते आपल्या मोठमोठ्या बंदरांच्या संरक्षणासाठीं जागोजाग तयार ठेविले आहेत. या यंत्राची कल्पना अलीकडे झाली असल्यामुळें लढाईंत त्याचा अद्यापि म्हणण्यासारखा उपयोग झालेला नाहीं, फक्त टर्की-राशियन लढाईंत मात्र थोडासा उपयोग केला होता.

फौज व आरमार यांशिवाय, राशियन राज्यांत शत्रूचा प्रवेश होऊं नये म्हणून जागोजाग मजबूत तटबंदी किल्ले बांधिले आहेत. बाल्तिक समुद्रावरील रेवेल, नार्वा, क्रान्स्ताद्, विबोर्ग व आणखी बऱ्याच जागा इतक्या मजबूत केल्या आहेत कीं त्या बाजूस शत्रूपासून राशियास कांहीं भय नाहीं, असें कांहीं युद्धकलेंत निष्णात इंग्लिश सरदारांचें मत आहेत. तेथील किल्लयांची इतकी तयारी आहे, कीं बाल्तिक समुद्रांत जाऊन राशियाशीं लढणें अगदीं व्यर्थ आहे असें ते म्हणतात. दक्षिणेकडील काळ्या समुद्रावरील बंदरेंही त्याचप्रमाणें मजबूत केलीं आहेत.

त्यांत ओदेसा, निकोलेफ़, क्रिमियाच्या लढाईंत जमीनदोस्त झालेलें सेबॉस्तपोल व अझॉफ हीं प्रसिद्ध आहेत. काकेसस प्रदेशांच्या बाजूंवर पोटी, बाटूम, कार्स इत्यादि बरींच स्थानें आहेत. आमच्या सरकाराचा व रशियाचा संग्राम झाल्यास काळ्यासमुद्रांतच लढाई फार होईल. त्या बाजूस रशियाचा मोड होण्याचा पुष्कळ संभव आहे. लढाईच्या वेळीं तुर्कस्थानानें इंग्लिश गलबतांस काळ्यासमुद्रांत जाण्यास परवानगी दिली पाहिजे, परंतु तो देश जर तिन्हाईत राहिला तर मात्र रशियाला भीति नाहीं. एकदां इंग्लिश गलबतें आंत शिरलीं ह्मणजे मग रशियास फार जड जाईल व विशेषतः इंग्लिश फौज जर काकेससच्या इकडील उतरणीवर ठेपेल, तर तेथील लोक रशियाच्या जुलुमास त्रासले असल्यामुळें लागलेच बंड करतील. सिर्काशिया, जिआर्जिया वगैरे प्रांतांतील लोकांस रशियाचा फारच कंटाळा आला आहे व ते रशियाच्या अमलास झुगारून देण्याचीच संधी पहात आहेत.

ओघानुसार रशियन लोक जिंकलेल्या लोकांस कसे वागवितात हें सांगितलें पाहिजे. काकेशसपर्वतांच्या बाजूंवर आज शेंकडों वर्षें कांहीं स्वतंत्र जाती रहात होत्या, त्यांत सर्काशियन वगैरे प्रख्यात आहेत. पूर्वीं हे लोक लुटी करीत व आसपासच्या देशांतून बायका, मुलें पळवून नेत. परंतु पुढें तुर्कस्थान व इराण या देशांतील लोकांनीं त्यांच्यावर स्वाऱ्या करून त्यांस हातटेंकीस आणिलें. हे लोक जात्याच लढाऊ, हिय्येबाज असून त्यांनीं फार दिवस स्वातंत्र्य अनुभविलें होतें. शेवटीं त्यांचा निरुपाय झाल्यावर त्यांनीं आपल्या शत्रूंच्या जाचांतून मुक्त व्हावें ह्मणून एखाद्या बळकट राष्ट्राचा आश्रय धरण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें ते रशियन झाराच्या बावट्याखालीं गेले. रशियन सरकारानें कांहीं वर्षें त्यांस नीट वागविलें; परंतु आतां त्यांस फारच जुलूम सोसावा लागतो. त्यांच्या देशभाषेंतल्या सर्व शाळा बद करून रशियन सुरू केली, त्यांच्या प्राचीन व पूज्य मानलेल्या चालींचा अपमान केला, त्यांची न्यायपद्धति,

कायदे, धर्म, आचार वगैरे गोष्टींत हात घातला व वर्तमानपत्रांचें तोंड बंद केलें आहे. इतकेंच नव्हे, तर त्या लोकांनीं आपला देशी पोषाख घातला तरी देखील रुसांला राग येतो. जर त्यांना इंग्लिशांची मदत मिळेल तर ते रशियन सरकारावर एकदम बंड करतील. हाच प्रकार पोलांद वगैरे जिंकलेल्या मुलखांत आढळतो. सर्व लोकांस जुलमी शिपायगिरीचा फारच जुलूम वाटतो व अलीकडे तर, रशियाची ज्यांवर मुख्य भिस्त, ते कोसाक लोक सुद्धां फार संतापले आहेत.

या प्रदेशांत वर सांगितल्या जागांखेरीज दर्बंद, तिफ्लिस, एरिवान ह्या जागाही बळकट आहेत. एशियाखंडांत इराणच्या हद्दीवर चात, किझिलअर्वत, अस्काबाद, सराक्स वगैरे जागा तटबंदीच्या आहेत. यांशिवाय कास्पियन, ऑरल, अमुदर्या व सिरदर्या ह्यांच्या तीरांवर ही बरींच बळकट स्थानें आहेत.

रशियाच्या युद्धसामग्रीचें जें हें वर्णन दिलें त्यावरून रशियाची तयारी मोठी दिसेल, परंतु हा भ्रम आहे. लढाई चालविण्यास व ती विशेषतः इंग्लंदसारख्या संपन्न व पहिल्या प्रतीच्या बळकट राष्ट्राशीं चालविण्यास, रशियास बिलकुल ताकद नाहीं. याचें मुख्य कारण द्रव्याची कमतरता. रशियासारखें दिवाळखोर कर्जबाजारी राष्ट्र दुसरें कोठेंच नसेल. हें एवढें कर्ज वाढण्याचें कारण लढाया. महत्वाकांक्षेमुळें वारंवार लढाया करून रशियन सरकारचा खजिना अगदीं हलका झाला आहे. राज्याच्या सगळ्या उत्पन्नापैकीं $\frac{1}{2}$ भाग करांपासून येतो व या करांच्या बोजाखालीं तर रूस लोक वांकले आहेत. अशा तऱ्हेनें लोकांपासून पिळून काढलेला पैसा व कर्जानें उभारलेला पैसा जो जमतो, त्याचा $\frac{2}{3}$ भाग लढाईच्या खर्चाकडे जातो !! उपन्नाचा एवढा भाग दारूगोळ्यांत उडतो एवढ्यावरूनच रूस सरकाराच्या दुष्ट महत्वाकांक्षेचें स्वरूप ध्यानांत येईल. रशियाचें सर्व राज्य कर्जावर चाललें आहे यामुळें संपन्न इंग्लंदाशीं रशिया किती दिवस टिकाव धरील हें उघडच दिसतें. कागदी पैसा करून बरीच रकम निघते, परंतु त्या नोटांचा भाव शेंकडा

२१।३० कमी असतो. ह्यावरून रूस सरकार पतीचें व इमानी कूळ आहे असा लोकांस विश्वास नाहीं असें दिसतें. रूस देशांत एखादा प्रवासी गेला तर त्याला नाणें मिळतां मिळतां मारामार पडते. सर्व व्यवहार या उतरलेल्या नोटांवर चालतो. राशियांत बहुतेक कर्ज इंग्लंदांतून आणलें आहे.

राशियन राज्याचें उत्पन्न वर्षाचें सुमारें ७० कोटी रु० आहे व दरसाल खर्चाचें प्रमाण तर उत्पन्नाहून फारच जास्त असतें. यामुळें शिलकेचें तर नांवच नको; पण कर्जाचीही फेड होत नाहीं. आज मित्तिला राशियाला ५ अब्ज ७८ कोट रुपये कर्ज आहे ! याखेरीज रेलवे करण्यासाठीं वेळोवेळ काढलेल्या कर्जाची रकम ही तशीच मोठी आहे. राशियानें १८७६ सालापासून १८८० सालापर्यंत तुर्कस्थानाशीं जें युद्ध चालविलें होतें त्यांत १ अब्ज १० कोटी रुपये खर्च झाला ! या उघळपट्टीमुळें राशियाची पत कमी होत आहे तेव्हां कर्ज मिळण्याची ही पंचाईत पडते. *

राशियन लोकांस विद्या देण्यासाठीं कांहीं झारांनीं खटपटी केल्या त्यासंबंधीं उल्लेख मागील प्रकरणांत आलाच आहे. विद्याखात्यांत नीट फेरफार करून नवीन सुधारणा, माजी झारानें केली. राशियन लोकांनीं स्वतः खटपट न करतां परदेशांचें आयतें ज्ञान मिळवून अनुकरणाचा सपाटा चालविला त्याचे परिणाम काय झाले व हल्लींच्या ज्ञानवृद्धीचा त्यांच्यावर काय परिणाम झाला आहे ही माहिती आमच्या वाचकांस उपयोगी येईल ह्मणून पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत ती दिली आहे. एथें फक्त तेथील विद्या खात्याची मात्र माहिती देतों. राशियांत विद्याखात्यासाठीं एक स्वतंत्र मंत्रि झाराजवळ असतो. विद्या खात्यासाठीं देशाचे ११ भाग कल्पून प्रत्येकावर एकेक क्युरेटर नेमिला आहे. त्याला मदत करण्यासाठीं ६ विद्वान् मेंबरांची एक सभा असते. पितर्सबर्ग, मास्को खारकोफ, कझान, कीफ्, दॉरपत, ओदेसा आणि वार्सा अशीं आठ विद्यापीठें

* परिशिष्ट (अ)पहा.

अगर युनिव्हर्सिटि आहेत. त्यांत पहिल्या ठिकाणच्या युनिव्हर्सिटींत अर्वाचिन भाषांचा व लातिन भाषेचा अभ्यास उत्तम होतो अशी ख्याति आहे. आपल्या संस्कृत भाषेलाही येथें स्थळ मिळालें आहे इतकेंच नवे, तर संस्कृत भाषेचे युरोपांत जे कोश झाले, त्यांत पितर्सबर्ग येथील कोश प्रख्यात व सर्व मान्य आहे. ओदेसा येथील विद्यापीठांत ग्रीक भाषा, गणित शास्त्र व अलीकडील सर्व शास्त्रें, यांचा अभ्यास उत्तम होतो. किफ् येथें इतिहास व धर्म शास्त्र आणि मास्को येथें कायदे (व्यवहार) व वैद्यक, हे विषय चांगले होतात.

रशियांतिल कालेजांतील मंडळी, गुप्त मंडळ्यांत सामील असते व बंड करण्याकडे, त्यांची प्रवृत्ति विशेष दिसते. एक प्रवाशी लिहतो कीं, तेथील विद्यार्थी झारांच्या करड्या अमंलाला त्रासले आहेत; तसेंच त्यांचें ज्ञान पोपटी असून दृढ व खोल नसतें. १८८२ सालीं रशियांतील युनिव्हर्सिटींतून एकंदर १०७०० विद्यार्थी व ६३७ प्रोफेसर (गुरु) होते. फिन्लंद करतां एक स्वतंत्रच युनिव्हर्सिटी आहे. तेथें गरीब विद्यार्थ्यांस सरकारच्या खर्चानें शिक्षण मिळतें. स० १८७९ सालीं रशियांत निरनिराळ्या तऱ्हेचीं ३२६ हायस्कूलें होतीं व त्यांत ७८००० विद्यार्थी होते. त्यांशिवाय फिनलंदांत ४५ हायस्कूलें असून ४९०० विद्यार्थी होते. कृषिकर्म, कारागिरी, खाणींचें काम, वगैरे विषय शिकविण्याच्या निराळ्या अनेक शाळा आहेत.

कनिष्ठ प्रतीचें शिक्षण देण्यासाठीं १८२० त रूसदेशांत २२७७० शाळा होत्या व त्यांत ११,४०,९१९ विद्यार्थी होते, त्यांपैकीं २,३६,००० मुली होत्या. या शाळांवरील शिक्षकांची संख्या २९००० होती व त्यांपैकीं ५००० बायका होत्या. १८८२ त रशियांत ६९१ नार्मल स्कुलें होतीं व त्यांत ४००० विद्यार्थी होते. कनिष्ठ प्रतीच्या शिक्षणाचा लाभ गरीब लोकांस अद्यापि व्हावा तितका होत नाहीं. खेड्यापाड्यांतून असाव्या तितक्या शाळा नसून गरीब लोकांस गांव-

च्या उपाध्याकडून किंवा एखाद्या जमीनदाराच्या औदार्यानें जें कांहीं शिक्षण मिळेल तेवढेंच. फक्त पोलंदांत मात्र शिक्षण चांगलें मिळतें; याचें कारण तेथील शिक्षणपद्धत जर्मनीच्या तऱ्हेवर आहे. स्त्रीशिक्षणांत रशियांत बरीच सुधारणा झाली आहे हें वर दिलेल्या आंकड्यांवरून लक्षांत येईल. शिवाय स्त्रियांकरतां ४ हायस्कुलें असून त्यांत शिक्षण फुकट मिळतें. १८७९ त रशियांत १७९ स्त्रिया वैद्यक व शस्त्रक्रिया शिकत होत्या. रशियन सरकार, शिकलेल्या स्त्रियांस पोष्ट, तारायंत्र वगैरे खात्यांतून जागा देतें यामुळें त्यांस अभ्यास करण्यास उत्तेजन मिळतें. त्या देशांत पुरुषांकरितां व बायकांकरितां शारीर शिक्षणासाठीं शाळा आहेत. रशियामध्यें वर दिलेल्या एकंदर लोक शिक्षणासाठीं व युद्धकला, नौकानयन, इंजिनीअरींग वगैरे दुसऱ्या अनेक प्रकारच्या शिक्षणासाठीं दर साल ९ कोटी रुपये खर्च होतो. रशियांत सरासरीनें पहातां शेकडा १९ इसमांस लिहितां वाचतां येतें.

१८८३ सालीं रशियांत एकंदर १९२७४ मैल आगगाडीचा रस्ता चालू होता व सुमारें १०६२ मैल तयार होत होता. हल्लीं सैबिरियांत, कासेसस प्रदेशांत व डॉन नदीवरील कोळशांच्या खाणीकडे आगगाडी नेण्याचें घांटत आहे. रशियन राज्यांत अजून सुमारें ९००० मैल रेलवे तयार करण्याचें ठरत आहे. एशिया खंडांतील आगगाडीची माहिती शेवटील प्रकरणांत दिली आहे.

१८८२त रूस देशांत ९ हजार पोष्ट आफिसें होतीं, त्यांच्यांतून सुमारें १४ कोटी पत्रें, १॥ कोटी बंग्या व १० कोटी वर्तमानपत्रें त्या सालीं रवाना झालीं. रशियन राज्यांत १,४९,००० मैल तारायंत्र आहे.

प्रकरण ४ थें.

रूस देशांतील ग्रामरचना—मीर किंवा कम्यून—स्थानिक स्वराज्य—व्होलोस्त—न्यायखातें—सुधारणा आणि कायदे इ० इ.

ग्रामरचना किंवा ग्रामव्यवस्था या संज्ञेखालीं देशांतील गांवांची आंतली सर्व व्यवस्था कशी ठेवली असते, गांवच्या जमीनीची वांटणी कशी केली असते व गांवच्या व्यवस्थेंत सरकारचा हात किती असतो, इत्यादि प्रश्नांचें उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. निरनिराळ्या देशांतील ग्रामरचनांची माहिती उपयुक्त व महत्वाची आहे. कांहीं देशांतून व विशेषतः आमच्या देशांत व रूसदेशांत, ग्रामव्यवस्थेचे प्राचीन प्रकार अद्यापि बऱ्याच अंशीं कायम आहेत. त्यांसंबंधी चांगली माहिती मिळाविली असतां मनुष्याच्या प्राचीन इतिहासाचें व सामाजिक व्यवस्थेचें स्वरूप ध्यानांत येतें इतकेंच नव्हे, तर अलीकडे जे स्थानिक अधिकार आमच्या लोकांस दिले आहेत ते सर्व किंवा त्यांहून ही. कांहीं जास्त हक्क, जगांतील हल्लींचीं कांहीं प्रसिद्ध राष्ट्रें व लोक जन्मास येण्याच्या पूर्वीपासून तेथील लोकांकडे चालत आले आहेत, हेंहीं कळेल. आमच्या देशांत हे हक्क अगदींच नाहींसे झाले होते असें नाहीं; तथापि अलीकडे एकदोन शतकांत ते बरेच कमी झाले होते. ते कसे कमी झाले हें सांगण्याचें हें स्थळ नव्हे. त्याचप्रमाणें सांप्रत, भूमीचें स्वामित्व व त्यावर अवलंबून रहाणारी जमीनीचा सारा वसूल करण्याची पद्धात, ह्यासंबंधानें आमच्या देशांत जो वाटाघाट चालला आहे तिचें स्वरूप नीट ध्यानांत येण्यास, निरनिराळ्या देशांतील जमीनी कशा वांटल्या जातात, त्यांवर मालकी कोणाची समजावयाची, तेथें साराठरोती कोणत्या पद्धतीवर होते ही माहिती अवश्य पाहिजे. कारण या माहितीपासून आपणाला तुलना करून पहातां येईल, कीं अमूक एक

व्यवस्था सोईची व फायदेशीर आहे. ज्या पद्धतीपासून जमीनीचें उत्पन्न वाढविण्यांत प्रतिबंध होत नसून शेतकरी सुखी रहातात, त्यांचे लहानसहान तंटे लवकर व थोडक्या खर्चानें तुटतात व त्यांच्या उद्योगांत सरकारचा हात फार पडत नाहीं, ती पद्धति उत्तम हें स्पष्टच दिसतें.

जमीनीवर स्वामित्व सरकारचें किंवा लोकांचे (शेतकऱ्यांचें) हा प्रश्न मोठ्या महत्त्वाचा आहे व याचा विचार विशेषतः आमच्या सुशिक्षित लोकांनीं करण्यालायक आहे. आमच्या सरकाराकडून जमीनीच्या संबंधानें वेळोवेळीं जे ठराव बाहेर येतात त्यांचें खरें स्वरूप व खुबी कळण्यास या विषयाचें थोडेसें ज्ञान पाहिजे. त्याचप्रमाणें अर्थशास्त्राच्या दृष्टीनें सुद्धां हा प्रश्न महत्त्वाचा आहे. परंतु ही सर्व माहिती आह्माला निदान या पुस्तकांत देतां येत नाहीं. राशियांतिल ग्रामव्यवस्थेची माहिती मात्र या प्रकरणांत देणार व तिचा उपयोग वर सांगितलेल्या कांहीं गोष्टींचा विचार करतांना बराच होईल, असें आह्मांस वाटतें.

राज्यें लोकसत्ताक असोत किंवा प्रजासत्ताक असोत, त्यांची उत्पत्ति, रचना व घटना होण्यापूर्वीच जमीनीच्या स्वामित्वाचा उलगडा झाला होता. मनुष्यांच्या फार प्राचीन काळच्या इतिहासाचे दाखले दाखविण्यांत कांहीं अर्थ नाहीं, परंतु मनुष्यानें जेव्हां एके ठिकाणीं वस्ति करून जमिनीस आऊत लाविलें तेव्हांच तिचें स्वामित्व त्याच्याकडे गेलें. ज्यानें जमीन लागवडीला आणिली त्याचेंच तिच्यावर स्वामित्व; सरकारें अलीकडील आहेत. जमीनीची लागवड करून मनुष्यांनीं जेव्हां समाजांत एकत्र रहाण्याची सुरुवात केली तेव्हां जमीनीची मालकी प्रत्येकाची वेगळी न राहतां समाईक झाली असावी असें दिसतें. गांवची जमीन सगळ्या लोकांची व तिचा उपभोग गांवच्या सर्व लोकांस मिळावा असें ठरलें. परंतु मनुष्यांची संख्या वाढून सगळ्यांनाच शेतकरी होतां येईना तेव्हां आपल्या सर्व गरजा भागाव्या ह्मणून गांवच्या गावांतच, श्रमविभागाच्या तत्वावर, धंद्यांची वांटणी झाली. कोणी जमीन नांगरण्याचें काम पत्करलें, कोणी सुताराचें,

कोणी लोहाराचें, कोणी पहारा करणाऱ्याचें व कोणी देवपूजेचें आणि कोणी जोशाचें पत्करलें. अशा व्यवस्थेंत सर्वांचीं कामें भागून नीट बंदोबस्तही राही. गावांतील जमीनीचें जें उत्पन्न होई त्यावर सर्वांचा थोडाबहुत हक्क असे. अशी व्यवस्था झाल्यानंतर गांवच्या बलुत्यांकडे गांवकीची कामें लावून दिलीं असावीं. ही व्यवस्था होऊन कांहीं काळ गेल्यावर गांवांतील जमीनीवर जी समाईक मालकी होती ती जाऊन जमीनीची शेतकऱ्यांत वांटणी झाली. आमच्या देशांत हल्लीं जो प्रकार आढळतो त्यांत गांवांतील जमीनीवर गांवच्या लोकांचें समाईक स्वामित्व नसतें, परंतु जमीनी वांटल्या जाऊन जो तो आपल्या जमीनीची पाहिजे ती व्यवस्था करण्यास मुखत्यार असतो. त्याला गांवच्या लोकांचें अनुमोदन घ्यावें लागत नाहीं व गांवच्या लोकांनाही त्याच्याबद्दल जबाबदारी बाळगावी लागत नाहीं. ही जी पद्धति सांगितली तीशिवाय, ज्या गांवांतील जमीनीवर लोकांचें स्वामित्व असून तेच लागवड करितात व उत्पन्नाच्या आपसांत वांटण्या करतात हा एक प्रकार, व जेथें दरवर्षास किंवा कांहीं ठरीव वर्षांनीं, गांवांतील कुटुंबांकडे जमिनी वांटतात तो दुसरा प्रकार, असे दोन वेगळे प्रकार आहेत. यांपैकीं हा शेवटला प्रकार आजमितीला रूसदेशांत चालू आहे. तेथें गांवातील जमिनी आमच्या देशाप्रमाणें तोडून दिलेल्या नसून लोकांकडेच असतात व कांहीं नियमित वर्षांनीं त्यांची वांटणी होऊन प्रत्येक कुटुंबास कांहीं जमीन मिळते. त्या देशांत गांवच्या लोकांस, गांवांतील बंदोबस्तासाठीं वं दुसऱ्या कांहीं कामासाठीं जो खर्च लागे,तो लोकांवरच पडे.आमच्या देशांतही त्याचप्रमाणें होतें, परंतु अशा गांवखर्चासाठीं एकदमच बलुत्यांकडे जमिनी तोडून दिल्या होत्या, त्यामुळें गांवची सर्व व्यवस्था बलुत्यांनाच पहावी लागे. उत्तर हिंदुस्थानांत व त्यांतही विशेषतः पंजाबांतील ग्रामव्यवस्था बऱ्याच अंशी रशियाच्या व्यवस्थेप्रमाणेंच आहे. तेथें गांवांतील जमीनीवर गांवच्या लोकांचें समाईक स्वामित्व असतें.

आर्य लोकांच्या अशा प्रकारच्या ग्रामव्यवस्था सुरू झाल्या नंतर जेव्हां अनेक गांव वसले, तेव्हां सर्वांचा बंदोबस्त रहावा व संरक्षण व्हावें ह्या हेतूनेंच जणुं सरकारें जन्मास आलीं. ह्या म्हणण्याचा अर्थ शब्दशः न घेतां फक्त तात्पर्यार्थच घ्यावा; कारण सरकार म्हणजे काय, त्याच्याकडे हल्लीं आलेले हक्क कसकसे आले व ते येईपर्यंत मध्यें किती काळ लोटला व कोणते फेरफार झाले, हें सांगितल्यास एक स्वतंत्र इतिहासच होईल. सरकारें जशीं आपण सध्यां पहातों तशीं स्थापन झाल्यावर लोकांच्या पूर्वापार चालत आलेल्या हक्कांची कशी पायमल्ली झाली एवढेंच पहाणें आहे. सरकारांचें मूळ कोणींही शोधूं नये. शोधल्यास मारामाऱ्या, लबाड्या, रक्तस्राव ह्यांचीच मालिका दृष्टीस पडेल. फक्त आपण एवढेंच पाहूं कीं, जेव्हां मनुष्याच्या वसाहती वाढल्या, व्यापारधंदे, कारखाने व इतर व्यहवार अनेक तऱ्हेनें सुरू झाले, तेव्हां श्रमविभागाच्याच मुद्यावर, संरक्षण करण्याचें काम सरकाराकडे आलें. हें काम पत्करल्यावर अर्थात्च त्याच्या पोषणासाठीं कांहीं तरी वेतन दिलें पाहिजे म्हणून जमिनीच्या उत्पन्नाचा कांहीं भाग राज्यकर्त्यांस देण्याची वहिवाट सुरू झाली. ज्या गांवांतील जमीन वांटली गेली नसून समाईकच असें तेथील लोकांस सरकारदेण्याबद्दल सगळे मिळून जबाबदार व्हावें लागे. तीच पद्धति राशियांत हल्लींही चालते. परंतु जेथें जमिनींची वांटणी झाली असते तेथें प्रत्येक शेतकऱ्यास फक्त आपल्या अंशाबद्दलच जोखीम पडतें. रूसदेशांत सरकारदेण्याची जबाबदारी सगळ्या गांवावर असते त्यामुळें गांवच्या लोकांस प्रत्येक शेतकऱ्याच्या वर्तणुकीकडे लक्ष पोंचवावें लागतें. असा प्रकार आतां आमच्या देशांत क्वचित्च आढळतो. येथें जो तो शेतकरी आपापल्या हिश्शापुर्ताच जबाबदार आहे.

सरकारदेण्यासंबंधानें निरनिराळ्या देशांतून निरनिराळ्या चाली आहेत. त्याचप्रमाणें सरकारांचें मुख्य काम संरक्षण करण्यापुरतें मुळचें आहे, व तेवढ्याकरितां कांहीं द्रव्य

सरकारांला द्यावें लागे व लागतें, हें आतां लक्षांत आलेंच असेल. कालांतरानें सरकारांची शक्ति व अधिकार वाढून संरक्षण या शब्दांत हजारों गोष्टींची व्याप्ति होऊं लागली व आतां तर पाहिजे तें काम त्या सदराखालीं ढकलतां येतें. पूर्वीच्या ग्रामव्यवस्थेंत न्याय तोडण्याचें काम गांवच्या पंचांकडेच असे. ती पद्धति थोड्या बहुत अंशीं राशियांत आढळते. जसजसे लोक सुधारत चालले व त्यांची संख्या वाढली तेव्हां सरकारानांच हें काम आपणाकडे घेणें भाग पडलें. परंतु हल्लींच्या सुधारणेचा कल असा दिसतो, कीं पुढेंमागें ते हक्क पूर्ववत् लोकांकडे जातील. खुद्द राशियांत या गोष्टीला प्रत्यंतर मिळेल हें पुढें कळेल. जमिनीवर राजांचें स्वामित्व नाहीं ही गोष्ट वर सांगितलेल्या विचारसरणीस अनुसरून आहे. असो.

राशियांतील ग्रामव्यवस्थेंत असे नियम आहेत कीं, जर तेथील जुलमी सरकार आपला दाब कमी करील तर रूसलोकांना फार सुख मिळेल. ग्रामव्यवस्थेपैकीं सर्व कामें तेथील राहिवाश्यांकडेच सोंपविलीं आहेत, परंतु राशियनसरकार आपल्या स्वार्थावर नजर ठेऊन लोकांना अनेक रीतीचे उपद्रव देतें, यामुळें त्यांना दिलेल्या हक्कांचा कांहीं उपयोग होत नाहीं.

आमच्या इकडील ग्रामव्यवस्थेंत व राशियांतील ग्रामव्यवस्थेंत जे मोठे भेद आहेत ते वर दिले आहेत. आतां राशियामध्यें ग्रामव्यवस्थेंत ज्या नवीन रीति आढळतात त्या पुढें देतों. राशियांतील ग्रामव्यवस्थेंत प्रत्येक कुटुंबाचें मत असतें. राशियांतील ग्रामव्यवस्थेंत बलुत्यांच्या सर्व कामांचा अंतर्भाव होऊन कांहीं जास्त गोष्टीही त्यांत येतात. आमच्या इकडे गांवांतील लोक व जमीन इत्यादि सर्व गोष्टींस समुदायार्थी ' गांव पांढरी ' किंवा फक्त ' पांढरी ' असें म्हणतात. त्यासच राशियांत मीर किंवा कम्यून हीं नांवें देतात. परंतु मीर ही संज्ञा राशियांतील गावांत, व्यवस्था करणारी जी सभा असते तिलाही लावितात.

हे मीर फार जुने व प्राचीन काळापासून चालत आलेले आहेत व त्यांपासून जुनाट शेतकऱ्यांचें संरक्षण होऊन सर्वांस

जमीनी मिळतात, ह्या गोष्टीचा रूस लोकांस मोठाच अभिमान आहे. रूस देशांत अनेक उलाढाली झाल्या परंतु ही ग्रामव्यवस्था कायमच आहे. आमच्या देशांत सुद्धां मुसलमान व मराठे यांचीं राज्यें लयास गेलीं तरी बलुत्यांवर चाललेली ग्रामव्यवस्था कायमच होती. राजा किंवा सरकार कोण आहे ही पंचाईत गांवांस नव्हती. फक्त सरकारदेणें दिलें ह्मणजे मग त्यांस सरकारचें नांव काढावें लागत नसे. गावांतील अल्प गरजा ते लोक कशाही भागवीत. अंदाधुंदीच्या काळांत, अशा व्यवस्थेपासून गांवांस उपद्रव पोंचला नाहीं. इंग्लिश अंमलापासून मात्र ही ग्रामव्यवस्था बहुतेक मोडली ह्मणण्यास हरकत नाहीं.

खेड्यापाड्यांतील लोकांनीं आपल्या सामाजिक गोष्टींची व्यवस्था पाहिजे तशी करावी ह्मणून रूसदेशांत लोकांकडे पुष्कळ अधिकार ठेविले आहेत. ज्या गोष्टींत सरकाराचा प्रत्यक्ष संबंध येतो तेथें मात्र सरकारची देखरेख असते. परंतु सरकारच्या हक्कांबद्दल खेड्याचे सगळे लोकच जबाबदार धरिले जातात. ही ग्रामव्यवस्था रहाण्याकरितां गांवकऱ्यांस जे हक्क दिले आहेत त्यांअन्वयें त्यांस एक ग्रामसभा भरावी लागते. त्या मंमेंतील अध्यक्षाची नेमणूक लोकच करितात. ह्या गांवमंडळ्यांचें काम अगदीं टापटिपेनें चालतें असें नाहीं व तें अमुक तऱ्हेनें चालावें असा लेखी कायदाही नाहीं. तेथें जुनी वहिवाट हाच कायदा. आमच्या जुन्या पंचायती जशा चावडीवर किंवा एखाद्या मोकळ्या जाग्यांत सुद्धां जमत त्याचप्रमाणें मीर नांवाच्या सभा झाडाखालींही भरतात. या सभांतून शेतांचे विभाग करून त्यांची वांटणी करणें, सरकारदेण्याची व्यवस्था लावणें, हिशेब तपासणें, सरकारच्या मागण्याप्रमाणें फौजेंत शिपाई पाठविणें, मीरांत नवीन इसमांस घेणें, झाराकडे किंवा त्याच्या प्रधानांच्या सभेकडे अर्ज किंवा कांहीं फिर्यादी पाठविणें, इत्यादि पुष्कळ गोष्टींची भवति न भवति होते. ह्यांत सरकारची ढवळाढवळ नसल्यामुळें गांवचे लोक ह्या गोष्टींचा पटकन निवाडा लाविताात. तसेंच त्यांस आपणा

सर्वांची चांगली माहिती असल्यामुळें कोणावरही विशेष जुलूम किंवा विशेष मेहेरबानी होण्याचा संभव फार थोडा असतो. या सभा वर्षांतून जसें कारण पडेल त्याप्रमाणें भरतात. गांवांतील प्रत्येक कुटुंबांपैकीं एक मुख्य इसम या सभेंत सभासद असतो. खेड्यांतील पडीत किंवा लागवडीच्या जमिनीवर कम्यूनची पूर्ण मालकी असते. गांवाकडून सरकारास जे कर द्यावे लागतात त्यांचा हिस्सा कम्यूनांत ज्यांचीं नांवें दाखल झालीं आहेत त्या सर्वांना द्यावा लागतो. कम्यूनाला जर कोणत्याही कारणामुळें सरकारचें किंवा सावकाराचें फार कर्ज झालें तर त्याबद्दल सरकार त्या गांवची जमीन विकूं शकत नाहीं. गांवच्या जमिनीवर सरकाराचा मुद्दां कांहीं हक्क नाहीं असा नियम आहे.

गांवांतील कुटुंबांपैकीं जे मुख्य यजमान असतात ते या गांवच्या सभेंत बसतात व तेथें ज्या वाटाघाटी होतात व जे ठराव होतात त्याप्रमाणें लोकांच्या गृहकृत्यांत सुद्धां फेरफार करावे लागतात. गवत कापणें, पडीत जमीनीची लागवड करणें वगैरे गोष्टींस ग्रामसभेचें अनुमोदन लागतें ; तसेंच गांवांत एखादा शेतकरी दारूबाज किंवा व्यसनी निघून भिकारी झाला तर त्याच्या सरकारदेण्याची जबाबदारी लोकांवरच असते म्हणून त्यास मार्गावर आणण्याविषयीं खटपट करितात व उपदेश करूनही पहातात. इतर देशांत खेड्यांतील अमुक एक मनुष्य कसा वागतो, किती कर्ज काढतो, इ० चौकशी करण्याची जरूरी पडत नाहीं; परंतु रशियांतील खेड्यांत ह्या पंचायती देखील लोकांस कराव्याच लागतात. एखाद्याला तें गांव सोडून जाणें असल्यास तेथील मीराची परवानगी पाहिजे. त्यास परगांवीं जाणें जरूरच असेल तर त्याच्या हिश्शाच्या सरकारदेण्याबद्दल एक जामीन द्यावा लागतो व थोडकेच दिवसांसाठीं त्याला आपला गांव सोडणें असल्यास ग्रामसभेची लेखी परवानगी द्यावी लागते. ही परवानगी मिळाल्यावरही कम्यूनच्या मनांत त्यास परत बोलावणें असल्यास त्यांचा हुकूम पहातांच त्यास हजर व्हावें लागतें. बाहेर गांवीं रहाण्याबद्दल जो परवाना लागतो त्याबद्दल

कांहीं फी द्यावी लागते. ती फी जोंपर्यंत वक्तशीर पोंचते तोंपर्यंत बहुतकरून ग्रामसभेचें बोलावणें त्यास जात नाहीं. ह्या अधिकारापासून ग्रामसभेस केव्हां केव्हां बराच पैसा मिळतो व कांहीं दिवस गांवतल्या पिढ्यावर चैन मारतां येते; कारण गांव सोडून गेलेल्या लोकांपैकीं कांहीं इसम मोठ्या शहरांत जाऊन कामधंद्यावर बराच पैसा मिळवितात, अशी बातमी सभेस कळल्यास त्यांला गावांत हजर व्हावें अशी चिठी जाते; परतु आपले फायदेशीर उद्योगधंदे सोडून जाण्यापेक्षां सभेची मूठ दाबणेंच त्यांस सोईचें होतें ! रशियांतील प्रवाशांचें म्हणणें आहे,कीं ग्रामसभांकडून असा उपद्रव फारसा होत नाहीं.

खानेसुमारीच्या वेळीं रशियांतील गांवांतल्या शेतकऱ्यांची यादी केली असते. या यादीवरूनच कर वगैरे सरकारदेण्याचा अंदाज ठरविला असतो. गांवांतील शेतकऱ्यांची जी यादी असते त्यांत एकंदर पुरुष असतील त्यांचीं नांवें असतात, मग त्यांचें वय केवढें ही असो. अशी यादी प्रत्येक गांवांत असते व त्या यादींत मध्यंतरींच्या जननमरणावरून जे फेरफार व्हावयाचे ते फक्त दुसऱ्या खानेसुमारीच्या वेळीं होतात. गांवांतील पुरुषांच्या संख्येवरून सरकारदेणें ठरवितात व ह्या देण्याबद्दल ग्रामसभेस जबाबदार व्हावें लागतें. ज्याअर्थी कर द्यावा लागतो त्याअर्थी प्रत्येक पुरुषाच्या वांट्यास गांवातील थोडी तरी जमीन येतेच. ही यादी एकदां ठरल्यावर त्यांत जे लोक येतात, त्यांतून कित्येक मरण पावले किंवा फौजेंत गेले तरी दुसरी मनुष्यगणती होऊन यादीची फेर तपासणी होईपर्यंत, ग्रामसभेस एकदां ठरलेलेंच सरकारदेणें द्यावें लागतें. यामुळें केव्हां केव्हां एखाद्या गांवावर गैरशिस्त कर बसतात. रशियांत जमिनीचा सारा घेण्यांत बरेच अन्याय होतात, त्यांचें अर्थशास्त्रदृष्ट्या विवेचन केल्यास फारच आडवळण द्यावें लागतें, तथापि एक उदाहरण दिल्यानें एकंदर पद्धति लक्षांत येईल. त्या देशांत जमीनीचा सारा व कर ह्या बाबी उत्पन्नावर बसविलेल्या नमून लोकसंख्येवर ठरविलेल्या अस-

तात. गांवात जमीन किती आहे, त्यांत पडीत व लागवडीची किती, उत्पन्न काय होतें व किती होतें वगैरे महत्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून गांवांतील शेतकऱ्यांच्या संख्येवर सारा ठरविला असतो. ह्यामुळें ज्या गावांत जमीन थोडी असून लोकसंख्या फार असते त्या गांवाला, ज्या गांवात पुष्कळ जमीन असून वस्ति थोडी असते त्यापेक्षां जास्त सारा द्यावा लागतो ! हा उघड उघड अन्याय राशियांत हरहमेश घडतो व ह्यामुळें प्रजेमध्यें बरेंच अस्वास्थ्य पसरलें आहे. अमुक लोकसंख्या आहे तेव्हां अमुक रक्कम सरकारखजिन्यांत भरावी असा सरकारी हुकूम सुटल्यावर मग उपायच नाहीं. गांवातल्या जमीनी पड राहोत, धान्यें नासोत, त्यांची व्यवस्था कांहीं का होईना, सरकारदेणें पोंचलें ह्मणजे झालें ! गांवातील जमीनीची वांटणी करणें वगैरे गोष्टी,सरकार बिलकुल पहात नाहीं. दुसरी एक गंमत अशी होते, कीं एखाद्या शेतकऱ्यास जमीन सोडणें असलें तर त्यास तसें करतां येत नाहीं. आमच्या इकडे असें आहे कीं, सरकारदेणें पत्करत नसल्यास जमीनी सोडाव्या; परंतु राशियांत सरकारदेणें दिलेंच पाहिजे, मग जमीनीची लागवड करा अगर न करा.

ह्यापुढें ग्रामसभा गांवच्या जमिनीचे विभाग कोणत्या गोष्टीवरून करते हा विचार करावयाचा. यासंबंधानें रूसदेशांत एकच चाल नसून अनेक चाली आहेत. गांवांतील पुरुषांच्या यादीप्रमाणें गांवच्या जमिनीचे भाग करून प्रत्येक कुटुंबांत जितके पुरुष असतील तितके भाग त्या कुटुंबाकडे द्यावयाचे, अशी रीति कांहीं प्रांतांत चालते. या रीतीपासून कधीं कधीं अशी अडचण उद्भवते, कीं एखाद्या कुटुंबांत थोर पुरुष कोणी नसून एखादी विधवा व तिचे तीनचार लहान मुलगे असतात, तेव्हां त्यांच्याकडे जी जमीन येते तिची लागवड करावी कोणी हीच पंचाईत पडून त्या बाईवर सरकारच्या साऱ्याचें ओझें विनाकारण पडतें. मजूर लाऊन शेतभात करावें तर राशियांतील कांहीं प्रांतांत मजूर मिळण्याची मारामार पडते. कांहीं

नागांत जमीन वाईट असल्यामुळें तेथें जमीन म्हणजे लोकांस एक नाहींतें संकटच होतें !

ह्या अडचणी दूर करण्याच्या हेतूनें कांहीं गांवांत वांटणी-ची पद्धति निराळी केली आहे. तेथें जितके काम करणारे सशक्त शेतकरी असतील तेवढ्यांनाच लागवडीसाठीं जमीन मिळते. परंतु या तऱ्हेनें विभाग करून सर्व अडचणी भागत नाहींत, कारण एका खानेसुमारीपासून दुसऱ्या खानेसुमारीपर्यंत जो अवधि जातो तितक्यांत बरेच शेतकरी मरून जातात किंवा अन्य कांहीं कारणांनीं काम करण्यास नालायक होतात. असें झालें तरी त्यांच्या नांवावर पडलेली जमीन व तिच्या बरोबरील सरकारदेणें, हीं कांहीं सुटत नाहींत. ही उणीव दूर करण्याकरितां ठिकठिकाणच्या ग्रामसभा आपल्या सोईला येईल त्याप्रमाणें बरे वाईट दुसरे उपाय योजितात.

जमीनीचे विभाग करण्यासारखें महत्वाचें काम कम्यूनच्या सभेवर पूर्णपणें सोंपविलें असतें म्हणून अन्याय व पक्षपात होण्याचा संभव बराच दिसतो. तथापि अशा दोषाला त्या सभा क्वचित्च पात्र होतात. ज्या प्रांतांत जमीनी वाईट आहेत तेथें तर असें होण्याचा संभव फारच कमी आहे, कारण जमीनी असल्या तर बरें होईल, अशीच शेतकऱ्यांची इच्छा असते; परंतु कृषीक प्रदेशांत जमीनीवर उड्या पडतात. तथापि ह्या ग्रामसभांमध्यें सरकारचें आंग मुळींच नाहीं व विशेषतः त्यांत गांवच्या प्रत्येक कुटुंबाचा मुखत्यार असतोच, तेव्हां सर्वांमतें जी गोष्ट बरी वाटेल तीच ठराविण्यांत येते. या सभेंत दोन तऱ्हेचे लोक असतात, एक सामान्य सभासद, ज्यांकडे फक्त ठराव करण्यापुतेंच काम असतें व दुसरे अंमल बजाविणारे अध्यक्ष वगैरे कामदार. ह्या सभा मोकळ्या जागीं भरून त्यांत गुप्त कांहीं नसतें. सभेवर जो अध्यक्ष असतो त्याच्या गळ्यांत त्याच्या अधिकाराचें चिन्ह म्हणून, पितळेच्या सांखळींत अडकविलेलें एक पदक असतें. सभा चालली असतांना बंदोबस्त ठेवणें व सभेचे अखेर ठराव समजवून देणें, हीं दोन कामें त्या-

च्याकडे असतात. घरांतले यजमान नसल्यास वायकाही सभेस जातात. जमीन सुपीक असल्यामुळें जेथें ती मिळविण्यासाठीं लोक झटतात तेथें अन्याय होऊं नये ह्मणून चिंध्या टाकितात.

मीरांत जमीनेचे मोठे तीन भाग मानितात. १ गांवातील घरांनीं व्यापलेली जागा; २ शेतकीच्या उपयोगी जमीन; व ३ कुरण. घरांची जमीन एकदांच वांटली गेलेली आहे तेव्हां तिचे कांहीं विभाग होत नाहींत. पिकाऊ जमीनीचे लोकांच्या संख्येप्रमाणें जे भाग होतात ते तीन वर्षें चालतात. कुरणाचे ही त्याचप्रमाणें भाग करितात परंतु ते प्रत्येक वर्षास करितात. गवत कापण्याचा दिवस सभेकडून ठरतो तेव्हां सगळे शेतकरी गवत कापण्यास जातात,व नंतर त्या गवताचे आपसांत वांटे करितात. कित्येक ठिकाणीं एकएका कुटुंबाकडे कुरणाचे तुकडे तोडून दिले असतात. गायरानांवर किंवा कुरणांवर गांवच्या लोकांचा समाईक हक्क असण्याची पद्धति पुष्कळ देशांतून आढळते.

ग्रामसभा रविवारीं किंवा ज्या दिवशीं शेतकऱ्यांस फुरसत सांपडेल तेव्हां भरतात. या सभेचा अध्यक्ष आणि लोकांनींच निवडलेले दुसरे दोन इसम, मिळून तिघांकडे पोलिसपाटलांचा अधिकार असतो. लहान लहान देवघेवीचे तंटे किंवा लहानसे गुन्हे, यांची चौकशी करून निकाल लावण्याचा अधिकारही या तिघांकडे आहे. एखाद्या वाईट मनुष्यास सैबिरियांत हद्दपार करण्याचा अधिकार ग्रामसभेस आहे व अशा ठरावावर अपीलही नाहीं, असें त्या देशांतून आलेले कित्येक प्रवाशी सांगतात. परंतु ही गोष्ट खरी असल्यास ग्रामसभेच्या हातांत फारच भयंकर सत्ता ठेविली आहे असें ह्मटलें पाहिजे.

२०।२९ वर्षांपूर्वी रूसदेशांत दोन मोठ्या घडामोडी झाल्या; एक गुलामांस दिलेलें स्वातंत्र्य व दुसरी स्थानिक स्वराज्य. या सुमारास रूसदेशांत नवीन सुधारणा करणारे लोक बरेच झाले होते. त्यांच्या मनांतून आपल्या देशाचा व्यापार वाढवावा वगैरे विचार घोळत होते व ह्या हेतूस्तव त्यांचें सगळें लक्ष व्यापारांत प्रमुख राष्ट्र जें इंग्लंद, तिकडे गेलें. इंग्लंदाला

ज्या गोष्टींपासून हल्लींचें वैभव प्राप्त झालें आहे त्या गोष्टी आपल्या देशांत सुरू कराव्या म्हणजे अर्थातच रूसदेशही व्यापारांत पुढें सरसावेल असें त्यांस वाटे. इंग्लंदांत प्रत्येक मनुष्याला पाहिजे तो फायदेशीर उद्योग करण्याचें पूर्ण स्वातंत्र्य आहे व व्यापारधंद्याला अडथळा करणाऱ्या चाली व कायदे तेथें नाहींत म्हणून, लोकांमध्यें चढाओढ लागून उद्योग वाढतो आणि त्याबरोबर व्यापारही वाढतो. परंतु रशियांत ज्या कांहीं गोष्टी आहेत त्यांमुळें चढाओढीला मार्ग रहात नाहीं; त्यांपैकीं कम्यून किंवा मीर, हा मोठाच प्रतिबंध आहे. आपल्या सोईप्रमाणें उद्योग करण्यास, मीरापासून अनेक अडथळे उद्भवतात हें वर सांगितलेंच आहे. या कारणासाठीं कांहीं देशसुधारकांच्या मनांत कम्यून नाहींसे करण्याचे विचार येऊं लागले. हे विचार वर्तमानपत्रांतून प्रकट होतांच रूसदेशांत चोहोंकडे एकच ओरड सुरू झाली. या सुधारणेपेक्षां आपले जुने मामुल शिरस्ते बरे व त्यांस बिलकुल हात लागूं नये, असें देशाभिमानी लोक प्रतिपादन करूं लागले. पूर्वीच्या चाली वाईट व नवीन तेवढ्या चांगल्या असें म्हणणारे आणि त्यांच्या उलट जुन्या चालींचें संरक्षण करण्याविषयीं झटणारे लोक, असे रूसलोकांत दोन पक्ष आहेत. नवीन सुधारणेंत कम्यूनला धक्का पोंचणार, असें जेव्हां त्यांस कळलें तेव्हां या दोन्ही पक्षांच्या लोकांनीं त्याविरुद्ध गवगवा केला. कम्यूनांविषयीं त्या लोकांची फार पूज्यबुद्धि आहे. जुन्या चालींचें प्रतिपादन करणारे लोकांस रूस देशांत स्लावोफिल् म्हणतात हें मागें सांगितलेंच आहे. या लोकांस पश्चिमयुरोपांतील रीतरिवाजांचा व मतांचा पराकाष्ठेचा कंटाळा आहे. आपल्या देशाचें म्हणून जेवढें कांहीं असेल तेवढ्याचें अवलंबन करावें असें त्यांचें ठरीव मत आहे. हे लोक व नवीन मतांचें प्रतिपादन करणारे लोक, हे जरी इतर अनेक गोष्टींत भिन्न आहेत तथापि कम्यूनांबद्दल त्यांचें मत एक आहे. आपण जीं स्वतंत्रता मागतों तिला पुढें मागें कधीं तरी कम्यूनां-

पासून मोठा फायदा होईल असें त्यांस वाटतें; ह्मणून ग्रामसभां-पासून वास्तविक होणारे उपद्रव दाखविणाऱ्या लोकांची, या दोन्हीं पक्षांच्या लोकांनीं अगदींच हुयों उडविली. वास्तविक पहातां ग्राम-सभांपासून विशेष नुकसान तर झालें नाहींच, परंतु शेतकऱ्यांस जेव्हां गुलामगिरीचीं संकटें सोसावीं लागत, तेव्हां या ग्रामसभांमुळेंच त्यांस थोडें बहुत सुख मिळे. त्याचप्रमाणें स्लावोफिल ह्मणत, कीं पश्चिमयुरोपांतील लोकांच्या मतांत चलविचल फार झाली आहे, पुरातन घराणीं नाहींशीं करावीं व त्यांचे हक्क बु-डवावे, सर्व लोकांस संपत्तीचा उपभोग सारखा मिळावा, सर्वांस सारखेंच स्वातंत्र्य असावें इत्यादि जीं, स्वातंत्र्य, समत्व व बंधुत्व दाखविणारीं कांहीं मतें पश्चिम युरोपांत चालतात तीं, या ग्रामस-भा आहेत ह्मणूनच आपल्या देशांत फारशीं शिरलीं नाहींत; हा एक मोठाच फायदा झाला असें त्यांचें मत आहे.

रशियांत सुधारलेले लोक पुष्कळ आहेत. नवीन कायदे कानू करते वेळीं तत्संबंधीं गहन विचारांत ते फार शिरतात. अमूक एक कायदा चांगला होईल किंवा नाहीं, हें आपल्या काळापुतेंच न पहातां, पुढें होणाऱ्या पिढ्यांवर त्यांचा काय परिणाम होईल, त्याचीच वाटाघाट फार होते. कोणत्याही गो-ष्टीवर तत्वविचार करण्याची त्यांस फार आवड आहे. एखादी गोष्ट करण्यापूर्वी, तिचें स्वरूप व्यवहारदृष्ट्या न पहातां, अर्थशास्त्र, नीतिशास्त्र, इत्यादि अनेक शास्त्रांच्या तात्विक नि-यमांवर ते फार लक्ष देतात. हें करणें फारसें दोषार्ह आहे असें ह्मणवत नाहीं, तथापि त्याचा परिणाम सोईचे व हितावह का-यदे कधींच मिळत नाहींत येवढा होतो. अमुक एक कायदा के-ल्यास तूर्त हितावह होईल परंतु कालांतरानें येणाऱ्या पिढीस त्यापासून उपद्रव होईल, एवढ्या दूर विचारावर तो कायदा न करणें, हें कांहीं चांगलें नाहीं. कोणत्याही पिढीला, आपल्या वाडवडिलांचे कायदे मोडून आपल्या स्थित्यनुरूप ते नवीन करण्याचा किंवा त्यांना नवीन स्वरूप देण्याचा अधिकार आहे, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येत नाहीं. व्यवहारावर नजर न देतां, पुस्त-

की विचारांवर ते लोक फारच विश्वास ठेवितात. हें सांग-ण्यांचें कारण इतकेंच, कीं कम्यूनमध्यें सुधारणा करण्याचे विचार यामुळेंच जागच्याजागीं राहिले.

रशियनलोक पुनः असें ह्मणतात कीं, युरोपांतील कायदे कानूंवा परिणाम, तिकडील शेतकऱ्यांस अन्नान्नदशेस लावण्यास मात्र कारण झाला. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांत शेतकऱ्यांची स्थिति दिवसेंदिवस शोचनीय होत आहे, व जमिनीही त्यांच्या हातून जात आहेत. परंतु रूमदेशांत कम्यून असल्यामुळें प्रत्येक शेतकऱ्यास थोडी तरी जमीन मिळतेच. तेव्हां कम्यून मोडून टाकिल्यास शेतकरी भिकेस लागून उघडे पडतील व देशामध्यें भिकार वाढून त्याच्या पोषणासाठीं इंग्लंदासारखे कायदे करावे लागतील, तेव्हां हें भावी संकट टाळण्याकरितां कम्यून ची सर्व व्यवस्था कायमच ठेवावी. ही ग्रामव्यवस्था आहे ह्मणूनच पिकाऊ जमिनीचा $\frac{2}{3}$ भाग निवळ शेतकऱ्यांकडे आहे. ती जमीन मोठे व्यापारी किंवा बडेलोक यांच्या हातांत गेल्यावर, त्यांच्या मागण्याप्रमाणें सारा द्यावा लागतो आणि ह्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या वर्गावर काय होतो, हें ऐलंड, इंग्लंड वगैरे देशांत उघड दिसून येतें. रशियांत असे कायदे आहेत, कीं शेतकरी कितीही कर्जबाजारी झाला तथापि त्याची जमीन व शेतकीचीं आउतें हीं कांहीं सावकारास मिळावयाचीं नाहींत. यामुळें जमीन शेतकऱ्यांकडेच राहते. त्याचप्रमाणें शेतकऱ्यास मुलगा झाला. कीं थोडी तरी जास्त जमीन मिळावयाचीच. रशियांत लोकसंख्येपैकीं $\frac{9}{10}$ लोक शेतकरी आहेत, यांचें हें एक कारण आहे. तसेंच शेतकऱ्यास जेव्हां खात्री असते कीं, आपल्या जमिनीवर आपली पूर्णसत्ता आहे, व ती आपल्या हातांतून कधींही काढतां येणार नाहीं, तेव्हां तींत मेहनत करून, उत्पन्न वाढविण्यासाठीं तो होईल तितकी खटपट करतो. हा कांहीं सामान्य फायदा नव्हे.

२ एवढावेळ रशियाच्या ग्रामव्यवस्थेची माहिती सांगितली. यातां पुढची पायरी ह्मटली ह्मणजे स्थानिकस्वराज्य. हे हक

आमच्या लोकांस जसे नवीन मिळाले त्याचप्रमाणें रुसांसही अलीकडेच मिळाले आहेत. स्थानिक व्यवस्था चालविणारी अगदीं खालची मंडळी म्हणजे ग्रामसभा. कांहीं गांव मिळून १००० लोकसंख्या झाली म्हणजे "वोलोस्त" नांवाची दुसरी एक सभा बनते. या सभेंत १० कुटुंबांकडून एक एक मनुष्य मुखत्यार पाठविलेला असतो. त्या सभेंत जितके गांव येतात त्यांच्या संबंधी लोकहिताच्या गोष्टींवर त्यांत वाटाघाट चालते. या सभेंत एक अध्यक्ष असतो तो व दुसरे लोकांनीं निवडलेले कांहीं इसम मिळून 'वोलोस्त' चीं कोर्टें होतात. कम्यूनांत जसे लहान लहान खटले तपासले जातात त्याचप्रमाणें या वोलोस्तांच्या कोर्टांतून जरा मोठ्या खटल्यांची चौकशी होते. या स्थानिक कोर्टांना दिवाणी व फौजदारी अधिकार दिले आहेत त्याचप्रमाणें कम्यूनच्या कोर्टांत ठराव झालेल्या कांहीं खटल्यांची फिरून तपासणी करण्याचा अधिकार या कोर्टांकडे ठेविला आहे. 'वोलोस्त' सभेच्या अध्यक्षास फार काम करावें लागतें. त्याच्या हद्दींतील अंमल बजावणीचें काम त्याच्याकडे असतें. त्या ठिकाणच्या पोलिसाकडून सुटलेले हुकूम त्याला अमलांत आणावे लागतात, ह्यासाठीं त्याच्या हाताखालीं बरेच शिपाई दिले असतात. गांवावर बसविलेले कर वसूल होतात किंवा नाहीं हेंही त्याला पहावें लागतें. त्याची पाळी संपली म्हणजे पुनः कांहीं तें काम पत्करण्याची त्यास इच्छा होत नाहीं, इतका त्रास त्यास सोसावा लागतो.

'वोलोस्त'च्याही वर जी स्थानिक सभा असते तिला "झेम्स्त्वो" असें नांव आहे. आमच्या इकडे झालेले डिस्त्रिक्त बोर्ड रशियांतील या सभा, यांचें स्वरूप साधारणपणें समान आहे या सभेंत कम्यूनांतून व शहरांतून पाठविलेले लोक बसतात यांची निवडणूक अर्थातच, लोकांकडे आहे. 'जस्तिस आफ धि पीस' ह्यांची नेमणूक करणें, जिल्ह्यांतल्या पोलिसांची व्यवस्था ठेवणें, रस्ते, पूल, वगैरे लोकोपयोगी कामें करणें व त्यांची दुरुस्ती ठेवणें, शहरांतून स्वच्छता राखणें, कनिष्ठ प्रतीच्या शिक्ष

णास मदत व दुष्काळपीडित लोकांस अन्न देणें वगैरे अनेक कामें या सभांकडे सोंपविलीं आहेत. सगळ्या जिल्ह्यांच्या संभांकडून एक एक प्रतिनिधि प्रांताच्या मुख्य सभेकडे पाठवितात. या सभांकडे स्थानिक खर्चाची व्यवस्था ठेवण्याचें काम असतें. जिल्ह्यांच्या सभांत शेतकरी लोक नसून बहुतेक मोठे जमीनदारच असतात, याचें कारण, रूस शेतकऱ्यांस अशा सभेंत बसणें आवडत नाहीं व ह्या सभा १८६४ सालापासूनच सुरू केल्या असल्यामुळें अद्यापि त्यांची गोडीही उत्पन्न झाली नाहीं.

'मीर किंवा कम्यून,' 'वोलोस्त,' 'झेम्स्त्वो' वगैरे सभांपासून रशियन लोकांस पुष्कळ राजकीय हक्क मिळाले आहेत. त्या देशांत पुढेंमागें राज्यव्यवस्थेंत लोकांचें मत घेण्याची चाल सुरू झाल्यास, या सभांपासून त्यांस एक तऱ्हेचें शिक्षणच मिळत आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. लोकांनीं निवडलेल्या प्रतिनिध्यांकडून रशियाचीं राज्यसूत्रें हालण्यास थोडीच वर्षें लागतील. तो हक्क मिळण्याविषयीं त्यांचे हरप्रयत्न चालू आहेत. रशियांत ज्या स्थानिक सभा आहेत ह्मणून इतका वेळ सांगितलें, त्यांस जसे हक्क मिळाले आहेत तसे युरोपांतल्या किंवा अमेरिकेंतल्या एकाही प्रजासत्ताक राज्यांतील लोकांस मिळालेले नाहींत. ज्या देशांत जुलमी राज्य चालतें तेथेंच असे हक्क लोकांकडे असणें, हीं गोष्ट मोठ्या आश्चर्याची दिसते. रशियन ग्रामसभेंत लोकांचा हात प्रत्येक कामांत पुढें असतो, परंतु एकंदर राज्यव्यवस्थेंत हे एवढे हक्क खेरीज करून, दुसरीकडे जुलमी सरकाराचा इतका जाच आहे, कीं या स्थानिक हक्कांचा वास्तविक उपयोग फार थोडा होतो.

कम्यूनच्या रचनेकडे व व्यवस्थेकडे लक्ष दिलें असतां त्याच नमुन्यावर 'वोलोस्त', व 'झेम्स्त्वो' यांची रचना व्हावी हें साहजिकच दिसतें. या सभांपैकीं शेवटली सभा फक्त किरकोळ स्थानिक कामांपूर्तीच आहे. त्या सभेला लोकांच्या तर्फेनें झारास विनंतिपत्रें पाठविण्याचा अधिकार नाहीं, परंतु ह्याहूनही दुःखाची गोष्ट ह्मणजे ही, कीं त्या सभांत पाहिजे त्या विषयावर मोकळेपणानें

संभाषण किंवा वादविवाद करण्याची परवानगी नाहीं. रशिया-सारख्या देशांत, जेथें वर्तमानपत्रांस राजकीय व लोकाहिताच्या विषयांवर स्वतंत्र विचार प्रकट करण्याचा प्रतिबंध आहे, तेथें तसल्या विषयांवर वाटाघाट करण्यास या स्थानिक सभांचा चांगला उपयोग करितां आला असता. परंतु तें द्वारही बंद केल्यामुळें त्या सभा असून नसून सारख्याच झाल्या आहेत. ज्या सभेंत, लोकांच्या हिताहिताच्या गोष्टींचा विचार करतांना, प्रथम सरकारची मर्जी संभाळावी लागते व प्रत्येक ठिकाणीं तोंड संभाळून, बातचितानें, व जपून बोलावें लागतें, ती सभा लोकांनींच निवडलेल्या प्रतिनिधींची असली तरी काय उपयोग होणार ? अशा सभांचा योग्य उपयोग म्हणजे एवढाच कीं, प्रजा व राजा यांच्या परस्परांच्या हिताहितांचा त्यांत विचार होऊन हरकामांत निःपक्षपाती ठराव व्हावे. परंतु रशियांत सरकारच्या करड्या अंमलाखालीं स्थानिकस्वराज्याचे अधिकार व्यर्थ झाले आहेत. दिवसानुदिवस स्वतंत्रतेसाठीं भांडणाऱ्या प्रजेस असल्या हक्कांची थोडी गोडी लावून दिल्यावर, ज्यास्त हक्क मिळण्याविषयीं त्यांची इच्छा होणें अगदीं साहजिक आहे. अशा इच्छेमुळें तेथील सरकारानें लोकांस महत्वाकांक्षी म्हणणें, हें युक्तीस अनुसरून नाहीं थोडी लालूच दाखवून हात मागें घेतल्यानें लोकांची इच्छा जास्त वाढते. स्थानिक सभांस जास्त हक्क देऊन त्यांस जरा खुली हवा लागल्यानें रशियन सरकारास मोठा फायदा होईल. या सभांपासून आपल्या प्रजेच्या रास्त मागण्या कोणत्या आहेत हें कळण्याचें एक उत्तम द्वार होईल, व पुढें कालांतरानें, बड्या राजकीय कामांतही प्रजेच्या विचारांस स्थल मिळण्यास हा एक मार्गच केल्यासारखें होईल. ज्या देशांत प्रजेच्या विचारांस मान मिळून, राज्ययंत्र लोकांच्या बहुमताप्रमाणें चालतें, ती राज्यरीति चांगली हें उघडच आहे. तेव्हां त्या मानाला पात्र होण्यास, रशियन राज्यपद्धतींत मोठे कांहीं फेरफार करण्याचें कारण नाहीं. याच स्थानिक सभांस पूर्ण स्वातंत्र्य देऊन, राष्ट्राच्या मुख्य सभेशीं

त्यांचा संबंध जुळविला म्हणजे झालें. परंतु एवढें करीपर्यंत किती झार प्राणास मुकतात, हें सांगतां येत नाहीं !

लोकांच्या ओरडीकडे लक्ष पोंचवून रशियन सरकारानें लोकहिताच्या पुष्कळ गोष्टी केल्या हे खरें, तथापि इंग्लद देशांतील लोकांप्रमाणें रूस लोकांस हक्क मिळेपर्यंत, त्या देशांत स्वस्थता होणें कठिण दिसतें. १८६४ सालापासून अलीकडे त्या देशांत न्यायपद्धतींतही बरेच फेरफार केले आहेत. या नवीन सुधारणेपासून रूस लोकांस थोड्या खर्चानें न्याय मिळतो हा एक मोठा फायदा झाला आहे; त्यापूर्वी त्या देशांत निरनिराळ्या ठिकाणीं निराळे कायदे कानु असल्यामुळें तेथील न्यायपद्धति मोठ्या घोंटाळ्याची होती. आमच्या देशांतही न्यायखात्यांत लवकरच सुधारणा केली पाहिजे.

१८६७ त गुलांमास दास्यांतून मुक्त केल्यावर रशियन सरकारचें व सुधारणेच्छूचें लक्ष न्यायखात्याकडे वळलें आणि आपल्या देशांतल्या न्यायपद्धतींत कोणत्या उणीवी आहेत व त्या कोणत्या उपायांनीं दूर होतील याबद्दल विचार सुरू झाले. प्राचीन काळीं रूस देशांत अर्ध सुधारलेल्या इतर देशांप्रमाणें न्यायदानाचें काम बऱ्याच अंशीं लोकांकडे होतें. त्यावेळेस रूस देश आपल्या बाल्यावस्थेंत होता यास्तव व्यक्तिमात्राचें शरीर, मालमत्ता व हक्क, यांचें रक्षण करण्याचें काम लोकांच्याच हातांत होतें. स्वावलंबन हा न्यायपद्धतीचा पाया होता. पुढें रशियांत झारांचा अम्मल सुरू झाल्यावर या जुन्या वहिवाटींत पुष्कळच अंतर पडलें. लोकांची मदत न घेतां राज्याचा गाडा हांकण्याचें काम बादशहांनीं आपल्या शिरावर घेतलें व लोकांनीं आपल्या प्रत्येक गोष्टींत झारांकडे पहावें अशी राज्यरीति चालविली. याच क्रमानें पुढें लोकांचें अंग न्यायदानांत नाहींसें करून राजे पुढें सरसावले.

त्यावेळीं जो हा फेरफार झाला हा नित्यक्रमास अनुसरून च होता. आपण प्रत्येक देशाच्या इतिहासांत हीच गोष्ट हातीं कीं राजांची सत्ता वाढल्यावर, न्यायदानाचें काम त्यां-

च्याकडे जातें. ह्या शतकांत जेव्हां रशियांतील लोकांचें लक्ष न्यायखात्याकडे लागलें, तेव्हां त्यांस असें आढळून आलें कीं, बादशहांच्या हातांत तें काम गेल्यापासून आजपर्यंत त्यांत अनेक घोंटाळे उत्पन्न झाले होते. कायदेकानू बिकट व भाराभर झाल्यामुळें त्यांचा मुख्य उद्देश सिद्धीस जात नाहीं असें त्यांस दिसलें; ह्मणून १८६४ सालांत न्यायपद्धति सुधारली. पूर्वीचे बिकट व घोटाळ्याचे कायदे आणि कोर्टांचे भानगडीचे शिरस्ते मोडून, नवीन पद्धति ठरविली. पूर्वीं झारांच्या कारकीर्दींत खटल्यांची चौकशी गुप्त रीतीनें होत असे, ती वहिवाट मोडून खटले चालतांना ते ऐकण्याची परवानगी लोकांस मिळाली. त्याचप्रमाणें फौजदारी गुन्ह्यांत जुरी मिळाली. हे जुरर लोक अमुक असावे असें न ठरवितां पाहिजे त्या वर्गांतले निवडावे असें ठरविलें. न्यायाधीशांचे पगार वाढविले, त्यामुळें लांच खाण्याकडे त्यांचे लक्ष कमी झालें. त्याचप्रमाणें न्यायाधीशांस स्वतंत्र करून वरिष्ठ न्यायाधीशांस कायमच केलें. ज्या खटल्यांत सरकारच्या व लोकांच्या हिता विषयीं वाद असतो, तेव्हां न्यायाधीशास जर स्वातंत्र्य नसेल व जर त्यास असें वाटेल, कीं लोकांच्या तर्फे न्याय दिल्यास सरकारची मर्जी खप्पा होऊन आपल्या पोटावर पाय येतील, तर अर्थात्च तो सदोदित सरकारच्या तर्फेचा होणार ! ह्मणून ही अडचण दूर करण्यासाठीं सुधारलेल्या राष्ट्रांत न्यायाधीशास स्वातंत्र्य दिलें असतें व वरिष्ठ न्यायाधीशांस तर एकदां न्यायासन प्राप्त झाल्यावर तेथून दूर न करण्याविषयीं कायद्यानेंच बंधन केलें असतें. जुन्या कारकीर्दींत रूस देशांत न्यायाधीशाचें काम करणारे लोक अक्षरशत्रु असत व वशिल्यानें या महत्वाच्या जागा संपादीत. त्यांच्या अंगीं विद्येचा गंधही नसे. या न्यायाधीशांचो निवडणुक बाह्यतः लोकच करीत परंतु खरोखर पहातां सरकारचें आंत अंग असे. ह्या निवडलेल्या न्यायाधीशांस कांहीं थोड्या ठरीव मुदतीपर्यंतच न्यायासन मिळे. ती मुदत संपतांच नवे न्यायाधीश येत. या चालीपासून असा एक

मोठा तोटा होत असे कीं, न्यायाधीश सर्वदा कच्चे रहात व अनुभवलेले लोकांस घरीं बसावें लागे. या कामांवर बहुधा, भिकेस लागलेले, आळशी, ज्ञानशून्य व वाईट चालीचे जमीनदार लोक येत. ते फक्त सहीचे मालक असत व त्यांस जगाची बिलकुल माहिती नसे. कोर्टांतील शिरस्तेदार मनाला वाटेल त्याप्रमाणें खटले तयार करून आणून, त्यांवर त्याच्या सह्या घेत. लांच खाण्याचा सपाटा तर चोहोंकडे होता. तेव्हां अशा व्यवस्थेंत लोकांस कोणत्या प्रकारचा न्याय मिळे याची कल्पना सहज करतां येईल !

या वाईट प्रकाराचा बोभाटा झाल्यावर झारनिकोलस यानें, राष्ट्रांतील मुख्य सभेकडे, कायद्यांत व कोर्टांच्या शिरस्त्यांत काय सुधारणा करावी ह्याचा विचार करण्याचें काम सोंपविलें. पुढें माजी झाराच्या कारकीर्दींत न्यायखात्यासंबंधानें चौकशी करण्याकरितां एक कमिशान बसलें. त्या कमिशनाच्या सूचना अशा होत्या कीं, पूर्वीचे कायदे फार मोठे व घोंटाळ्याचे आहेत, ते सोपे करावे; थोड्या खर्चांत व लवकर न्याय मिळावा म्हणून 'जस्टिस आफ धि पीस' यांची नेमणूक करावी; न्याय उघड व लोकांसमक्ष व्हावा आणि राज्यांतील इतर खात्यांपासून न्यायखातें स्वतंत्र करावें. ह्या सूचनांप्रमाणें फेरफार करून उदार अलेक्झांदर बादशहानें 'जस्टिस आफ धि पीस' निवडण्याचें काम लोकांवर सोंपविलें. परंतु 'रेग्युलर ट्रायब्युनल' नामक कोर्टांच्या न्यायाधीशांची नेमणूक सरकारच करितें. हल्लीं न्यायाधीशांच्या कामावर नेमलेले लोक, पूर्वीच्या मानानें पहातां, विद्वान् व अनुभविक असतात. या 'ट्रायब्युनल' कोर्टांच्या निकालावर पुनः चौकशी करण्याचें काम राष्ट्रांतील वरिष्ठ न्यायसभेकडे आहे.

प्रत्येक जिल्ह्यांत 'जस्टिस आफ धि पीस' ह्यांचीं कोर्टें आहेत. यांस लोकच नेमतात व ते तीन वर्षें काम पहातात. यांच्याकडे लहान लहान खटले मात्र येतात. तीन वर्षें झाल्यावर त्याच मनुष्याची पुनः निवडणूक केली तरी चालते.

यांच्याकडे १ वर्षाची कैद देण्याचा अधिकार असतो. यांच्या ठरावांवर दुसऱ्या एका वरिष्ठ कोर्टाकडे अपील चालतें. या वरिष्ठ कोर्टाचे न्यायाधीशही जमीनदारांनींच निवडलेले असतात. लोकांस कोर्टफीचा खर्च फार येत नाहीं व 'जस्टिसां' कडे खटला गेल्यावर, त्यांच्याकडून वादी प्रतिवादी या उभय पक्षांस अपसांत समजूत करावी म्हणून उपदेश मिळतो, व कित्येक बिकट कामांत अमुक तऱ्हेनें तोड पाडावी अशी ही ते सूचना करतात. यामुळें पुष्कळ दाव्यांत लवकर निकाल होतो व तंटे वाढत नाहींत. आपसांत ठराव करण्यास जर दोन्ही पक्ष कबूल असतील तर न्यायाधीश आपल्या सहीनिशी त्यांचा ठराव लिहितो. फटके मारणें, वगैरे शरीरास अपायकारक शिक्षा रशियांत नाहींत, फक्त गांवच्या सभेकडून मात्र ही शिक्षा केव्हां केव्हां अमलांत येते. दिवाणी खटल्यांत केवढीही रकम असली तथापि अपील करतां येतें. तात्पर्य काय कीं, रशियांतील न्यायखातें, जर कायद्यांप्रमाणें व ठरावांप्रमाणें चालविलें तर लोकांस खरोखरच सुख मिळेल. परंतु चांगले कायदे असून तेथील खरी स्थिती काय आहे व तिचीं कारणें कोणतीं हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे.

रशियांतील न्याय खात्यांत जी सुधारणा केली, ती फ्रान्स व इंग्लंद या देशांच्या पद्धतीवर केली आहे. परंतु लोकांस हे प्रकार नवीनच असल्यामुळें त्यांचा फायदा कमी होतो.

ह्या व मागच्या प्रकरणांत रशियन राज्य पद्धतीची माहिती वाचकांस मिळाली आहे. त्यावरून सहज दिसेल, कीं कायद्यानें लोकांस स्थानिक अधिकार दिले आहेत व ग्रामसभा स्वतंत्र आहेत, तथापि प्रत्येक कामांत सरकारचा आंतून बाहेरून दाब असल्यामुळें त्यांचा उपयोग होत नाहीं. राजकीय गोष्टींत तोंड बंद केल्यामुळेंच या हक्कांचा उपयोग नाहीं, हें सांगितलेंच आहे. शारीर शिक्षा देऊं नये असा कायदा आहे, तथापि रशियांत हजारों लोकांस गुप्त पोलीसाकडून पाहिजे तीं दुःखें सोसावीं लागतात व कारागृहांत जन्म काढावा लागतो. लोकांस

जुरीचे हक्क कायद्यानें मिळाले आहेत, तथापि हरहमेश राजकीय गुन्ह्यांची चौकशीही न होतां शेकडों लोकांस सैबिरियांत जावें लागतें ! ! तात्पर्य काय, कीं रशियांत हिंडण्याच्या प्रवासास चोहोंकडे विद्यापीठें व हजारों विद्यार्थी आढळतात, पुस्तकालयें, ग्रंथ, वर्तमानपत्रें पुष्कळ दिसतात आणि नानातऱ्हेचे कारखाने, उद्योगशाळा, संग्रहालयें वगैरे सुधारणेचीं हजारों चिन्हें पुष्कळ सांपडतात, तथापि सर्व चलनाची किल्ली बादशाही जुलूम आहे !

बाह्यसुधारणेवरून असें वाटतें, कीं हे लोक फार सुखी असावे, परंतु त्यांची खरी विपत्ति त्यांनाच माहीत. रशियांतील कायद्यांचीं पुस्तकेंच पाहिलीं तर रूस लोकांस पूर्ण स्वातंत्र्य व राजकीय हक्क मिळाले आहेत असा भास होईल, परंतु व्यवहारांत नित्य दृष्टीस पडणारा प्रकार भयंकर आहे. एक गोष्ट मात्र फारच संभवनीय दिसते, ती ही कीं, सांप्रत रूस लोकांस ज्ञानप्राप्ति झाल्यामुळें त्यांच्यामध्यें जी चळवळ सुरू झाली आहे, तिचा अखेरपरिणाम असा होईल, कीं ते लोक झारांचा जुलमी अंमल झुगारून देतील व राजकीय सूत्रें आपल्या हातांत घेतील, आणि इतकें होण्याला फार वर्षें लागणार नाहींत.

रशियन न्यायपद्धतिसंबंधीं लिहितांना आमच्या देशांतही न्यायखात्यांत सुधारणा केली पाहिजे असें ओघानुसार आम्हीं बोलून गेलों. त्याच संबंधानें चार शब्द लिहून हें प्रकरण आटपूं. आमच्या देशांत फार प्राचीन काळापासून राजांकडे न्यायदानाचें काम होतें ही गोष्ट जरी निर्विवाद आहे, तथापि पंचायतींत शेकडों खटल्यांचा प्रथम निकाल लागे, त्यामुळें लोकांच्या पैशाचा व वेळाचा अपव्यय होत नसे. ही पंचायतीची रीति इंग्लीश अंमल झाल्यापासून मोडली. त्या पद्धतीपासून खरोखर हित किती होतें, त्याबद्दल पुष्कळ अनुभविक इंग्लिश ग्रंथकर्त्यांचेंच मत पाहिलें तर समजेल. न्यायखात्या संबंधानें हिंदुस्थानच्या पुष्कळ आरोळ्या आहेत, परंतु त्या इंग्लंदांतील लोकांच्या कानीं पडतील तेव्हां दाद लागावयाची ! हिंदुस्थान-

च्या राज्यव्यस्थेची चौकशी करण्याकरतां कमिशन बसण्याचें घाटत आहे, त्यांत न्यायखात्याच्या प्रश्नाचा, त्याच्या महत्वाप्रमाणें, योग्य विचार होईल अशी आशा आहे. दिवसेंदिवस लोकांना समजण्यासही बिकट असे शेंकडों कायदे मात्र बाहेर पडतात, परंतु लोकांच्या खऱ्याखुऱ्या ओरडींकडे दुर्लक्ष होतें. शेंकडो कायदे बाहेर पडतात ही गोष्ट फक्त आमच्या देशापुर्तीच आहे असें नाहीं, तर सुधारलेल्या बहुतेक देशांत हीच रड ऐकूं येते. हल्लींच्या सुधारणेचा कल कायद्यांचें जाळें वाढविण्याकडे आहे. अर्वाचिनकाळांत भौतिक सुधारणा ज्यामानानें वाढली त्या मानानें सामाजिक सुधारणा वाढली नाहीं. प्रत्येक देशांत कायदे इतक्या जलदीनें वाढत आहेत, कीं ते समजण्यास आयुष्य खर्च करावें लागतें. पुनः ही गोष्ट निर्विवाद असतां ही, व कायद्यांचे अर्थ करतांना, सगळें आयुष्य त्यांतच घालविणाऱ्या विद्वान् न्यायाधिशांस श्रम पडतात, हेंही स्पष्ट असून, देशांतल्या गांवढ्या लोकांस ते कायदे पक्के अवगत आहेत, असें कल्पून चालणें हें न्याय्य समजावें काय? प्रजेस साधारणपणें माहीत नसणाऱ्या गोष्टी माहीत आहेत, असें मानून त्यांस शिक्षा देणें, हें सांप्रतच्या न्यायपद्धतींचें दूषण आहे. तथापि मनुष्याचे बुद्धीची दुर्बलता व संकोचित्व, ह्यांकडे लक्ष दिल्यास हा दोष सर्वस्वी नाहींसा होणें असंभवनीय आहे. मनुष्यांचें आयुष्य थोडें व कायद्यांचा भार तर वाढत आहे आणि त्यांचें ज्ञान होणें दिवसेंदिवस कठीण होत आहे, तेव्हां अर्थात्च, वरील दूषण कमी न होतां वाढणार आहे. तें वाढूं नये म्हणून यत्न करणें मात्र, प्रत्येक सरकारचें काम आहे. कायदे वाढण्याचीं कारणें कोणतीं, त्यांचे वाईट परिणाम कितपत होतात व ते दूर करण्यास कोणते उपाय आहेत, याचा विचार करणें योग्य आहे; परंतु त्याचें स्थळ हें नव्हे.

प्रकरण ५ वें.

वडेलोक व उमराव–बोयारलोक?–हक्कांबद्दल तंटा युरोपांतील इतर राष्ट्रांच्या वडेलोकांचे हक्क–सुधारणेकडे प्रवृत्ति–इ०.

युरोपखंडांतील प्रत्येक देशांत वडेलोकांचा एक स्वतंत्र वर्ग किंवा जाति आहे. हा वर्ग संपत्तीवर अवलंबून नसून घराण्याचे हक्कांवरून झाला आहे. या वर्गांत येणाऱ्या व्यक्तींस राज्यांतील अन्यलोकांकडून विशेष हक्क व विशेष मानपान असतात. इंग्लंदांत लार्ड पदवींत गणलेले लोक दर्जा, मानपान व पार्लमेंत सभेंत बसण्याचा अधिकार, इत्यादिक गोष्टींनीं जसे मध्यम प्रतीच्या इतर लोकांहून वेगळे आहेत, त्याप्रमाणेंच रशियातही बड्या लोकांचा एक वर्ग होता व अद्यापि ही बराच आढळतो. रशियांतील जुनाट घराण्यांस पूर्वी राजकीय कामांत हात घालतां येत होता, परंतु झारांच्या कारकिर्दींपासून त्या वर्गाच्या स्थितींत मोठा फरक झाला आहे. इंग्लंदांतील लार्ड लोकांस राजकीय हक्क फार आहेत, तसे हक्क रशियन उमरावांस नाहींत. तथापि त्या वर्गास मानपान व दर्जा जास्त अमून, झाराच्या राज्यव्यवस्थेचें काम त्यांच्याकडेच असतें. त्यांचीं घराणीं जुनीं आहेत, त्यांना गुलाम ठेवण्याची परवानगी होती व देशांतील मोठे जमीनदार तेच आहेत. रूमदेशांतील वडेलोकांचे जुने हक्क जाऊन त्यांच्या स्थितींत अंतर कसें पडलें, हें या प्रकरणांत दाखवावयाचें आहे. त्याचप्रमाणें प्रसंगोपात, युरोपांतील वडे लोकांच्या हक्कांची माहिती द्यावी हेंही योजिलें आहे. अलीकडे आमच्या देशांतील कांहीं मंडळीस हा विषय महत्वाचा वाटत आहे; कित्येक तर असा प्रतिष्ठित वर्ग समाजांत असावा आणि तो असल्यानें कांहीं राजकीय व सामाजिक फायदे होण्याचा संभव आहे, असें प्रतिपादन करितात. आमच्या लोकांच्या मानसिक प्रवृत्तीचा कल पाश्चात्य राष्ट्रांचें अनुकरण करण्याकडे असल्यामुळेंच हे विचार

पुढें आले आहेत. या ठिकाणीं या विचारांवर आमचें मत देण्याचा हेतु नाहीं. परंतु पुढील कांहीं पृष्ठें वाचल्यानें या विषयाचें विवेचन करण्यापुर्ती सामग्री आमच्या वाचकांस मिळेल. कारण ह्या प्रकरणांत युरोपीयन बडे लोकांविषयीं बरीच माहिती दिली आहे.

रशियांत प्राचीन काळीं एकसत्ताक साम्राज्य नसून, जागोजाग अनेक लहानमोठीं राजें होतीं, हें मागें सांगितलेंच आहे. या राजांच्या सेवेंत बोयार नांवाचे हजारबंद जमेदार लोक असत. त्यांशिवाय आपलें शौर्य गाजविण्यासाठीं व द्रव्य आणि कीर्ति संपादण्याच्या हेतूनें स्वतःच्या खुषीनेंच शिपायी बनलेले पुष्कळ लोक त्यांच्या पदरीं असत. या शिपायांची तुलना कांहीं अंशीं आमच्या शिलेदारांशीं करितां येईल. बोयार लोक त्या संस्थानांतील राहिवाशी असून त्यांच्या घराण्याकडे पूर्वापार चालत आलेल्या जमिनी असत. बडे लोक किंवा उमराव हेच लोक होते, व राजांच्या दरबारांत यांची मोठी प्रतिष्ठा असे. बाह्यतः पाहिलें असतां, हे आपापल्या राजाच्या अंमलांत असत तथापि त्यांच्या मर्जीप्रमाणेंच संदोदित वागत नसत. हे बोयार, खुषीला आलें तर मात्र राजानें केलेल्या स्वारीशिकारींत जात. यांशिवाय दुसरे जे परस्थलचे शिपाई असत त्यांना आपली चाकरी सोडून पाहिजे तेव्हां अन्यत्र जाता येत असे. या प्रतिष्ठित वर्गाच्या संमतीशिवाय जर राजानें एखादा युद्धप्रसंग आणिला तर, आपलें मत घेतलें नाहीं म्हणून आम्हीं लढण्यास खुषी नाहीं, असें ते साफ सांगत. महत्वाच्या राजकीय गोष्टींत राजानें या बडेलोकांचे मत द्यावें लागे. कित्येक प्रसंगीं राजा दुराचारी, दुष्ट व अयोग्य वाटल्यास त्यास देहान्त शिक्षाही या लोकांनीं दिली होती. यावरून स्पष्ट दिसतें, कीं हे बडेलोक स्वतंत्र होते व राजकीय गोष्टींत हात घालण्याचा त्यांस अधिकार होता. हा अधिकार रूसदेशांतील जुन्या ग्रामरचनेच्या पद्धतीस अनुसरूनच होता. रशियांत गांवांतील जमिनीवर लोकांची समाईक अविभक्त मालकी आहे व ग्रामव्यवस्थेंत

प्रत्येक कुटुंबाचें अनुमोदन असतें. त्याचप्रमाणें तेथें जीं लहान लहान मांडलिक राज्यें झालीं त्यांच्या व्यवस्थेंतही आपलें अंग असावें, अशी बोयारलोकांना साहजिकच इच्छा झाली. तसेंच पश्चिम युरोपांतील बड्या लोकांप्रमाणें यांस, राजाला मदत दिलीच पाहिजे असें नव्हतें. त्या बडेलोकांकडे असलेल्या जमिनी सरंजामी नवत्या.

रशियावर जेव्हां पुढें तार्तार व मोंगल लोकांनीं स्वाऱ्या करून आपली सत्ता त्या देशांत स्थापिली तेव्हां तेथील लहान मोठे सर्व राजे त्यांचे मांडलिक बनले. तेव्हांपासून बोयार लोकांच्या राजकीय हक्कांत पुष्कळ फेरफार झाले व त्यांच्यावर त्यांच्या राजांचा विशेष दाब बसत चालला. दिवसेंदिवस ते राजे त्यांस आपल्या मर्जीप्रमाणें वागवूं लागले. तथापि त्या लोकांचें महत्व अगदींच नाहींसें झालें नवतें. तार्तार खानांचा अंमल जरी जुलमी व कडक होता तथापि त्यांस मिळणारा करभार नियमित पोंचला ह्मणजे मग तिकडे ते मांडलिक संस्थानिक आपापसांत पाहिजे ते भगडे करोत. त्यांकडे ते खान दुर्लक्ष करीत. तेव्हां अशा स्थितींत संस्थानिकांस आपल्या शेजारच्या संस्थानिकांशीं लढण्याचा प्रसंग वारंवार येई, ह्मणून आपल्या देशाचें संरक्षण व्हावें व साधल्यास अन्य राजांच्या मुलुखाचें हरण करावें याही हेतूनें, त्यांस आपल्या पदरीं बरीच फौज बाळगावी लागे. तेव्हां अर्थातच ते बोयार लोकांची मनोधारणा करीत. तात्पर्य काय कीं, तार्तार खानांच्या जुलमी एकसत्ताक राज्यपद्धतीच्या संवयीनें व अनुकरणामुळें रशियांतील मांडलिक राजेही आपापल्या टापूंत जुलमानें वागूं लागले व बोयार लोकांच्या हक्कांची पायमल्ली होऊं लागली, परंतु त्या वर्गाचें वर्चस्व मोडलें नाहीं. पुढें एकदोन शतकांत जेव्हां मास्कोच्या राजांनीं सगळा रूमदेश आपल्या ताब्यांत आणिला तेव्हांपासून या बोयार लोकांचें सगळे हक्क नाहींसे झाले. झारांच्या सत्तेपासून, संस्थानिकांबरोबर ते लोकही बुडाले. झारांचा अमल झाल्यावर या जुनाट प्रतिष्ठित वर्गाची मानहानि झाली. त्यांस तेव्हांपासून

कोणीच पुसेना. आपल्या राजांजवळ ते बरोबरीच्या नात्यानं किंवा निदान सलगीनें वागत, परंतु त्याप्रमाणें झारांशीं वागतां येईना. झारांच्या दरबाराचा थाट मुसलमानी बादशाहीचा असल्यामुळें तेथील रिवाजाप्रमाणें उमरावांस मोठ्या अदबीनें व नम्रतेन वागावें लागे. झारांचा मर्जा खप्पा होऊन, पुष्कळ बडे लोक प्राणास मुकल्याचीं प्रत्यक्ष उदाहरणें पाहून, इतर बडे लोक व सरदार, ह्यांवर झारांचा दरारा बसला. मुसलमानरीतिप्रमाणें या लोकांचा दर्जा व मानमरातब झारांनीं आपल्या दरबारांत कायम राखिला, परंतु त्यांच्या हातीं कांडीभरही राजकीय सत्ता ठेविली नाहीं. यानंतर झारांची स्तुति करून व त्यांच्या मर्जीसारखें वागून त्यांची मेहेरबानी संपादण्याकडे या लोकांचें लक्ष लागलें. कांहीं दिवस झारांच्या मुलमी अमलापासून मुक्त होण्याचो खटपट यांनीं चालविली होती, परंतु त्यांचे श्रम व्यर्थ झाले. आपल्या जुन्या राजांच्या दरबारांत असतांना राजकीय गोष्टींकडे त्यांचें लक्ष असे, परंतु आतां तें कांहीं चालेनासें झाल्यामुळें ते उमराव फक्त आपल्या मानपानांसाठीं मात्र एकसारखे तंटे करीत. कमी दर्जाच्या मनुष्याच्या हाताखालीं मोठ्या दर्जाचा मनुष्य कधींही काम करीत नसे. या उमरावांना झारांच्या पदरीं राज्यांतील मोठमोठीं कामें करावीं लागत यामुळें अशा प्रकारचे तंटे वारंवार येत. मोठ्या दर्जाच्या उमरावाच्या कुटुंबांतल्या एकाद्या मनुष्यानें, कमी दर्जाच्या उमरावाच्या हाताखालीं सरकारी चाकरी केल्यास, ते लोक आपल्या कुळास कलंक लागला असें मानीत. झारांच्या दरबारांत किंवा मेजवानीच्या प्रसंगीं उजव्या बाजूस कोणी बसावें, डाव्या बाजूस बसण्याचा कोणाचा अधिकार, इत्यादि अनेक क्षुल्लक गोष्टींवरून जे तंटे पडत, ते सोडविणें झारासच्च भाग पडे.

याप्रमाणें या उमराव व सरदारलोकांच्या मानपानाचें महत्व पितर धि ग्रेत गादीवर येईपर्यंत चाललें होतें. याच्या पूर्वी हे लोक दरबारांत अनेक मसलती करीत व नानातऱ्हेचे बखेडे

करण्यांत गुंतलेले असत. परंतु पितर गादीवर आल्यापासून त्यांच्या स्थितींत मोठाच फरक पडला. लोकहितावर दृष्टि देवून, राशियांत आपली पूर्ण सत्ता असतांही, सामान्य मजुरांप्रमाणें काम करण्यांत ज्यास कोडीभरही अपमान वाटत नसे, त्यास या उमरावांच्या प्रतिष्ठेचा व दर्जाचा साहजिकच त्रास येई. हट्टवादी, हेकेखोर, प्रतिष्ठित व डौली लोकांचा तो मनापासून द्वेष करी. आपण हातीं घेतलेलें लोकसुधारणेचें काम नीट रीतीनें शेवटास न्यावें यास्तव जो कोणी हुशार, आज्ञाधारक व तरतरीत असे, त्यालाच तो मोठ्या हुद्द्याच्या-जागा देई. अशा जागा देण्यांत त्याचें लक्ष कुलापेक्षां गुणांवरच फार असे. वाडवडिलांच्या नांवावर प्रतिष्ठा मारणाऱ्या कुचकामी लोकांची भीड न ठेवितां, तो गुणिजनांचें मात्र गौरव करी. आमच्या देशांत लार्ड लिटन साहेबानीं 'स्टाटूटरी सिविलियन' नेमण्याची जी नवीन पद्धति सुरू केली, ती पितरच्या पद्धतीच्या अगदीं उलट आहे, परंतु ह्यांत आमच्या लोकांस मोठ्या हुद्द्याच्या जागा मिळतात एवढाच संतोष मानावयाचा. पितरच्यापूर्वी राज्यांतील हुद्द्यांच्या जागा फक्त या बडे लोकांसच मिळत. हल्लीं आमच्या देशांत ज्याप्रमाणें मोठ्या हुद्द्यांच्या जागा बहुधा युरोपियनांसाठींच असतात, त्याचप्रमाणें राशियांत पितरच्या पूर्वी स्थिति होती व आतांही आहे ह्मटलें तरी चालेल. तथापि सांप्रत असलेल्या राशियन बडे लोकांत व उमरावांत सगळेच लोक जुनाट बड्या घराण्यांतले नसून, कित्येक तर कनिष्ठ प्रतीच्या लोकांतून येऊन आपल्या योग्यतेवर मोठेपणास चढलेले आहेत.

पितरनें या लोकांच्या स्थितींत एवढाच बदल केला नाहीं, तर याहूनही एक नवीन नियम केला त्यापासून तर या वर्गास फारच जाच होऊं लागला. पितरच्यापूर्वी उमरावांस व बडे लोकांस यारांबरोबर लढाईस जावेंच अशी सक्ति नव्हती, परंतु पितरनें जो उकॉझ् (हुकूम) काढला त्यापासून त्यानें बडे लोकांस सैन्यांत चाकरी करण्याची सक्ति केली. जे बडे

लोक सैन्यांत चाकरी करणार नाहींत त्यांच्या जमिनी सरकार जप्त करील, असा ठराव होतांच त्यांच्या घराण्याकडे ज्या जमीनी फक्त इनाम म्हणून फार दिवस चालत आल्या होत्या, त्यांस या ठरावापासून सरंजामाचें स्वरूप आलें. कित्येकांच्या जमीनी तर म्हारांच्या कारकीर्दीपूर्वीच त्यांच्या घराण्याकडे होत्या, त्याही या कायद्यापासून सरंजामी झाल्या. फक्त कायद्यानें पहातां या ठरावांत पितरचा मोठा जुलुमच समजला पाहिजे; परंतु देशहितावर नजर दिली तर तसें करणें त्यास इष्टच होतें. जमीनी घेण्यावरच न थाबतां, जे बडे लोक सैन्यांत येण्यास कुरकुर करीत त्यांस तो राजद्रोह्यांप्रमाणें मानून कधींकधीं कडक शिक्षाही देई.

या कायद्यामुळें बडेलोक सरकारचे बंदे नोकर बनले. पितरच्या कारकीर्दींत सरकारची चाकरी करण्याचा प्रसंग त्यांस अनेक वेळां येत असे व त्याच्या भयानें ते कोणतेंही काम मुकाट्यानें करीत. परंतु या कडक रीतीपासून फायदा न होतां उलटा तोटाच झाला, कारण ते लोक सरकाराचा गुप्तरीतीनें द्वेष करूं लागले. आपणाकडे चालत आलेल्या जमीनींला सरकारानें अन्यायानें नवीन कायदा करून, सरंजामी स्वरूप दिलें, हें त्यांच्या मनांत जाचत असे. जमीनीवरच न रहातां शिक्षा भोगण्याचा ही प्रसंग येऊं लागला, हें पाहून हे लोक इतके त्रासून गेले होते कीं, त्यांस ती सरकारची कडक चाकरी नको व त्या जमीनी ही नकोत असें झालें; त्यामुळें कित्येक तर आपली वतनें सोडून व्यापारी बनले व कित्येक जीवाला कंटाळून मंक (बैरागी) होऊन परमार्थ साधण्याकडे लागले.

पितरच्या मागून त्यानें केलेला कायदा मागें पडला, तथापि उमरावांची स्थिति सुधारली नाहीं व विशेषतः त्यांना, ती दुसऱ्या कांहीं कारणामुळें, फारच दुःखाची व अपमानकारक दिसूं लागली. हें कारण असें होतें कीं, या सुमारास रूसदेशांत पश्चिम युरोपांतील विद्या व कलाकौशल्यें व रीतरिवाज इत्यादिकांचा फैलाव होत होता व त्यांतही फ्रान्स व जर्मनीच्या रीतींचे अनुक-

रण वरिष्ठ वर्गांत व दरबारांत चालू होतें. त्या देशांतील बड्या-लोकांशीं आपली तुलना करून पाहिल्यावर रशियन उमरावांस फार लाज वाटे. जर्मनीपेक्षां ही या वेळीं फ्रान्सदेशांत बडेलोकांचें वैभव, मानमरातब, हक्क व मोकळिकी वगैरे गोष्टींचें स्तोम फारच होतें. फ्रेंचांच्या विलासी दरबारांत बडेलोकांची चैन चालत असे, व त्यांना इतके हक्क होते व इतक्या मोकळिकी होत्या, कीं ते कनिष्ठ प्रतीच्या वर्गांशीं मन मानेल तसें वर्तन ठेवीत. याचा परिणाम पुढें फ्रेंचराज्यक्रांतीच्या वेळीं काय झाला तें प्रसिद्धच आहे. इकडे रशियांतील बडेलोक फक्त नावाचे होते. त्यांना हक्क नव्हते, मोकळिकी नव्हत्या आणि शिवाय झारांची मर्जी बिघडल्यास बिचाऱ्यांस केव्हां केव्हां खरोखरीच मार खावा लागे! ह्मणून आपल्या स्थितीचा त्रास येऊन, त्यांस फ्रान्स वगैरे देशांतील बड्या लोकांप्रमाणें व्हावें अशी इच्छा होऊं लागली. या त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांना पुढें बेतावेतानें बरेंच स्वांतत्र्य व हक्क मिळूं लागले. 'तिसरा पॉल' नांवाच्या झारानें १७६२ त पितरचा कडक कायदा रद्द केला व सैन्यांत शिरणें त्यांच्या मर्जीवर ठेविलें. पुढें कयाथराईन झारिना (झार शब्दाचें स्त्रीलिंगी रूप), हिनें बडे लोकांस जास्त महत्त्वास आणिलें व त्यांस नवे हक्क व मोकळीका मिळाल्या. तेव्हांपासून ते लोक जरा पुढें सरसावले. झाराच्या सैन्यांत चाकरी करणें त्यांच्या खुषीवर ठेवल्यापासून व विशेषतः त्यांची दरबारांत प्रतिष्ठा होऊं लागल्यापासून सैन्यांत शिरण्याविषयीं त्यांनाच औत्सुक्य आलें. कांठलीही गोष्ट जुलमानें करणें व खुषीनें करणें ह्यामध्यें महदंतर असतें. कयाथराईन फ्रेंचांच्या दरबाराचें अनुकरण करूं लागल्यामुळें, रशियन लोकांच्या श्रेष्ठ वर्गास तेज येऊं लागलें. सुधारलेल्या व सुशिक्षित देशांत चिनी, डामडौली व दरबारशोभेसाठीं बडेलोक असावे असा तिचा ग्रह झाल्यापासून, फ्रान्सदेशांतील बड्यांचा जसा थाटमाट होता, तसा आपल्याही देशांत उतरण्याचा तिनें निश्चय केला. यामुळें पंधराव्या लुईच्या दरबाराप्रमाणें पितर्सबर्ग शहरांतही

दरबारी थाट वाढला व विलास वाढले. ह्या सुमारास रूस-देशांतील वरिष्ठ प्रतीचे लोक फ्रेंच भाषा शिकूं लागले, आणि फ्रेंच बोलणें ह्मणजे एक भूषणच असें त्यांस वाटूं लागलें. त्यांचें पाहून खालच्या प्रतीच्या लोकांनीं त्यांचाच कित्ता वळविण्यास प्रारंभ केला.

फ्रेंचांचें बाह्य अनुकरण सर्व झालें, तथापि ते लोक फ्रेंच बडे-लोकांहून वेगळ्या स्थितींतच होते. आधीं युरोपांतील बडे लोकांस घराण्याच्या जुनाटपणाबद्दल फारच महत्व वाटतें व कित्येक तर आपल्या वंशावृक्षाचीं पाळें थेट प्राचीन जलप्रलयापर्यंत नेऊन पोंचविण्याच्या खटपटींत असतात! ह्या संबंधानें फ्रान्सदेशांतील बडेलोकांकडे पाहिल्यास त्यांचीं घराणीं जुनाट व राजघराण्यावरोबर चालत आलीं होतीं; परंतु रशियन उमराव तर कालचीं मंडळी होती. कारण प्राचीन बोयार लोक पितरच्यापूर्वीच नाहींसे झाले होते, आणि त्याच्या कारकीर्दींत तर हीन कुळांतील शेंकडों नवी मंडळी पुढें आलो होती.

कॅथराइनच्या मनांत फ्रान्साप्रमाणें रशियांतही बडेलोक असावे असें होतें, परंतु ते फक्त दरबारशोभेसाठीं! त्यांच्या हातांत राजकीय सत्तेचा कांहीं अंश द्यावा असा तिचा मुळींच उद्देश नवता. थाटमाट व चैन करण्यास किंवा खुषमस्करी करून दरबारी विलासांत काळ घालविण्यापुर्ताच हा नवीन वर्ग बनविला, परंतु इतर प्रजेपेक्षां त्यांच्याकडे कांहींच विशेष अधिकार ठेविले नाहींत. यामुळें त्यांचें त्यांनाच वाटूं लागलें, कीं फ्रेंच फॉशनांचें (रीतरिवाजांचें) अनुकरण केलें तथापि तादृश फायदा कांहींच नाहीं! राजकीय प्रकरणांत फ्रेंच उमरावांचें पुष्कळ आंग असे, परंतु इकडे रशियांतील उमरावांस झाराच्या मर्जीवर अवलंबून रहाणें भाग होतें. कित्येक स्थानिक अधिकार त्यांस दिले होते, आणि त्यांवर रशियन बडेलोकांस प्रांतांतून बडेजावकी मिरवितां येण्यासारखें होतें, तथापि या अधिकारांचा उपयोग करण्यासाठीं बरेंच काम

करावें लागे व त्यांना असल्या कामांचा जाल्याच पराकाष्ठेचा आळस असल्यामुळें, या अधिकारप्राप्तिजन्य आनंद न मानतां त्यांस एक प्रकारचा जाचच वाटूं लागला.

तात्पर्य रशियन बडेलोकांच्या वास्तविक स्थितींत, इतर प्रजेहून विशेष अधिकारांनीं वगैरे, कांहींच भेद नाहीं. तथापि त्यांच्याकडे जमिनी मोठ्या अमतात व राज्यांतील हुद्यांचीं मोठमोठीं कामें त्यांनाच मिळतात यामुळें त्यांची प्रतिष्ठा आहे. इंग्लंद व जर्मनींतील बड्या लोकांप्रमाणें त्यांच्या वांट्यास उपपदें व किताब पुष्कळ असतात परंतु हातांत अधिकार व विशेष हक्क नाहींत. गुलाम किंवा मर्फ बाळगण्याचा हक्क माझ, १८६१ पर्यंत त्यांच्याकडे होता, परंतु त्या वर्षीं २ कोटी गुलामांस एकदम मुक्ति मिळाली तेव्हां तो हक्क गेला व बड्या लोकांच्या हातची अर्धी जमीनही गेली. तेव्हांपासून हा वर्ग अगदीं मोडला म्हणण्यास हरकत नाहीं. कायद्याच्या नजरेनें पहातां त्यांच्यामध्यें व इतर प्रजेमध्यें कांहींच भेद नाहीं. रशियांत विद्येचा प्रसार होऊं लागल्यापासून चांगले सुशिक्षित लोक ह्या वर्गांतून फार निघाले. शिवाय यांचीं वतनें मोठीं आहेत व फौज, आरमार आणि राज्यांतील दुसऱ्या खात्यांतील मोठ्या जागा यांनाच देण्याची चाल असल्यामुळें, व बादशाही दरबारांत यांचा प्रवेश असल्यामुळेंच, रशियांत बडेलोक आहेत असा भास होतो; परंतु कायदेशीर रीतीनें पहातां ह्या देशांत हा वर्ग नाहींच म्हटला तरी चालेल. पूर्वी होता. परंतु त्यांचे हक्क आतां नाहींसे झाले आहेत.

फ्रान्स, जर्मनी, इंग्लंद वगैरे पश्चिमयुरोपांतील देशांत जो उमरावांचा एक वर्ग आढळतो त्याच्या प्राचीन इतिहासाचें दिग्दर्शन पुढील प्रकरणांत केलें आहे. त्या देशांतील राजघराण्यांचा व बडे लोकांचा उदय समकालीनच होता; प्रथमतः ते लोक स्वतंत्र होते व राजांनाच त्यांचें भय असे. पुढें राजांनीं शहरांतील लोकांस पुष्कळ हक्क देऊन बडे लोकांस नम्र केलें, तथापि त्यांच्याकडे वरेच हक्क व अधिकार कायम

ठेविले. रशियांत जे बडेलोक होते, त्यांचा तार्तारखानांनीं व नंतर झारांनीं समूळ उच्छेद केला. तसा प्रकार वरील देशांत घडला नाहीं व तेथील ड्यूक, अर्ल, वगैरे पदव्या धारण करणारे बडेलोक जुनाट होते व नवे थोडेच केले जात, म्हणून नवीन मंडळी त्या श्रेष्ठ वर्गांत शिरल्याबरोबर अगदीं त्यांत मिसळून जाई. ह्या कारणामुळें बड्या वर्गाचे आचारविचारांचें स्वरूप स्वतंत्र व भिन्न राहून,त्यांची एक जातच बनली. ते बडेलोक इतर लोकांस हलके मानीत व त्यांशीं लग्नव्यवहार वगैरे होतां होईल तितका टाळीत. त्यांच्या जातीचा त्यांस मोठा अभिमान असे; याशिवाय आपल्या संपत्तीच्या व अधिकाराच्या जोरावर खालच्या पायरीच्या लोकांस ते फार उपद्रव देत. पश्चिम युरोपांतच ही जात फार प्रतिष्ठेस चढली. जर्मनींतील बड्या लोकांनीं आपलें पूर्वीचें स्वरूप बऱ्याच अंशीं कायम राखिलें आहे व त्या देशांत हा वर्ग इतर लोकांपासून अलिप्त राहतो. फ्रान्सांतील बड्या लोकांनीं जें उन्मत्त वर्तन चालविलें व इतर प्रजेवर जे अनन्वित जुलूम केले, त्यांचें फळ इ. स. १७८९ त ली राज्यक्रांति झाली तेव्हां मिळालें. त्या भयंकर प्रसंगीं फ्रान्सांतील बडे लोकांची रांगोळी उडाली, व आतां जरी त्या देशांत कांहीं जुनीं घराणीं आहेत तरी त्यांस कांहींच विशेष हक्क नाहींत.

इंग्लंदांतील बड्या लोकांचा इतिहासही चमत्कारिक आहे. त्या देशांत अद्यापिही ह्या वर्गाचा बराच जोर असून त्यांच्या हातांत पुष्कळ राजसत्ता व हक्क ठेविले आहेत. इंग्लंदांतील राजकीय सत्तेचीं तीन अंगें आहेत, त्यांपैकीं हे बडे लोक एक अंग आहे. कांहीं शतकांपूर्वी त्या देशांतील कनिष्ठ वर्गास जुलमी राजांच्या जाचांतून सोडविण्यास हेच लोक कारण झाले. इंग्लिश लोकांनीं जे राजकीय हक्क संपादन करून आपलें स्वातंत्र्य स्थापन केलें, तें मिळविण्यांत या बड्या लोकांनीं फार मेहनत केली,हें त्या देशाचा इतिहास शिकणाऱ्यास माहित आहेच. तेथील बडेलोक सध्या जरी आपली बाजू संभाळून व आपल्या

हक्कांचें संरक्षण करून आहेत, आणि दुसऱ्या लोकांशीं त्यांचें वर्तन सभ्यतेचें असतें, तथापि पैशाच्या वगैरे मदानें ते गर्विष्ठ आहेत व इतरांहून त्यांचा स्वभाव भिन्न दिसतो. पार्लमेंतांतील वरिष्ठ सभा "हाउस ऑफ् लार्ड्स्", बडेलोकांचीच आहे.

रशियन बडे लोकांस हक्क नाहींत खरे, परंतु त्याच स्थितींत इतर देशांतील बडे लोकांशीं त्यांची तुलना करून पहातां, असें आढळेल कीं, ते लोक ज्ञानोत्कर्ष व सुधारणा करण्यांत तत्पर असतात; पश्चिम युरोपांतील बड्या लोकांच्या वर्तनाचा कल वेगळा आहे. नवीन सुधारणा करण्यांत किंवा ज्या गोष्टींत सार्वजनिक हित होत आहे परंतु आपले हक्क जातात असें वाटतें तेथें त्या गोष्टीला ते पुष्कळ हरकती आणितात. परंतु रूस बडे लोकांस आपल्या वर्गाची आढ्यता नाहीं व असण्याचें कारणही नाहीं. या लोकांस पूर्वीपासूनच स्वातंत्र्य व सत्ता माहीत नव्हती, व झार त्यांचा वारंवार अपमान करीत. शिवाय इतर लोकांशीं द्वेष करण्यासारखे हक्कही त्यांच्या हातांत नव्हते म्हणूनच त्यांचें वर्तन चांगलें आहे हें उघड आहे. बडे लोक वास्तविक पहातां रूसदेशांत नाहींत, तथापि दिवसेंदिवस फौजेंतील लोकच बडे लोकांसारखे होत आहेत. परंतु हे लोक सरकारच्या सेवेंतच प्रतिष्ठेस चढले आहेत. उच्च कुल, जुनाट घराणें, मानपान वगैरे गोष्टी त्या देशांतून नाहींशा होत आहेत, तथापि पदव्यांचें महत्व फारच वाढत आहे. पश्चिमयुरोपांतील बड्या घराण्यांत अशी चाल आहे कीं वाडवडिलांची स्थावर संपत्ति सगळी ज्येष्ठ पुत्राला च मिळावयाची. या चालीमुळें त्यांच्या कुळांचा आब व ऐपत राहते. रूसदेशांत संपत्तीची वांटणी मुलांमध्यें सारखी करण्याची चाल असल्यामुळें पुष्कळ मोठीं घराणीं भिकेस लागलीं आहेत, व त्यांच्या जमिनीचे वांटे होऊन तुकडे झाले आहेत. तसेंच हलक्या कुळांतूनच स्वतःच्या योग्यतेवर प्रतिष्ठेस चढलेले लोक दिवसानुदिवस वाढत आहेत, त्यामुळें बडे लोकांचा एक स्वतंत्र वर्ग राहिला नाहीं. १८८१ त रशियांत सुमारें एक लाख

जमीनदार बडे लोक होते. त्यांपैकीं सुमारें ४००० इसमांस पूर्वी ९०० गुलाम बाळगण्याची परवानगी होती. कांहीं थोडे लोकांजवळ तर पुष्कळच जमीन होती. एका 'कौंत' पदवीच्या बड्या गृहस्थाजवळ ३,०८,००० गुलाम होते! कित्येकांकडे खाणी आहेत, व कित्येकांकडे तर युरोपांतील लहान देशांएवढ्या जमिनी आहेत ह्मणून हे लोक फारच संपन्न आहेत. सांप्रत ते आपणास विशेष अधिकार मिळावे म्हणून खटपट न करितां, सार्वलौकिक हितासाठींच झटत असतात. फौजेंत नांवालौकिकास चढून जे लोक झाराच्या दरबारांत असतात, त्यांना परदेशांशीं लढाया करण्याची फार हौस आहे व एशियाखंडांत रशियानें जी गडबड चालविली आहे त्यांत, हेच लोक पुढें आहेत असें कित्येकांचे ह्मणणें आहे.

प्रकरण ६ वें.

शहरवासी लोक—शहरें थोडीं कां? युरोपांतील शहरांचा इतिहास-व त्यांचे हक्क-फ्युदल सिस्तेम?—नगरसभा (म्युनसिपालटया)—झारांचे वर्तन—जुलमानें लादलेल्या सुधारणेची निष्फलता—धंदे व जाती—रूसव्यापारी—कर्मणुकीचे प्रकार—स्त्रियांची स्थिति-यांत्रिक सुधारणा—कारखाने. इ०

रशियांतील लोकांच्या रीतिभाति, लोकरिवाज कायदेकानू, इत्यादि माहिती मिळविण्याची ज्यांस इच्छा असेल, त्यांना अर्थात्च तेथील शहरवस्तीची ओळख झाली पाहिजे. ही गोष्ट रशियाच्याच संबंधानें आहे असें नाहीं, तर कोणत्याही देशाची माहिती याच तऱ्हेची मिळविली पाहिजे. फलाण्या देशाचे बडे लोक, शेतकरी, राज्यव्यवस्था, धर्म, वगैरे ठळक ठळक गोष्टींची चौकशी केली ह्मणजेच आपलें काम उरकलें असें होत नाहीं, तर आह्मांस तेथील व्यापारी, उदमी, कारागीर वगैरे शहरवासी लोक, व त्याचप्रमाणें इतर धंदे रोजगार करणारे लोक यांची माहि-

तीही असली पाहिजे; तेथील शहरें, त्यांची रचना त्याची व्यवस्था, तेथील कारखाने, व्यापारधंदे, म्युनसिपालट्या व शहरांचे इतर हक्क वगैरे गोष्टींपासूनही उपयुक्त माहिती मिळते. या प्रकरणांत ही माहिती देण्याचा प्रयत्न केला असून, ओघानुसार युरोपांतील नगरें व शहरें यांचा जुना इतिहासही दिला आहे.

जे लोक रूसदेशांतून प्रवास करून आले आहेत त्यांच्या लिहिण्यावरून असें दिसतें कीं रशियांतील शहरें, 'दूरतः पर्वतो रम्यः' या वचनाप्रमाणें, दुरून पाहिलीं असतां, सुंदर व रम्य अमावीं असा भास होतो. परंतु आंत जातांक्षणींच हा भ्रम दूर होतो, व त्यांचें खरें ओंगळ स्वरूप नजरेस येतें. वेडीवांकडी रचना व अस्वच्छता हीं त्यांचीं मुख्य लक्षणें! युरोपांतील इतर शहरांच्या तोलानें पहातां 'शहर' हें नांवही त्यांस शोभत नाहीं अलीकडील युरोपीअन शहरांत जी शोभा, टाकटीक व स्वच्छता दिसून येते ती रशियन शहरांत नाहीं. रस्ते रुंद असतात, परंतु फरसबंदी किंवा गबडी घातली नसल्यामुळें त्यांत चिखल होतो व खांचखळगे पडतात. घरें एकमजली बैठीं असून बहुधा लांकडींच असतात, तथापि अलीकडे दगडी घरें होऊं लागलीं आहेत. शहरांतील घरें एकास एक खेंचलेलीं नसून अंतराअंतरावर असतात व त्यांभोंवतीं मोठीं अंगणें असतात. व सर्व देखावा खेडेगांवचा दिसतो. दुकानें इतर युरोपीयन दुकानांप्रमाणें भपकेदार नसून, त्यांतील जिनसांची रचना गिऱ्हाइकांस मोह घालण्याजोगी केलेली नसते. या शहरांचें साधारण स्वरूप आमच्या खेडांतील शहरांप्रमाणेंच असतें. शहरांत रमणीय बागबगीचे, चव्हाटे किंवा इतर सार्वजनिक कर्मणुकेच्या जागा बहुधा नसतातच; तसेंच रात्रीं रस्त्यांत दिवे सुद्धां नसतात. हें जें वर्णन दिलें त्यांत पितर्सबर्ग व दुसरीं एक दोन शहरें मात्र मोडत नाहींत, कारण त्यांची रचना पश्चिमयुरोपियन शहरांच्या धर्तीवर आहे.

एवढ्या मोठ्या देशांत 'शहर' नांवाखालीं अशीं शहरें फार थोडीं आहेत. रशियनसरकारच्या ठरावाप्रमाणें, ज्या गांवांत

अमुक कचेऱ्या व अमुक सरकारी कामदार ज्या गांवांत रहातात, त्या सर्वांस शहरें ह्मणतात. साधारणपणें शहरास १० हजार वस्ती धरून पहातां, रूस देशांत १२७ शहरें आहेत. पन्नास हजारांहून जास्त संख्येचीं पंचवीस शहरें आहेत. सारातव्ह, खर्सन, कारकव्ह, काझान, कीफ, किशेनेफ, रीगा, या शहरांत लाखापासन दीड लाखपर्यंत वस्ती आहे. मोठ्या शहरांपैकीं ओदेसा येथें २॥ लक्ष, वार्सा ४ लक्ष, मास्को ७॥ लक्ष व सेंतपीतसेबर्ग येथें १० लक्ष वस्ती आहे. काकेससपर्वतसंबंधी प्रदेशांत मुख्य शहर तिफलिस असून, त्याची वस्ती एक लाखावर आहे. मोठ्या शहरांतील उदमीव्यापारी बहुतक परदेशचे असतात. रशियांत जर्मन लोकांच्याच हातांत व्यापारधंदे आहेत असें ह्मटल तरी चालेल. रशियाच्या लोकसंख्येच्या मानान $\frac{1}{10}$ लोक शहरवासी आहेत, परंतु व्यापारधंद्यांत गुंतलेल्या इंग्लंडासारख्या देशांत तेंच प्रमाण $\frac{1}{2}$ वसतें. व्यापारधंदे, कल कारखाने इत्यादि भरभराटीस आल्याचें मुख्य चिन्ह शहरवस्ती आहे. अधे सुधारलेल्या देशांत कृषिकर्मच लोकांचा मुख्य धंदा असतो, परंतु सुधारलेल्या देशांत व्यापारधंदे व कारखाने वाढून शहरांची भरभराट होते. आमच्या देशांतच आगगाडी झाल्यापासून नवीन शहर कशीं वसलीं हें पुष्कळांस माहीत आहे. ज्या देशांत शहरवस्ती कमी तेथें सधारणा होणं नाहीं ह्मटलें तरी चालेल युरोपखंडांतील पश्चिम भागांत हजारों शहरें आहेत व तीं माणसांनीं गजबजत असतात. रशियासारख्या अफाट देशांत शहरवस्ती कां कमी असावी या प्रश्नचें उत्तर मि० वॅलेस यांनीं आपल्या पुस्तकांत दिलें आहे, त्याच अनुरोधानें वाचकांच्या मनोरंजनासाठीं आह्मीं ती माहिती जरा विस्तारानें देतों. या स्थळीं असली हकीगत देण्यांत आमचा मुख्य उद्देश मिळून इतकाच आहे, की तिच्या योगानें आमच्या मराठी वाचकांस युरोपांतील राजकीय व सामाजिक गोष्टींचें बरेंच ज्ञान व्हावें.

ज्या देशांत व्यापारधंदे बेताचेच असतात, तेथें शहरें वाढत नाहींत. अशा देशांत राजधान्या, सरकारी अधिकाऱ्यांचा ठा-

णीं किंवा मोठीं देवस्थानें जेथें असतात तेथें मात्र मोठीं शहरें बनतात. परंतु ज्या देशांत हजारों कारखाने असून लाखों मनुष्य उद्योगांत गुंतलें असतें, तेथें शहरें वाढत असतात. याचें प्रत्यंतर इंग्लंडांत सदोदित दृष्टीस पडतें. तेथें नवीन नवीन मोठीं शहरें दररोज बनत आहेत. त्याचप्रमाणें देशांत लढाया वगैरे नसून, स्वास्थ्य असलें ह्मणजे मनुष्यास उद्योग करण्यास फावतें व त्यामुळें अर्थात्च शहरवस्ती वाढते. रशियांत शेतकीचें माहात्म्य फार असून इतर धंदे व कारखाने अजून कनिष्ठ स्थितींत आहेत. हीं जीं उघड उघड कारणें, त्यांशिवाय कांहीं दुसरीं कारणें आहेत, परंतु तीं सांगतांना इतिहासांत शिरावें लागतें.

रूसदेश आर्थिंच विस्तीर्ण आहे व फ्रान्स, जर्मनी वगैरे त्याच्या मर्यादा ठरल्या नाहींत. रशियाच्या पूर्व बाजूस पाहिजे तितका मुलुख असून दिवसेंदिवस तें राज्य त्या दिशेस कसें वाढत आहे हें आपण पहातच आहों. एका बाजूस बेहरींग सामुद्रधुनी धरून, थेट हिंदुकूश पर्वतापर्यंत त्याचा अंमल पसरला आहे. खुद्द रशियांत क्षेत्रफळाच्या मानानें वस्ती फार पातळ आहे व तेथें पुष्कळ जमीन सुपीक असूनही पड आहे. इंग्लंड वगैरे देशांत जमीन इतकी दुर्मीळ झाली आहे कीं वाईट जमीनीवरही हजारों रुपये खर्चून नवीन सुधारलेलीं खतें व यंत्र लावून पिकें काढतात. रशियांत शेतकीची पद्धति जुनीच असून खतें वगैरे कमी घालतात, यामुळें जमीनीचा कस निघून जाऊन चांगली जमीन कांहीं वर्षांनीं वाईट होते; अशी झाल्यावर तिला खत वगैरे घालून मेहनत करण्यापेक्षां रशियन लोक दुसरीच जमीन पहात. प्राचीन काळीं हाच क्रम चालू होता व जमीनही मुबलख असल्यामुळें पंचाइत पडत नसे. थोडीच असती तर दुसऱ्या युक्त्या निघाल्या असत्या, परंतु गरज लागल्याखेरीज लागत्याही गोष्टींचा तोड निघत नाहीं. थोड्या श्रमांत आपल्या गरजा भागविण्यांत प्रत्येकाचें लक्ष असतेंच. रशियन लोक एका जमीनीच्या तुकड्यावर मेहनत न करतां नवीन जमीनीचा शोध करीत जात. याच क्रमानें प्राचीन काळापासून रशियन

लोकांचें राज्य विस्तार पावत आहे. निपर नदीच्या तीरीं जें लहानसें राज्य होतें तेंच आतां जगांत मोठें झालें आहे. रूस लोकांची संख्या जरी अलीकडे पुष्कळ वाढली आहे, तथापि त्यांच्या राज्याचा विस्तारही फारच झपाट्यानें झाल्यामुळें वस्ती एकंदरींत पातळच आहे. या कारणामुळें रूस देशांत एकाच ठिकाणीं वस्ती वाढली नाहीं व लोकांचा धंदा मुख्यत्वेंकरून शेतकीच पडल्यामुळें शहरें झालीं नाहींत हें उघड आहे. त्याच प्रमाणें १८६१ सालापर्यंत रूसदेशांतील शेतकरीलोक गुलाम होते; त्यांस सर्फ म्हणत. त्या लोकांकडे स्वतःच्या जमीनी नसून त्यांस मोठमोठया जमीनदारांच्या वतनांवर खपावें लागे आपल्या धन्याची जमीन सोडून अन्यत्र जाण्याचा त्यांस प्रतिबंध होता. धन्याला ज्या पदार्थांची अवश्यकता लागे ते पदार्थ, ते आपल्या गुलामांकडूनच होतील तसे करून घेत. शेतांतल्या जाउतांवर किंवा जनावरांवर ज्याप्रमाणें मालकाची सत्ता होती तशीच गुलामांवर त्यांच्या धन्याची सत्ता असे; यामुळें त्यांस खेडीं पाडीं सोडून दुसरे ठिकाणा जातां येईना. या कारणामळें शहरें वाढलीं नाहींत आणि कारखान्यांस व उद्योगांस उत्तेजन मिळालें नाहीं.

हीं शेवटलीं कारणें, ११ व्या व १२ व्या शतकाचे सुमारास युरोपखंडांत सर्वत्र असतां, पश्चिम यरोपांतच शहरें भरभराटीस कां यावीं व रशियांत कां यऊं नयेत, हा प्रश्न महत्वाचा असून त्याचें उत्तर ऐतिहासिक आहे. तें देण्याकरितां या टिकाणीं युरोपांतील शहरांचा थोडका इतिहास देतों. त्या शहरांची वृद्धि कशी झाली, व त्यांस निरनिराळे हक्क कसे मिळाले, हा इतिहास मोठा चमत्कारिक आहे

रोमनलोकांचें राज्य बुडाल्यावर युरोपखंडांत चोहोंकडे अंदाधुंदी चालू झाली. त्या वेळीं ज्याचा सर्वांवर दाब राहील असें एकही बलिष्ठ राष्ट्र युरोपांत स्थापन झालें नव्हतें. ज्या रानटी लोकांनीं रोमन राज्य घेतलें ते एका राजाच्या हाताखालीं नव्हते व पुढें त्यांच्या त्यांच्यांतच अनेक फळया होऊन, जो तो थोडाथोडा मुलूख बळकावून बसला. यांतूनच कांहीं

बलिष्ठ हाऊन राजे झाले; तथापि त्यांचा अधिकार फार थोडा होता. ११ व्या शतकाच्या सुमारास युरोपांतील लोक-समाजांत चार तऱ्हेचे लोक होते:—१ राजे किंवा मुख्य अधिकारी; २ सरदार किंवा जहागिरी घऊन राजाला युद्धांत मदत करणारे, बडे जमीनदार लोक, ३ धर्माधिकारी, भिक्षुक वगैरे, व ४ थे कृषिकर्म करणारे दास किंवा गुलाम. बहुतेक जुनाट राष्ट्रांच्या इतिहासांत लोकांची अशीच वांटणी झाल्याचे आढळत. या चऱ्ही वर्गांचे ऐक्य झाल्यावर अर्थात्च राष्ट्राला बळकटी येते. वैदिककाली आमच्या आर्यांच्या समाजांतही असच चार तऱ्हेचे वर्ग होते. राजे व सरदार ह्मणजे आमचा क्षत्रिय वर्ग; धर्माधिकारी व परमार्थाकडे गुंतलेले लोक ह्मणजे इकडील ब्राह्मण; व श्रेष्ठ वर्णाचे (वर्गाचे) दास्य करून कृषिकर्म करणारे दास ह्मणजे आमच्याकडील शूद्र होत. युरोपखंडांत अद्यापि वैश्य वर्ग बनला नवता, तथापि या काळापासून पुढे नगरे व शहरे वाढत चाललीं व त्यांबरोबरच व्यापारी उद्योगी लोक पुढे येत चालले. युरोपखण्डातील शहरांचे स्वातंत्र्यस्थापन होण्यास या वर्गाचेच सहाय्य होतें. समाजांत असे चार वर्ग स्थापन झाल्यावर, पुढे परस्परांत वर्चस्व स्थापण्यासाठी चढाओढ सुरू झाली व मत्सर वाढत चालला. या तंट्यांचा भर युरोपखडांत १२ व्या शतकापासून सुरू झाला. युरोपांतील सभ्यांचा राज्ये व सभ्यांचे कायदेकानु, हक्क वगैरे सर्व गोष्टींचे मूळ या वेळच्या इतिहासांतच आहे. आमच्या देशांत हे तंटे फारच प्राचीन काळीं लागले व त्यांचा शेवट झाला तेव्हां, युरोपांत अज्ञान पसरलें होतें. आर्यांच्या ज्ञानाचा उदय, विकास व उत्कर्ष, ह्या कथा प्राचीन आहेत. युरोपखडांत रोमन व ग्रीक सुधारणेचा उदय झाल्यावर आमच्या आर्यांच्या सुधारणेचा प्रवाह मंद होऊन मानसिक तत्वविचारांचे डोहांतच भ्रमण पावूं लागला, व त्याचा पुढील क्रम खुंटला. वर्चस्व स्थापण्याचे तंटे आमच्या देशांत झाले त्याप्रमाणच युरोपांतही १२ व्या शतकात चालले होत. हजारों वर्षे

मध्यें लोटलीं तथापि या दोनीं ठिकाणच्या इतिहासांतील गोष्टींत साम्य आहे. इतिहासाच्या गोष्टींची पुनरावृत्ति होत असते असें ह्मणतात, तें सर्वस्वी खरें आहे. आमच्या देशांत ब्राह्मण व क्षत्रिय, या दोन वर्गांत वर्चस्व स्थापण्याबद्दल जे तंटे झाले, ते पुराणप्रसिद्ध आहेत. परशुरामानें एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी केली, याचा अर्थ उघड आहे. वादाच्या परिणामीं ब्राह्मणांचें वर्चस्व स्थापन झालें, व तेव्हापासून इतर वर्गांचें महत्व कमी झालें. तथापि तें कमी होण्यास वरील एकच कारण झालें नाहीं. युरोपियन समाजांतील वर्गांच्या तंट्यांत कोणत्याही एका वर्गाचा समूळ चुराडा झाला नाहीं, परंतु कांहीं शतकेंपर्यंत कनिष्ठ प्रतीच्या लोकांस जे प्रसंग सोसावे लागले व ज्या अपेष्टा काढाव्या लागल्या, तशा आमच्या देशांतील शूद्रांस काढाव्या लागल्या नाहींत. ब्राह्मणांचें वर्चस्व इकडे स्थापन झाल्यामुळेंच आमच्या जनसमाजाचें स्वरूप युरोपांतील समाजांहून भिन्न झालें, असें नाहीं. आमच्या पूर्वजानीं ज्या आर्यावर्तांत वस्ती केली त्याची रचना, सृष्टिस्वरूप, अन्नपाणी व हवा, यांचा परिणाम त्यांच्या मनावर फार झाला होता, ह्मणूनच आमच्या लोकांच्या मानसिक वृत्तिमध्यें व युरोपीयन लोकांच्या मानसिक वृत्तिमध्यें मोठा भेद दिसून येतो व यामुळेंच आमची सामाजिक व गृहस्थिति त्यांच्याहून वेगळी आहे. कोठलाही समाज, किंवा लोक उत्कर्षदशेस येण्यापूर्वी, त्यांत अनेक फेरफार होऊं शकतात. परंतु त्या लोकांच्या किंवा राष्ट्राच्या सुधारणेची अमुक एक मर्यादा पोंचली ह्मणजे, त्यांचे आचारविचार, धर्म व नीति, ह्यांत बदल करणें कठीण होतें. समाजरूपी शरीर बनण्यापूर्वीच जर कोणाच्या मनांत आलें, कीं त्याच्या घटका वयांस अमुक स्वरूप द्यावें, तर तसें लवकर करतां येईल. परंतु एकदांका त्यांचें आंगवळणा हें स्वरूप पडलें तर त्याचें रूपांतर करणें फार कठीण होतें. रोमन लोकांचें राज्य ट्युतान वगैरे लोकांनीं नाहींसें केल्यावर, युरोपांतील समाज मोडला,

रोमनलोकांची सुधारणा लोप पावली व चोहोंकडे बेबंदी चाल्
झाली. त्या रानटी लोकांवर एकमत्ताक राजा नव्हता त्यां-
च्या टोळ्या असत व त्या टोळ्यांवर त्यांनींच निवडलेले आध-
कारी असत. हा अधिकार वंशपरंपरा त्यांच्याकडे चालत नम्-
न, फक्त शौर्यावर व त्या त्या व्यक्तीच्या गुणांवरच मिळे.
कांहींकाळ लोटल्यावर या अधिकाऱ्यांची सत्ता वाढत चाललो
व मुलूख संपादून ते एके ठिकाणीं राहूं लागले. पुढें त्यांतूनच
कित्येकांनीं आपल्या शक्तीनें व शहाणपणानें आपलें वर्चस्व
स्थापून राजचिन्हें धारण केलीं, तेव्हां बाकीचे लहानलहान
सरदारलोक त्यांच्या हाताखालीं आले. अशा तऱ्हेन युरो-
पांत क्षत्रिय वर्ग बनला व नवीं राज्यें सुरूं झालीं. या सर-
दारांकडे यापुढें वंशपरंपरा अधिकार मिळाले, परंतु त्यांस
राजांच्या हुकुमांत राहावें लागे व प्रसंगीं सैन्य पुर-
वावें लागे. कांहीं काळापूर्वी जे लोक आपखुषीनेंच आपले
अधिकारी नेमीत, त्यांस आतां गुलाम व्हावें लागलें व त्यांच्या हातांत
कांहींच सत्ता राहिली नाहीं. आतां एवढी उलाढाल होण्यास पुष्कळ
काळ लोटला हें खरें आहे, परंतु ती लोकांच्या जमजशी आंग-
वळणा पडली तसें त्यांस आपल्या पूर्वीच्या स्वातंत्र्याचें विस्म-
रण पडलें व ते आपल्या धन्यांचे गुलाम झाले. अशा तऱ्हेनें
युरोपांत शेतकऱ्यांचा अगर दासांचा वर्ग बनला. या वर्गाची
स्थिति आमच्या देशांतील शूद्रांच्या स्थितीहून वाईट झाली.
आर्यांनीं शूद्रांस जिंकलें होतें, यामळें त्यांचें वर्चस्व होणें साहजिक
होतें; परंतु युरोपांतील शेतकरी वगैरे कनिष्ठ लोकांस, आपल्याच
लोकांचें दास्य करावें लागलें. आमच्या इकडे शूद्र वर्णास
ब्राह्मणक्षत्रियादि उच्च वर्णांची सेवा करावी असा धर्म लावून
दिला होता व शूद्र अपराध्यांस स्मृतिकारांनीं कडक शिक्षा
नेमून दिल्या होत्या; तथापि त्यांचेकडे पुष्कळ स्वातंत्र्य राखिलें
होतें. आणि असेंही पण दाखवितां येईल, कीं आमच्या
लोकांचा स्वभाव शांत व दयाळू असल्यामुळें, त्या शिक्षा क
चित्च अमलांत येत असतील. विशेषतः सेवाधर्माचा संबंध

पारलौकिक हिताशीं ठेविल्यामुळें, त्या वर्णास फारसा उपद्रव झाला नाहीं. परंतु युरोपखंडांतील शूद्रवर्णास पक्की गुलामगिरी सोसावी लागत होती. युरोपियन पंडितांच्या कालमापनानेंच मनूचा काल इ० सनाच्या पूर्वी कांहीं शतकें धरिला व त्याच्या स्मृतात घातलेल्या शिक्षा, शूद्रांस एकसारख्या सोसाव्या लागत असही घेऊन चालले, तरी युरोपांत १४व्या, १५ व्या (कित्येक, देशांत तर १९ व्या) शतकांपर्यंत कनिष्ठ प्रतीच्या लाकांस वागविण्याचे जे कायदे होते, त्यांच्या तुलनेनं मनूचे कायदे फारच सौम्य होते. मनूला शिव्या देणारे लोक इतिहासाच्या खऱ्या गोष्टींवर दृष्टि ठेवीत नाहींत. १९ व्या शतकांतील स्वातंत्र्याचीं तत्वें घेऊन तीनहजार वर्षांपूर्वीच्या लोकांवर अपशब्दांचो लाखोली वहाणें युक्तीस शोभत नाहीं. ब्राह्मणांना दोष देण्याचा उपदेश करणाऱ्या गौरकायांना त्यांच्या इतिहासांतील उघड उघड उदाहरणें दिलीं पाहिजेत. तथापि ह्यावरून एकानें वाईट गोष्ट केली तशी दुसऱ्यानेंही केली ह्मणजे ती न्याय्य होते, असें आमचें मत आहे, असें कोणी समजूं नये. परंतु जुन्या इतिहासांच्या गोष्टींचा विचार करतांना व त्यांवर आपले अभिप्राय देतांना, तो काळ कोणता होता, त्या वेळच्या लोकांचें ज्ञान किती होतें, त्यांची मानसिक प्रवृत्ति कोणीकडे वहात होती व भोंवतालच्या इतर गोष्टी कशा होत्या व त्यांचे परिणाम कोणते झाले होते, इत्यादि गोष्टींचा विचार अवश्य केला पाहिजे. परंतु इतिहासाच्या तत्वांचा असा सारासार विचार करणें, सामान्य लोकांच्या पलीकडील आहे. मोठमोठ्या व दूरदूरच्या राष्ट्रांच्या इतिहासांचें मनन करून, सादृश्य पहाण्याची योग्यता जशी अंगीं येईल आणि सामाजिक रचनेचे घटकावयव किती भिन्न, अपरिमित व समजण्यास कठीण असतात, व त्यांचा समाजाच्या स्वरूपावर एकंदर परिणाम काय होतो, इत्यादि गोष्टांचा विचार करण्याची जशी मनवय होईल, तसें आपल्या पुराणपूर्वजांस व्यर्थ शिव्या देण्याचं धाडस होणार नाहीं. असो.

वर सांगितल्याप्रमाणें युरोपांत तीन वर्ग बनल्यावर, ह्यांत धर्माधिकारी—पुरोहित मंडळीचा एक नवीन वर्ग बनला. रोमचे शत्रु रानटी होते व त्यांचा धर्म मूर्तिपूजक होता. त्या लोकांनां जेव्हां रोमन राज्य घेतलें तेव्हां, ख्रिस्ती धर्माचा पुष्कळ प्रसार झाला होता. या रानटी लोकांच्या कारकीर्दीत रोमची विद्या, कलाकौशल्यें, कायदेकानू वगैरे सर्व सुधारणा ख्रिस्ती धर्माच्या लोकांतच राहिली होती. ख्रिस्ती लोकांत धर्माची व्यवस्था करण्यासाठीं उत्तम व्यवस्था केली होती. त्यांत पोपापासून खालीं, क्रमाक्रमानें दर्जाचे अनेक धर्माधिकाऱ्यांची परंपरा असे. त्यांचे वर्तनाचे नियम कडकडीत असत व त्यांची नीति ही चांगली होती, यामुळें सर्व ख्रिस्ती लोक बांधले गेले होते. या धर्माचा बाह्य भपका, त्याच्या अनुयायी लोकांचें कडकडीत वर्तन व सदाचरण, व त्या धर्माच्या लोकांची विद्या, इत्यादिकांची त्या रानटी लोकांवर छाप बसली व ते दिपून गेले. सर्व सुधारणा व ज्ञान ख्रिस्ती लोकांजवळच राहिल्यामुळें धर्मोपदेशकांस चांगलें यश मिळून ख्रिस्ती धर्माचा प्रसार झपाट्यानें झाला. कांहीं शतकें हा क्रम चालल्यावर त्या पाद्री मंडळीनें लोकांवर आपला पक्का अमल बसविला. सरदार व बडे लोकांस सुद्धां पोपाचें मनोधारण करणें भाग पडूं लागलें. हे सरदार बेबंद होते; परंतु त्यांस शह करण्याची भीति घातली ह्मणजे मात्र ताळ्यावर येत. अशा तऱ्हेनें पश्चिमयुरोपांत ख्रिस्ती धर्मोपदेशकांचा अधिकार वाढत चालला व लोकसमाजांत त्यांचा स्वतंत्र वर्ग झाला.

असे वर्ग बनल्यानंतर मनुष्याच्या साहजिक स्वभावाप्रमाणें, वर्चस्व स्थापण्या विषयीं त्यांचे आपसांत कलह उत्पन्न झाले. सरदारलोक आपसांत भांडत होते इतकेंच नाहीं, तर ते राजांवर उठत; गुलाम किंवा शेतकरी लोक दास्यांतून मुक्त होण्याच्या खटपटांत असत व धर्मपर भिक्षुकलोकही आपलें महत्व राखण्याचे. मधि दरडोत नसत. यावेळीं युरोपांतील समाजांची रचना दृढ झाली नव्ती व भिन्न भिन्न वर्गांचें मेलन झालें नव्तें. समाज

बनण्यास जे जे लोक पाहिजे होते ते होते. परंतु त्यांची नीट व्यवस्था झाली नवती. वरील तंटे सुरू होऊन कांहा कळपर्यंत यांपकीं एंकाद्या वर्गाचें महत्व वाढे, परंत युगांपांत अखर्गास कोणत्याच वर्गाचें श्रेष्ठत्व न होतां सर्वांचे हक्क थोडबहुत कायम राहिले. परंतु हें होईपर्यंत पुष्कळ शतकं लोटलीं.

अकराव्या व बाराव्या शतकांत जव्हां युरोपांतील लोकसमाजांत वर सांगितलेली मारामार सुरू झाली, तेव्हांपासून तेथील शहरांच्या उन्नतीस प्रारंभ झाला. राजांला बंड लोक व सरदार जुमनीतना, हें पाहून आपल्या पक्षाला सबळ करण्यासाठीं, राजांना कित्येक लहानमोठ्या गावांस पुष्कळ हक्क दिले.या गावतून लहानमान व्यापारधंदा करणारे जे लोक असत त्यांना जे अनेक तऱ्हेचे कर द्यावे लागत, ते बंद करून त्यांच्या व्यापारास उत्तेजन दिलें व कित्येकांस आपल्या शहरांचें सरक्षण करण्यासाठीं तटबंदी करणें व लढाऊलोक तयार करणें, वगैरे मोकळकी दिल्या. तसेंच त्यांस हत्यारबंद राहून आसपासच्या बेबंद सरदारांचें शासन करण्याचाही अधिकार दिला. राजांचा धाक या सरदारांवर चालेना, यामुळ ते आसपासच्या गांवातील उदमीलोकांस उपद्रव देत, लुटी करीत व गरीब लाकांवर दंड बांधीत. हा क्रम कांहा काळ चालला होता, परंतु शहरांतील लोकांस वरील हक्क मिळतांच त्यांनां बडे लोकांचें शासन करण्याचा निश्चय केला. यापूढं या शहरवासीलोकांस (बर्गस) आपल्या गांवांची व्यवस्था करणाऱ्यांची स्वतःच निवडणुक काढण्याच परवानन, राजांकडून मिळाल राजांस व शहरच्या लोकांस हे बडे सरदार लाक सामान्य शत्रु होते. शहरवासी लोकांस हक्क संपादन झाल्यापासून शहरांची वृद्धी होत चाललीं.

शेतकऱ्यांत व गुलामांत भेद नवता. शेतकऱ्यांस संपत्ति मिळविण्याचा अधिकार नवता व त्यांनी मिळविलेल्या वित्तावर त्यांच्या जमीनदार बड्यालोकांचीच मालकी होती. त्यास आपलें ठिकाण सोडून जाण्याची मनाइ होती, त्यांच्या मुलांमुलींची लग्न करण्यास त्यांच्या धन्यांची परवानगी लागत असे आणि त्यांचें जीवित सर्व

अपल्या यजमानासाठींच होतें. आमच्याइकडे शूद्र लोकांस वरिष्ठ वर्गांची सेवा करावी असा धर्म लावून दिला होता, तथापि त्यांस एका स्थळाहून दुसरीकडे जातां येत होतें, त्यांना पाहिंजे तो धंदा, पाहिंजे तेथें करण्याची परवानगी होती, आणि त्यांनीं संपादलेल्या वित्तावर व त्यांच्या मुलांबाळांवर त्यांची पूर्ण मालकी होती. इकडील शूद्रांच्या व युरोपांतील शेतकऱ्यांच्या स्थितींत महदंतर होतें. मनुचे कायदे सौम्य होते, असें म्हटलें तें याच-साठीं. शतकेंच्या शततेंपर्यंत युरोपांतील खालच्या लोकांस दास्य मागावें लागलें. बंडलोकांनीं त्यांचे नानातऱ्हेचे छळ करावे, त्यांस मारावें, हाणावें, परंतु त्यांची दाद घणारा कोणीच उरला नाहीं, असें चाललें असतां राजांकडून शहरांस नवीन हक्क मिळाले. त्यामुळें जमीनदार बड्यालोकांच्या जुलमास त्रासलेले शेतकरी आपलें वित्त, निदान आपला जीव घेऊन, शहरांच्या अश्रयास जात. ज्याला ज्याला संधि सांपडे तो शहरांत जाऊन लप. यामुळें दिवसेंदिवस शहरांची वस्ति वाढत चाललो व शहरांतील लोकांनीं पुंड जमीनदारांस नरम आणिलें. व्यापार व नवीन हक्क, या दोन गोष्टींनीं पश्चिमयुरोपांतील शहरें वाढलीं. युरोपामध्यें या सुमारास फ्युदल सिस्तेम नांवाची जमीनीची व लोकांची व्यवस्था करण्याची पद्धति जारीनें चालत होती. शहरांची वृद्धि झाली हें त्याच व्यवस्थेचें फल होय. या व्यवस्थेचें स्वरूप असें होतें, कीं रानटी लोकांनीं पश्चिम युरोप आपल्या ताब्यांत आणल्यावर, त्याचे मोठमोठे तुकड सरदारांनीं वांटून घेतल. त्या सरदारांनीं आपल्या जमीनीचे हो यात्रप्रमाणें भाग करून दुसऱ्या लहान लहान सरदारांकडे लाऊन दिले व त्या लहान सरदारांनाही त्या जमीनी आपल्या बरोबरच्या लोकांत वांटून दिल्या. या व्यवस्थेतून नवीन निंकलल्या मुलुखांचें शत्रूपासून संरक्षण झालें. या जमीनी ज्यांकडे जात त्यांना, त्यांच्या हल आपापल्या वरिष्ठ जमीनदार सरदारांची नोकरी करावी लागे व त्याच्या हुकुमांत राहून त्यांनीं बोलाविल्यावरून्वर लढाईस निघावें लागे. याप्रमाणें व्यवस्था झाल्यावर, मोठे

मोठे सरदार स्वतंत्र होऊन एकमेकांस पुसेनासे झाले. यांनींच पुढें 'राजा' हें पद धारण केलें; तथापि ते आपल्या हाताखालील लहान सरदारांस पूर्वींप्रमाणेंच वागवीत; स्वारीशिकारींत या सरदारांस आपल्या पथकांसह हजर व्हावें लागे. या व्यवस्थेंत अखेरचे कनिष्ठ लोक म्हणजे शेतकरी. त्यांची स्थिति कशी होती हें पूर्वीच सांगितलें आहे. या व्यवस्थेपासन होणारा सर्व जुलूम व त्रास या खालच्या वर्गास सोसावा लागे. कांहीं काळानें लहान लहान सरदारही आपल्या किल्ल्यांत राहून राजांचा हुकूम जुमानीतनासे झाले, त्यांच्या आपसांत लढाया सरू झाल्या व ते राजांच्या ताब्यांतील शहरांस उपद्रव देऊं लागले. तेव्हां अर्थातच त्यांचें शासन करण्यासाठीं, राजांना शहरवासी लोकांस स्वातंत्र्य व हक्क देणें भाग पडलें, हें मागें सांगितलेंच आहे.

ही फ्युदलसिस्तेम व पश्चिमयुरोपांतील सामाजिक व्यवस्था रशियांत नव्हती. वर सांगितल्या गोष्टी फक्त पश्चिमयुरोपापुर्त्याच होत्या. ही माहिती देण्याचा उद्देश पश्चिमयुरोपांतच शहरांची भरभराट कां झाली व बर्गेस (शहरांतील लोक) नांवाच्या लोकांस नवीन हक्क व स्वातंत्र्य कसें मिळालें, हें सांगण्याचा होता. या शहरांत हत्यारबंद शिबंदी तेथील लोकच होते व ते आपल्या शहरांतील एकंदर व्यवस्था ठेवीत. राजांला देण्याचा कर पोंचला म्हणजे त्यालाही शहरांच्या भानगडींत हात घालण्याचा अधिकार नव्हता. आंतली व्यवस्था ठेवणारे कामदार, न्यायाधीश, कोतवाल वगैरे अधिकारी, लोकच निवडीत. म्युनिसिपाल कमेट्यांची मूळ स्थापना एथून झाली. युरोपांतील म्युनिसिपालट्यांस पुष्कळच अधिकार असतात व त्यांच्या कामांत मुख्य सरकारची ढवळाढवळ नसते. अज्ञान व बेबंद काळांत युरोपाचा व्यापार वाढण्यास शहरांचें स्वातंत्र्यच कारण झालें परंतु रशियांतील शहरांस ही गोष्ट बिलकुल लागू नाहीं. जर्मनींत, कांहीं शहरांची एक जट होती, तींत रशियांतील नोवगोरोद शहर मात्र गणलें जात होतें.

यामळेंच रशियाच्या बाल्यावस्थेंतच त्या शहराची भरभराट होता. तथें व्यापार अतिशय चाले, वस्तीही मोठी होतीं आणि शहरचे लोकच आपली व्यवस्था ठेवीत व संरक्षण करीत. पुढं एका झारानं या शहराचा कसा चुराडा केला, हं मागें दुसऱ्या प्रकरणांत सांगितलेंच आहे.

सोळाव्या शतकांत मास्कोच्या 'ग्रांड प्रिन्सांनीं' तातार लोकांचा पराभव करून झॉरपद धारण केलें व देशांत आपला अंमल स्थापिला. तेराव्या व चवदाव्या शतकांतील इतर यरोपियन राजांप्रमाणें यांची शक्ति लहान नवती व त्यांस आपल्या सरदारांपेक्षा वचकाव लागत नसे. हे झार बलिष्ठ, कडक व फौजबंद होत आणि त्यांच्या सरदारांवर त्यांचा मोठा दरारा असे. पश्चिमयुरोपांतील शहरांची सत्ता वाढूं लागल्यावर दोन चार शतकांनीं रशियास स्वस्थता मिळाली; त्यानंतर पुढं व्यापारधंदे वाढविण्याकडे झारांचें लक्ष लागल. झारांनीं ही आपल्या देशांतील शहरांस कांहीं हक्क दिले, परंतु त्यांचे स्वरूप भिन्न होतें. त्यांचा उद्देश शहरांस स्वातंत्र्य देण्याचा नसून फक्त जास्त पैसा काढण्याचा होता. शहरांतील लोकांखेरीज नवीन लोकांस व्यापार करण्याची व त्यांशीं चढाओढ करण्याची बंदी केली. शेतकरी लोकांपासून त्यांस वेगळे केलें व जमीनदारांच्या हक्कांपासून मुक्त केलें. परंतु ह्या हक्कांपासून शहरांची भरभराट न होतां उलट परिणाम झाला. त्या लोकांवर करांचा बोजा बसला व व्यापार करण्याचा मक्ता त्यांसच दिल्यामळें नवीन लोक पुढें येईनासे झाले. शेतकरी लोकांस आपले गांव सोडून जाण्याची परवानगी नवती व त्यांतनही कोणी गेलेच तर त्यांस व्यापारधंदे करण्याची मनाई होती. अर्थात् शहरांची वस्ति यामुळेंच वाढली नाहीं व बहुतेक लोक शेतकींतच मग्न झाले. एकट्या शेतकीनेंच देशाची भरभराट कधीं व्हावयाची नाहीं. ज्या देशांत शेतकीच धंदा असतो तो देश अज्ञान स्थितींत राहता. शेतकी अगर कलाकौशल्यांचे कारखाने, धंदे, आणि बाह्य दशांशा व्यापार व दळणवळण असल्याशिवाय त्या

देशांत सुधारणा होत नाहीं. ह्या गोष्टी राशियास लागू होत्या.

शहरांतील उद्योगी लोकांस असले पोकळ अधिकार दिले व त्यांवर करांचा जुलूम केला ! शिवाय सरकारी कामें फुकट करण्याचा जुलूम वेगळाच होता. या जाचाला शहरांतले लोक त्रासून गेले व शहरें सोडून जाऊं लागले, तेव्हां आपलें करांचें उत्पन्न कमी होईल ह्मणून झारांनीं शहरांची लोकसंख्या ठरवून दिली व शहरांतून पळणाऱ्यांस कडक शिक्षा दिल्या ! शहरें व व्यापार वाढाविण्याचे झारांनीं योजिलेले उपाय किती वेडेपणाचे होते हें वरच दिसतें!

परंतु मागल्या शतकापासून राशियांतील शहरांस विशेष स्वातंत्र्य मिळूं लागलें. पितर धि ग्रेत याला युरोपांतील प्रवासानें अनुभवास आलें कीं, देशाची संपत्ति वाढण्यास व भरभराट होण्यास राष्ट्रांमध्यें सुखवस्तु मध्यम प्रतीचे लोक फार वाढले पाहिजेत. परंतु व्यापारधंद्यांखेरीज असे लोक होणें नाहीं. शहरें हीं तर व्यापार व कारखाने यांचीं स्थानें होत व तेथेंच सुखवस्तु लोक व्हावयाचे. परंतु राशियांतील शहरांकडे पाहिलें असतां अगदीं उलटच प्रकार त्यास दिसला, ह्मणून त्यानें शहरें वाढविण्याचा उद्योग हातीं घेतला व दूरदूरच्या देशांहून व्यापारी व कारागीरलोक आपल्या देशांत आणिले आणि त्यांस राशियांत वस्ती करण्यास जागा दिली. निरनिराळे कारखाने शहरांतून सुरू करून, राशियांतील लोकांस परदेशांत कसबें व धंदे शिकण्यास पाठविलें. शाळा, दवाखाने, पोलिस व कोर्तें ह्यांची शहरांत स्थापना केली. शहरसभा स्थापन करून त्यांस हक्क दिले; व्यापाऱ्यांच्या सभा व मंडळ्या स्थापन केल्या व जेणेंकरून व्यापार वाढेल व शहरें भरभराटीस असें वाटलें, ते ते सर्व उपाय सुरू केले. त्याच्या मागून क्याथाराईन हिनेंही तोच क्रम आरंभिला. आपलें नांव रहावें ह्मणून तिनें नवीन शहरें स्थापन केलीं. तिच्या तेवीस वर्षांच्या कारकीर्दीत २१६ शहरें नवीन वसलीं ! क्याथाराईन या वेळेस

फ्रेंचांचें अनुकरण करूं लागली होती; तिनें फ्रान्स देशातल्याप्रमाणें एक बडे लोकांचा वर्ग केला व त्याप्रमाणेंच शहरवासी लोकांचा वर्ग करण्याचा तिचा मानस होता. शहरांतील लोक सुखी, सुशिक्षित व हुशार असावे अशी तिची फार इच्छा होती. यासाठीं तिनें शहरांस बादशाही सनदापत्रें करून दिलीं.

इतकें करूनही शहरांची भरभराट झाली नाहीं. ज्या लोकांस पितरेंनें धंदे शिकण्यास पाठविले होतें ते तर कांहींच शिकले नाहींत व जे थोडे शिकले तेही आपल्या स्वदेशांत आल्यावर भोंवतालचें वारें लागून सुस्त झाले, तेव्हां अर्थात्च शहरें वाढलीं नाहींत. सरकारी भाषेनें शहर संज्ञा देणें फारच सोपें होतें: आफिसें बांधावीं, कोर्तें करावीं, व कामदार नेमावे ह्मणजे झालें शहर ! पण अशानें वस्ति व व्यापार कसा वाढेल ! झारांचें सर्व वर्तनच चमत्कारिक; त्यांना वाटे कीं आपल्या हुकुमाबराबर पाहिजे तें करतां येईल.

सरकारी दाखल्यास मात्र शहरांची संख्या वाढली. निरनिराळे कामदार व नोकर पाहिजेत ते नेमले व बाकीची व्यवस्था केली. परंतु ही व्यवस्था कोणाकरितां ? लोकांकरितां. पण लोक आहेत कोठें ?

ज्या लोकांस असल्या म्युनासिपालत्या अगर नगरसभांचें वळण नाहीं व माहितीही नाहीं, त्यांस हा प्रकार आवडला नाहीं. फक्त बादशहाची मर्जी, यापेक्षां या म्युनसिपालत्यांत कांहीं अर्थच नव्हता. त्यांस लोकबल नव्हतें. लोकांसच तो प्रकार कळत नव्हता व बिनमोल आपल्या शहरांसाठीं आठवड्यांत कांहीं दिवस काम केल्यानें आपणांस कांहीं मोठेपणा मिळतो ह्याची कल्पनासुद्धां त्या बिचारांच्या डोक्यांत नव्हती. कोणत्याही लोकांस अमुकएक खात्याची अगर अमुकएक गोष्टीची गरज स्वतः भासल्याशिवाय, ती गोष्ट त्यांच्या हितासाठीं ह्मणून त्यांच्या आंगावर ढकलण्यापासून कांहीं फायदा होणार नाहीं. ज्या गोष्टीचा योग्य उपयोग करण्याची योग्यता लो-

कांचे अंगातच आली नाहीं, त्या गोष्टी लोकांवर लादल्याने त्यांस उलटा जाच मात्र होतो. लहान मुलास मोठ्या मनुष्याचा पोषाख जसा शोभत नाहीं व अंगाला तोलत नाहीं, त्याचप्रमाणें अज्ञानावस्थेंत राहणाऱ्या लोकांस सुधारलेल्या व उच्च स्थितीस आलेल्या लोकांचे कायदे व मामुल बिलकुल उपयोगी पडत नाहींत. त्यांची अज्ञान अवस्थेंतून जसजसी सुटका होत जाईल त्या त्या बेतानें त्यांच्या उणीवी त्यांना भासूं लागतील. रानवट रशियन लोकांस, विद्या व कला कौशल्यांत बऱ्याच प्रवीण झालेल्या लोकांच्या तऱ्हा रुचल्या नाहींत. ज्यांना या शहरांतील सभांत (अगर टौन कौन्सिलांत) निवडीत ते मोठ्या जुलमानें तें काम पत्करीत. त्याची त्यांना आवड म्हटली तर बिलकुल नवती; शिवाय झारसाहेबाकडून वेळोवेळीं जे हुकूम अगर उझक सुटत त्यांचा अर्थ सुद्धां त्यांना नीट कळेना व त्यांची सर्व धांदल उडे ! अमुक अमुक तऱ्हेनें शहरांत बंदोबस्त ठेवावा किंवा व्यवस्था करावी, असे ठराव निघत व त्यांत चूक केल्यास शिक्षा देण्याचा ही धाक घातला होता तथापि त्यांच्या हातून तें काम नीट निभेना.

पितरचा उद्देश लोकहित होता तथापि त्यानें योजिलेले उपाय त्याच्या प्रजेच्या अज्ञानावस्थेंत योग्य नवते. त्यांची सुधारणा झाल्याशिवाय व त्यांस सार्वजनिक कामांत मन घालण्याची गोडी लागेपर्यंत झारांच्या खटपटी व्यर्थ होत्या. कायदे करणाऱ्यांनीं किंवा नव्या रीतरिवाजांचे अनुकरण करणाऱ्यांनीं एक गोष्ट आपल्या डोळ्यापुढें नेहमीं ठेविली पाहिजे, ती अशी कीं, कोणत्याही चाली वस्तुतः चांगल्या आहेत एवढ्यावरूनच लोकांवर लादूं नयेत.त्यांच्या अंगीं खरोखर कांहीं गुण असल्यास सुशिक्षित लोक त्यांचा हळुहळु स्वीकार करतातच.यावेळीं पश्चिम युरोपांतील लोक आपले हक्क संभाळून जास्त संपादन करण्याच्या उद्योगांत होते व त्यांची शक्ति वाढेल, अशी तेथील राजांसही भीति पडली होती, परंतु रशियांत झार आपल्या प्रजेस हक्क देत असतां ही ते नकोसे झाले. झारांनीं जे हक्क आपल्या प्र-

जेस दिले आहेत त्यांचें खरें स्वरूप मागें तिसऱ्या व चवथ्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. असो.

रशियन सरकारानें शहरांचे तीन वर्ग ठराविले आहेत. (१) प्रांतांची मुख्य शहरें; (२) जिल्ह्यांचीं ठाणीं व (३) यांशिवाय राहिलेलीं मोठीं गांवें. शहरांतून कांहीं बडे लोक, आसपासचे श्रीमंत जमीनदार व धर्मखात्यांतील आणि दुसरे सरकारी कामदार ह्यांची वस्ती थोडी बहुत असतेच, तथापि त्याशिवाय शहरांतील इतर लोकांच्या तीन जमाती आहेत. त्यांपैकीं पहिल्या जमातींत व्यापारी, दुसरींत शहरांत राहणारे (बर्गर्स) हक्कदार लोक, व तिसरींत कारागीर लोक येतात. यांत व्यापाऱ्यांचें महत्व जास्त आहे. रशियामध्यें धंद्यांवरून एक प्रकारच्या जाती झाल्या आहेत. तेथें व्यापारी उदमी, कारागीर वगैरे लोकांच्या निरनिराळ्या सभा असतात. ज्याला जो धंदा करावयाचा असेल त्याला त्या धंद्याच्या सभेंत नांव घालावें लागतें व कांहीं नेमस्त वर्गणीही द्यावी लागते. या मंडळ्यांस शहरांत कांहीं हक्क असतात ते हक्क त्या सभांत नांव दाखल केल्याशिवाय मिळावयाचे नाहींत. व्यापारी, सुतार, सोनार, गंवडी, मजूर वगैरे प्रत्येक धंद्याच्या लोकांच्या सभा असतात व जोंपर्यंत त्या सभेला आपली फी (वर्गणी) पोंचते तोंपर्यंत त्या सभेच्या लोकांस जे हक्क असतात ते सर्व मिळतात. कारागीर लोकांच्या सभांस रशियन भाषेंत 'झेक्' हें नांव आहे. या मंडळ्यांत अध्यक्ष किंवा महाजन म्हणून कांहीं लोक नेमलेले असतात ते आपापल्या मंडळीच्या संबंधाच्या हरएक गोष्टीचा विचार करितात. एका धंद्याच्या मनुष्यास दुसरा धंदा पत्करण्याची इच्छा झाल्यास रशियांत मोठी पंचाईत येते.

जे लोक यांपैकीं कोणत्याही सभेंत दाखल नसतात, परंतु ज्यांचीं घेरंदारें शहरांत असून, तेथें त्यांचें नेहमी रहाणें असतें त्यांना बर्गर्स (शहरवासी) ही संज्ञा आहे. त्यांना सुद्धां शहरांत कांहीं हक्क असतात व त्यांची ही एक स्वतंत्र सभा

असते. युरोपखंडापैकीं रशियन राज्यांत बर्गर्स लोकांची संख्या सुमारें ४० लक्ष आहे; व्यापारीलोक २९ लक्ष व कारागीर अदमासें ४ लक्ष आहेत.

निरनिराळ्या धंद्याच्या ज्या या सभा आहेत त्यांशिवाय सर्व शहरासाठीं 'टौन कौन्सिल' ह्मणून एक मोठी सभा असते. शहरांत ज्यांचीं घरें आहेत त्यांस त्या सभेंत बसण्याचा अधिकार आहे, यामुळें बडेलोकही या सभेंत असतात. तथापि मागें सांगितल्याप्रमाणें लोकांस असलीं कामें करण्याची आवड नाहीं व या सभांस ते मोठ्या त्रासानें जातात.

रशियाचा व्यापार दिवसेंदिवस वाढत असल्यामुळें व्यापारी उदमीलोक बरेच सुखी झाले आहेत. त्यांच्याजवळ पुष्कळ पैसा झाला आहे, तथापि त्यांचें रहाणें जुन्या तऱ्हेवर असतें. त्यांना नव्या चाली व रीति बिलकुल आवडत नाहींत. पैसा सांठविला ह्मणजे घरदार, वतनवाड्या, मळेबागा इत्यादि विकत घेतात व त्यांत खुर्च्या, कोचें, आरसे, तजबिरा वगैरे सामानही मांडितात, परंतु त्याचा कधींही उपभोग घेत नाहींत ! चांगलें घर असलें तरी ते तळमजल्यांतील एकाद्या कोंदट खोलींतच रहातात. कोणी परकी मनुष्य भेटण्यास गेला तर त्यांचें चांगलें आगत स्वागत करून चहा, काफी किंवा फळफळावळ त्याच्या पुढें मांडतात. व्यापारीलोक जुन्या चालीचे असल्यामुळें त्यांच्या स्त्रिया परक्यांस दिसावयाच्या नाहींत. रूसदेशांत ही मुसलमानी चाल फक्त व्यापारी लोकांतच आहे. हे व्यापारी सुशिक्षित नसून त्यांस आपल्या धंद्याबाहेर कांहीं माहीत नसतें. त्यांशीं संभाषण करणें असल्यास त्यांच्या धंद्याच्याच संबंधाचें केलें पाहिजे. हे व्यापारी श्रीमंत झाले ह्मणजे सरकारांतून चांद, पदकें किंवा पदव्या मिळविण्या विषयीं फारच खटपट करीत परंतु ह्या पोकळ गौरवाची आवड कमी होत आहे.

नोवगोरोड, कीफ, काझान इत्यादि राजधानी पासून दूर परंतु पिकाऊ प्रदेशांत जीं शहरें आहेत तेथें शेतभात वगैरे करून शेंकडो श्रीमान जमीनदार लोक रहातात. रशियांत विद्येची ह-

द्धि होत असल्यामुळें लहान लहान शहरांत सुद्धां नवीन सुधारणेचीं चिन्हें आढळूं लागलीं आहेत. एकादें दुसरें नाटकगृह, लायब्ररी, दोनचार क्लब (समाज) व कांहीं कर्मणुकेच्या जागा शहरांतून होत आहेत. श्रीमंत जमीनदार लोक हिवाळ्यांत शहरांत रहातात परंतु उन्हाळ्यांत आपल्या खेड्यांतून असतात. शहरांतील सुखवस्तुलोक व सरकारी कामदार हिवाळ्यांत बॉल, मेजवान्या, गाणीं इत्यादि कर्मणुकींत वेळ घालवितात. हिवाळ्यांत चार लोक जमतात तों पर्यंतचही मजा चालते नाहींतर कांहीं नसतें. रशियन लोकांस पत्ते खेळण्याचा फारच नाद आहे, तथापि कर्मणुकेसाठीं दररोज निघणारीं किंवा आठवड्याचीं वर्तमानपत्रें पुष्कळ लोक वाचतात व जाडीं जाडीं मासिक पुस्तकें ही त्यांच्या हातांत आढळतात.

रशियामध्यें अनेक जातीचे लोक आहेत व त्यांच्या शिक्षणांतही कमीज्यास्ती प्रकार असल्यामुळें, तेथील स्त्रियांविषयीं सामान्य माहिती देतां येत नाहीं. परंतु एकंदरींत पहातां स्त्रियांच्या शिक्षणासाठीं दिवसेंदिवस पुष्कळ प्रयत्न चालले आहेत, परंतु जुन्या तऱ्हेवर रहाणाऱ्या लोकांच्या व विशेषतः खालच्या प्रतीच्या लोकांच्या स्त्रियांला विद्येचा गंध नसतो. त्यांस घरांतील कामांखेरीज शेतकामें ही करावीं लागतात. उत्तरेकडे हिंवाळ्यांत शेतकाम बंद होतें तेव्हां त्या शिवणकाम करतात किंवा खेळांत, भेटी घेण्यांत, अथवा देवांच्या गोष्टी सांगण्यांत वेळ घालवितात. रशियांतील लोक धर्मभोळे आहेत, त्यांत बायका तर फारच धार्मिक व पाहिजे त्या असंभवनीय गोष्टींवर विश्वास ठेवणाऱ्या आहेत. सुखवस्तु मध्यम प्रतीच्या लोकांच्या स्त्रियांचा काळ आळसांत व खाण्यापिण्यांत जातो. तेथील स्त्रिया पुरुषांत फारशा मिसळत नव्हत्या, परंतु अलिकडे युरोपांतील चालींचें अनुकरण होऊं लागल्यापासून ती रीत मोडली.

वरिष्ट प्रतीच्या स्त्रिया बऱ्याच शिकलेल्या असतात, व त्या फ्रेंच बायकांसारखे नखरे करण्यांत मन घालतात. कित्येक स्त्रिय।

चागल्याच शिकलेल्या असून पुस्तकें लिहितात व कांहीं तर राजकीय गुप्त मंडळ्यांत शिरल्या आहेत. सुशिक्षित व युरोपीयन पद्धतीवर चालणाऱ्या लोकांत लग्नें वधूवरांच्या परस्पर संमतीनें होतात, तथापि वडिलांचें अनुमोदन लागतें. जुन्या लोकांत लग्नें ठरविण्याचें काम आईबापांकडेच असतें. लग्नें लहानपणीं होत नाहींत.

कित्येक शहरें पवित्र स्थानें मानलीं असल्यामुळें तेथें वर्षास लाखों लोक जातात. त्यांत कीफ् शहर मुख्य आहे. हें शहर निपर नदीच्या ऊंच तीरावर वसलें असून, त्याचा देखावा बाग-बगीच्यांमुळें फार रमणीय आहे. या ठिकाणीं मंक (बैरागी) लोकांस रहाण्याकरतां केलेले फार जुनाट विहार आहेत. येथें शेकडों अन्नछत्रें असून, दरवर्षास दोन तीन लाख यात्रेकरू जमतात. कारकव्ह हें शहर ही मोठें असून तेथें एक युनिव्हर्सिटी आहे, तें काळ्या व अझाफ समुद्रांकडे जाणाऱ्या रस्त्यांवर असल्यामुळें तेथें मोठा व्यापार चालतो. फिनलंदच्या अखातावर उत्तरेकडे हेल्सिंगफोर्स व दक्षिणेस रेव्हेल हीं बंदरें आहेत, त्यांपैकीं दुसरें नवीन वसलेले असल्यामुळें फार सुंदर आहे. उत्तरेकडे श्वेत समुद्रावर आर्केंजल नांवाचें बंदर आहे तेथें ही बराच व्यापार चालतो. त्या बंदरांतून धान्य, सण, डांबर, इमारतीचें लांकूड वगैरे १ कोट रुपयांचा माल सालीना परदेशांत जातो. या ठिकाणीं इंग्लिश गलबतें फार जातात. या शहरापासून जवळच एका बेटावर एक पवित्र साधूचा मठ आहे त्याचे दर्शनास दरवर्षास सगळ्या राज्यांतून २०।४० हजार लोक येतात. हा प्रदेश अति थंड आहे, मार्ग नीट नाहींत, चोहोंकडे दलदली व रानें आहेत आणि वर्षांतून ९ माहिने बर्फ जमलेलें असतें, परंतु इतकीं संकटें सोसूनही भाविक लोक तें स्थान पहाण्यास जातात. तेथें किती ही यात्रे करूं आले तरी त्यांस तीन दिवस फुकट अन्न मिळतें. हें देवस्थान मोठें जागृत असें मानतात. १८५६ त क्रिमियाच्या लढाईंच्या वेळीं इंग्लिशांचीं लढाऊ गलबतें त्या

वेटाजवळ आलेलीं पाहून तेथील साधु, महंत वगैरे सगळे स्तोत्रें ह्मणत त्या वेटाभोंवतीं फिरूं लागले. इंग्लिश गलबतें तेथें न राहतां दुसरीकडे गेलीं, एवढ्यावरून तेथील देवानेंच त्यांना घालविलें अशी त्या स्थानाची ख्याति झाली ! झारही तेथील यात्रा करितात. रशियांत सेंनपितर्सबर्गच्या खालोखाल मोठें शहर मास्को आहे. हें शहर रशियांतील जुन्या पक्षांच्या लोकांचे ह्मटले तरी चालेल. पश्चिम युरोपांतील चालीचें अनुकरण करणारे लोक मुख्य· राजधानींत असतात परंतु येथें जुन्या मतांचे पुष्कळ श्रीमान् जमीनदार लोक रहातात. हें शहर ही पवित्र स्थान आहे, व तेथें ही हजारों लोक यात्रेस येतात. हें रशियांतील प्राचीन राजधानी होतें व मध्य भागीं असल्या मुळें तेथें व्यापारही मोठा चालतो. तेथें आगगाडीचे पुष्कळ रस्ते येऊन मिळतात; धुराचे दिवे व ट्रामगाड्या सुरू केल्यापासून त्याला नवें रूप येत आहे, तथापि तें अजून जुन्या तऱ्हेचें दिसतें. तेथील रस्ते वेडेवांकडे आहेत व दुकानें ही नीट नेटकीं शोभिवंत नाहींत परंतु शेंकडों सुंदर देवालयें मात्र आहेत त्यांच्या पांढऱ्या भिंती व हिरवीं शिखरें जागोजाग वर आलेलीं दिसतात.

या शतकांत रूसदेशांतही यांत्रिकशक्तीचा बराच उपयोग होऊं लागला आहे. आगगाड्या, रस्ते, तारायंत्र इत्यादिकांच्या योगानें व्यापारास जोर येत असून, रशियन मालाचा खप मध्यएशियेंतही होऊं लागला आहे. रशियांत कांच, कागद, व लोंकरीचें कापड तयार करण्याचे कारखाने पुष्कळ आहेत. त्याचप्रमाणें कापसाचें कापड व कमाविलेलें कातडें तयार करण्यांतही बरेच लोक गुंतले आहेत. रशियासारखें उत्तम कमावलेलें कातडें कोठेंच तयार होत नाहीं अशी ख्याति आहे. त्याचप्रमाणें कलाबतूचें व जराचें कामही रशियांत उत्कृष्ट होतें. आगगाड्यांचीं यंत्रें, आगबोटी, लढाऊ गलबतें व अर्वाचीन युद्धकलेंत लागणारीं सर्व तऱ्हेचीं धातुक यंत्रें, शस्त्रें व इतर सर्व सामान त्या देशांतच तयार करितात. तथापि कांहीं कांहीं बिकट यंत्रें परदे-

,शांतून आणितात. रशियांत खाणींचीं कामेंही पुष्कळ आहेत; त्यांत मुख्यत्वेंकरून दॉन नदीवरील कोळशाच्या खाणी मोठ्या आहेत. मोठमोठे कारखाने व यांत्रिक शक्तीनें चालणारीं कलाकौशल्याचीं ठिकाणें, पितर्सबर्ग व मास्को शहरांच्या आसपास आहेत. कापसाच्या व रेशमाच्या मोठ्या गिरण्या येथेंच आहेत. बंदरी शहरांतून मुख्य कारखाने सण विणण्याचे असून तेथें अवजारें, दोरखंडें वगैरे गलबतांच्या उपयोगी जिन्नस तयार होतात. पोलंदांत, पितर्सबर्ग येथें व उरल पर्वतांतील पर्म प्रांतांत लोखंडाचे मोठमोठे कारखाने आहेत. याच उरल पर्वतांत लोखंड, कोळसा, रुपें, पारा वगैरे खनिज पदार्थ काढण्याच्या पुष्कळ खाणी आहेत व त्यांचें उत्पन्न एकसारखें वाढत आहे. इतकी सुधारणा झाली आहे तरी लोकसंख्येच्या मानानें उद्योगधंद्यांत फारच थोडे लोक गुंतलेले दिसतात. तसेंच रशियांत तयार केलेले जिन्नस इंग्लंदांतील कारखान्यांतून निघालेल्या जिन्नसांपेक्षां दिसण्यांत व टिकाऊपणांत कमी असतात. इंग्लंदांतील मालाशीं चढाओढ करण्यापुर्ती रशियन मालाची सफाई होण्यास फार काळ लागेल. रशियन लोकांचें मुख्य लक्ष शेतकीवर असून व्यापारधंद्याकडे कमी आहे, व त्यांतही शहरांच्या महत्वाकांक्षेस मुळींच प्रतिबंध नसल्यामुळें देशांतील तरुण व होतकरू लोकांचें बळ व पैसा सगळा फौजफाट्यांत व लढायांत खर्च होतो यामुळें सगळा देश अगदीं निःसत्व होऊन गेला आहे. कांहीं वर्षें या लढाया थांबल्यास व्यापारास बरीच तेजी येईल व लोकांचें लक्ष धनोत्पादक उद्योगांकडे लागेल. सध्यां चाललेला दारूगोळ्याचा खर्च कमी केल्याशिवाय लोकांच्या शिरावरील कराचा भार उतरणें कठीण आहे. लोकांच्या श्रमाचा व द्रव्याचा व्यय निरर्थक कामाकडे जोंपर्यंत होतो, तोंपर्यंत त्यांच्या अंगांत उद्योगधंदे व कलाकौशल्यें वाढविण्याचें त्राण येणार नाहीं.



प्रकरण ७ वें.

रशियन शेतकरी-गृहस्थिति-ग्रामसभेशीं संबंध-रीतिभाती-स्वभाव-सर्फ लोकांचा इतिहास-जमीनदारांचा जुलूम-मुक्ततेचीं कारणें,-परिणाम इ०.

रशियांत शेतकऱ्यांचा वर्ग मोठा आहे व मुख्यत्वेंकरून लोकांचा उद्योग शेती आहे हें मागें सांगितलेंच आहे. या शेतकऱ्यांची स्थिति १८६१ पासून अगदीं पालटली आहे. त्या सालीं सुमारें २,२०,००,००० शेतकऱ्यांस शेंकडों वर्षें चालत आलेल्या दास्यापासून मुक्तता मिळाली. अशी मोठी सामाजिक घडामोड कोठल्याही देशांत एकदम झाली नसेल. त्या वर्षापासून रशियन शेतकरी, जमीनदारांच्या किंवा सरकारच्या जमिनींवर मोफत श्रम करण्याच्या त्रासापासून मोकळा झाला. ही गोष्ट होण्यापूर्वी त्यांची स्थिति कशी होती हें अगोदर सांगून नंतर त्यांच्या दास्याची हकीगत देऊं.

रशियन लोक व विशेषतः तेथील शेतकरी लोक हे प्राचीन आर्यांच्या शाखेपैकीं आहेत हें मागें सांगितलेंच आहे. आर्यांच्या सामाजिक व गृहस्थितींत दोन मोठ्या गोष्टी सर्वत्र आढळतात;—त्यांची ग्रामरचना व कुटुंबरचना. ग्रामरचनेच्या संबंधानें मागें आलेंच आहे. त्यांच्या कुटुंबांत एका वडील पुरुषाचा अधिकार असे; आपल्या पुत्रपौत्रादि घरांतल्या मनुष्यांवर त्याची पूर्ण सत्ता होती व घरांतल्या मालमत्तेची व्यवस्था करण्याची त्यास मोकळीक होती. आमच्या देशांत व रोमन लोकांत ही चाल होती हें प्रसिद्धच आहे. त्याचप्रमाणें रशियांत वसाहत केलेल्या स्लॉव लोकांतही हा प्रकार आढळतो. स्लॉवलोकांचें स्वातंत्र्य गेल्यानंतर त्यांच्यावर जीं अनेक संकटें पडलीं, त्यांमुळें त्यांच्या पूर्वीच्या व नवीन स्थितींमध्यें फेरफार झाला. तथापि अविभक्त कुटुंब व गांवच्या जमिनीवरील समाईक हक्क, ह्या दोन गोष्टी त्यांच्यांत कायम

राहिल्या. मोंगलांना घालवून दिल्यापासून रशियांतील शेतकऱ्यांस स्वातंत्र्य न मिळतां ते गुलाम झाले. परंतु त्यांच्या कुटुंब व ग्रामव्यवस्थेंत फेरफार झाले नाहींत.

रशियन शेतकरी स्वभावतः थोडे आळशी आहेत. आपलें पोट भरण्यापुरतें उत्पन्न केलें म्हणजे जास्त श्रम ते कधीं करावयाचे नाहींत. त्यांचा निर्वाह थोडक्यांत होतो व त्यांच्या गरजाही फार थोड्या असतात. त्यांला पोटापुर्तें धान्य, तंबाखु, व पांघरण्यास पाठभर बकऱ्याचीं कातडीं असलीं म्हणजे त्यांची तृप्ति होते. रशियांत जमीनीवर श्रम करण्याचे दिवस तेथील चमत्कारिक हवेमुळें फार थोडे असतात ; व विशेषतः उत्तरेकडील थंड प्रदेशांत तर शेतकीचा हंगाम अगदीं लहान असतो. एप्रील महिन्याचे सुमारास बर्फ वितळण्यास लागल्यावर शेतकामास प्रारंभ होतो व जुलै किंवा आगष्ट महिन्यांत पिकें हातांत येतात. रशियाच्या दक्षिण भागांत जमीन फार सुपीक असल्यामुळें थोड्या श्रमांतच काम होतें म्हणून तेथील शेतकरी आळशी व अज्ञान आहेत. उत्तरेकडील शेतकऱ्यांस चांगलें शिक्षण मिळालें असून, वाचतां न येणाऱ्या लोकांची संख्या फारच थोडी आहे. मि० वालेस यांना तर या शेतकऱ्यांच्या घरांतून ' बकल' च्या ' सुधारणेचा इतिहास ' नामक प्रसिद्ध ग्रंथाचीं रशियन भाषांतरें आढळलीं. हें पुस्तक त्यांतील स्वतंत्र विचारांमुळें त्या देशांत फार प्रिय झालें आहे. त्याचीं निरनिराळीं बारा भाषांतरें रूस भाषेंतच झालीं आहेत.

रूस शेतकऱ्यांची आपल्या धर्मावर चांगली श्रद्धा आहे, तथापि परधर्मी लोकांस ते त्रास देत नाहींत, जरी ते स्वभावतः आळशी आहेत तथापि ते आनंदी व थट्टेबाज असतात, दारू प्रिण्याचें त्यांस फारच व्यसन आहे तरी त्यांचा स्वभाव थंड असतो, पाहुणचार करण्यांत त्यांस गोडी वाटते व स्वदेशाबद्दल प्राण सोडण्यासही ते तयार आहेत. त्यांच्या देशावर किंवा धर्मावर एकादें संकट आल्यास त्यांस लढाईचा आवेश येतो. सोळाव्या शतकांत पोल लोकांचा, नंतर स्विदनच्या १२ व्या चार्लस

राजाचा व शेवटीं नेपोलियनचा पराभव करण्यांत ह्या लोकांनीं पुष्कळ शौर्य दाखविलें. तुर्कस्थानाशीं झालेल्या लढायांत धर्माभिमानाचें ही चरित्र अंग होतें. रशियन शेतकऱ्यांस फौजेंत शिरणें मनापासून आवडत नाहीं, परंतु एकदा शिपाई झाल्यावर पाहिजे तीं संकटें सोसण्यास ते तयार असतात.

कोणत्याही राष्ट्रांच्या अंगीं फार वर्षें जडलेली चाल एकदम नाहींशी होत नाहीं व तशी नाहींशी करण्याचा प्रयत्न केला असतां रक्तस्राव झणून व्हावयाचेच अशा एक इतिहासांत सामान्य नियम दिसतो. फ्रेंच राज्यक्रांति होण्याचें मुख्य कारण वरिष्ठ लोकांचा खालच्या प्रतीच्या लोकांवर होणारा जुलूम हें होतें. तेथें लोकांनीं आपलें स्वातंत्र्य स्थापण्यासाठीं जी खटपट केली तींत लाखों लोक बळी पडले; परंतु रशियांत एकंदर ४॥ कोट मनुष्यांस स्वतंत्र केलें असतां कोठें कांहींच गडबड झाली नाहीं. याचें कारण रशियांतील कनिष्ठ प्रतीच्या लोकांस सोडविण्याचे प्रयत्न वरिष्ठ लोकांनींच केले व आपण होऊनच शेकडों श्रीमंत जमीनदारांनीं आपलें नुकसान करून घेतलें; परंतु फ्रान्स वगैरे इतर देशांतून कनिष्ठलोकांनींच आपल्या खटपटीनें आपलें डोकें वर काढिलें. रशियांत झालेल्या सुधारणेच्या गोष्टींत हीच एक मोठी गोम आहे कीं, तेथील सरकाराकडून च चांगलीं कृत्यें होतील तेवढीं; बाकी लोकांत व विशेषतः शेतकरी लोकांत अज्ञान पसरल्यामुळें कांहींच हालचाल दिसत नाहीं. परंतु दिवसेंदिवस राजकीय व सामाजिक विषयांत मन घालणारे सुशिक्षित लोकांचा एक नवा वर्ग तयार होत आहे. क्रिमियाच्या लढाईंत निकलस झाराचा पराभव झाल्यामुळें ह्या नवीन विद्वान् मंडळीनें मोठी ओरड केली व गुलामसोडवणुकेंत ह्या ओरडी ला बराच उपयोग झाला.

रूरिकच्या कारकीर्दीपासून तेराव्या शतकांत मोंगल लोकांच्या रशियावर स्वाऱ्या होईपर्यंत, तेथें गुलाम फार थोडे होते; आणि हेही लढाईंत जिंकलेले कर्जासाठीं गुलाम झालेले, किंवा आपल्या खुषीनेंच आपणास

विकून घेतलेले लोक होते. रशियांतील इतर शेतकरी लोक कांहीं गुलामांच्या वर्गांत मोडत नवते. ते स्वतंत्र असून जमीनदाराशीं जमीनीची लागवड करण्याचा एक वर्षाचा करार करीत; तो संपतांच त्यांस पाहिजे तिकडे जाण्याची परवानगी होती.

मोंगलांची स्वारी झाल्यापासून रूस लोकांच्या दुर्दैवास प्रारंभ झाला. मोंगलांच्या दोनशें वर्षांच्या अमलांत त्यांचें स्वातंत्र्य गेलें व त्या लोकांच्या स्वभावांतही वाईट बदल झाली. या नातीर लोकांनीं रूस लोकांवर एक डोईकर बसविला व तो नीटपणें वसूल करण्यासाठीं एक दुष्ट कायदा असा काढिला, कीं शेतकरी लोकांनीं आपल्या जमीनी सोडून दुसरीकडे जाऊं नये. परंतु मोंगलांची कारकीर्द संपल्यावर शेतकरी लोकांस एका स्थळाहून दुसरीकडे जाण्याची इच्छा झाल्यास, त्यांला बरीच मोकळिक मिळूं लागली. शेतकरी नसून जे घरांत काम करणारे लाखों गुलाम होते, त्यांच्या स्थितींत पालट न पडतां, त्यांचा क्रयविक्रय उघड चालत असे. पुढें १६२९ त रशियाच्या गादीवर एक नवीन घराणें आलें. ह्या घराण्याचा गादीवर फारसा वारसा नवता ह्मणून झारानें आपला पक्ष सबळ करण्यासाठीं आपल्याभोंवतीं कांहीं बडेलोक गोळा केले, व त्यांच्या इच्छेवरून शेतकरी लोकांस पुनः एकाच जमिनीवर खिळून रहाण्याचा कायदा सुरू झाला. इतकें झालें तरी अद्यापि त्यांचें स्वातंत्र्य अगदींच नष्ट झालें नसून त्यांच्याकडे बरेच हक्क राखिले होते. परंतु पुढें पितर धि ग्रेत गादीवर आल्यापासून ह्या लाकांची स्थिति फार वाईट झाली. पितर ह्यानें आपल्या लोकांच्या उन्नतिकरितां फार श्रम घेतले. तथापि आपल्या देशांतल्या लोकसंख्येच्या एका मोठ्या अंशाच्या हिताकडे त्याचें फारच दुर्लक्ष झालें. त्यानें ज्या सुधारणा करण्याचा बेत केला होता त्या कांहीं पैशाशिवाय झाल्या नसत्या ह्मणून राज्यांतील प्रत्येक मनुष्यानें राज्ययंत्र चालविण्यासाठीं कांहीं तरी कर दिलाच पाहिजे, हें तत्व त्यानें पुढें आणिलें. शेतकरी, बडेलोकांच्या पदरचे गुलाम, व इतर कामधंदा, मोल-

मजुरी करून निर्वाह करणारे लोकांकडून सरकारास कांहींच प्रत्यक्ष मिळत नाहीं, असें त्याच्या नजरेस आलें होतें, ह्याकरितां डोईकर बसविण्याचा त्यानें निश्चय केला. हा कर बसविण्यासाठीं त्यानें आपल्या देशांतल्या लोकांची खानेसुमारी केली. ती करितांना लोकांचें वर्गीकरण केलें होतें, त्यांत गुलाम व शेतकरी लोकास एकाच सदरांत ढकलून दिलें. ही चूक झाल्यानें जो घोंटाळा झाला तों पुढें कांहीं नीट होईना व बिचाऱ्या शेतकऱ्यांची व गुलामांची स्थिति एक झाली. कर गोळा करणें विशेष सुलभ पडावें ह्मणून जमीनदारांकडे जे गुलाम व मजुरीनें शेतकी करणार लोक होते, त्यांच्या कराबद्दल त्या जमीनदारांलाच जबाबदार केलें.

या जमीनदारांस फारसा त्रास होऊं नये ह्मणून त्यानें असा ठराव केला कीं त्यांच्या जमीनींत काम करणाऱ्या शेतकऱ्यांनींही दुसरीकडे जाऊं नये. त्याचप्रमाणें ग्रामसभांवरही एक ठरीव रक्कम देण्याचें ठरवून टाकिल्यामुळें गांवच्या जमीनीची नीट लागवड होऊन प्रत्येकास कराचा कमी अंश बसावा ह्मणून त्या सभांनीं ही, गांवांतल्या लोकांनीं सभेच्या परवानगी शिवाय गांव सोडून जाऊं नये असे कायदे करून घेतले; यामुळें कम्यूनांतले लोकही तेथील जमीनीस बांधून टाकिल्यासारखे झाले. खुद्द बादशहांच्या जमीनीवर जे लोक होते त्यांस ही हेच नियम लागू केले. ह्या नियमांच्या जुलूमांतून मोकळें होण्यासाठीं शेतकरी लोक जमीनी सोडून पळून गेले व देशभर फिरून मोलमजुरीनें पोट भरण्यास लागले. हें बंद होण्यासाठीं पितर यानें आणखी एक कायदा केला कीं, लष्करांत काम करणाऱ्या लोकांखेरीज बाकीच्या लोकांनीं एकाद्या ग्रामसभेंत तरी असावें किंवा जमीनदारांचें गुलाम व्हावें; असें न केल्यास कडक शिक्षा ठरविल्या. अशा कायद्यांनीं पितरच्या कारकीर्दींत गुलामगिरी वाढली व शेतकरीलोकांचें स्वातंत्र्य गेलें. सर्फ ह्या शब्दाचा शेतकरी असा अर्थ होता तो जाऊन गुलाम असा झाला. जमीनदारांस असले अधिकार मिळाल्यावर गरीब लो-

कांवर फारच जुलूम होऊं लागला. तेव्हां ते लोक लष्करांत चाकरी करण्यास उत्सुक झाले. हा क्रम चाललयास शेतकी मागें पडून देशाचें उत्पन्न कमी होईल या भीतीनें जमीनदारांच्या व ग्रामसभांच्या परवानगीशिवाय लष्करांत शिरूं नये असा ठराव केला !

या कायद्यांविरुद्ध शेतकऱ्यानीं बंडे केलीं ; तथापि त्यांची मुक्तता झाली नाहीं. क्याथराइन राणीच्या कारकीर्दीत रशियन बडेलोकांचें महत्व वाढलें. बडेलोकांस खुष ठेवण्यासाठीं त्या राणीनें कनिष्ठ प्रतीच्या लोकांची स्थिति फारच वाईट केली. पितरपासून जे पुरुष रशियाच्या गादीवर बसले त्यांनीं बडे लोकांस व सरदारांस राज्यांतल्या जमीनी दिल्या व त्यांबरोबर लागवड करण्यासाठीं तेथील शेतकऱ्यांसही त्यांच्या ताब्यांत दिलें. कोणालाही इनाम देणें झाल्यास जमीन व गुलाम देण्याची चाल पडली. खुद्द क्याथराईन हिनेंच आपल्या उमरावांस लाखों सर्फ दिले. हिच्या राज्यांत गुलामगिरी शिखरास पोंचली. स्वातंत्र्य जाऊन, सर्फ लोक ह्मणजे धन्याच्या मालमत्तेपैकींच एक जिन्नस, असा फरक झाला. सर्फांना मारावें, छळावें, विकावें किंवा हद्दपार करावें, तरी कायद्यापासून त्यांस कांहींच रक्षण मिळेना. गुलामानें आपल्या धन्यावर फिर्याद केल्यास शिक्षा होईल, असे दुष्ट व क्रूर ठरावही बाहेर पडले.

१८५८ सालीं त्या देशांत एकंदर ४,७,१,००,००० गुलाम उर्फ सर्फ होते. देशांतील लोक संख्येच्या निम्मेपेक्षां जास्त लोक परतंत्र होते, ह्यावरून ही गुलामगिरीची दुष्ट चाल किती वाढली होती हें दिसेल. यांपैकीं २ कोट गुलाम सरकारी जमीनींत व खाणींत काम करीत; सुमारें २ कोटि, १० लक्ष गुलाम जमीनदार, बडे लोक वगैरे मंडळीच्या जमीनींवर रहात; शिवाय घरचीं हलकीं कामें करणारे १५ लाख गुलाम होते.

सरकारी जमीनींवर काम करणारे लोकांस बरेंच स्वातंत्र्य होतें. व्यवस्थेच्या प्रकरणांत ज्या ग्रामसभांची माहिती दिली आहे त्या सभा सरकारी गावांतून मात्र

चालत होत्या. गांवच्या जमिनी व सरकारी जमिनीची लागवड करून सरकार कर देणें चुकतें केलें म्हणजे तेथील लोकांस इतर कामें पडत नसत. ह्यांस मुक्त करतांना सरकारास प्रयास पडले नाहींत. सरकारानें त्यांस स्थलांतर करण्याची परवानगी दिली व त्यानीं संपादित वित्तावर त्याची पूर्ण मालकी करून स्वतंत्र केल्याबरोबर त्यांना मालकीनें जमिनी दिल्या. जमीनदारांकडे जे गुलाम होते त्यांची स्थितिमात्र अतिवाईट होती. हरएक कामांत जमीनदार हात घालून मनाला वांटल तशी ढवळाढवळ करीत; ते गुलामांकडून तीन प्रकारानें कामें घेत. त्यांच्या मनांत घरींच शेतकी करणें असल्यास ते गुलामांकडून करवेल तितकी मेहनत करवति; अथवा आपल्या जमीनी त्यांच्याकडे खंडानें लावीत व त्यांच्याकडून उक्ता पैसा किंवा ऐनजिन्नस उत्पन्नाचा भाग घेत. कित्येक जमीनदार आपल्या जमीनी ग्रामसभां (कम्यून) कडे लावून त्याबद्दल नियमित पैसा घेत. या मेहनतीबद्दल गुलामांस मजुरी मिळत नसे. ह्या शिवाय सर्फलोकांस आपल्या धन्याकडे कोंबडींबकरीं, भाजिपाला, फळफळाव वगैरे जिन्नस वर्षांतून नजर करावे लागत. धन्याजवळ जर गरजेपेक्षां जास्त गुलाम असले तर त्यांस मोलमजुरी करण्याची परवानगी मिळे; परंतु उत्पन्नाचा मोठा भाग धन्याचा! प्रत्येक गुलामास आठवड्यांतून निदान तीन दिवस तरी आपल्या धन्याची चाकरी केलीच पाहिजे असा कायदा होता; राहिल्यावेळांत त्यानें आपल्या घरचीं कामें करावीं.

याप्रमाणें राष्ट्रांतील अर्ध्या पेक्षां जास्ती लोकदास्यांत होते, यामुळें देशांत अज्ञान, जुलूम व विपत्ति वाढून, उद्योग व कारखाने बंद पडत चालले व लोकांत निरुत्साह पसरला. परंतु पॉल झार गादीवर बसतांच गुलामांला स्वातंत्र्याची निदान सांवली तरी देण्याची सुरुवात झाली. आजपर्यंत सरदार, बडे लोक व जमीनदार लोकांची आपल्या पदरच्या गुलामांवर अनियंत्रित सत्ता होती. ती तशीच ठेऊन राज्यांतील निम्मे लोकांना दुःखांत ठेवल्यानें देशाचें अनेक प्रकारें नुकसानच आहे

ही गोष्ट त्या झाराच्या लक्षांत आली. परंतु बडे लोकांचें मन दुखवून इतक्या लोकांस स्वातंत्र्य देण्याचा धीर त्यास होईना व हें साहजिकच आहे. कारण ज्या गोष्टींची लोकांस सवय जडली आहे, त्या, लेखणीच्या एका झपाट्या बरोबर दूर होत नाहींत. जुलमी व कडक सरकारांच्या हुकुमांवरून कांहीं गोष्टी बंद होतात, परंतु वास्तविक पहातां सावकाश व पायरी पायरीनें त्या दूर केल्यानें जें हित होतें, तें कांहीं उतावळीनें व दरारा बसवून होत नाहीं ; पॉल यानें एवढीच सुधारणा केली कीं, गुलामाकडून आठवड्यांतून तीन दिवस मात्र काम घ्यावें. त्यानें राज्याचा उपभोग थोडेच दिवस घेतला, तेव्हां जास्त सुधारणा करण्यास तो राहिला नाहीं, परंतु त्याच्या कारकीर्दीपासून गुलामांचे जाच थोड थोडे कमी होत गेले ; शेवटीं १८६१ सालीं त्यांस स्वातंत्र्य मिळालें. पॉल यानें केलेल्या ठरावांविरुद्ध बडे लोकांस कुरकुर करतां येईना, ह्याचें कारण मागें एके ठिकाणीं दिलेंच आहे कीं, बडे लोकांनीं फौजेंत चाकरी केली पाहिजे असा जो सक्त कायदा होता, त्या झारानें तो मोडून टाकिला. मागून झालेल्या झारांनीं पुष्कळ गुलामांस स्वातंत्र्य दिलें व गुलामांस छळणाऱ्या जमीनदारांस, अपराधाच्या मानानें लहान मोठ्या शिक्षा ठरवून टाकिल्या. परंतु जमीनदार आपल्या गुलामांस क्रूरपणानें वागवितात, हें सरकारच्या नजरेस येईल तर दाद लागे, कारण गुलामांस फिर्याद करण्याची परवानगी नवती ! त्यांस पाहिजे तें काम सांगावें, त्यांच्याकडून आपलें देणें छळ करून उगवून घ्यावें, हुकूम तोडिल्यास चाळीस फटके किंवा पंधरा दांडके त्यांच्या पाठीवर मारावे व इतकेंही करून गुलाम नरम न आल्यास त्यास सरकारच्या ताब्यांत देऊन फौजेंत किंवा सैबिरियांतील खाणींवर पाठवावें, असे अधिकार जमीनदारांच्या हातांत ठेविले होते !

क्रिमियाची लढाई थांबल्यावर माजी झारानें असें बोलून दाखविलें, कीं " माझ्या मनांत सर्फ लोकांस मुक्त करावयाचें आहे अशी चोहोंकडे वदंता उठली आहे, ती सर्व खरी आहे, असें

समजूं नये. परंतु गुलामांच्या सध्यांच्या स्थितींत फेरफार करण्याचें माझ्या मनांत घोळत आहे. लोकांनीं आपण होऊन ही दुष्ट चाल नाहींशी करा ह्मणून विनंति करण्यापूर्वीच सरकारानें कांहीं तजवीज केली पाहिजे. गुलामांस एकदम मुक्त करतांना पुष्कळ गोष्टींचा विचार केला पाहिजे. जमीनीच्या मालकांचें जें एकदम नुकसान होईल तें कसें टाळावें, वगैरे पुष्कळ अडचणी आहेत; ह्मणून त्या संबंधानें लोकांकडून सूचना आल्यास मी लक्ष देईन." ह्याचा हे शब्द गुलामांला पूर्ण स्वातंत्र्य देण्याचे सूचक होते. त्यांच्या सोडवणूकींत ज्या अडचणी येतील त्याचा पुर्ता विचार करण्यासाठीं एक कमेटी भरविली. जमीनदारांच्या जमीनींत खपणार गुलामांस एकदम मोकळे करून जगावर मोकळे सोडणें इष्ट नव्हतें. तर त्यांना पोटा पुर्ती जमीन ही मिळावी असें पुष्कळांचें मत होतें, त्याप्रमाणें जमीनदारांकडून एकदम जमीन घेऊन शेतकऱ्यांस द्यावी तर जुलूम होणार आहे व एका वर्गाचें मोठें नुकसान होईल, इत्यादि अडचणी पुढें आल्या. ह्या सगळ्या दूर होऊन २।२½ कोट लोकांस जगावर उघडे न सोडतां नीट तजवीज करावी व जमीनदारांचे ही नुकसान होऊं नये ह्मणून विचार करण्यासाठीं बादशहानें प्रसिद्ध पणें एक मंडळी स्थापन केली. निरनिराळ्या जमीनदारांचे व गुलामांचे कोणते सबध आहेत ते कळावे ह्मणून या मंडळीनें चौकशी करून रिपोर्ट केला. आतां गुलामांला स्वातंत्र्य मिळणार अशी सर्वांची खात्री झाली, त्याबरोबर वर्तमानपत्रांतून त्याविषयावर दररोज शेकडों लेख येऊं लागले, व जो तो गुलाम सोडविण्यापासून वेगळे वेगळे फायदे दाखवूं लागला. सर्व लोकांच्या दुर्गुणांचें दुःख विपत्तिचें मूल कारण ही गुलामगीरी आहे व हिचा बीमोड केल्याशिवाय कांहीं लोकांची मानसोन्नति होत नाहीं, असें नीतिशास्त्रज्ञ ह्मणूं लागले; जमीनदारांचें गुलामाशीं चाललेलें वर्तन अन्यायाचें व जुलमाचें आहे असें कायदेवाले बोलूं लागले; तसेंच गुलामगिरीपासून व्यापारस्वातंत्र्य, चढाओढ, व पाहिजे

तो धंदा करण्याची प्रत्येकास मोकळीक, ह्या गोष्टींचा लाभ होत नाहीं व देशांत दारिद्र्य पसरत चाललें आहे असें अर्थशास्त्री सांगूं लागले. याप्रमाणें या गोष्टींची वाटाघाट सुशिक्षित लोकांत सुरू झाली. शेवटीं १८६१ च्या फेब्रुआरी महिन्यांत गुलाम सोडण्याचा कायदा बाहेर पडला त्यांत तीन कलमें होतीं:—

१. सर्फलोकांचें दास्य काढून त्यांस स्वतंत्र शेतकऱ्यांचे सगळे हक्क मिळावे व जमीनदारांच्या जागीं ग्रामसभांनीं स्थानिक व्यवस्था ठेवावी.

२. ज्या ग्रामसभांकडे जमीनदारांची जमीन होती तीच त्या सभांकडेच रहावी व नुकसानाबद्दल जमीनदारास कांहीं पैसा सभांनीं द्यावा, किंवा गांवच्या लोकांनीं जमीनदारांचीं कामें मजुरीनें करून पैसा फेडावा.

३. किंवा ग्रामसभांच्याबद्दल सरकारानेंच पैसा भरून सभांकडून परस्पर सावकाश द्यावा.

घरांत काम करणारे गुलामांविषयीं असा ठराव केला, कीं त्यानीं आपल्या धन्यांची आणखी दोन वर्षें चाकरी केल्यावर ते स्वतंत्र होतील. त्यांस जमीन मिळणार नाहीं. याप्रमाणें जमीनदारांचे हक्कांचें संरक्षण करून शेतकऱ्यांसही त्यांच्याकडे असलेल्या जमीनीवर पूर्ण मालकी, कांहीं वर्षांनीं कर्जाची फेड झाल्यावर मिळावी. हा कायदा निघतांच जमीनदारांचे हक्क व त्यांच्या जमीनीबद्दल काय द्यावें, हें नीट ठरवण्याकरितां झारानें देशामध्यें कांहीं हुशार, इमानी व निःपक्षपाती लोकांस नेमिलें. त्यांचें मोठें काम शेतकऱ्यांची समजूत करण्याचें होतें. कित्येक ठिकाणीं मारमाऱ्या व तंटे झाले व कित्येक खेड्यांनीं जमीनदारांस कांहीं देत नाहीं अमें साफ सांगितलें. त्या सर्वांस ताळ्यावर आणून समजूत पाडणें कठीण होतें, पण तें काम करणाऱ्या लोकांनीं त तंटे थोडक्यांत तोडिले त्याचप्रमाणें सावकारांच्या व जमीनदारांच्या कर्जाल आमसभा व शेतकरी राहूं नयेत ह्मणून जमीनीबद्दल निघालेल्या देण्याचा ¾ हिस्सा सरकारानें स्वतः देण्याचें कबूल केलें, व हें सरकारानें कर्ज सावकाश द्यावें असें ठरावेलें.

येणेंप्रमाणें रूसदेशांतील गुलामगिरीची हकीकत आहे. त्या सोडवणुकेनें तेथील समाजांत मोठीच घडामोड झाली. गुलामांस मुक्तता द्यावी, हें जमीनदारांच्याही मनांत होतें म्हणून त्यांनींही वरेंच नुकसान सोसिलें. गुलामलोक स्वतंत्र शेतकरी झाल्यावर त्या देशाच्या एकंदर स्थितींत कांहीं तरी मोठे फरक होतील व कदाचित् फायदा न होतां नुकसानच होईल असेंही कित्येक म्हणूं लागले. खरोखर पहातां ज्या सर्फांचे धनी चांगले होते त्यांस ह्या स्वातंत्र्यापासून वास्तविक लाभ फारसा कांहीं झाला नाहीं. शेतकीच्या कामांत व दुसऱ्या अनेक प्रसंगीं त्यांच्या धन्यांचा त्यांना मोठा आश्रय होता, तो सुटला व त्यांना सावकारा पुढें तोंड पसरण्याची पाळी आली. कित्येक तर असें म्हणत कीं रशियन शेतकरी स्वभावतः आळशी असल्यामुळें त्यांस स्वातंत्र्य मिळाल्यावर त्यांच्या हातून काम होणार नाहीं, देशांत उत्पन्न कमी होईल, व दारिद्र्य वाढेल. परंतु पंचवीस वर्षांच्या अनुभवावरून आतां असें कांहींच झालें नाहीं म्हणतां येईल. दास्यविमोचनाचा प्रत्यक्ष परिणाम आधीं जमीनदारांवरच झाला. तो हा कीं त्यांच्या पदरीं गुलाम होते म्हणून ते निरुद्योगी असत; परंतु यापुढें त्यांस उद्योग करणें भाग पडलें व त्यांचा उघळा स्वभाव जाऊन ते दूरदर्शी, मितव्ययी व दक्ष झाले. शेतकरी लोकांना मनाचें स्वातंत्र्य मिळालें व दुसरे उद्योगधंदे करण्यस त्यांस फुरसत मिळूं लागली आणि आपल्या श्रमाच्या फळावर आपली सत्ता आहे अशी खात्री होतांच उद्योगास उत्तेजन मिळालें. परंतु स्वातंत्र्यापासून त्यांच्या वास्तविक स्थितींत जो चांगला फेरफार होईल असें वाटत होतें तसा झाला नाहीं. तथापि सरकारचा सारा कमी झाल्यास व मागें चवथ्या प्रकरणांत सांगितलेल्या ग्रामसभांचे जे दोष आहेत ते दूर झाल्यानें, शेतकऱ्यांची स्थिति खास सुधारेल. जमीनीवर आपली पुर्ण सत्ता आहे व आपल्या मेहनतीप्रमाणें आपणांस फळ मिळेल, ही खात्री असल्यावर ते जास्त उद्योग करतीलच.

प्रकरण ८ वें.



ज्ञानवृद्धि–सुधारलेल्या राष्ट्रांचें अनुकरण–फ्रान्स आणि नव्या व जुन्या मतांचा कलह–अनुकरणाचें परिणाम–पुनः तेंच–काव्यें व नाटकें–गुप्त मंडळ्या–वर्तमानपत्रें इ०

मागील पृष्ठें लक्षपूर्वक वाचणाऱ्यांच्या ध्यानांत असेलच, कीं पूर्वीपासून रूस देशाला एशिया खंडांतील सुधारणेचें व रीतरिवाजांचें वळण लागलें होतें. रोमन राज्य संपल्यावर पुढें कांहीं काळानें पश्चिम युरोपांत रोमन व ग्रीक सुधारणेचें पुनरुज्जीवन होऊं लागलें आणि त्याला मध्यंतरी ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीं जो प्रतिबंध आणिला होता तो ही, यहुदी व मुसलमान लोकांनीं आपल्याबरोबर युरोपखंडांत नेलेल्या पूर्वेकडील ज्ञानाच्या संसर्गानें नाहींसा झाला. रोमन क्याथोलिक पाद्र्यांनीं आपल्या धर्माचा अपमान होऊं नये ह्मणून स्वतंत्र विचार व नवीन शोध करणाऱ्यांचा अनेक प्रकारें छळ मांडिला आणि सर्व सृष्टिज्ञान बैबलांत आहे असें प्रतिपादन करून, पश्चिम युरोपांत अज्ञान माजविलें. परंतु स्पेनदेशांत मुसलमानांनीं आपल्याबराबर ज्योतिष, वैद्यक, गणित, इत्यादि पूर्वेकडील शास्त्रें नेलीं होतीं, एवढेंच नाहीं, तर ख्रिस्त्यांनीं छपविलेल्या ग्रीक ग्रंथांचीं भाषांतरें करून, ग्रीक सुधारणाही युरोपांत पसरिली. ह्यामुळें युरोपांत ज्ञानवृद्धि होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं व ख्रिस्ती धर्माचें बंड मोडत चाललें. शेवटीं पंधराव्या व सोळाव्या शतकांत तर पोपसाहेबांस न जुमानितां चोहोंकडे स्वतंत्र विचार, नवीं मतें व नवे शोध होऊं लागले. मागील एका प्रकरणांत सांगितलेंच आहे, कीं रूस देशाला या सुधारेणाचा गंधही पोंचला नाहीं. त्या देशांत रोमन सुधारणेचा मुळींच प्रवेश झाला नाहीं व ज्या मुसलमान लोकांनीं तेथें आपलें राज्य स्थापन केलें होतें, ते बगदाद किंवा कोर्दोवा येथील मुसलमानांप्रमाणें सुधारले नवते. ते

मोंगल, एशिया खंडांत जीं कांहीं वरींच सुधारलेलीं राष्ट्रें होतं त्यांपैकीं नसून, पहिल्या प्रतीचे रानटी व अज्ञान होते. त्यांच्य सहवासानें रूस लोकांत जास्तच अज्ञान पसरलें. स्पेन देशां गेलेल्या मुसलमानांचें स्वरूप भिन्न होतें. ते पुष्कळ सुधारले होते व त्यांच्या अंमलांत त्या देशांत विद्या व कलाकौशल्य वाढत होतें. स्पेन देशांतून ते लोक गेल्यावर तो देश भिकेस लागला; इकडे तार्तार लोक रशियांतून गेले म्हणून रूस लोकां-च्या सुधारणेस प्रारंभ झाला. ह्यावरून स्पष्ट आहे, कीं प-श्चिम युरोपांत सोळाव्या व सतराव्या शतकांत जी सुधारणा झाली तिचा लाभ रूस लोकांस मिळण्यास फार काळ लागला. त्यांना आपलें स्वातंत्र्य स्थापण्यासच श्रम करावे लागले. हें स्वातंत्र्य स्थापल्यावर रूस लोकांचें पश्चिम युरोपाशीं दळण-वळण सुरू झालें. त्या देशांत पाश्चात्य सुधारणेचा व रीति-भातींचा प्रवेश होऊन फक्त दोन शतकें झालीं, इतक्या थोड्या काळांतच संपादन केलेल्या ज्ञानाचा प्रसार त्या देशांत कसा झाला व तें राष्ट्र हल्लींच्या स्थितीस कसें येऊन पोंचलें, तेथील लोकांना परकीय सुधारणा मिळाल्यामुळें त्यांच्या मानसिक स्थि-तींत व रीतरिवाजांत कसे फरक झाले व त्यांच्या विचारांचा व ज्ञानाचा कल सांप्रत कोणत्या तऱ्हेचा आहे, हें सांगण्याचा प्र-यत्न या प्रकरणांत केला आहे. या प्रकरणांत रूस लोकांच्या स्वतःविषयीं सर्व हकीगत संपवून, पुढील दोन प्रकरणांत त्यां-च्या एशियाखंडांतील राजकीय कारस्थानांचा इतिहास दिला आहे.

यश: सतराव्या शतकांत इंग्लंड, फ्रान्स, इटाली, जर्मनी वगैरे पा-श्चात्य देशांत विद्वान् लोक नवे नवे शोध करून मनुष्याच्या ज्ञानभांडारांत भर घालूं लागले; मनुष्याचें सृष्टिविषयक ज्ञान वाढूं लागलें; कलाकौशल्य उदयास येऊं लागलीं आणि चोहों-कडे नवीन शोधक, तत्ववेत्ते, कवि, नाट्याचार्य, ज्योतिषि, रसा-यनवेत्ते, शिल्पज्ञ, नाविक, युद्धकलाभिज्ञ इत्यादि लोक चमकूं लागले. ज्यावेळीं इंग्लंदांत राजा व प्रजा यांचे आपल्या वि-

क्षित हक्कांबद्दल तंटे सुरू झाले, जेव्हां बेकन, डेकारटे, वगैरे महात्म्यांच्या उपदेशानें सृष्ट पदार्थांचें शोध होऊं लागले, लोकांचें लक्ष शास्त्रीय ज्ञानाकडे लागलें, धर्माचें प्राबल्य मोडलें व बुद्धीला स्वातंत्र्य मिळालें; जेव्हां युरोपांतील दर्यावर्दी व्यापार करण्यासाठीं व नवीन मुलूख मिळविण्यासाठीं दूरदूरच्या सफरा करूं लागला, तेव्हां रशियन लोक नुकते कोठें तार्तारांच्या अमलांतून मुक्त झाले होते; परंतु शेकडों वर्षें आंगांत भरलेलें आलस्य व अज्ञान कमी झालें नवतें. रूस देशाचें युरोपाशीं दळण वळण नवतें व तो देश पश्चिम युरोपांतील लोकांस माहीतही नव्हता म्हटलें तरी चालेल.

रशियांत अलीकडे झालेली सुधारणा व पश्चिम युरोपांतील देशांत झालेली सुधारणा यांमध्यें एक मोठा भेद असा आहे कीं, त्या देशांतून ती क्रमाक्रमानें व लोकांच्या ज्ञानाच्या पायरीनेंच झाली. तेथील सुधारणा लोकांवर बाहरून आणून लादलेली नसून त्यांनींच बेताबेतानें केली. परंतु रशियांतील लोकांस आयताच ज्ञानविधि सांपडला, व त्यामुळें स्वतःच्या बुद्धीस श्रम न देतां अनुकरणाचा झपाटा मात्र सुरू झाला. तसेंच त्यांना जी पाश्चात्य सुधारणा मिळाली ती ग्रहण करण्यापुर्ती त्यांचें अंगीं शक्ति उत्पन्न होण्यापूर्वीच व लोकांतही कांहीं चळवळ नसतां, तेथील राज्यकर्त्यांनीं ती त्यांच्यावर जुलुमानें व मारूनमुटकून लादली. ज्यांची पाश्चात्य सुधारणा पसरण्याची मनापासून इच्छा होती त्यांनीं स्वतःच्या मानसिक शक्तीला थोडाच श्रम दिला होता. त्यांना फक्त अनुकरण करावें एवढेंच माहीत होतें. पाश्चात्यांचे आचार विचार घेतले म्हणजेच आपला देश सुधारेल व संपन्न होईल असें त्यांस वाटे. अंधळ्या अनुकरणानें काय वाईट परिणाम होतात, तें पुढील हकिगत वाचून कळेल. आपला देश आपलें अन्न, हवा, व आपल्या अंगीं जन्मापासून खिळलेलें आचारविचार मनांत न आणता, एक करतो म्हणून दुसऱ्यानेंही करावें एवढ्याच कोत्या समजावर, परकी लोकांच्या चालींची मतांची व विचारांची हुबेहुब नक्कल उतरण्यांतच भूषण मानू

चुकीचें दिसतें. अनुकरणानें जे फायदे होतीलसे वाटतात ते होत नाहींत. कोणत्याही लोकांच्या रीतिभाती व आचारविचार त्यांच्या मनाच्या किंवा बुद्धीच्या प्रागभ्यावरच अवलंबून असतात असें नाहीं, तर त्यांचीं दुसरीं ही कारणें आहेत, परंतु तीं मानवी शक्तीच्या पलीकडील आहेत. अनुकरणानें लोकांच्या बुद्धीचा विकास होत नाहीं, आणि त्यामुळें खरी सुधारणा होत नाहीं. हे विचार आमच्या लोकांनीं लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. पुढील हकीगत वाचली ह्मणजे त्यांचें प्रत्यंतर मिळणारच्च आहे. स्वतःचे डोळे दिपून गेल्यास दुसऱ्याचा अनुभव तरी ऐकावा. इतिहासाचा उपयोग ह्याहून दुसरा कोणता ?

मागील एष्टें वाचणारास रशियन लोक युरोपांतील इतर राष्ट्रांतील लोकांहून भिन्न आहेत हें माहीतच आहे. पश्चिम युरोपाशीं दळणवळण सुरू होतांच नवी सुधारणा, नवे पोषाख, नवे आचारविचार व नव्या राज्यरीति दृष्टीस पडतांच रूस लोकांचे डोळे दिपून गेले व अनुकरण सुरू झालें. या अनुकरणाचा वाईट परिणाम अद्यापिही बराच कायम आहे. मागच्या शतकांत रशियांतील सुशिक्षित ह्मणविणारे लोक आपल्या देशाचा व आपल्या आचारविचारांचा फार तिरस्कार करीत, परंतु आतां त्या लोकांचे ठायीं स्वदेशाभिमान आला आहे.

रशियांत जी पाश्चात्य सुधारणा शिरली आहे, तिचा प्रारंभ सेंतपितर्सबर्ग शहराच्या स्थापनेपासून झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तें शहर नव्या सुधारणेचें दर्शक आहे व मास्को जुन्या रशियन सुधारणेचें मुख्य स्थान आहे. सेंतपितर्सबर्ग झाल्यावर रूस लोकांचें पाश्चात्य राष्ट्रांशीं दळणवळण सुरू झालें. पितर धि ग्रेत याच्या सत्कृत्यांतीलच हें एक मानिलें आहे. हें शहर बांधण्यांत त्यानें आपली दूर दृष्टि दाखविली. बालतिक समुद्रावर असल्यामुळें दळणवळणाचें तें मोठें साधन झालें व विशेषतः त्याच्यापासून रूस देशाला त्या बाजूनें कांहींच भीति उरली नाहीं. हें शहर नेवानदीच्या विस्तीर्ण व स्वच्छ प्रवाहाच्या दोनही तीरांवर पसरलें आहे. येथील इमारती दगडाच्या असून भ-

व्य व सुंदर आहेत. या शहराची रचना सगळी पश्चिमेकडील धर्तीवर आहे. यांत प्रवासाला पहाण्यासारखीं अनेक सुंदर स्थळें आहेत. बागबगीचे, कारंजीं, पुतळे, स्मारक स्तंभ, पदार्थसंग्रहालयें, चित्रशाळा वगैरे शेकडों प्रेक्षणीय स्थळें चोहोंकडे आढळतात. या शहराची बांधणी होतांना पितराधिग्रेत स्वतः देखरेख करीत होता, व त्याचें तेव्हां राहण्याचें लहानसें लांकडी घर अद्यापि दाखवितात.

एकट्या पितरनें रशियाच्या उन्नति करतां जे उपाय योजिले व आपल्या शरीरास जे श्रम दिले तसे कोणत्याच झाराचे हातून झाले नाहींत. त्याच्या पूर्वी मास्कोच्या गादीवर बसलेले झार आपलें आयुष्य मुसलमानी डाम डौलांत व ऐषआरांमांत घालवीत. ते अभिमानी, भारी, प्रतिष्ठित व आपल्या उच्चपदाच्या मदानें मत्त होते. त्यांच्या डोळ्यांवर सत्तेचाधूर चढला होता. त्यांना सर्व सृष्टि काय ती आपल्या देशांतच वाटत होती. बाह्य जगाची त्यांस माहिती नवती व ती मिळविण्याविषयीं ही ते उदासीन होते. देवपूजा, धर्मचर्चा, आश्रितांशीं विनोद, मृगया, देवळांचे दर्शन, महंताशीं वादविवाद, व राक्षसी मेजवान्या यांत त्यांचा कालक्षेप होई. मास्को सोडण्याचा प्रसंग आल्यास तो फक्त एखाद्या पवित्र तीर्थाची किंवा समाधीची यात्रा करण्यासाठीं यावयाचा. दरबारी लोक व उमराव, यांसच बादशहांची भेट होई,बाकीच्या लोकांस त्यांचें दर्शनही दुरापास्त होतें. पितर हा पुरुष मात्र वेगळ्या स्वभावाचा निपजला. लहानपणांतच त्याला राजकीय घोटाळे व दरबारांतील कारस्थानांचा अनुभव मिळाला व त्याचें लहानपण जाचांत गेलें. यामुळें हातीं अधिकार येतांच त्यानें परंपरागत आलेल्या जुन्या चाली मोडण्याचा निश्चय केला. आपल्यावर लोकांची टीका होईल ही भीति तो मुळींच बाळगीत नसे. त्यानें रशियांतील लोकांच्या जुन्या चाली व संप्रदाय मोडून आपल्या दरबारांत पाश्चात्यांचे रिवाज सुरू केले. त्याला पारमार्थिक विषयापेक्षां ऐहिक विषय आवडत. धर्मपुस्तकांपेक्षां, या जग ज्यांचा उपयोग होईल तेवढींच पुस्तकें त्याला मान्य हो

त्याच्या वर्तनावरून जुने भाविक राशियन त्याला सैतानाचा अवतार मानीत. युरोपांतील प्रवास करून आल्यावर आपल्या लोकांच्या ऐहिक सुखाची वृद्धि होण्याचे त्यानें अनेक उपाय योजिले. पितरनें जी सुधारणा आपल्या लोकांनीं द्यावी ह्मणून जुलूम चालविला होता ती दरबारी लोक व वडे लोक यानींच घेतली. इतर लोकांस पाश्चात्य चालींचा मजा ह्मणून तिरस्कार होता. वडे लोकांनीं, हें अनुकरण सुरू करण्यांत झाराची मर्जी, याहून जास्त विचार केला नवता, ह्यामुळें पाश्चात्यांची रीतरिवाजांचीं नक्कल उतरल्यावर आपल्या देशाचा त्यांस कंटाळा आला. रूस देशाच्या जुन्या इतिहासाचा त्यांस अभिमान वाटेनासा झाला, आणि आपल्या देशांतील ह्मणून जी जी गोष्ट असे ती ती वाईट व रानटी, अशी त्यांस वाटूं लागली !

पितर यानें आपल्या देशांतील लोकांच्या मानसिक शिक्षणांत व विचारांत जी ही चळवळ सुरू केली, तिचें स्वरूप साधें व व्यवहारोपयोगी होतें. या जगांत ज्या गोष्टींनीं मनुष्याचें सुख वाढेल, त्या उत्पन्न करण्याकडेसच या शिक्षणाचा कल होता. तत्वज्ञान व परमार्थ, ह्या विषयांत मन घालण्यापासून संसारांतील मनुष्याच्या गरजा भागत नाहींत व त्यांचें सुख वाढत नाहीं हें जाणून तसें शिक्षण पितरला आवडत नसे. त्याचप्रमाणें त्याला ' घटपटा ' वर पूर्वपक्ष उत्तरपक्ष करणाऱ्या तार्किकांची अगर पारमार्थीक विषयांवर गहन मिमांसा करणाऱ्या दर्शनकारांची जरुर नव्हती. युद्धकलाभिज्ञ, नौकागमनिपुण, राजकारस्थानी, मुत्सद्दी, शिल्पज्ञ, कारागीर, व्यापारी, वगैरे लोकांपासूनच देशाची भौतिक सुधारणा होईल हें जाणून त्यानें प्रजेस व्यवहारोपयोगी शिक्षण देण्याचें आरंभिलें. ज्ञान मुलांसाठीं कनिष्ट प्रतिचें शिक्षण देणाऱ्या शाळा स्थापिल्या व जास्त ज्ञान झालेल्या विद्यार्थ्यांकरितां, शिल्पशास्त्र, लष्करशास्त्र, नौकानयन, धातुसंशोधन, दुर्गरचना ह्या व यांसारख्याच अन्य विषयांवर निरनिराळ्या भाषांतील उत्कृष्ट ग्रंथांचीं कालोचित भाषांतरें करविलीं. परदेशांहून कलाकौशल्याभि-

झांस आपल्या देशांत आणिलें व पुष्कळ तरुण रशियन लोकांस परदेशांत तेथील भाषा व कला शिकण्यास पाठविलें. तात्पर्य जेवढें जेवढें ह्मणून रशियन लोकांस सुधारण्याचें साधन दिसलें तेवढें तेवढें साध्य करण्यास त्यानें प्रयत्न केला.

पहिल्यानें जर्मन लोक शेजारीं असल्यामुळें रूस लोकांनीं त्यांचेंच अनुकरण केलें. ऑनराणी गादीवर बसल्यावर तर जर्मन अनुकरणाची कमाल झाली. दरबारांत त्या लोकांचें वर्चस्व होऊन राज्यांतील महत्वाच्या जागा त्यांस मिळूं लागल्या यामुळें रूस लोकांना संताप आला. परंतु या राणीच्या मागून जी बाई गादीवर बसली तिनें जर्मन लोकांस घालवून आपले देशांतील लोकांस पुढें आणिलें.

शार्मण्य लोकांचे विचार व शिक्षण, ह्यांतून मुक्त झाल्यावरहि रशियाच्या मानसिक शक्तीनें स्वातंत्र्य मिळाविलें नाहीं. स्वतंत्र विचार करणारे व आपल्या बुद्धीला श्रम देणारे लोक रशियांत ह्या वेळीं निपजले नवते. एकदां उत्तनवारीची जी संवय लागली ती दूर करणें कठीण होतें. याचीं कारणें स्पष्टच आहेत. पितरच्या कारकीर्दीपासून रशियांतील सुशिक्षित लोकांस आपल्या देशाच्या इतिहासाचा व आचारविचारांचा कंटाळा वाटूं लागला. विचार न करतां आपल्या प्राचीन चालींवर लात मारल्यामुळें, रशियाचीं शुद्ध देशी तत्वें लपून गेलीं. जर्मनीचें अनुकरण करण्याचा झपाटा बंद झाल्यावर रूस लोक अनुकरण करण्यासारखें दुसरें राष्ट्र कोणतें आहे असें पाहूं लागले. आपल्या जुन्या चालींचा कंटाळा व जर्मनीचा द्वेष उत्पन्न झाल्यावर, असें होणें साहजिकच होतें.

या काळांत युरोपखंडांत फ्रान्स देश सर्व प्रकारें पुढें होता. जेवढा ह्मणून डामडौल, ऐषआराम, व भपका आणि ज्या ज्या कांहीं सभ्यतेच्या व शिष्टपणाच्या चाली व संप्रदाय होते ते सर्व फ्रान्सांत होते. अनुकरण करण्यासारखा देश हाच होता. पंधराव्या शतकापासून पुढें काव्यें, नाटकें, व इतर विद्याविषयक शास्त्रांकडे लोकांची नवी रुची लागली होती. तीप्रमाणें मोठे

मोठे नामांकित कवि व ग्रंथकर्ते फ्रान्स देशांतच निपजले होते. मागच्या शतकाच्या मध्यंतरीं जर्मनी व इंग्लंद वगैरे देशांत सुद्धां फ्रेंचाचें अनुकरण सुरू झालें, मग ज्यांच्या मनांत स्वदेशाबद्दल काडीभर ही अभिमान नवता अशा रूस लोकांनीं तर फ्रेंचांच्या सगळ्या चाली उचलल्या व आंधळें अनुकरण सुरू केलें यांत आश्चर्य नाहीं.

हें अनुकरण प्रथमतः वरवर होतें. पोषाख, खाणेंपिणें व इतर डामडौल मात्र सुरू झाला होता, परंतु क्याथराईन गादीवर येतांच, दरबारी व बडे सुशिक्षित लोकांवर फ्रेंचांचा पक्का अंमल बसला. सभ्य लोकांच्या संभाषणांतून देशभाषा गेली व फ्रेंच सुरू झाली. त्या भाषेचा अभ्यास सुरू झाला व ती बोलणारास मान मिळूं लागला. रशियन लोकांचा देश स्वतंत्र होता व फ्रान्स ही दूर होता असें असतां ही, अनुकरण व्हावें हें आश्चर्य आहे. प्रसिद्ध वालतेरशीं व " एन् सैक्लोपिडिया " नामक सार्वविषयक ग्रंथांत लेख लिहणाऱ्या प्रजासत्ताक, व धर्मांत विश्वास न ठेवणाऱ्या, नवीन मतांच्या लोकांशीं क्याथराईन इचा स्नेह होता व त्या लोकांशीं तिचा पत्रव्यहवार चाले. यामुळें रशियन दरबारांत फ्रेंच मतांचा प्रसार झाला. दरबारांत वजन राखण्यासाठीं व सुधारलेला म्हणवून घेण्यासाठीं, फ्रेंच भाषा बोलणें व फ्रेंच ग्रंथांची ओळख करण्याविषयीं जो तो खटपट करूं लागला. क्याथराईनपुढें फ्रेंच कवि कार्निल व रॉसिन यांच्या करुणरसप्रधान नाटकांचे व मालिएरच्या हास्यकारक प्रहसनाचे अनेक प्रयोग होत. रशियन भाषेंतच परकी ग्रंथांचें ज्ञान करून घेणाऱ्यासाठीं हजारों पुस्तकांचीं भाषांतरें झालीं, परंतु नवीन रचलेला असा त्या भाषेंत एक ही चांगला ग्रंथ झाला नाहीं ! या भाषांतरांच्या संपाद्यांत फ्रेंच ग्रंथकारांशिवाय, होमर डिमास्थेनीस्, सिसेरो, व्हर्जिल, दान्ते,सर्वान्तेस्,मिल्तन, फिल्डिंग वगैरे निरनिराळ्या युरोपीयन देशांतील प्राचीन व अर्वाचीन कवींचीं भाषांतरें झालीं.

अशा भाषांतरांपासून लोकांची माहिती व बहुश्रुतपणा वाढेल, परंतु मानसिक शक्ति वाढणार नाहीं. जोपर्यंत मनाच्या ग्रहणशक्तीलाच श्रम देण्याची संवय असते तोंपर्यंत स्वतंत्र विचार व कल्पनाशक्ति निघावयाची नाहीं. हा नियम ज्याप्रमाणें व्यक्तिबद्दल लागू पडतो त्याचप्रमाणें साऱ्या राष्ट्रालाही लागतो. जोंपर्यंत एकादें राष्ट्र, दुसऱ्या राष्ट्रापासून विद्याकलादिज्ञान आयतेंच घेतें, तोंपर्यंत तेथें मानसिक स्वातंत्र्य नाहींच असें समजावें. जोंपर्यंत परकी राष्ट्राचे आचारविचार, विद्या, ह्यांचा ओघ चालू असतो व परराष्ट्राची नक्कल उतरण्यांतच भूषण मानिलें जातें, तोंपर्यंत त्या देशांत स्वतंत्र व नवीन ह्मणून कांहींच व्हावयाचें नाहीं. तेथें बुद्धिमत्तेची व कल्पनाशक्तीची कमाल दाखविणें ह्मणजे परराष्ट्राचे विचार हुबेहुब प्रकट करणें होय. यावरून फ्रेंचांचें वारें अंगांत होतें तोंपर्यंत रूस लोकांत एकही उत्तम ग्रंथ निघाला नाहीं. ते अनुकरण करीत व परकी कवींचीं भाषांतरें उतरीत. पुढें सवंयीमुळें अनुकरण करण्यांत मात्र हे लोक निपूण झाले. परकी कवींचे विचार व कल्पना आपल्या भाषेंत हुबेहुब उतरण्यांत त्यांनीं आपलें कौशल्य दाखविलें. भाषांतरांच्या ग्रंथाचा आतां रूस देशांत बराच विसर पडला आहे.

याप्रमाणें रशियांत मागल्या शतकांत फ्रेंचांच्या इतिहासकाव्यांचाच फैलाव झाला एवढें नाहीं, तर या काळीं फ्रान्सांत जीं नवीन तत्वें बाहेर पडलीं होतीं, तीं सुद्धां रशियांत शिरलीं. या तत्वांच्या सपाट्यांत युरोपांत पूर्वीपासून चालत आलेल्या पारमार्थिक व तात्विक विचारांचा आणि शास्त्रीय सिद्धांतांचा शेवट झाला, त्यामुळें त्या वेळपर्यंत सर्वसंमत झालेल्या राजकीय व सामाजिक रचनेचे पायेच ढांसळले. आजपर्यंत जे धार्मिक व तात्विक विचार खरे मानले होते त्यांचा या नवीन तत्वज्ञांनीं फडशा उडविला व शेवटीं फ्रान्सांत लोकसत्ताक स्वतंत्र मतांचा प्रसार होऊन राज्यक्रांती झाली. पुढें हें वारें थोडेंबहुत इतर देशांतही शिरून त्यावेळच्या

सरकारांविरुद्ध बंडें उद्भवलीं. खालच्या लोकांत अशा विचारांचा फैलाव झाल्यामुळें त्या वावटळीपासून अलिप्त राहणें कठीण होतें, व विशेषतः अनुकरण करणाऱ्या रूसलोकांस तर रच कठीण होतें. त्या लोकांपैकीं 'सुधारलेले' म्हणविणाऱ्या श्रेष्ठ वर्गाचे लोकांस, आपल्या जुन्या चालींबद्दल प्रीति नवती व जर्मनी व इंग्लंद सारख्या इतर देशांतील लोकांप्रमाणें चांगलें चाईट निवडण्याची अंगीं योग्यताही नवती. यामुळें फ्रान्सांतील नव्या तत्वांचा अटकाव होणें सोपें नवतें. रशियनलोक जरी धार्मिक आहेत, तथापि धर्मतत्वांवर वादविवाद करणारे नाहींत, व त्यांस इतर धर्मांचा फारसा द्वेषही नाहीं, यामुळें या नवीन विचारांचा प्रसार धर्मखात्यांतील पाद्रीमंडळींतही झाला व ते लोकही त्यांचा फैलाव करूं लागले.

तसेंच या सुमारास युरोपांत कांहीं मंडळी अशी निघाली कीं तिला जगांत सध्यां चाललेल्या लबाड्यांचा व ढोंगीं आयुष्यक्रमाचा तिरस्कार आला होता. मनुष्याच्या अज्ञात प्राचीन अवस्थेची त्यांस इच्छा होऊं लागली. त्यांचे विचार काल्पनिक व मनोमय होते. मानवी जातीच्या खऱ्या सुखाचे, स्वातंत्र्याचे, उपजत अधिकारांचे व भूतदयेचे मार्ग शोधण्याकडे त्यांचें चित्त गुंगलें. या मंडळीचा मुख्य गुरु रुसू नामक एक फ्रेंच होता. या मतांचाही संसर्ग रशियाला पोंचला. जेव्हां सर्व मनुष्यें गुराखी होतीं, त्यांस पाहिजे तें करण्याची परवानगी होती, त्यांचें परस्परांशीं बंधुत्वाचें व प्रेमाचें वर्तन होतें व जेव्हां जगांत हल्लींच्या सुधारणेच्या लबाड्या व ढोंगें नवतीं, तेव्हां आपण जन्मलों असतों तर चांगलें झालें असतें, इत्यादि काल्पनिक सुख दुःखावरून ते अश्रु ढाळीत. या मतांपासून शृंगार व करुणरसभरित काव्यें व कथानकें त्यांस आवडूं लागलीं, आणि स्त्रीपुरुषांच्या परस्पर संबंधावर व सुखदुःखावर भाषणें, विचार व लेख सुरू झाले अशा मस्तक फिरवून टाकणाऱ्या कल्पनांनीं व भावनांनीं सरस झालेल्या लोकांचें रशियांत वरेंच वेड शिरलें आणि त्यामुळें कांहीं कालपर्यंत अशा कवित्वरूपी, कल्पनामय, व भ्रममय काव्यांचें वाचन फार माजलें.

फ्रेंच राज्यक्रांती झाल्यावरोवर हीं भ्रमात्मक तत्वें व रंगेल विचार नाहींसे झाले 'मनुष्यांचे स्वाभाविक हक्क,' 'स्वातंत्र्य,' 'लोकसत्ता' इत्यादि विषयांवर चर्चा करणारे लोकांस १७८९ त पारीस शहरांत झालेल्या भयंकर दंग्याचें वर्तमान कळतांच, वाटलें कीं हीं तत्वें काव्यांत व पुस्तकांतच चांगलीं, परंतु तीं जर व्यवहारांत शिरलीं तर भलभलते अनर्थ व उत्पात होतील. राज्यें धुळधाणीस मिळविणारीं, वडे लोक व वडे धर्माधिकारी वगैरे हक्कदार लोकांची दुर्दशा करणारीं, समाजरचना उलथणारीं, श्रीमंतांचें द्रव्य घेऊन सर्वांची संपत्ति सारखी करण्याचा उपदेश करणारीं, आणि शेंकडों वर्षें पूज्य मानलेल्या धर्मावर व आचारांवर लात मारणारीं, फ्रेंच लोकांचीं नवीं तत्वें, फ्रान्स देशांतच चाललीं. रशियांतील उच्च वर्गानें बाह्यतः परकी राष्ट्राचें अनुकरण केलें होतें व झारांनीं ही फ्रेंचांच्या मतांस माना डोलविल्या, तथापि त्या तत्वांस अनुसरून त्यांनीं त्या देशांतील कनिष्ठ प्रतीच्या लोकांस स्वातंत्र्य दिलें नाहीं, व समत्व, बंधुप्रीति इत्यादि विचारांस व्याख्यानांपुरतेच मान मिळे. रशियांतील खालच्या लोकांस जर हे विचार कळते तर पितर्सवर्गात ही पारीसचा देखावा दृष्टीस पडता, परंतु रशियांतील लोकांत हे विचार पसरले नवते म्हणून पारीसचा दंगा होतांच रशियांतील वड्या लोकांचे डोळे उघडले. फ्रेंच लोकांनीं आपले आपले अधिकार मिळविण्यासाठीं स्वातंत्र्याच्या देवतेस जेव्हां आपल्या राजाचा पहिला बळि अर्पण केला व वड्या हक्कदारलोकांच रक्तांचें तिला स्नान घातलें, तेव्हांच या तत्वांचें खरें स्वरूप रशियन दरबारी लोकांस कळलें. फ्रान्सांत चालेलल्या कत्तलीची, व एका सपाट्यासरशी श्रेष्ठ व कनिष्ट असे समाजांतले भेद नाहींसे केल्याची वदंता कळतांच सर्वांस या तत्वांविषयीं भय उत्पन्न झालें. इतकें दिवस हीं तत्वें बोलण्यांत येत होतीं व खुद्द कॅथराईनही त्यांत मन घाली, परंतु वरील गोष्टींपासून, तिचे विचार एकदम पालटले आणि फ्रान्सार्चें अनुकरण करण्याचा जो झपाटा चालला होता

तो एकदम बंद झाला व तेव्हांपासून परराष्ट्रांविषयीं रूसलोकांत तिटकारा उत्पन्न झाला.

ही पालट होतांच रूस देशांत देशाभिमान जागृत झाला. १८१२ त फ्रेंचांची स्वारी त्या देशावर झाल्या बरोबर सगळ्या रूसलोकांस स्वदेशप्रीतीचा ऊत आला व आपल्या बलाढ्य शत्रूचा नाश करण्या-साठीं त्यांनीं मास्को शहर जाळून टाकिलें व नेपोलियनच्या फौजेची दुर्दशा उडविली. तेव्हांपासून कांहीं वर्षें फ्रान्स देशांचें नांव काढ-ल्यास त्यांस संताप येई व फ्रेंचाची स्तुति केली तर सरकाराकडून कडक शिक्षा मिळे. सगळ्या युरोपास जिंकणाऱ्या नेपोलियनाचा रूस लोकांनीं नाश केल्यामुळें त्या लोकांची जगभर ख्याति झाली व पश्चिम युरोपांतील लोकांचें लक्ष राशियाकडे गेलें.

परंतु ही देशाभिमानाची उडी थोडा काळ टिकली, व पुढें हळुहळु 'स्वदेशप्रीति, देशाभिमान, देशमाता' इत्यादि शब्दांची थट्टा होण्यास सुरुवात झाली. परशत्रूची भीति दूर झाल्यावर व सर्व लोक नित्यक्रमास लागतांच सुशिक्षित लोकांत परभाषेंतील ग्रंथांचें अवलोकन सुरू झालें. आपल्या भाषेंत ग्रंथ नसल्यास परभाषेचे कां वाचूं नयेत? ह्या ठरींव उत्तरावर देशाभिमानी लो-कांस चप्प बसावें लागे. परकी ग्रंथांबरोबर पुनः परकीय मतें व विचारही येऊं लागले व क्षणभर चढलेलें देशाभिमानाचें वारें उतरून गेलें.

परंतु या शतकाच्या आरंभीं जीं मतें व ज्या विद्या परभाषें-तील ग्रंथांतून राशियांत येऊं लागल्या, त्यांचें स्वरूप क्याथराईन-च्या वेळीं आलेल्या ज्ञानाहून भिन्न होतें. फ्रान्स देशांतील राज्यक्रांती, नेपोलियनच्या स्वाऱ्या, देशाभिमानी युद्धें, बोर्बन घराण्याचें फ्रेंच गादीवर पुनरारोहण व दुसऱ्या महत्वाच्या गो-ष्टींनीं पश्चिम युरोपांत मानसिक ज्ञानाचा कल फिरला व राजकी-य विचारही पालटले होते. या सुमारास फ्रान्साच्या उदाहरणा-बर युरोपांत बंडें होण्याचीं चिन्हें दिसूं लागताच युरोपांतील रा-जकीय घराण्यांनीं आपली राज्यपद्धति कडक केली. ह्यासंबंधानें मागें (७३ पृष्ठांत) उल्लेख आलाच आहे. जुलमी अंमल

पुनः चालू झाला व छापखान्यांवर सरकारची करडी नजर झाली. रशियांत राजकीय विषयांवर चर्चा करण्याची मनाई होतांच मासिक व पाक्षिक पुस्तकांत साधारण व्यवहारिक किंवा गायन, नाट्य, आलेख्य, काव्य इत्यादि निरुपद्रवी विषयांवर मात्र लेख येत. कायद्यानें लेखणी बंद केली, पण तोंड बंद केलें नव्हतें. छापणें बंद झालें, परंतु रशियांतील तरुण शिक्षित लोकांचे क्लब, सभा किंवा लहानसान जमावांत राजकीय वगैरे विषयांवर उघड वादविवाद होत. नेपोलियनचा पराभव होऊन युरोपास शांतता मिळाल्यावर युरोपांतील जुनाट राजकीय घराण्यांनीं, फ्रेंच तत्वज्ञांच्या व राज्यशत्रूंच्या विचारांचा व मतांचा युरोपांतून निमोड करावा व राज्यें पूर्ववत् अनियंत्रित रीतीनें व जुलमानें चालवावीं, असा ठराव केला होता. लोकमतास दाद न देणें, ग्रंथ नाहींसे करणें, व वर्तमानपत्रांच्या मुसक्या बांधणें, " लोकांचे सहजिक हक्क " वगैरे बंडखोर विचारांस निर्मूल करणें इत्यादि जुलमी प्रकार युरोपीय राष्ट्रांत सुरू करण्याचा राजपक्षीय लोकांचा बेत झाला. या मताचा रशियनझार, पहिला अलेक्झांदर तर फारच अनुकूल होता. या ठरावान्वयेंच रशियांत ग्रंथ छापणें कायद्याच्या दाबांत ठेवलें होतें.

फ्रेंच राज्यक्रांतीच्या पूर्वी जीं तत्वें चोहोंकडे फैलावलीं होतीं, तीं ह्मणजे अगदीं वाईट ठरलीं असें नाहीं. पण त्या तत्वांचा सारासार विचार न करितां मन मानेल तसा समाजांत तुमडा केल्यानें फ्रान्स देशांत जो भयंकर अनर्थ कोसळला व युरोपांत सुद्धां त्यांच्या योगेंकरून चोहोंकडे जीं बंडें व लढाया सुरू झाल्या, त्यांपासून लोकांचे डोळे उघडले व त्या तत्वांविषयीं पराच संशय वाटूं लागला; म्हणून तीं तत्वें व्यवहारांत तासून कानमन नीट केल्यावरच आणिलीं पाहिजेत, नाहींतर हितापेक्षां अहित जास्तच होण्याचा संभव आहे अशी दूरदर्शी लोकांची खात्री झाली.

या सुमारास रशियन लोकांच्या संभाषणांत महत्वाचे प्रौढ विचार कांहींच नसत; ताज्या ताज्या पुस्तकांतील वाक्यांवर ते वाग्यफळ वटवट मात्र पुष्कळ करीत. त्यांच्या हातुन तेथील सर-

काराविरुद्ध कोणतेंच कृत्य झालें नसतें. त्यांचीं भाषणं शिळोप्याच्या गप्पांला योग्य होतीं. अशल्या रिकाम्या संभाषणापेक्षां त्यांच्या हातून कांहींच होण्यासारखें नव्हतें हें खरें, परंतु त्यांमुळें त्या लोकांत नवीन चमत्कारिक विचार किंवा अघटित कल्पना ऐकण्याची गोडी वाढत चालली. ते विचार नास्तिक, धर्मविमुख, नीतिविरुद्ध किंवा बंडखोर असले तरी, श्रोते मंडळी मिळूं लागली. राजकीय गोष्टींत उघडपणें मन घालणें म्हणजे राजद्रोह मानिला होता म्हणून कांहीं ते विचार त्यांच्या डोळ्यांपुढून जात नसत. आपल्या देशाच्या राजकीय पद्धतींत सुधारणा करण्यासाठीं या लोकांनीं चमत्कारीक उपाय चालविले. कित्येक तर मंत्रतंत्र, जादू, योगसाधन वगैरे विषयांत मन घालूं लागले व त्यांपासून आपल्या सर्व सामाजिक व राजकीय अडचणी दूर होतील असें त्यांस वाटे! परंतु हा श्रम व्यर्थ झाल्यावर अर्थशास्त्र, कायदेकानू, आपल्या देशाचा इतिहास व रीतीभाती, इत्यादि अध्ययनानें त्या जातील असें ही कांहीं व्यवहारीक लोकांस वाटूं लागलें.

प्रत्येकवेळीं कालमाहात्म्याप्रमाणें आपल्या सामाजिक व राजकीय अडचणी अमुक अमुक उपायांनींच दूर होतील अशी कित्येकांस भ्रमात्मक खात्री असते. कित्येकांचा धर्मांत, कित्येकांचा भूतदयेंत, कित्येकांचा कायद्यांत किंवा सार्वजनिक शिक्षणांत किंवा व्यापारांत, पक्का भरवसा असतो. यांपैकीं प्रत्येकास वाटत असतें कीं. आपल्या उपायांनींच देशाच्या आधिव्याधि दूर होतील. या समजावर नेपोलियनचा पराभव झाल्यावर कांहीं वर्षांनीं युरोपांत राजकीय सुधारणा करण्यासाठीं गुप्त मंडळ्या स्थापण्याचा झपाटा सुरू झाला. त्याप्रमाणें त्याला शिक्षितांतही अनुयायी मिळाले. अशा गुप्त मंडळ्या स्थापन होण्यास जीं कारणें होतीं, त्यांपैकीं मुख्य असें होतें कीं, जेव्हां बोनापार्टानें युरोपांतील बहुतेक राज्यें पादाक्रांत करून फ्रेंचाचा त्रिवर्णध्वज पोर्तुगालपासून रशियाच्या हद्दीपर्यंत फिरविला, तेव्हां त्या युरोपांतील राजघराण्यांनीं व तत्पक्षीय लोकांनीं, फ्रेंचांना घालविण्यासाठीं आपल्या प्रजेंत देशा-

भिमान जागृत केला. तेव्हां राजांनीं आपल्या प्रजेस पुष्कळ वचनें दिलीं व कायदेकानू सुधारण्याकडे व लोकसुख वाढविण्याकडे लक्ष देण्याचें कबूल केलें. परंतु बोनापार्ताचा नाश होऊन, या पदभ्रष्ट झालेल्या राजांचा अम्मल कायम झाल्यावर, तीं वचनें त्यानीं गुंडाळून ठेविलीं व पूर्ववत् जुलमी व शिरजोर राज्यरीति सुरू केली इतकेंच नव्हे, तर लोकसत्ताक मतांचा प्रसार होऊं नये ह्मणून आपसांत तह केले व कडक कायदे अमलांत येऊं लागले. असा प्रकार होतांच लोकांना असें वाटूं लागले कीं, नेपोलियन काय वाईट होता? स्वदेशासाठीं जे आह्मीं लढलों ते पुनः जुलमांत पडण्यासाठीं कीं काय? या प्रश्नांचें उत्तर, गुप्त मंडळ्या स्थापून राजांची खोड मोडावी असें त्यांस सुचलें. त्याप्रमाणें १८२० पासून पुढें इटाली, स्पेन, जर्मनी, फ्रान्स, ग्रीस, वगैरे देशांत वेगवेगळ्या गुप्त मंडळ्या स्थापन झाल्या. त्यांचा उद्देश तेथील राजघराण्यांचा नाश करण्याचा होता. १८२५ त सेंतपितर्सबर्ग येथेंही एक गुप्त मंडळी निघाली; तिचा बेत असा होता कीं, फौजेंत फितुर करून बंड करावें व राजघराणें नाहींसें करून लोकसत्ताक राज्याची स्थापना करावी, पण या गुप्त मंडळीचे बेत बाहेर फुटले, व सामील लोकांस तोफेच्या तोंडी मोक्ष मिळाला! त्या दिवसापासून रशियन सुधारकांची धांदल उडाली. पितर्सबर्ग शहरांत तो दंगा होण्यापूर्वी जे उत्साह, तमाशे व चैन चालली होती ती सर्व नाहींशी झाली. वाचाळ मंडळीच्या गप्पा बंद झाल्या आणि धर्म, नीति, विद्या, राजनीति वगैरे विषयांवर छुप्पांत व कॉफीखान्यांत चालणाऱ्या भाषणांतून जे भयंकर विचार निघत ते जागच्या जागींच जिरले, त्या लोकांत धास्ति उत्पन्न झाली व असल्या जमण्याच्या जागा रिकाम्या झाल्या. रूससरकारनें असल्या गडबडींत व चळवळींत मन घालणाऱ्यांस कारागृहांत टाकिलें व चोहींकडे इरारा बसविला.

निकलस झारानें तर सक्त हुकूम सोडिले कीं तात्विक व राजकीय विषयांवर बिलकुल चर्चा करूं नये! त्यानें आपला हु-

कुम तोडणाऱ्यांस हद्दपार केलें व दुसऱ्या कडक शिक्षा देऊन, तरूण, व इर्पेच्या मंडळीचे राजकीय विषयांवरील मनांतले तरंग जागच्या जागीं जिरविले ! तेव्हांपासून अर्थशास्त्र, सामाजिक व राजकीय सुधारणा, सरकारचें गैरशिस्त वर्तन इत्यादि विषयांवर कोणीहि भाषण करीनासा झाला; आणि पत्ते खेळण्यांत, हुक्का किंवा मद्य पिण्यांत किंवा फ्रेंच भाषेंतील शृंगारमय कादंबऱ्या व नाटकें वाचण्यांतच कालक्षेप व कर्मणुक करणें सर्वांस निर्भय दिसलें.

निकलसच्या कायद्यांपासून रूसदेशांत जी मानसिक सुधारणा व ज्ञान वृद्धि वाढत होती तिची गति मंद झाली, व बुद्धिवान् पुरुषांच्या मानसिक शक्तीला कोठेंच वाव नसल्यामुळें कल्पनामय काव्यकादंबऱ्या करण्याकडे त्यांची प्रवृत्ति झाली. निकलसाच्या कारकीर्दीत रशियन कविता उत्कर्ष पावूं लागली व लोकांच्या कवित्वशक्तीस स्फुरण येऊं लागलें. काव्यें व नाटकें लिहणारांस सरकारांतूनही आश्रय मिळाला. त्याच्या कारकीर्दीत ज्ञानवृद्धि जरी झाली नाहीं, तथापि कल्पनासृष्टींत पुष्कळ ग्रंथापत्य उत्पन्न झालें. या सुमारास रशियन भाषेंत कल्पित् मनोरंजक ग्रंथ पुष्कळ निघून त्या भाषेस नवें स्वरुप मिळालें. परंतु अतिशयोक्तिपूरित कल्पनासमुद्रांत बुडी मारण्यास लावणाऱ्या काव्यकथानकांची परमावधि झाली म्हणजे, त्यांचा सुद्धां वीट येतो. त्याप्रमाणेंच या कादंबऱ्यांचा लोकांस कंटाळा येऊन ज्यांत कल्पनासृष्टि कमी असून संसाराच्या व व्यवहारांतल्या हंमेश घडणाऱ्या गोष्टींचे हुबेहुब चित्र असतें, अशा ग्रंथांविषयीं मात्र जास्त अभिरुची उत्पन्न झाली. अशीं कथानकें लिहिणारा गोगोल नांवाचा एक प्रख्यात कवि रशियांत नुक्ताच होऊन गेला. त्याचे ग्रंथांत मानवी स्वभावाचें, त्याच्या सर्व स्थितींतलें चित्र काढलें असून, त्याची भाषा चटकदार, विनोदपर व व्यवहारांतली आहे, अशी त्याची प्रसिद्धि आहे. त्याच्या कथेंतील पात्रांचीं नावें म्हणीप्रमाणें सर्वतोमुखीं झालीं आहेत. तेथील भाषेंत ग्रंथरचना व त्यांची परीक्षा करणारांचें लक्ष इतके दिवस भाषेच्या बाह्य

सौंदर्याकडे फार होतें, ह्मणून विदग्धरचना वाढून ग्राम्यप्रयोग कमी झाले व अर्थगौरवापेक्षां शब्दसौंदर्याकडेच विशेष गोडी लागली; परंतु नवीन तऱ्हेचे कवि लिहूं लागल्यापासून अर्थगौरवाकडे ही लोकांचें लक्ष लागलें. निकलसाच्या कडक राजनीतीचे वास्तविक परिणाम फारच वाईट झाले. कांहीं काळपर्यंत जरी लोकांचें लक्ष सौम्य विषयांकडे होतें, तथापि जुलमानें व कायद्यानें तोंडें बांधून राजकीय चर्चा बंद करण्यांत त्यानें जी चूक केली, तिचा परिणाम त्या सरकारास सदोदित भोगावा लागणार आहे.

युरोपांत गुप्त मंडळ्या स्थापन झाल्यावर रशियांतही झाल्या ह्मणून वर सांगितलेंच आहे. तथापि निकलस झाराच्या भरभराटींत राजसत्तेविरुद्ध व सरकाराचे वर्तनाविरुद्ध मसलतींत असणाऱ्या लोकांचें कांहींच चालत नवतें. परंतु त्याच्या कारकीर्दीच्या अखेरीस व क्रिमियाच्या लढाईंत पराभव झाल्यावर, निवळ राजनिष्ठ लोकांचे मुखांतूनही झारांची राज्यरीति दुष्ट आहे असे उद्गार बाहेर पडूं लागले. १८४८ त फ्रान्स देशांत पुनः बंड झालें व लोकसत्ताक राज्याची स्थापना झाल्यावर इटली, स्पेन वगैरे देशांतील लोकांप्रमाणें रूस लोकांत राजसत्तेविरुद्ध गडबडी सुरू झाल्या. पश्चिमयुरोपांतील स्वातंत्र्याचे विचारांची गोडी लागलेल्या सुशिक्षित लोकांस झारांचा जुलमी राजनीति अर्थातच विषम वाटूं लागली, परंतु त्यांना आपले विचार उघडपणानें प्रगट करतां येईनात ह्मणून, त्या लोकांची प्रवृत्ति गुप्त मंडळ्या स्थापन करण्याकडे वळली. ज्या देशांत लिहिण्याचें व बोलण्याचें स्वातंत्र्य असतें त्यांत असले विचार गुप्त रहात नाहींत, परंतु तसे रशियांत रहाणें साहजिकच होतें. कारण लोकांस शिक्षण मिळून आपल्या स्वाभाविक हक्कांचा विचार करण्याची योग्यता त्यांचे अंगीं आली असतांही, राजकीय गोष्टींत मन न घालण्याविषयीं त्यांच्यांवर जुलूम करण्यानें, राज्यांत बंडें वाढत जातात, व त्याप्रमाणेंच आपल्या प्रजेचे मनांत वैषम्य व अस्वास्थ्य उत्पन्न होण्याचीं कारणें न शोधतां व

लोकांचीं योग्य मागणीं न देतां, त्यांच्यावर जास्तच जुलूम केल्यानें कोठलीही राजसत्ता टिकली नाहीं हें इतिहासप्रसिद्धच आहे. निकलस झारानें व कांहीं अंशीं माजी झार अलेक्झांडर यानें हीच राजनीति चालविली होती. तथापि अलेक्झांदरच्या कारकीर्दींत लोकांत बंड होण्याचीं चिन्हें दिसूं लागतांच, त्यानें प्रथमतः आपल्या देशांतील गुलामांस स्वातंत्र्य दिलें व लोकांस स्थानिकस्वराज्य वगैरे अधिकार दिले, तथापि या अस्वस्थ व बंडखोर लोकांची तृप्ति न होतां त्यांनीं जास्तच मागण्या सुरू केल्या पूर्वापार एकसत्ताक व अनियंत्रित राज्य करण्याची गोडी लागलेल्या रूस सरकारास त्या मागण्या देणें कठीण वाटलें. तरी विचाऱ्या माजी झारानें आपल्या लोकांची खरी योग्यता मनांत आणून बऱ्याच चांगल्या गोष्टी करण्याची सुरवात केली होती, परंतु फ्रान्स देशाच्या सोळाव्या लुई प्रमाणें बंडखोरांनीं त्याचा प्राण व्यर्थ घेतला. गुलामांस स्वातंत्र्य मिळाल्यापासून रूस देशांतील लोकांस जास्त स्वातंत्र्य मागण्याची इच्छा उत्पन्न झाली व तिची निराशा झाल्यावर तेथें एक गुप्त मंडळी स्थापन झाली आणि तिनें राजाची सत्ता नाहींशी करण्याच्या खटपटी चालविल्या. या सर्व लोकांस रूस सरकार सामान्यतः 'निहिलिस्त' म्हणतें. वास्तविक पहातां निहिलिस्त हा शब्द जास्त स्वातंत्र्य व जास्त हक्क मागणाऱ्या सर्वच रशियन सुशिक्षित लोकांस लावितां येत नाहीं. कारण या नांवाखालीं येणारे लोकांचीं मतें इतकीं भयंकर आहेत, कीं तीं कोणत्याही प्रजासत्ताक राज्यांत मान्य होणार नाहींत. सरकारच्या विरुद्ध कुरकुर करणारे सगळे ' निहिलिस्त'च आहेत अशा समजुतीनें रूस सरकारानें शेकडों लोकांस विनाकारण शिक्षा दिल्या आहेत. परंतु खरोखर निहिलिस्त मताचे लोक थोडे आहेत व विशेषतः त्यांचीं मतें मानवी स्वभावाच्या इतकीं विरुद्ध आहेत, कीं त्या लोकांची संख्या वाढणें ही कठीण दिसतें. तथापि आलीकडे पांचदहा वर्षांत या लोकांच्या गुप्त मंडळ्यांनीं रूस देशांत जीं भयंकर कृत्यें केलीं, त्यांवरून त्यांचें नांव जगभर झालें आहे.

मागल्या शतकांत जेव्हां मानवी स्वातंत्र्य स्थापन करण्याविषयीं फ्रान्स देशांत चळवळ सुरू झाली, तेव्हांपासून, जगांत ह-ल्लीं सांपडणाऱ्या सामाजिक, राजकीय व धर्म संबंधी व्यवस्था चांगल्या आहेत किंवा नाहींत, असे तात्त्विक विचार सुरू झाले. या विचारांत मन घालणाऱ्या लोकांपैकीं पुष्कळांनीं, मनुष्याचें दारिद्र्य व विपत्ति दूर करण्यासाठीं सामाजिक व राजकीय वगैरे व्यवस्थेंत अमुक अमुक फेरफार करावे अशा सूचना जगापुढें मांडिल्या. त्या लोकांच्या फ्रान्स, जर्मनी, इंग्लंद, ऐर्लंद वगैरे देशांत बऱ्याच मंडळ्या आहेत. याच लोकांच्या पद्धतीवर निहिलिस्त लोकांचे विचार आहेत. जिवाला त्रासलेले, अर्ध शिक्षित, निराश झालेले लोकच या गुप्त मंडळींत आहेत. हे केवळ शून्यवादी आहेत. 'कायदा नाहीं व धर्म नाहीं' या चार शब्दांतच यांचें सर्व मत येतें. सांप्रत जगांत चालू असलेल्या समाज, धर्म, कायदा, सरकार वगैरे गोष्टींची वाताहत केल्याशिवाय कांहीं मनुष्याची विपत्ति दूर होऊन सुखवृद्धि होणार नाहीं, असें याचें मत आहे. सरकार व धर्म, या दोहोंच्या बंधनांतून मुक्त झाल्यावरच लोक सुखी होतील असें समजून, निहिलिस्त लोकांनीं रशियन सरकाराशीं व धर्माशीं गुप्त युद्ध चालविलें आहे. त्यांनीं आपले दुष्ट उद्देश सिद्धीस नेण्यासाठीं पुष्कळ ठिकाणीं आगी घातल्या, सरकारी कामदारांचे खून केले व झाराचाही प्राण घेतला ! हे प्रकार सुरू होतांच रूससरकारानें या गुप्त मंडळ्या नाहींशा करण्याची पुष्कळ खटपट करून, त्यांच्या मुख्य पुढाऱ्यांस जन्मठेपा दिल्या व कित्येकांस हद्दपार केलें. यांपैकीं कित्येक इंग्लंद, स्विझर्लंद, इटालि इत्यादि देशांत जाऊन राहिले आहेत व तेथून ते रशियांतील निहिलिस्तांशीं पत्रव्यवहार चालवितात; त्यांत हर्झेन, व बाकुनिन वगैरे प्रख्यात निहिलिस्त मतांच्या प्रसारकांनीं 'कोलोकोल (घंटा), नामक एक रशियन भाषेंत वर्तमान पत्र चालविलें. तें प्रथम लंदन व नंतर जेनेवा शहरांत निघे. हें पत्र बंडखोर–प्रजासत्ताक लेखांनीं भरलेलें असे. बाकुलिन यानें १८६८ त केलेल्या भा-

पणाचा उतारा पुढें दिला आहे त्यावरून, निहिलिस्त मताचें स्वरुप स्पष्ट होईल. तो ह्मणतोः—

"बांधवहो, तुह्मांस एका नूतन धर्माचा उपदेश करण्यास मीं आलों आहें. या धर्माचा प्रसार या पृथ्वीवर झालाच पाहिजे. या धर्माचीं तत्वें संदिग्ध व अस्थिर नाहींत. जुनी सृष्टि नाहींशी होऊन नवीन निर्माण झाली पाहिजे व जगांत अन्यायाचा लेशही राहतां नये."

"'आमच्या नवीन धर्माची पहिली आज्ञा जगांतील असत्य नाहींसें करावें ह्मणून आहे; त्याप्रमाणें 'मूले कुठारः' या न्यायानें, प्रथमतः जगांतील सर्व खोटसाळपणाचें, लबाडींचें व विपत्तीचें मूल असें असत्य ह्मणजे 'देव'; तें नाहींसें केलें पाहिजे. या विश्वाचा चालक कोणीएक 'परमेश्वर' आहे, अशी मिथ्या व लबाड कल्पना लोकांच्या मनांत भरवून, आज हजारों वर्षें धर्मोपदेशकांनीं व राजांनीं आपला निर्वाह चालविला आहे. तसेंच आपल्या जुलमी सत्तेचा व कायद्यांचा अम्मल अव्याहत चालावा ह्मणून, त्यांनीं 'परलोक' कल्पून तेथें 'देव' शिक्षा देता, अशी भीति घातली आहे. हा 'देव' दुसरें कांहीं नसून, पृथ्वीवरील जुलुमाचें मुर्तिमंत कल्पित चित्र आहे. पृथ्वींतील $\frac{९}{१०}$ लोकांनीं $\frac{१}{१०}$ लोकांच्या जुलमाखालीं रहावें म्हणूनच या लबाड्या पसरिल्या आहेत.

* * * * * *

"पहिली खोटी गोष्ट 'देव'; दुसरी 'हक्क'. शक्तीच्या जोरावर मिळविलेल्या धनाचें संरक्षण व्हावें ह्मणून 'हक्कां'ची लबाड कल्पना काढली आहे. परंतु याच 'हक्कांचें' जोरापुढें कांहीं चालत नाहीं. हक्कांची लबाडी मनांत भरवून व $\frac{१}{१०}$ लोक, $\frac{९}{१०}$ लोकांवर अंमल चालवितात.

* * * * * * *

"ज्यानें सुख वाढेल तोच तुह्मीं कायदा करा तें सुख वाढविण्यासाठीं प्रथम सांप्रतच्या राजकीय व सामाजिक इमारतींचे पायेच ढांसळले पाहिजेत. धर्म व राज्य नाहींसें करण्याची वेळ येईल तेव्हां, कांकु होऊं नये, असें शिक्षण आपल्या मुलांस द्या. जगांत जेवढें ह्मणून जुनें आहे त्याचा नाश केला पाहिजे. हल्लींच्या चांगल्या व वाईट, दोन्ही गोष्टींचा नाश केल्याशिवाय उपायच नाहीं. आंगलया गोष्टी जरी ठेविल्या तरी मागल्या काळाचें स्मरण राहाणारच, ह्मणून त्याही नाहींतशा केल्या पाहिजेत. असें केल्यावरच जगांत पुढें होणाऱ्या पिढींचें सुख वाढेल व सांप्रत दिसणारी विपत्ति दूर होईल."

"बादशहा किंवा इतर सरकारी कामदारांचे खून केल्यानें, त्यांच्याविषयीं असलेला पूज्यबुद्धि लोकांचे मनांतून नाहींशी होते. धर्म व सत्ता यांचा नाश करण्याची सवय झाल्यानेंच, आपले उद्देश पुढें सिद्धीस जातील."

अशीं मतें बाळगणारे लोकांस पृथ्वीवर थोडेच अनुयायी मिळतील! रशियांत सरकाराच्या राज्यरीतिविरुद्ध टीका करणाऱ्या सगळ्या लोकांस निहिलिस्त ह्मणतात ह्मणून या

मतांचे लोक फार आहेत असें वाटतें. तथापि तेथें अशा मतांचा प्रसार होण्याचीं कारणें अनेक आहेत. रशियन लोकांचा स्वभाव बराच उतूं आहे, यामुळें कोणत्याही गोष्टीचा पुरा विचार केल्याखेरीज ते त्यांत हात घालतात; त्यांस राजकीय शिक्षण आजपर्यंत फारच थोडें मिळालें आहे; कांहीं सुशिक्षित लोकांच्या मागण्यावरून गुलामसोडवणुक, स्थानिकस्वराज्य वगैरे गोष्टी त्यांस मिळाल्या, परंतु त्यांपासून स्वातंत्र्य, समता वगैरे विचारांचा मात्र फाजील फैलाव झाला; तसेंच देशांत आगगाड्या झाल्यापासून पश्चिम युरोपाशीं दळणवळण फार वाढून तिकडील सगळ्या कल्पना रूसदेशांत भराभर शिरतात व रुसांना पूर्वीपासून अनुकरणाची संवय असल्यामुळें त्या कल्पना उचलणारी मंडळी तेथें पुष्कळ मिळते. अलीकडे जरी रशियन लोकांच्या बुद्धीचा विकास होऊन अनुकरण कमी झालें आहे, तथापि त्याचा वाईट परिणाम त्या लोकांस पुष्कळ दिवस भोंवेल. निहिलिस्त मतांचा प्रसार होऊं न देण्याचा मुख्य उपाय म्हणजे लोकांच्या योग्य मागण्या देऊन त्यांना खुषी ठेवणें हा होय. परंतु रूस सरकार तसें न करतां गुप्त पोलिसाच्या द्वारानें व कडक शिक्षांच्या भीतीनेंच हें बंड मोडेल, असें समजतें. वर्तमानपत्रांचें व बोलण्याचालण्याचें स्वातंत्र्य मिळाल्यावर, निहिलिस्त लोक अर्धे कमी होतील. हल्लीं मास्को व पितर्सबर्ग येथील कांहीं वर्तमानपत्रांस मात्र थोडेसें स्वातंत्र्य दिलें आहे, बाकीच्यांस उघडपणें कांहींच लिहितां येत नाहीं. परदेशांतून येणारीं वर्तमानपत्रें लोकांनीं वाचल्यास त्यांचीं मनें बिघडतील या भीतीनें, सरकारच्या पसंतीस न येणारे लेख परकी वर्तमान पत्रांतून फाडून टाकल्यावर, तीं फाटकीं तुटकीं पत्रें लोकांस मिळतात ! अशा मुर्खपणाच्या गोष्टी कमी होईपर्यंत निहिलिस्त व बंडखोर लोकांचा मोड होणार नाहीं हें स्पष्टच दिसतें!

रूस देशांत १८८२ सालीं ४७२ वर्तमानपत्रें निघत होतीं; त्यांपैकीं ३७७ रशियन भाषेत चालत. वर्तमान पत्रांत सरका-

ण रा विरुद्ध मजकूर येऊं नयेत ह्मणून एक देखरेख करणारा काम-
त्व दार नेमिला आहे, त्याला कोठलेंही पत्र एकदम बंद करण्याचा
अधिकार आहे. 'मास्को जर्नल' नामक पत्राचा खप फार अ-
अ सून तें युनिव्हर्सितींतील लोक चालवितात; त्याच्या खालोखाल
सां झा पेतर्सबर्ग येथें निघणारें 'गोलोस' हें पत्र प्रसिद्ध आहे.

प्रकरण ९ वें.

रशिया व इंग्लंद—रशियाचा एशियेंत राज्य-विस्तार—सैबेरिया—मध्य एशिया-विषयाचें महत्व—स्वरूपवर्णन—उत्पन्न, व्यापार व दळणवळण—आर्य व त्युतान लोकांचें भिन्न स्वरूप—लोकवर्णन—धर्म—रशियाचा इराणाशीं संबंध—काकेससपर्वतावरील स्वारी—खिवावर स्वारी—खोकान व बुखाऱ्याशीं युद्धें—पुनः खिवा—तर्कोमन लोकांशीं युद्धें—रशियाचा चीन, जपान व कोरिया ह्या देशांशीं संबंध—इ०

मागिल आठ प्रकरणांत रशिया व रशियन लोक ह्यांअविषयीं विशेष सांगण्यासारखें होतें तेवढें सांगितलें. ह्या व ह्यापुढील प्रकरणांत रशियन लोकांच्या एशियेंतील राज्याची व राज्यकारस्थानांची हकीगत दिली आहे.

एशियाखंडाचा नकाशा हातांत घेतल्यावर दिसेल, कीं या खंडांत दोन सोड्या युरोपीयन लोकांनीं आपलीं राज्यें स्थापिलीं आहेत. दक्षिणभागीं इंग्लिशांचा जोर आहे व उत्तरेकडून रशियाची पुढें चाल आहे. या दोन्हीं राष्ट्रांत चढाओढ लागून परस्परांविषयीं मत्सरभाव उत्पन्न व्हावा हें साहजिक आहे; कारण या खंडांत राज्यें स्थापण्यांत दोघांचे हेतु सारखे व एकच आहेत. या दोन्हीं राष्ट्रांनीं आपला अंमल कसा वाढविला व आप-

ल्या राज्यास नवे प्रांत व देश कसे जोडिले हें मनांत आणल्या
स, या दोहोंच्या सरहद्दी मिळाल्या पाहिजेत असा तर्क सहज
निघतो. इंग्लिशांनीं आपलें राज्य कसें वाढविलें तें पुढील भा
गांत सांगितलें आहे, यांत फक्त रूसलोकांनीं आपला घाय म
ध्य एशियेंत कसा शिरकवला व आपली हद्द आफगाणिस्थानास
कशी मिळविली हें दिलें आहे.

एशियाखंडापैकीं सैबेरिया, मांचुरिआचा थोडा भाग, स्वतंत्रतार्त-
री, (कर्गीझ, स्तेपे, रशियन तुर्कस्थान, ट्रान्सकास्पीनिया) व
ट्रान्सकाकेसिया हे देश रशियाकडे आहेत; शिवाय खिवा व
बुखारा येथील संस्थानें त्याच्या ताब्यांत आहेत.

या खंडाच्या उत्तरेकडे सैबेरिया नांवाचा निर्जन, व थंडीचा
विस्तीर्ण मुलुख पसरला आहे. १२३२ त कांहीं कोसॉक लो-
कांनीं झाराच्या परवानगीनें त्या देशांत वसाहती केल्या, तेव्हां
पासून तो देश रशियाच्या राज्यांत मोडतो. तो मुलुख आमच्या
देशाच्या ४ पट मोठा आहे तथापि वस्ती फक्त २५ लक्षांजवळ
आहे; याचें कारण तेथील हवा फार थंड असून वर्षांतून कांहीं
दिवस खेरीज करून तेथें बर्फ सांचलेलें असतें. तथापि त्या
देशांत, दक्षिण भागीं आणि आलताई व उरल पर्वतांत मनुष्यें
रहाण्यासारख्या जागा आहेत. या देशांतून दोनतीन मोठ्या
नद्या वहातात व या भागांत काय तो त्यांचाच व्यापा-
रास उपयोग होतो. सैबेरियांत खनिज संपत्ति चांगली आहे
म्हणून जागोजाग सोनें, तांबें वगैरे धातू काढण्याचा खाणी झा-
ल्या आहेत; त्यांत रूसदेशांतून हद्दपार केलेले कैदी काम कर-
तात. व्यापाराच्या सोईकरतां सैबेरियाच्या दक्षिणभागीं रूस
सरकारानें बरेच श्रम घेतले आहेत. रशियांतील पर्म शहरापा-
सून उरलपर्वतावरून एकतारिनबर्ग शहरापर्यंत, व तेथून, ओबी
नदीस मिळणाऱ्या इर्तिश नदीवरील त्युमेन शहरापर्यंत आगगा-
डी सुरू केली आहे. या इर्तिशनदींतून आलताईपर्वताच्या पा-
यथ्यापर्यंत आगबोटी जातात; शिवाय त्युमेन पासून तोबालस्क
व ओंस्कपर्यंत, आणि तेथून पुढें मध्यएशियेंत जाण्याकरितां ट-

पालगाडीचे रस्ते बांधिले आहेत. तारायंत्रही पासिफिक सागरापर्यंत नेलें असून त्याचा एक फांटा चीनांत पेकीन शहरापर्यंत गेला आहे. बहुतेक खाणी पर्वतांच्या बाजूनें आहेत म्हणून तेथें मात्र जागोजाग कोसाक लोकांच्या वसाहती झाल्या आहेत. चीनदेशाचा रशियाशीं चालणारा बहुतेक व्यापार सैबेरियांतून चालतो व आगगाड्या व आगबोटींच्या योगानें तो वाढण्याचीं चिन्हें आहेत. थोडे वर्षांपूर्वी रूस सरकारानें साखालिन बेट व आमुर नदीच्या मुखावरील मांचूरियाचा बराच भाग आपल्या राज्यास जोडिला. आणि पासिफिक सागरावर व्लादोवोस्तोक बंदराची तटबंदी करून, तेथें आरमार ठेविलें आहे, त्यामुळें जपान व चीनच्या राज्यांस धाक्कांत राखिलें आहे. रशियन अंमल कोरियाच्या राज्यापर्यंत पोंचला आहे.

मध्य एशियेंतील बहुतेक राज्य या शतकांतच संपादन केलें आहे. या मुलुखाविषयीं आजपर्यंत युरोपांतही अज्ञान होतें, परंतु रशियाचें राज्य तेथें झाल्यापासून तो प्रदेश महत्वास येत आहे. या शतकांत रशियानें तिकडे जी गडबड व कारस्थानें केलीं त्यांच्याकडे परकी राष्ट्रांचे लक्ष फारसें लागलें नव्हतें, परंतु झारांचे झेंडे हळूहळू पुढें पुढें येऊं लागल्यापासून आमच्या सरकाराची नजर त्या गोष्टीवर पोंचली; तेव्हांच युरोपीयन प्रवासी तिकडे जाऊन माहिती मिळवूं लागले. मध्य एशियेंत जो प्रदेश रशियाकडे आहे, त्यांत पूर्वी स्वतंत्र तार्तरी व तुरार्ण उर्फ तुर्कस्थान हे देश येत होते व तेथें लहान मोठीं स्वतंत्र मुसलमान खानांचीं राज्यें होतीं. आतां हे सगळे देश श्वेतझाराच्या ताब्यांत आल्यामुळें त्या सर्वांस **रशियन मध्य एशिया** म्हणतात. या भागाबद्दल आमच्या वाचकांस फारच थोडी माहिती असेल म्हणून अगोदर ती देऊन, तेथें रशियानें आपली सत्ता कशी स्थापिली हा इतिहास पुढें दिला आहे.

आह्मीं हातीं घेतलेल्या विषयांचें महत्व रशियाचा व आमच्या सरकारचा आज तह झाला एवढ्यानेंच कमी होणार नाहीं अफगाणिस्थानच्या राज्याचीं नीट तोंड निघून आमच्या देशाला

जो अतोनात खर्च होत आहे तो बंद होई पर्यंत व एकंदरींत रशिया व इंग्लंद या दोन सुधारलेल्या राष्ट्रांमधील मत्सर बंद होऊन मनाला स्वास्थ्य मिळे पर्यंत या विषयाचें महत्व कायमच राहील. आजपर्यंत झालेल्या गोष्टींवर नजर देतां वर सांगितलेलीं सूचिन्हें उदयास येण्यास फार काळ लागणार आहे. पुढल्या प्रकरणांत जो इतिहास दिला आहे त्यावरून परवांच्या रशियन गडबडीचा वाजवीपेक्षां जास्त बाऊ झाला हें वाचकांस कळेलच. असा बाऊ करणाऱ्या मंडळींचें आमच्या देशातील व इंग्लंडांतील मुत्सद्यांवर जों पर्यंत वजन राहील तों पर्यंत आमच्या देशास सालिना कोट्यवधि रुपये खर्च पडणार व तो आह्मांला सोसावा लागणारच, तेव्हां हा विषय आमच्या डोळ्यापुढून दूर होण्याची लवकर आशा नाहीं.

रशियाच्या हालचालीकडे आमच्या राष्ट्राचे डोळे लागल्यामुळेंच या विषयाचें महत्व आहे असें नाहीं, तर मध्य एशिये खालीं मोडणाऱ्या प्रदेशांचा संबंध मानवी जातीच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासांत बराच भाग आहे. या प्रदेशांतूनच आर्य लोकांच्या टोळ्या परदेशांत गेल्या असा, प्राचीन इतिहास व दंतकथांवरून वगैरे अदमास केला आहे. सिहून व जिहून नद्यांच्या थड्यांवरच आर्यांनीं मानवी सुधारणा केली असें मानलें आहे. मासिदोनच्या शिकंदर बादशाहास अडथळा करणारे बळकट शत्रु याच प्रदेशांत कायते भेटले व पुढें अर्वाचीन काळीं झेंगीसखान, तैमूर वगैरे राक्षसांच्या हाताखालीं ज्या तार्तार व मोंगल लोकांनीं एशिया व युरोपखंड दणदणावून सोडिलें, त्यांचे थवेही याच प्रदेशांतून निघाले. तसेंच आमच्या वैदिककालच्या पूर्वजांनीं जेव्हां सप्तसिंधूवर आपले तळ दिले तेव्हांपासून आजपर्यंत वायव्ये कडून झालेल्या स्वाऱ्या याच प्रदेशांतून निघाल्या. अलिकडे अलिकडे या प्रदेशांविषयीं महत्व कमी झालें होतें, परंतु यापुढें तेथील स्थिति पालटून तो भाग भरभराटीस येईल असेंही दिसूं लागलें आहे. कारण रशियाचा अंमल सुरु झाल्यापासून रस्ते, तारायंत्र, टपाल, आ-

गेलीकडी वगैरे पाश्चात्य सुधारणेच्या विनी तेथें अगोदरच पोंचल्या आहेत, यामुळें पुढें थोडक्या काळांतच त्या देशांत व्यापार, कलाकौशल्यें वाढून उत्कर्ष होईल, असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. कांहीं शतकांपूर्वी त्या प्रदेशांतून जे रानटी लोक बाहेर पडले त्यांनीं सुधारलेल्या लोकांस त्रास दिला, परंतु तसेंच आतां रशियन लोकांच्या द्वारें सुधारणा जात आहे; तसेंच ज्या प्रदेशांतून प्रथम मानवी सुधारणा बाहेर निघाली त्याच प्रदेशांकडे ती पुनः परतत आहे ही गोष्टही लक्षांत आणण्यासारखी आहे.

युरोपीयन लोकांनीं परदेश जिंकून तेथें पाश्चात्य सुधारणेची पेरणी केली, ही गोष्ट तर अभिनंदनीयच आहे, परंतु ही सुधारणा ज्या साधनांनीं पसरते तीं साधनें नीतीस अनुसरून आहेत किंवा नाहीं एवढाच संशय आहे. इतिहासांत पावलोपावलीं आढळून येतें कीं, लढाया, रक्तस्राव व निरपराध्यांची प्राणहानि झाल्याशिवाय कांहीं सुधारणा पसरत नाहीं. ह्या एवढ्या गोष्टीवरूनच ही सुधारणा ह्मणावी किंवा काय असाही संशय येतो. असो. असे विचार लिहूं लागल्याम आह्मीं कोणीकडे घसरूं, हें आह्मास पकें माहीत आहे, व तें लिहणें आम या वाचकांस पसंत पडणार नाहीं, ह्मणून हें तत्वज्ञान बंद करणें चांगलें दिसतें.

एशियाखंडाचा मध्य भाग उंच आहे. पश्चिमेस भूमध्यसमुद्रापासून पूर्वेस पासिफिक महासागरापर्यंत या खंडांतून पर्वत पसरले आहेत. हा मधलाप्रदेश या खंडाचें आंतच आहे ह्मटलें तरी चालेल. याची पूर्वपश्चिम लांबी साधारण मानानें ६००० मैल आहे. या आढ्याच्या उत्तरदक्षिण दिशेस प्रथम कांहीं विस्तीर्ण उंचवट्याचीं मैदानें अमून पुढें उतरणीचे सखल प्रदेश लागतात. या उंचवट्याच्या प्रदेशाची तिबेट व गोबीच्या मैदानाच्या सुमारास, अदमासें दोन हजार मैल रुंदी आहे. ही रुंदी पश्चिमेकडे कमी कमी होत गेली आहे. या सारखा अति उंच प्रदेश पृथ्वीवर कोठेंही नाहीं. या उंचवट्यांतून

जाणाऱ्या पर्वतांच्या रांगा बहुतेक स्थूल, गगनचुंबित, व नित्य हिमाच्छादित असतात. परंतु कोठें कोठें त्या लहान लहान होत जाऊन, त्यांचें एकादुसरें अति उंच शिखर मधेंच वर डोकें काढतें. या रांगेस एशियामिनरमध्यें प्रारंभ होतो.

ही पर्वताची रांग पुढें इराणच्या उत्तरेनें जी जाते ती अफ-गाणिस्थानांतील पर्वतांस मिळते. हिला इराणांत दमावंद नांवाचें २०००० फुट उंचीचें ज्वालामुखी शिखर आहे. इराणांतून जाणाऱ्या या रांगेला त्या देशाच्या व यव्य कोंपऱ्यांत 'एलबर्ज' हें नांव आहे. त्याच्या फाट्यांतच इराणांतील अजरबिझान नामक सुंदर व पिकाऊ प्रदेश आहे. तो सोडून पूर्वेकडे गेल्यावर वर सांगितलेली पर्वतांची रांग सखल होत जाऊन खोरासानच्या डोंग रांत मिसळली आहे, व तेथून पुढें तीच रांग हिरातच्या उत्तरेस असणाऱ्या सफेद कोह (पारोपामिसस) नामक डोंगरांस मिळते. इराणांत, व विशेषतः खोरासानांत, या रांगेच्या दोन्ही बाजूस वाळवंटी व रुक्ष मैदानें आहेत. खोरासान डोंगरांच्या उत्तर उतरणीवर अत्रक नदी पासून पुढें रशियन अम्मल चालतो, व तेथेंच हिरातेकडे निघणारा आगगाडीचा रस्ता बांधिला आहे. या प्रदेशांत वाळवंटें व दलदली असून तेथील हवा रोगट आहे आणि तेथें रशियन लोकांचा अम्मल बसण्यापूर्वी 'टेके' वगैरे टर्कोमन लोकांच्या जाती हिंडत.

हिरातपासून पुढें पुनः उंच पर्वतांस प्रारंभ होतो. येथून पूर्वेकडे उंच उंच होत जाणाऱ्या रांगेची विस्तारानें, उंचीनें, किंवा विशाळ स्वरूपानें बरोबरी करणारी पर्वतांची रांग पृथ्वीवर दुसरी नाहीं. या रांगेतच अफगाणीस्थानांतील 'कोह् इ बाबा', हिंदुकुश,' हिंदुस्थानांतील हिमालय, तिबेटांतील कैनलून (कैलास), व तुर्कस्थानांतिल थियानशान, वगैरे पर्वत मोडतात. हे पर्वत उंच असून सदोदित बर्फानें झांकलेले असतात. हिंदुकुश पर्वताच्या तिकडील उतरणीवर आफगाण अमलांतील बलख, कुंडझ, खुलम् वगैरे प्रदेश व बोखारा, ह्यांची वांळवटी मैदानें लागतात व इकडील उतरणीवर आमच्या देशा-

[illegible] मध्यल प्रदेशांस प्रारंभ होतो. हिंदु कुशपर्वत उंच असून [illegible] विकट आहे तेव्हां त्यावरून अफगाणीस्थानावर किंवा आमच्या देशावर परशत्रूची स्वारी होण्याचा फारच थोडा संभव आहे. या पर्वताच्या शाखा काश्मीरपर्यंत पसरल्या आहेत, [illegible] पुढें हिमालय पर्वतास प्रारंभ होतो.

[illegible] खंडातील मध्यप्रदेशांतून जाणाऱ्या पर्वतांच्या [illegible] या हिंदुकुशापासून पुढें दोन मोठ्या शाखा फुटतात. एक शाखा जरा आग्नेयीकडे वळते, व तींत कैनलून काराकोरम, व हिमालय हे पर्वत येतात. दुसरी शाखा उत्तरेकडे वळून पुढें पुनः पूर्वेकडे फिरते. हींत थियानशान, बोलोर, व आलताई वगैरे पर्वत आहेत. या दोन्ही शाखा पुढें सखल होऊन त्यांचीं टोकें पूर्वसागरांत भिजतात. मध्य एशियाची ही पर्वतांची सांखळी आहे तिच्या भाजूंवर तिबेट, गोबी, [illegible] तुर्कस्थान, तुराण येथील उंच मैदानें पसरलीं आहेत. पर्वताचा वाजू व तेथून निघणाऱ्या नद्यांचे तीर सोडून हा भाग [illegible] ओसाड व वाळवंटी आहे. हा प्रदेश उंच असल्यामुळें [illegible] दक्षिणेकडील रुक्ष वारे मात्र सारखे वहातात. हिंदुकुशापासून आमच्या देशाकडे निघणाऱ्या शाखेच्या प्रारंभीं अति [illegible] व सुपीक काश्मीर देश आहे. त्याचप्रमाणें उत्तरेकडे तुर्कस्थानांतून जाणाऱ्या रांगेच्या प्रारंभीं 'पामीर' नांवाचा एक उंच सुंदर प्रदेश आहे. काश्मीरांतून सिंधुनदी वहाते व पामीरांतून आमुदर्या नदीचा प्रवाह जातो. पामीर प्रदेश आर्यांचें आद्यस्थान [illegible] मानिलें आहे. या उत्तरेकडे जाणाऱ्या पर्वतांच्या एका [illegible] गोबी वगैरे निर्जन मैदानें आहेत असें सांगितलें, त्याच्यापैकीं, त्याच्या दुसऱ्या बाजूस कर्गीझ, कराकुम्, किझिलकुम वगैरे विस्तीर्ण वाळवंटें आहेत. तात्पर्य मध्यएशियेंत कृषिला योग्य व सुपीक असा प्रदेश काय तो पर्वतांच्या वाजूवरच पसरला आहे.

मध्यएशियेंतील बहुतेक भागांत चीन व रशियन सरकारांचा अमल आहे. थियानशान पर्वतांच्या पूर्वेकडील मोंगोलिया वगैरे

प्रांत चीनचा अंमल आहे व पश्चिमेकडील भागांत रूसांचा आह. या पश्चिम भागाशींच आमचें कर्तव्य आहे. या भागांत हे पर्वत आहेत ह्मणूनच येथें मनुष्यवस्ती झाली आहे, नाहीं तर हें एक दुसरें सहारा वाळवंटच झालें असतें. या पर्वतांमुळून येथील हवेंत जरा सौम्यता आली आहे व त्यांतून निघणाऱ्या नद्यांनीं या प्रदेशास थोडी सुपीकता आली आहे. या नद्या आतां व्यापारासही उपयोगी आहेत, कारण हिवाळा खेरीज करून इतर दिवसांत त्यांतून लहान लहान गलबतें व रूस लोकांनीं आणलेल्या आगबोटी चालतात.

रशियन मध्यएशियेंत आक्सस (आमूदर्या किंवा जिहून), झरपशान, सिरदर्या (सिहून किंवा झग्झार्टिस), चयू, इलि, नारिन वगैरे मोठ्या नद्या आहेत. ह्या सर्व सरोवरांस मिळतात किंवा वाळूंत जिरून जातात.

आमूदर्या प्राचीन काळीं कास्पियन समुद्रास मिळत होती, परंतु हल्लीं ती आरल सरोवरांत पडते. या नदीच्या तीरावरील प्रदेश प्राचीन काळापासून फार भरभराटींत होता. हिचा उगम पामीर प्रांतांतील एका सरोवरांत होतो. हिचा प्रवाह कांहीं वेळ दक्षिणेकडे वळून नंतर वायव्येकडे वळतो. प्राचीन काळीं या नदीच्या पलीकडील प्रदेशांबद्दल कोणास माहिती नवती. ही नदी प्रथम अफगाण अंमलांतल्या वखान व बदकशान प्रांतांतील पर्वतांच्या खोऱ्यांतून वहाते व तेथून बाहेर पडल्यावर हिला 'आमू' हें नांव प्राप्त होतें. हिच्या डाव्या तीरावर अफगाण तुर्कस्थानांतील कुंडझ, खुलम् व बलख हे प्रांत आहेत. उजव्या तीरावर रशियन अंमल असून पुढे बोखारा येथील खानाचा मुलूख लागतो. तेथपासून तिचा प्रवाह निव्वळ रेताड वाळवंटांतून जातो. हिच्या मुखाजवळील प्रदेशांत खिवा संस्थान आहे. या नदीच्या कालव्यांनीं त्या प्रांताला बरीच सुपीकता आली आहे. झरपशान नदी थियानशान पर्वतांतील एका हिम प्रवाहांतून निघून ती समरकंद व बोखारा शहरांजवळून वहाते. हिच्या तीरावरील प्रदेशासारखा अतिशय पिकाऊ व हवाशीर प्रदेश सगळ्या मध्य

एशियेंत नाहीं. सगळा मुलुख शेतवाड्या व खेड्यांनीं भरला आहे. या प्रदेशांत रेशीम उत्पन्न करण्याचा उद्योग फार चालतो. हिच्या कांठावरील समरकंद शहर प्रख्यात तैमूरलंग बादशहाची राजधानी होतें, व तेव्हांपासून त्या प्रांतांत तें शहर मुख्य मानिलें आहे. आरल सरोवरास मिळणारी मध्यएशियेंतील दुसरी मोठी नदी सिहून ऊर्फ सिरदर्या ही होय. हिच्या कांठावर रशियनलोकांनीं पुष्कळ किल्ले बांधिले आहेत. हींत मुखापासून पांचशें मैलावर गलबतें चालतात. हिच्या कांठावरील बहुतेक प्रदेश खोखानच्या खानाच्या ताब्यांत होता, परंतु थोड्या वर्षांपूर्वी रशियनलोकांनीं ते राज्य नाहींसें करून आपली सत्ता स्थापिली आहे. या नदीपासून आमूदर्या नदीपर्यंत असणाऱ्या प्रदेशास तुराण किंवा तुर्कस्थान असें म्हणतात. याच्या पूर्वेकडील भागांत काशगारचें राज्य असून, तेथें चीनचें सार्वभौमत्व चालतें.

थियानशान पर्वताच्या मध्यांतरावर कल्दजा नांवाचा फार सुपीक प्रदेश आहे, त्यांतून इली व दुसऱ्या कांहीं नद्या निघतात व त्या बालकश नांवाच्या एका मोठ्या खाऱ्या सरोवरास मिळतात. या नद्यांच्या तीरावर पुष्कळ लागवड होते व येथील हवाही सौम्य आहे. येथें कोसाक लोकांच्या वसाहती झाल्या आहेत. येथें रूससरकारानें सेमरेचिंस्क नांवाचा प्रांत केला आहे.

रशियन मध्यएशियेच्या खऱ्यांत मुख्यत्वेंकरून गवती मैदानें किंवा वाळवंटें फार आहेत. या गवती मैदानांस स्तेपे ही संज्ञा आहे. या स्तेपेंत उरल पर्वतापासून पूर्वेकडे बालकश सरोवरापर्यंत पसरलेलें मैदान फार मोठें असून त्याला कर्गीझ स्तेपे हें नांव आहे. या सपाट मैदानांत रशियन एशियेचा अर्धा मुलुख मोडतो. या मैदानांत निव्वळ वाळू नसून त्यांत थोडेसें गवत उगवलेलें असतें. शेंकडों कोस चालले तरी या प्रदेशांत कोठें उंचवटा दृष्टीस पडावयाचा नाहीं किंवा दुसरी वनस्पती सांपडावयाची नाहीं. कोठें कोठें मात्र खारी, दलदली व वाळूंत शिरणाऱ्या लहान लहान नद्या आढळतात, व त्यां-

च्या भोंवतालीं मात्र थोडीं झाडेंझुडपें उगवतात. आमुदर्यानदी च्या उजव्या व डाव्या बाजूस अशींच वाळवंटें आहेत. मध्यम एशियेवर ग्रंथ लिहिणारा प्रख्यात व्हॉम्बे यानें या मैदानां चें उन्हाळ्यांतलें वर्णन दिलें आहे. तो ह्मणतो, "हे स्तेपे ह्मणजे एक वाळूचा समुद्र आहे. समुद्रामध्यें वादळें होऊन ज्याप्रमाणें पाण्याच्या उंच लाटा आकाशांत उसळतात तशा वाळूच्या लाटा एथें उसळतात. वारा पडल्यावर समुद्राच्या सपाटीवर जशा लहान लहान उंचनीच लाटा हालत असतात तशा वाळूच्या लाटा या मैदानांत हालत असतात. या वैराण प्रदेशांत, आकाशामध्यें एखाद्या पक्षाचें किंवा जमिनीवर किडमुंगीचें ही दर्शन व्हावयाचें नाहीं; या मैदानांत दुर्दैवानें सांपडलेल्या मनुष्यांचीं व जनावरांचीं मृतकलेवरें मात्र जागोजाग आढळतात. एवढ्या मुलखांत नेत्रस्पर्शासि पाण्याचें टिपुसही मिळावयाचें नाहीं, यामुळें विचाऱ्या प्रवाशांस आपला पाण्याचा चंबु जिवापलीकडे बाळगावा लागतो. या मैदानांत केव्हां केव्हां ऊष्ण व रोगट वारे सुटतात, त्यामुळें शेकडों जीव प्राणास मुकतात. हे वारे सुटूं लागले ह्मणजे तेथील उंटें आपल्या उपजत बुद्धीवरूनच पुढील संकट जाणतात. तीं मोठ्यानें ओरडूं लागून जमिनीवर घालून घेतात व आपल्या मानां लांबवून वाळूंत खुपसतात; त्याप्रमाणें प्रवाशीही घाबरून त्या उंटांच्या आंगास चिकटतात. तो वारा वाहूं लागला ह्मणजे धापा टाकल्यासारखा आवाज ऐकूं येतो व आकाशांतून वाळूचा वर्षाव सुरू होतो. त्या वाळूचे कण इतके कढत असतात, कीं ते आगीच्या ठिणग्यांप्रमाणें भाजतात !"

आमुदर्या नदीच्या तीरावर अशीं पुष्कळ मैदानें आहेत, त्यांत एक तऱ्हेचें पर्णरहित उंच गवत आढळतें. त्यास तेथील भाषेंत "कनक वेतस" अशा अर्थाचें एक नांव आहे चोहोंकडे आढळणाऱ्या झाडांच्या जळक्या बुडख्यांवरून या प्रदेशांत प्राचीनकाळीं अरण्यें असावीं असा अदमास दिसतो. एथील गवतीं मैदानांत जर कदाचित् आग लागली तर त्या भयंकर देखाव्याचें वर्णन ही करतां येत नाहीं. वाऱ्याबरोबर अप्रतिहत वेगानें पुढें

णाऱ्या आगीच्या लोळांतून सुटून जाण्याकरितां जनावरां-
कळपाचे कळप पळत सुटतात व या आगीचा वेग इतका ज-
द असतो कीं, भरधांव घोड्यावरून ही सुटका करून घेणें
वट पडतें. हे वणवे मुलुखाचे मुलुख जाळून बेचिराख करतात.

कर्गिझ स्तेपेमध्यें वसंतऋतूंत सरोवरें, नद्या व पाणवठे यां-
या आसपास जीं हिरवींचार कुरणें व फलपुष्पयुक्त झाडेंझुडपें
गवतात तेवढींच, रूक्ष वाळवंटें पाहून त्रासलेल्या वाटसरांच्या
त्रांस विसावा देतात ; परंतु यांच्या पलिकडे नजर फेंकली ह्म-
जे कोसांच्या कोसपर्यंत पिंवळट व भुरक्या रंगाच्या सपाट मै-
दानाखेरीज कांहीं दिसत नाहीं. जेथें जेथें वनस्पति आढळते, ते-
थें घोडे, रानगाढवें वगैरे जनावरें स्वेच्छ हिंडत असतात. दलद-
लीच्या सोंवतालीं रानडुकरांचे कळपही पळतानां आढळतात.
या मरुदेशांत वर्षाचे तिन्हीकाळ आपलें उग्रस्वरूप धारण करि-
तात.जून महिन्यांत उन्हाळ्यास प्रारंभ होतो तेव्हां सूर्य आपल्या
खर किरणांनीं सर्व प्रदेश जाळीत असतो, हवा रूक्ष होते, चो-
हींकडे भयाण वरखरखीत दिसूं लागतें आणि वावटळीच्या यो-
गानें चोहींकडे एकदम हजारों धुळीचे लोट वर जातात. या प्रदे-
शांत पर्जन्याचें नांवच नको, एवढेंच नाहीं तर दिवसा भाजलेल्या
दिनीस रात्रीच्या दहिंवरापासूनही थंडावा मिळत नाहीं. अ-
हर्निशीं सूर्य आगीच्या गोळ्या सारखा लाल दिसतो; व ऐन दु-
रा जमिनींतून वर जाणाऱ्या वाफामुळें तो झाकून जातो.

जेव्हां आक्टोबर महिन्यांत हिवाळ्याचा अम्मल बसतो ते-
व्हां वरील स्वरूपाच्या अगदीं उलट स्थिति होते. सर्व मैदान
पांचपांच सहासहा फुट जाडीच्या बर्फाच्या थरानें आच्छादित
होतें. या कडक थंडीनें सर्व वनस्पति करपून जाते, झाडांवर एक
ही पान रहात नाहीं, व पर्णरहित शाखांवर हिमाचे कण चिक-
टून त्या पांढऱ्या दिसतात. उत्तरेकडील थंडवाऱ्यास प्रारंभ हो-
तांच जमिनीवर एकसारखा हिमाचा वर्षाव चालतो व वाऱ्याच्या
जोरानें जमिनीवर सांचलेल्या बर्फाच्या थराचे तुकडे तुकडे हो-
ऊन, ते मोठ्या जोरानें उडत असतात. उष्णमापक यंत्रामध्यें

शून्याच्याखालीं २९।३० अंश पारा जातो ! अशा थंडीच्या कडाक्यांत आकाश स्वच्छ असतें तेव्हां सुद्धां सूर्याचें तेज अगदीं मंद भासतें. या हिवाळ्यांत या प्रदेशांतील बहुतेक नद्या व सरोवरें थिजून जातात, व त्यांस वितुळण्यास मार्च महिन्यांत आरंभ होतो. या दिवसांत एथील वंजारी रहवासीं निवाऱ्याचे जाग्यास आपले तंबू ठोकून आपल्या जनावरांसह काळ घालवितात.

मनुष्यवर्गाच्या ज्या दोनतीन प्रख्यात शाखा आहेत त्यांपैकीं आर्यशाखेचे व तुरेनियन शाखेचे लोक मध्यएशियेंत आहेत. चार हजार वर्षांपुर्वी ज्याप्रमाणें या दोन शाखेंतील लोकांच्या मानसिक विचारांमध्यें, उद्योगामध्यें व एकंदर आचारांत भिन्नता दिसून येत होती, तीच अद्यापीही आहे. आर्य शाखेच्या दोन मोठ्या टोळ्या सप्तसिंधूवर व इराणांत वसाहती करून मानविसुधारणा करण्याकरितां मध्यएशियेंतून निघाल्या. या आर्य लोकांनीं प्राचीनकाळीं, धर्म राज्य, नीति, व समाज यांमध्यें फार सुधारणा केली. याच आर्यलोकांच्या कांहीं टोळ्या युरोपांत जाऊन तेथें त्यांनीं आपला अंमल बसविला व तेथें कांहीं कालांतरानें मनुष्याच्या सुखवृद्धीसाठीं ज्ञानवृद्धीचे मार्ग अवलंबिले. प्राचीन काळापासून मानवीसुधारणेचे कामांत आर्य लोकांचें पाऊल पुढेंच आहे; ज्ञानवृद्धि करण्याच्या मार्गांत ते अद्यापिही पुढें जात आहेत; परंतु तुरेनियन शाखेच्या, गुरें व ढोरें पाळून एकास्थळाहून दुसऱ्यास्थळीं चारा पाणी मिळण्याकरीतां हिंडणाऱ्या, वंजारी जातींची स्थिति प्राचीन काळापासून आहे ती आहे. आपल्या सामाजिक, राजकीय व पारमार्थिक सुखवृद्धीचे उपाय शोधण्याकडे त्यांचें कधींही लक्ष लागलेलें दिसत नाहीं व ज्ञानमार्गांत त्यानीं कधीही पाय ठेविला नाहीं. या शाखेच्या निरनिराळ्या पुष्कळ जाती मध्य एशियेमध्यें आहेत . आर्यशाखेचे लोकही अद्यापि आफगाणीस्थान, बलुचीस्थान, कोहीस्थान या देशांत व काबूल, बुखारा वगैरे प्रांतांतील कांहीं भागांत आढळतात. आमच्या खंडांतील सुधारलेल्या आर्यलोकांच्या दोन भाषा होत्या, एक संस्कृत व दुसरी झेंद. ही दुसरी भाषा

प्राचीन इराणांतील लोक बोलत असत. पारसिक ह्मणजे इराण देशांत जे आर्यलोक रहात होते त्यांच्याच संबंधाचे लोक मध्य एशियेंत आहेत. वर ज्या देशांत हे आर्यलोक आहेत ह्मणून सांगितलें त्यांना ओळखण्याची मुख्य खूण ह्मणजे त्यांच्या भाषा. पारसिक भाषेपासून निघणाऱ्या प्राकृत भाषा जे लोक बोलतात ते लोक आर्यशाखेचेच असा सिद्धांत ठरवितां येतो. या भाषा बोलणारे लोकांस ताजिक अशी सामान्य संज्ञा, तुरेनियन शाखेच्या तुर्की, तार्तार वगैरे जातींनीं दिली आहे. हे ताजिक लोक तैग्रीस नदीपासून आमूदर्या नदीपर्यंत आढळतात. ताजिक या संज्ञेखालीं प्राचीन आर्यांच्या ज्या जाती मोडतात त्यांच्या आयुष्यवर्तनाची मोठी खूण ह्मणजे शेत भात वगैरे स्वस्थतेचे उद्योग करणें ही होय. कारण दुसऱ्या अनार्य शाखेच्या लोकांच्या आयुष्यक्रमांत अगदीं भेद दिसून येतो. त्यांच्या हातून एका स्थळीं राहून स्वस्थतेचे धंदे करणें कधींच झालेलें नाहीं. स्थलांतर करून उदरनिर्वाह करणें, आपसामध्यें लढणें व लुटींत आनंद मानणें असा एक त्यांच्या मनाचा कल दिसून येतो. याच लोकांच्या शाखेंत येणाऱ्या तार्तार लोकांनीं स्वाऱ्या करकरून स्वस्थतेचे धंदे करणाऱ्या ताजिक आर्यलोकांना जर्जर केलें. रशियन तुर्कस्थानांत ताजिक व तार्तार ह्मणजे अनुक्रमें आर्य व तुरेनियन शाखेचे लोक आहेत. बुखारा प्रांतामध्यें व सिहूनदीपर्यंत वरिष्ठ वर्गामध्यें ताजिक लोकच मोडतात; हे लोक हलके धंदे करित नाहींत. ही जात उमदी व देखणी आहे, तथापि फारवर्षेपर्यंत तार्तार, उझबेग वगैरे तुर्की लोकांच्या ताब्यांत राहिल्यामुळें ताजिक लोकांमध्यें आर्यलोकांचे शौर्यधैर्यादि गुण दिसून येत नाहींत. हल्लीं या लोकांतील बहुतेक लोक व्यापार, कारकुनी, शेतकी वगैरे धंदे करतात.

रशियन तुर्कस्थानांत तुर्की ही संज्ञा अनार्य शाखेच्या लोकांस दिली आहे. तार्तार, उझबेग वगैरे लोक याच वर्गांत मोडतात. उझबेग लोकांची वस्ति या देशांत पुष्कळ आहे. प्रख्यात झेंगीसखान याच जातीपैकीं होता. या जातीनें मध्यएशियेंत

आपला अंमल बसवून निरनिराळीं राज्यें स्थापिलीं आहेत. हे लोक शूर असून त्यांस आर्य ताजिक लोकांचा पोषाग, टापटीप व डौल आवडत नाहींत व एके स्थळीं स्वस्थतेनें राहण्याचाही त्यांस कंटाळा येतो. उझबेग लोकांचाच अंमल तुर्कस्थानांत चालतो आणि बुखारा, खिवा, खोकंद वगैरे प्रांतांतील राजघराणीं त्यांचीच आहेत; उझबेगलोक शहरांतून, व एका स्थळाहून दुसऱ्या स्थळास वारंवार हालवितां येणाऱ्या तंबूच्या खेड्यांत राहतात. या लोकांच्या पुष्कळ जाती आहेत.

उझबेग लोकांशीं साम्य पावणार टर्कोमनलोक आहेत, यांच्या निरनिराळ्या जाती कास्पियन समुद्र व आमुदर्या नदीच्या मधील प्रदेशांत राहतात. हे लोक तंबूतच राहून लढाई, लूट वगैरे धंद्यांत आपलें आयुष्य घालवितात. हे मोठे लढाऊ आहेत. मर्व्ह येथील टेकटर्कोमन लोक या जातींतीलच होत. या लोकांचे सुमारें २ लक्ष तंबु या प्रदेशांत आहेत व एकंदर लोकसंख्या १० लक्ष असावी असा अदमास केला आहे; या लोकांत मुख्य असा कोणी नाहीं; दुसऱ्याच्या अमलांत राहणें व हुकूम एकणें त्यांस कधीं आवडत नाहीं. तथापि मध्यएशियेंत जे मुसलमानलोक आहेत त्यांपेक्षां टर्कोमन जातींत नीति जास्त आढळते. त्यांची सर्व अंतस्थ व्यवस्था, वडिलार्जित व पूर्वापार संप्रदायावर चालते. आपल्या वाडवडिलांची चाल न सोडणें ह्यांतच त्यांचा धर्म येतो. टर्कोमन लोकांची आपापल्या जातींत नेहेमी लढाई चालू असते. तथापि प्रत्येक जातींत पक्की जूट असून पोरांपासून थोरांपर्यंत त्यांना जातीचा विलक्षण अभिमान वाटतो. परमुलखांत लूट करावयास जाण्याची त्यांना फार हौस आहे व मध्यएशियेंतून जाणाऱ्या व्यापाऱ्यांच्या काफल्यांस या टर्कोमन लोकांची भीति आहे. प्रख्यात नादिरशाहा हा एक टर्कोमन होता. एशियेंतील लढाऊ जातीपैकीं टर्कोमनची बरोबरी कोणी करूं शकणार नाहीं; परंतु अलीकडे रशियनलोकांनीं मर्व्ह, सारक्स वगैरे शहरें घेतल्यापासून या लोकांस आपल्या अमलांत आणलें आहेत.

मध्यएशियेमध्यें सार्त या नांवाखालीं मोडणारे लोक आर्य किंवा अनार्य हें सांगतां येत नाहीं. परंतु शहरांत स्वस्थेतेनें राहून व्यापार करणाऱ्या लोकांस हें नांव देतात. सार्त ह्मणजे सौदागर किंवा व्यापारी.

कर्गिझ लोकांची व मुख्यत्वेंकरून सिरस्तेपेनाय प्रांतांत आहे. या नांवाखालीं मोडणारे लोक तार्तार व तुर्की या अनार्य लोकांपैकीं आहेत. आपल्या गुरांचेंढोरांच्यां कळपांस जेथें चारापाणी मिळेल तेथें हे फिरत असतात. एके ठिकाणीं घर करून राहणें त्यांस ठाऊक नाहीं; यांचा सर्व संसार पाठीवर असतो. यांची सपत्नी गुरें व बेडीं राहण्याजोगें स्थळ आढळलें कीं हे लोक आपले तंबु ठोकतात. या तंबूंना किर्गिट् का असें ह्मणतात, याचा वरचा भाग वाटोळा घुमटासारखा असून वर धूर जाण्याकरितां एक द्वार राखलें असतें.

रशियनलोकांनीं कर्गिझ लोकांस जिंकून त्यांच्या हातांत कांहीं अधिकार ठेवला नाहीं; तथापि त्यांस रशियाच्या फौजेंत नौकरी धरून आपलें शौर्य प्रकट करण्याचें एक साधन राखिलें आहे. व्यापाऱ्यांच्या किंवा प्रवाशांच्या काफल्यांवर छापा घालून त्यांस लुटणें हा या लोकांचा एक धर्मच झाला होता म्हणून रशियनसरकारास या लोकांची लूट बंद करण्यांत बरीच मेहनत पडली. कडक हवेंत घोडयावरून फिरणें, शिकार करणें, व प्रवाशांस गांठून लुटणें वगैरे कारणांनीं या लोकांस श्रम सोसण्याची संवय झाली आहे. हे लोक शरीरानें घट्टेकट्टे असून थोडे ठेंगणे आहेत.

कर्गिझ लोकांत कोणाची संपत्ति सांगणें असल्यास, त्याच्या जवळ किती मेंढरें व बकरीं आहेत हें सांगतात. या जनावरांवरच या लोकांचा चरितार्थ चालतो. एथील मेंढरें मोठी असून त्यांची लोकर लांब व भरभरीत असते, व एथील बकऱ्यांच्या लवेला फार किंमत येते. या प्रदेशांतून प्रतिवर्षी सुमारें १० लक्ष बकरीं व मेंढरें रशिया व चीन देशांत जातात. त्यांचे दूध, मांस व कांतडीं ह्यांवर या लोकांचा निर्वाह चालतो;

केव्हां केव्हां मेजवानीच्च देणें असल्यास घोड्यांचा बळी पडतो. यांचे घोडे चपळ, सोसिस व प्रसंगाविशेषीं दररोज २० पासून ४० मैलांपर्यंत कांहीं दिवस सतत मजल मारूं शकतात. एथील उंटें दोन मदारीचीं आहेत व तीं वाळवंटाप्रमाणें बर्फाच्छादित जमिनीवरूनही हिंवाळ्यांत प्रवास करितात.

मध्य एशियेंत मुसलमान धर्माचाच काय तो मुख्य पगडा आहे. पैगंबराचे अनुयायीलोकांनीं चीन, जपान, इत्यादि पूर्वेकडील देश सोडून सर्व खंडभर कोराण व तरवार यांच्या प्रतापावर आपलीं राज्यें स्थापन केलीं व धर्मवृद्धिही केली. या प्रदेशांतील मुसलमानांत पुष्कळ पंथ असून बुखारा, बल्क वगैरे शहरें त्या धर्माचीं पवित्र स्थानें असें मानिलें आहे.

रशियन लोकांचा अंमल बसल्यापासून सरकारी नात्यानें किंवा वसाहत करण्याच्या उद्देशानें राहिलेले ख्रिस्ती लोक दोन लक्षांजवळ आहेत. मध्य एशियेंत चीनच्या सरहद्दीवर बौद्ध धर्माचे लोक बरेच आहेत. कलदजा शहरांत 'फो' (बुद्धां) चीं देवळें आढळतात; शिवाय व्यापाराच्या उद्देशानें जाऊन राहिलेले हिंदु व यहुदीलोकही दृष्टीस पडतात. बुद्धधर्माचा प्रसार होता तेव्हां तर आकूमस नदी, हिंदुकुश वगैरे स्थानांच्या यात्रा करण्याकरितां इकडून पुष्कळ साधु जात. आमच्या देशांतील कित्येक वैरागी चीन, तिबेट, तार्तरी वगैरे देशांतून युरोपांतील मास्को शहरापर्यंत प्रवास करीत गेल्याची माहिती लागते. १८९७ सालच्या बंडांत मामील झालेल्या लोकांपैकीं पुष्कळ इसम मध्य एशियांतील मुसलमान संस्थानांत चाकरी धरून आहेत असें सांगतात. काश्गारच्या पायदळावर जो मुख्य सरदार आहे तोच प्रख्यात नानासाहेब पेशवा असावा अशी असंभवनीय बातमी मागें वर्तमानपत्रांतून आली होती.

या प्रदेशांत लग्नाच्या चाली निरनिराळ्या आहेत. टर्कीमन, कर्गीझ वगैरे लोकांत एक प्रकारचा स्वयंवर चालतो, तो लग्नाचा प्रकार तर चमत्कारिक आहे. अविवाहित तरुणी प्रथमतः आपल्या उमद्या चपळ घोड्यावर चाबुक घेऊन आरू

होते व घोडा पाहिजे तसा भरधाव सोडते; नंतर तिच्याशीं ल-
ग्न करण्याची ज्यांची इच्छा असत असे तरुणही स्वार होऊन
तिच्या मागें लागत. त्यांत ती चाबुकास्त्रांनीं यथास्थित नरम
करिते. परंतु इतकें सोसून व संभाळून जो मनुष्य तिच्या कटी
भोंवता किंवा स्तनावर हात टाकू शकेल त्याच्याच ती घरटे
आपलीशीं विवाह करण्याविषयीं कितेक उत्सुक असतात त्यां-
पैकीं जो तिच्या पंचतीस उंटांचे मोबदला स्त्री मागितल्या त्याशीं संधी आणून देते कीं, त्यास ती लग्नाचे गावच्या गायनां-
रंभा, पण तिनें टकोमन आणले गावच्या गायनां लो-
टतां.

[illegible] नद्यांच्या दोन्ही [illegible] प्रदेशांत
[illegible] जमिनीस सुपिकता आणण्याची [illegible] दिसून
येते. आकाश नेहमीं स्वच्छ असतें. [illegible] जग-
[illegible] पुष्कळ काळ स्वच्छ आढळत नाहीत. [illegible] प्रति-
[illegible] बगीचे या काळांत [illegible] आहेत. [illegible] प्रति-
[illegible] लहान [illegible] मार्ग [illegible] दिसत. [illegible] नद्यांच्या उप-
[illegible] कीं, पुष्कळ आढळत नाहीत. [illegible] उप-
[illegible] अशी जमीन कायमची [illegible] नद्यांच्या तीरावर व प
[illegible] बनलेला [illegible] आहे. [illegible]
[illegible] हिंवाळ्यांत [illegible] अगर भाग [illegible] हिंड
[illegible] आहे व [illegible] नदीच्या [illegible] व [illegible] उप
[illegible] तट [illegible] आहे [illegible] दीर
[illegible] [illegible] कां-
[illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]
[illegible] [illegible] [illegible] [illegible] [

पि रशियाची तृप्ति न होतां, बुखाऱ्यावर लक्ष होतेंच. बुखाऱ्या-शीं अगोदरच कुरापत निघाली होती, परंतु रशियाचें भय वाटून तेथील खानानें व लोकांनीं रशियन प्रदेशास त्रास दिला नाहीं. पण जनरल कॉफमन या गव्हरनराची मध्यएशियेंत नेमणूक झाल्यावर त्यानें लढाईचें कांहीं तरी कारण काढण्यासाठीं समरकंद शहरास शह देण्याकरितां म्हणून जवळच एक किल्ला बांधण्यास सुरुवात केली; बुखारी लोकांस हें सहजच आवडलें नाहीं. त्यां-नीं एकदम लढाई सुरू केली व एकदोन प्रसंगीं रशियासही चांगला हात दाखविला; परंतु युरोपांतील शस्त्रांपुढें त्यांच्यानें कसला टिकाव धरवतो ! १८६८ त समरकंद शहरावर रशिया-चे बावटे चढले, बुखाऱ्याचा खान शरण आला व त्यानें तह केला. त्यांत समरकंद वगैरे सुपीक प्रदेश रशियानें आ-ल्या ताब्यांत ठेऊन त्यांचा झरफशान नांवाचा एक नवा प्रांत बनविला. त्या दिवसापासून बुखारा संस्थान रशियाच्या ताब्यांत आलें, व कांहीं दिवसांनीं तें रशियन राज्यास जोडलें जाण्याचा पुष्कळ संभव आहे.

१८७५ त रशियन लोकांनीं पूर्वतुर्कस्थानांतील काश्गार प्रांतावर स्वारी केली; परंतु त्यांत यश मिळालें नाहीं, व चीनाशीं वैवन.व होण्याचा प्रसंग आल्यामुळें तो बेत रद्द केला.

बालकश् सरोवराच्या पूर्वेस कल्द्जा नांवाचा एक फार सुपी-क डोंगरी प्रदेश आहे. तेथें आज दोनतीन शतकें चिनीसरकार-चा अंमल होता. तेथें १८६८ त एक बंड झालें, तें शमविण्यास चिनीसरकाराला कठीण पडल्यामुळें १८७० त रशियन लोकांनीं तो प्रांत जिंकून आपल्या राज्यास जोडिला; आणि तेथें बंदोबस्त करण्याचें कबूल केल्यास तो परत देण्याचें चिनी लोकांस अभिवचन दिलें; त्या वचनाप्रमाणें १८८१ त त्याचा बराच भाग आपल्याकडे ठेऊन बाकीचा चिनास परत दिला.

बुखाराशीं तह झाल्यावर पांच वर्षांनीं १८७३ सालीं खिवा प्रकरण पुनः उद्भवलें. खिवाच्या खानाचें वर्तन १८४० त केलेल्या तहाविरुद्ध झालें. त्यानें कांहीं रशियन लोकांस कैदेंत

टाकिलें व रशियन मुलुखांत त्याचे लोक लुटी करूं लागले; त्यामुळें त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं खिवावर स्वारी करण्याचें ठरविलें. लढाई सुरू झाल्यावर कांहीं चकमकी झडल्या व शेवटीं जं० कॉफमन यानें खिवा घेतलें. परंतु पूर्वी दिलेल्या वचनाप्रमाणें रूससरकारानें तें राज्य खालसा न करतां त्यानाला मांडलिक केला व थोडासा मुलुख आपणाकडे घेतला. तेव्हांपासून खिवा संस्थानांत रशियन लोकांची देखरेख सुरू झाली व आतां तेथें बंदोबस्त व शांतता झाली आहे असें म्हणतात.

वर सांगितल्याप्रमाणें थोड्या वर्षांतच रशियाचा अम्मल सार्‍या मध्यएशियेंत बसला व झाराच्या नांवाचा मध्यएशियेंतील मुसलमानांस चांगला वाटूं लागला. सिरदर्या नदीपासून आक्सस नदीपर्यंत जे प्रदेश घेतले ते ताब्यांत आल्याबरोबर तेथें लगलेच रूससरकारचे अंमलदार येऊन व्यवस्थित राज्य सुरू झालें. हा सगळा मुलुख ताब्यांत आल्यावर कास्पियन समुद्रापासून मर्व शहरापर्यंत असलेल्या टर्कोमन नांवाच्या लुटारू व बेबंद लोकांच्या मुलुखावर रशियन लोकांनीं आपला डोळा ठेविला व त्या प्रदेशाची गुप्त टेहळणी सुरू केली. शेवटीं १८७९त पुनरपि पुण्यश्वेत झाराचे गरुडांकित झेंडे मर्व व मारावसकडील बाळबंटाकडे वळले. या तुर्कोमन लोकांची माहिती मागें दिलीच आहे. रशियन लोकांनीं कास्पियनच्या किनाऱ्यावर क्रास्नाडोवस्क येथें ठाणें घातल्यापासून हा प्रदेश जिंकून मध्यएशियेशीं दळणवळण ठेवण्याचा सरळ मार्ग लवकर आणण्याच्या हेतूनें १८७९त तुर्कोमन लोकांवर स्वारी केली. पहिल्यानें कांहीं दिवस त्यांनीं बरेंच शौर्य दाखविलें तथापि रशियन तोफांच्या माऱ्यापुढें त्या चपळ स्वारांचा निरुपाय होऊन त्यांनीं आपले सगळे लोक जिओटेपे नांवाच्या मातीच्या किल्ल्यांत जमा केले. त्या ठिकाणीं बायकामुलें धरून सुमारें ४० हजार तर्कोमन लोक जमले होते व त्यांनीं नवीन तटबंदी करून तें स्थान फारच मजबूत केलें. तें घेतानां रशियनांस जो श्रम पडला तसा त्यांस मध्या एशियेंत कोठेंच पडला नाहीं. कांहीं दिवस

चेढा घातल्यावर निरुपाय होऊन स्कोबेलॉफ् यानें तो किल्ला सुरुंग घालून उडविला, व गावांत शिरून २० हजार लोकांस चराचर कापून काढिलें व त्यांच्या नायकांची अप्रतिष्ठा केली! लाखों रुपये व शेकडों प्राण खर्ची घालून हा विजय मिळाल्यावर अर्थात् या टेक्कतकोमनांचा प्रदेश रशियन राज्यास जोडिला गेला!

१८८० सालीं अस्काबाद शहर घेतलें, तेथें तटबंदी केली, व बाजार वसविला. या टेक्केलोकांशीं लढतांना फौजेचा व सामुग्रीचा पुरवटा करण्यासाठीं स्कोबेलॉफ् यानें क्रास्नोडोवस्कपासून आगगाडीचा रस्ता बांधिला, यामुळें आदेस शहरापासून ४ दिवसांत हजारों सैन्य अस्काबाद येथें आणण्याची सोय झाली. कास्पियनपासून जो हा प्रदेश लागतो त्यांत बहुतेक वाळवंट असून त्याची लांबी सुमारें पांचशें मैल आहे. या वाळवंटांत मध्यंच मर्व्ह म्हणून एक पाण्याचें पिकाऊ स्थळ आहे. टेक्के प्रदेश काबीज केल्यावर पळालेले तुर्कोमन येथें जमले व तटबंदी करून राहिले. मर्व्ह हें शहर त्या भागांत एक मोठें स्थळ आहे. हिरात, बल्क, मश्द, बुखारा, खीवा वगैरे शहरांपासून येणारे प्रसिद्ध काफल्यांचे रस्ते येथें जमतात. रशियन लोकांस कास्पियनपासून समरकंद, बुखारा वगैरे शहरांशी व्यवहार चालवण्यास हें फार उपयोगाचें होईल. आणि म्हणूनच तें घेण्याचे विचार चालून, प्रसिद्ध अल्किखान—आफ् नांवाच्या सरदारानें तेथें वकिली चालविली, आणि रक्तस्रावाशिवाय मागल्या वर्षी फेब्रुआरी महिन्यांत त्या किल्लाच्या तटावर रशियन संत्री पहारा करूं लागले.

मर्व्ह व मारांक्स ह्या प्रख्यात जागा घेतल्यामुळें रशियाच्या चिनी अफगाणिस्थानच्या हद्दीवर आल्या व सरहद्दीचा तंटा उद्भवला. या तंट्याचें खरें स्वरूप व तत्संबंधी इतर गोष्टी पुढील भागांत दिल्या आहेत. हा प्रदेश घेतल्यापासून एशियाखंडांतील रशियन राज्याचा विस्तार फारच वाढला. कोरियापासून वर आलताई, थियाशान व हिंदुकूश पर्वतांपर्यंत

झाराचा अम्मल चालू झाला. इराण व ट्रान्सकास्पियन सुभ्यांमध्यें आतां अत्रकनदी हद्द झाली आहे.

कल्दजा प्रांत चीनसरकारास परत दिल्यापासून चीनचा व रशियाचा वेवनाव मिटला आहे, तथापि रशियाच्या महत्वाकांक्षेमुळें चिनीलोकांस मोठी काळजीच आहे ! परवां कोरियाचें राज्य रशियन संरक्षणाखालीं येणार होतें व थोडेच दिवसांनीं तो प्रसंग येईल; मग मात्र चीन व जपानच्या राज्यांस रशियापासून पुष्कळ भीति उत्पन्न होईल. इतके दिवस जपान व चीन मिळून दोघांनीं कोरियाला फार त्रास दिला आहे, त्यामुळें तो देश रशियास मिळण्याचा पुष्कळ संभव आहे.

प्रकरण १० वें.

अफगाणि स्थानाचें वर्णन–इंग्लिशांची पहिली धूळधेड–आमच्या देशाशीं संबंध–एलफिन्स्तनची वकिली–इराणची हिरातवर स्वारी–अफगाणिस्थानची पहिली लढाई–इंग्लंडाचा व रशियाचा एशियेंत राज्यविस्तार–शेअरअली व अंबाला दरबार–लिटनची कारकीर्द–दुसरें अफगाण युद्ध–अमीर अब्दुल रहिमान–रशियाची हालचाल–सरहद्दीचा तंटा–कमिशन–अफगाणांचें वर्तन–रावलपिंडीचा दरबार–पेंढ्यांची लढाई–तह–हिंदुस्थानच्या संरक्षणाचे उपाय–इ० इ०

अफगाणिस्थानच्या पूर्वेस हिंदुस्थान, दक्षिणेस बलुचिस्थान, पश्चिमेस इराण व खोरासान आणि उत्तरेस बुखारा संस्थान व रशियन तुर्कस्थान, हीं आहेत. मागें सांगितलेंच आहे कीं या देशांत एशियेंतील अत्युच्च पर्वतांच्या रांगेस प्रारंभ होतो. हा

सगळा देश समुद्राच्या पृष्ठभागापासून फारच उंच आहे. यांत हिंदुकुश, कोहिबाबा हे मोठे पर्वत आहेत; शिवाय हिरातच्या उत्तरेस सफेद कोह, मध्यभागीं सिआकोह, व हिंदुस्थानाच्या सीमेवर सुलेमान, हे पर्वत आहेत. यांच्या योगानें या देशाचें सगळें स्वरूप डोंगराळ झालें आहे. काबूलच्या उत्तरास हिंदुकुश आहे त्याची सरासरी उंची २१००० फुट आहे. त्यावरून पलिकडील अफगाण अमलांतील तुर्कस्थानांत जाण्यास पांच सहा बिकट घांट आहेत. सगळा मुलूख पहाडी, डोंगराळ असून त्या पर्वतांवर दाट जंगलें आहेत, यामुळें लुटारू लोकांस रहाण्याची चांगली सोयी झाली आहे. या डोंगरांच्या खोल व अवघड खेऱ्यादऱ्यांतून बरच्च प्रवाह वाहतात; त्यांत काबूलजवळून वहाणारी व सिंधुनदास मिळणारी काबूल नदी, पश्चिमेकडे खालीं वाळवंटींतल्या सिस्तान सरोवरास मिळणारी हेलमंद नदी, आणि हिरात मध्यें घालून उत्तरेकडेस समांतरानें वहाणाऱ्या व अनुक्रमें मरावस व मर्ईच्या वाळवंटांत शिरणाऱ्या हेरिरुद व मर्घाब नांवाच्या नद्या, या बऱ्याच मोठ्या आहेत. या देशाची पूर्वपश्चिम लांबी सुमारें ६०० मैल व उत्तरदक्षिण रुंदि ५०० मैल आहे. याचे पांच भाग आहेत: हिंदुस्थानच्या कोंपऱ्याजवळ काबूल प्रांत आहे, त्याच्या उत्तरेस आक्ससच्या नदीच्या खोऱ्यापर्यंत बदक्शान व वखान हे प्रांत आहेत; त्यांच्या पश्चिमेस कुंडुझ, खुलम् व बल्ख व त्यांच्याही पश्चिमेस अंदखोई, शिबरजान, मैमन वगैरे प्रांत आहेत. दक्षिणेकडे गिझनी, व कंदाहार प्रांत आहेत, व पश्चिमेस हिरात आहे.

देश जितका बिकट तितकीच तेथील हवाही कडक आहे. सगळा देश समुद्रापासून फारच उंच असल्यामुळें वातावरण पातळ असतें, आणि आकाश निरभ्र रहातें, यामुळें थंडी अतिशय पडते व उंच पर्वतांवर सदा बर्फ असतें. केव्हां केव्हां तर मध्यंच कडाका पडतो आणि बर्फाचा वर्षाव सुरू होऊन, पुष्कळ लोक मरतात. १७९० त प्रसिद्ध अहमंदशहा अबदल्ली बरोबर इराणांतून पुष्कळ सैन्य येत होतें, त्यांपैकीं १८०००

लोक एका रात्रींत थंडीनें मेले ! काबुलांत बकऱ्याचीं कातडीं पांघरून निजावें लागतें. काबूलचें संस्कृत नांव कंबोज. 'कंबलभोजः कंबोजः' अशी त्या शब्दाची उपपत्ति तीन हजार वर्षांपूर्वीच यास्क ऋषीनें निरुक्तांत दिली आहे. उन्हाळ्यांत तर डोंगर तापल्यामुळें अतिशय उष्मा होतो.

या प्रदेशांत पिकाऊ जमीन नद्यांच्या खोऱ्यांत आहे. सगळ्या अफगाणिस्थानांत हिरातचें खोरें फार पिकाऊ मानिलें आहे. त्या देशांत हरएक प्रकारचा मेवा उत्कृष्ट होतो, व थंड हवेनीं सर्व फळ फळाव लागते. नदी तीरावरील पिकाऊ जमीनींत गहूं, तांदूळ, ऊंस व तंबाखु ह्यांची लागवड करितात. रेशमी किड वाढवून रेशीम काढण्याकडे लोकांचें लक्ष बरेंच आहे; या देशांत स्वस्थता होईल तर पुष्कळ उत्पन्न होईल खरें, परंतु रस्ते करणें फार कठीण असल्यामुळें व्यापार फारसा वाढण्याची आशा नाहीं.

असल्या पहाडी विकट देशांत व असल्या कडक हवेंत रहाणारे लोकही तसेच असले पाहिजेत. त्यांस सामान्यतः जरी अफगाण म्हणतों तथापि त्यांत दुराणि, गिलचे, बेरदुराणि, युसफजी, इ० जाती आहेत. हल्लींच्या अमीराचें घराणें दुराणी जातीचें आहे. हिरातच्या आसपास व हेरिरुद व मर्वाब नद्यांच्या खोऱ्यांतून तर्कोमन व ताजिक जातींचे लोक आहेत. सगळ्या अफगाणिस्थानाची ६०।७० लक्षांजवळ लोकसंख्या असावी; त्यांत व्यापारासाठीं गेलेल्या हिंदूची संख्या ६ लक्ष आहे. अफगाण लोकांचा चेहरा देखणा असून ते मोठे धिप्पाड व बळकट आहेत. त्यांच्या स्वभावाविषयीं भिन्न भिन्न वर्णनें मिळतात. ते स्वातंत्र्येच्छु, शूर, आपल्या कुटुंबांत प्रेमानें वागणारे, स्नेहासाठीं जीव देणारे; परंतु तापट, मूड घेणारे, निर्दय, हट्टी व हांवरे आहेत, असें एल्फिन्स्तन साहेबाचें म्हणणें आहे. दुसरे व्हॉव्हे-सभृति लोक असें म्हणतात कीं, अफगाण लोक, एशियाखंडांतील इतर लोकांप्रमाणेंच नीच, बेमान, विश्वासघातकी, क्रूर व दुष्ट आहेत!! व्हॉव्हे साहेबांनीं एशियाखंडांतील लोकांस हें

नवें शिफारसपत्र दिलें नसून, मिल्लप्रभृतींनीं तें कधींच दिलें आहे ! आणि खरेंच आहे, कारण पाश्चात्य सुधारणेची वृद्धि करूं इच्छिणाऱ्या स्विस्ती राष्ट्रांस एशियाखंडांतील लोक नीच दिसणें रास्तच आहे ! एशियाखंडांतील निर्बळ लोक, आपल्या देशांसाठीं व स्वातंत्र्यासाठीं युद्धें करितात इतकेंच नव्हे तर ते, नीतिमान् युरोपियन राष्ट्रांनीं मनगटाच्या, युक्तीच्या, व राजनीतीनें कायदेशीर केलेल्या लबाडीच्या जोरावर एशियाखंडांतील राजांशीं केलेल्या तहांप्रमाणें वर्तन ठेवीत नाहींत ! हे तह अंमलबजावणीत कीं, त्यांची सार्थकता कधींच होणें नाहीं. स्विस्ती राष्ट्रांनीं पाहिजे त्या गडबडी कराव्या, परंतु अखेरीस विश्वासघातकी एशियेंतीलच लोक ! युरोपियन राष्ट्रांनीं देश मिळविण्याच्या झपाट्यांत व अधाशीपणांत असें म्हणणें अगदीं सयुक्तिक आहे. ' राष्ट्रांच्या कायद्यास ' इकडील हवा मानत नाहीं ! ! असो.

अफगाण विश्वासघातकी असोत, किंवा दुष्ट असोत. आमच्या सरकारानें १८०९ पासून त्या देशांतील लोकांशीं जें वर्तन झालें आहे तें ही शुद्ध आहे काय ? पुढील हकीगत वाचली म्हणजे या प्रश्नाचें उत्तर आमचे वाचकच देतील. सध्या एवढी गोष्ट खरी आहे कीं, या अफगाणिस्थानाच्या शेजारामुळें हिंदुस्थानाच्या पैशाचा व मनुष्यांचा मात्र भरपूर व्यय होत आहे व तो पुढें किती होईल हें ही कांहीं सांगतां येत नाहीं. या अफगाण लोकांची नीट कोणती तरी व्यवस्था लागल्याशिवाय आमचें दुर्दैव कांहीं संपणार नाहीं.

याच शतकांतच काय, पण आज कित्येक शतकें अफगाणिस्थानापासून आम्हांला अतोनात त्रास झाला आहे व त्या लोकांनीं चिरबलापासून विश्वासरावापर्यंत हजारों शूर हिंदूंचा प्राण घेतला आहे. गिझनीच्या महमदापासून अहमद अबदल्लीच्या शेवटल्या स्वारीपर्यंत या देशांतील द्रव्याचा पूर त्या दिशेस वहात होता व तो अजून ही बंद होत नाहीं; मात्र आतां जो पैसा जातो त्याचें स्वरूप भिन्न आहे.

या लहान, परंतु भयंकर लोकांच्या देशांतील राज्यव्यवस्था जुलमी असून, बंडाशिवाय पांच वर्षें कांहीं सुनीं जात नाहींत. अफगाण लोकांवर कोणाचा अंमल नाहीं, अमीरांचें स्वामित्व नांवाचें असतें. तथापि त्यांच्या जातींवर त्यांच्या सरदारांचा मात्र दाब व वजन असतें व हे सरदार जोंपर्यंत खुष असतात तोंपर्यंतच अमीराची अमीरी चालते, नाहीं तर लगेच बंडें सुरू होतात. काबूलवगैरे प्रदेश मोंगल बादशहा बाबर याजकडे होते, परंतु त्याचे वंशज जेव्हां दिल्लीतून येथलें राज्य चालवूं लागले तेव्हां, त्यांचा अंमल झुगारून अफगाण स्वतंत्र झाले. अकबर व शहाजहानाच्या राज्यांत अफगाणिस्थान पुनः जिंकण्याचे पुष्कळ प्रयत्न झाले; व मोंगलांचे मोठे मोठे मुसलमान व हिंदु सरदार खैबर घांट चढले होते, परंतु १८४० त इंग्लिशांच्या फौजेचा जो दुःखकारक शेवट झाला, तोच त्यांच्याही नशीबीं आला ! त्यानंतर कांहीं वर्षें अफगाणिस्थानांत पुष्कळ अंदाधुंदी होऊन हिरात वगैरे प्रदेश इराणानें घेतले. १७३८ अफगाण लोकांनींच इराणावर मुलखगिरी केली व इस्पहान घेतलें, तथापि नादिरशहानें त्यांस मोंगे ढकलून काबूल व कंदाहार दोन्ही शहरें काबीज केलीं. १७४७ त नादिरशहा मरेकऱ्यांकडून मारला गेल्यामुळें अफगाणिस्थानांत पुनः धांदल सुरू झाली; परंतु कांहीं दिवसांनीं कंदाहारच्या सरदारांनीं अहमद दुराणीस आपला शहा नेमिला. ह्यानें दिल्लीपासून कास्पियनपर्यंत अनेक स्वाऱ्या केल्या व त्याच्या कारकीर्दीत अफगाणिस्थानाचा अंमल काश्मिर, पंजाब, तुर्कस्थान आणि खोरासान ह्या प्रांतांत चालूं लागला. तो जिवंत होता तोंपर्यंत सर्व ठीक चाललें होतें, परंतु १७७३ त तो मेल्यावर अफगाण राज्य संकोच पावूं लागलें. त्याचा मुलगा तैमूरशहा यानें आपली गादी काबुलास नेली व १७९३ पर्यंत राज्य करून तो मरण पावला. त्याला २३ मुलगे होते, त्यांचे गादीचहल अर्थात्च तंटे होऊन मारामाऱ्या व खुनांची सुरवात झाली. ह्या गडबडींत अफगाणांच्या हातून पंजाब, काश्मीर, तुर्कस्थान वगैरे देश जाऊन

अफगाणहद्द हल्लीं आहे एवढी झाली. १७९२त प्रसिद्ध झेमानशहा गादीवर होता, परंतु १८०० मध्यें त्याच्या सरदारांनीं त्यास आंधळा करून पदच्युत केलें. त्याच्या मागून महमदशहा अमीर झाला; परंतु १८०३ मध्यें त्याला पदच्युत करून, अफगाणिस्थानाच्या पहिल्या लढाईंत प्रसिद्धीस आलेला शहासुजा गादीवर बसला.

ह्याच्या कारकिर्दीत इंग्लिशांची व अफगाणांची पहिली धूळभेट झाली. १८०९ मध्यें मौंतस्तुअर्त एलफिन्स्तन साहेबांस त्याच्या दरबारांत वकील पाठविलें होतें. या सुमारास फ्रेंच लोक इराणाच्या साहाय्यानें हिंदुस्थानवर स्वारी करणार आहेत अशी दाट वदंता उठली होती, तिच्या निराकारार्थ अफगाणलोकांस आपल्या बाजूला ओढण्यासाठीं हा वकील पाठविला होता. त्यानें आपलें काम नीट बजाविलें व अफगाणलोकांचा इंग्लिशांशीं चिरकाल स्नेह राहील अशीं चिन्हें दिसलीं, तथापि दैवानें वेगळेंच लिहिलें होतें! या सुमारास इराणांतसुद्धां इंग्लिशांचे वकील गेले होते हें मागें सांगितलेंच आहे.

एलफिन्स्तनच्या वकीलीचा परिणाम भलताच झाला. अफगाणलोकांना व सरदारांना असें वाटलें कीं, फिरंग्यांच्या (इंग्लिशांच्या) मसलतीनें शहासुजा आपली सत्ता वाढवीत आहे. एवढ्या संशयावरून परकीयांविषयीं ज्यांच्या मनांत उपजतच द्वेष अशा त्या रानटी अफगाणांनीं काबूल येथें बंड केलें, परंतु शहासुजा सुदैवानें हिंदुस्थानांत जिवंत निसटला. त्याचा जीव वचावला, परंतु त्या दिवसापासून हिंदुस्थानचें दुर्दैव पुढें सरसावलें!

शहासुजा पळाल्यावरअफगाणांनीं महमद शहाला पुनः अमीर केलें, परंतु १८१६ त पुनः एक बंड झालें त्यांत त्याला काबूल सोडून हिरातास जावें लागलें व तेवढ्या प्रांतावरच तो आपला अंमल चालवूं लागला. त्याच्यामागें काबूल येथें अतिशय अंदाधुंदी चालली होती, परंतु १८२६त सरदारांनीं दोस्तमहमदास अमीरी दिली. हा दोस्तमहमद तैमूरशहाच्या मुलांपैकींच एक होता. त्यानें आपल्या कारकीर्दीत काबूल वगैरे प्रांतांत पुष्कळ

बंदोबस्त करून हिंदुकुशाच्या तिकडिल उतरणीवरील बरेच प्रदेश अफगाणिस्थानांत आणिले. ह्यावेळीं पंजाबांत शूर रणजित सिंग होता, त्यानें अफगाण लोकांचा पराभव करून पेशावर व खैबर घांट काबीज केले.

एल्फिन्स्तन परत आल्यापासून १८३७ पर्यंत इंग्लिशांनीं अफगाणांकडे लक्ष पोंचविलें नाहीं. १८०९ पासून १८३७पर्यंतच कंपनीचें राज्य वाढत होतें. पेशव्यांचें राज्य, कुर्ग, आसाम, आराकान वगैरे मोठमोठे प्रदेश ताब्यांत येऊन त्यांची हद्द सतलज नदीपर्यंत आली होती. या नवीन संपादिलेल्या मुलखाची व्यवस्था करण्यांत व देशांत स्वस्थता राखण्यांत लार्ड बेंटिक गुंतले होते. त्यावेळीं हिंदुस्थानांत इंग्लिशांची सत्ता अनियंत्रित चालू झाली होती व त्यांना एकही शत्रू उरला नव्हता. परंतु १८३७ त लार्ड आकलंड गवर्नर जनरल झाला व त्यानें आपल्या उतावीळपणानें हिंदुस्थानावर एक नवेंच संकट आणिलें.

फ्रेंचांची भीति संपल्यावर रशियाचें प्रकरण उद्भवलें व इराणच्या दरबारांत इंग्लिश व रशियन वकिलांची मुलाखत झाली. त्या वेळापासून पुढें इराणाला मदतीस घेऊन रशिया या देशावर स्वारी करणार असें वर्तमान पसरलें होतें. यांत तथ्य कांहीं फारसें नव्हतें, परंतु हिरात घेण्यासाठीं इराणी फौज जेव्हां खोरासानांतून येऊं लागली तेव्हां, हे सर्व खेळ रशियाचे आहेत असा हिंदुस्थानसरकारास पुरा संशय आला. यामुळें हिरातचा वेढा उठविण्यांत आमच्या सरकारानें मदत केली व त्यांत यश येऊन इराणाशीं एक तहही झाला.

इराणी फौजेवर पाठविण्याकरितां जें सैन्य तयार केलें होतें त्याचा कांहीं तरी उपयोग होऊन, आपलें नांव चिरंजीव व्हावें या उद्देशानेंच जणु, आकलंद साहेबानें काबूलच्या अमीराकडे आपला वकील पाठविला. या वकिलाचीं मागणीं विरोध काय असणार? रशियाला दूर राखावें, इंग्लिशांशीं स्नेह करावा, त्यांचा व्यापार वाढविण्यांत मदत करावी व त्यांचा नेहमींचा एक रेसिडेंट

काबूल येथें ठेवावा, अशा अर्जाची ही मागणी होती. परंतु शहासुजाचा परिणाम लक्षांत आणून आपल्या सरदारांस खुष ठेवण्यासाठीं, दोस्त महमदानें वर्नेस् साहेबास निरोप दिला. एवढें कारण अफगाणिस्थानावर स्वारी करण्यास पुष्कळ झालें.

दोस्तमहमदानें रशियाशीं संधान जुळविलें अशी तर आतां पक्की खात्री होऊन चुकली व अफगाणिस्थानांत जाणारी फौज तयार झाली. दोस्तमहमदास पदच्युत करावें व शहासुजाला गादी देऊन त्याला आपल्या मुठींत ठेवावें एवढाच ह्या स्वारीचा उद्देश होता.

१८३९ त इंग्लिश फौज मोठ्या उत्साहानें अफगाणिस्थानांत चढली व काबूल, कंदाहार गिझनी वगैरे बळकट जागा भराभर घेऊन शहासुजास अमीर केलें व दोस्तमहमदास नेमणूक करून या देशांत पाठाविलें. ही व्यवस्था संपली न संपली तोंच तिकडे एक भयंकर बंड होऊन पुष्कळ इंग्लिश प्राणास मुकले व त्यांनीं केलेल्या अमीराचाही असाच अंत झाला. अफगाण लोकांनीं दोस्तमहमदाच्या मुलास आपला मुख्य करून इंग्लिशांचे पराभव केले व त्यांची फौज हिंदुस्थानांत परतणें भाग पडलें. या परतण्यांत ४००० फौज व १२००० बरोबरचे इतर लोक, हे सर्व तरवारीनें अथवा थंडीनें परलोकास गेले. अशा तऱ्हेनें या स्वारीची दुर्दशा झाल्यावर, इंग्लिश नांवाची छाप ठेवण्यासाठीं 'सूड उगविणारें सैन्य' तयार झालें व त्यानें पुनः काबूल गिझनी वगैरे स्थळें काबीज केली; परंतु वाईट हवेंत व क्रूर, खुनशी आणि रानटी लोकांत राहणें कठीण वाटून, हें विजयी सैन्य परत आलें व पहिलें अफगाणयुद्ध संपलें.

हा प्रकार झाल्यावर दोस्तमहमदास मोकळा केला होता, त्यानें परत जाऊन गादी संपादिली. १८४८ त शिखांबरोबर लढाई चालली होती, त्यांत यानें शिखांस पुष्कळ मदत केली, परंतु कंपनीनें पंजाब काबीज केल्यानंतरोवर त्यानें १८५५त दलहौसीसाहेबाशीं पेशावर येथें एक मित्रत्वाचा तह केला. इंग्लिशांबरोबर केलेला तह एकीकडे गुंडाळून, १८५६त इरा-

णी लोकांनीं हिरातवर स्वारी केली; त्यामुळें इंग्लिशांनीं इराणाचे
श अखातांत सैन्य पाठविलें व इराणी फौजेला परतविलें. १८६२
त दोस्तमहमदानें हिरात घेतली व लागलाच मरण पावला.
त्यानें आपल्या मृत्युपत्रांत आपल्या तेरा मुलांपैकीं तिसऱ्या शे-
अर अछीला गादी मिळावी असें लिहिलें होतें; परंतु त्याच्या
भावांनीं बंडें केलीं, त्यांचा बंदोबस्त होऊन १८६८ त त्याला
गादी मिळाली.

याच वर्षीं रशियानें समरकंद घेतल्याचें आश्चर्यकारक वर्त-
मान निघालें. त्यामुळें अफगाणिस्थानाशीं स्नेह करणें अत्यावश्य
वाटून लार्ड मेयोसाहेबांनीं १८६९ त अंबाला येथें एक दरबार
करून शेअरअल्लीची दोस्ती केली व त्याबद्दल अमीरास कांहीं
लक्ष रुपये देण्याचें ठरलें !

१८३९ पासून पुढें अंबाला येथील दरबार होईपर्यंत जो अवधि
लोटला तेवढ्यांत रशियाच्या व इंग्लंडाच्या एशियेंतील राज्यां-
चा विस्तार फारच जलदीनें वाढला. या शतकाच्या आरंभीं
जेव्हां रशियन एशियाखंडांत नुस्तेच शिरले होते तेव्हां त्यांचें
राज्य झपाट्यानें वाढून त्यांच्या हद्दीजवळ येतील असें स्वप्नांत
सुद्धां आलें नसेल, परंतु १८६९त आतां रशियाची महत्वाकांक्षा
थांबणार कोठें हा प्रश्न इंग्लंडांत व येथें सुरू झाला. रशियानें
जसें राज्य वाढविलें होतें तसेंच इंग्लंडानेंही पण वाढविलें आहे. र-
शियन लोक महत्वाकांक्षी आहेत, त्यांना मुलुख संपादण्याची व नि-
र्बळ निरपराधी संस्थानें तोंडांत टाकण्याची हाव सुटली आहे व अ-
से अतृप्त लोक जगांत नाहींत, अशी ओरड इंग्लिश वर्तमानपत्रांतून,
पुस्तकांतून व मंत्रीसभांतून चालली असतां, इंग्लंडानें आपली हद्द
पश्चिमेस १९०० मैल पुढें नेली व कलकत्त्याच्या दक्षिणेसही
१००० मैलांवर इंग्लिश निशाणें फडकूं लागलीं. रशियाचा
आमच्या देशावर स्वारी करण्याचा जर उद्देश असेल तर
तो दुष्ट हेतु सिद्धास जाऊं न देण्याविषयीं आह्मीं कायावाचा,
मनेंकरून झटावें, सरहद्दीचें रक्षण करावें व प्रसंग जाणून फौ-
जफांटा व आरमार यांचीही सिद्धता ठेवावी; परंतु जी गोष्ट आप-

गाणिस्थानांत शांतपणानें राज्य करून इंग्लिशांशीं स्नेहभावाचें वर्तन ठेविलें. अमीरानें आपला आवडता मुलगा अबदुलजान यास अंबाल्याच्या दरबारास आणिलें होतें व पुढें त्यासच अमीरी मिळण्याचा संभव दिसला, म्हणून त्याचा वडील मुलगा अयूबखान यानें एक बंड केलें. त्याला व अफगाण सरदारांना इंग्लिशांचा स्नेह मुळींच आवडला नाहीं. १८३९-४२ च्या युद्धापासून अफगाण लोक इंग्लिशांचा पुरा द्वेष करूं लागले होते, तथापि शेअरअल्लीनें अयुबखानास कैदेंत टाकून बंड शमविलें.

१८७६ त युवराजांची स्वारी या देशांत आली होती व राजनिष्ठ प्रजेनें त्यांचा योग्य सन्मान व आदरातिथ्य चालविलें होतें. या वेळेस हिंदुस्थानांत दुष्काळ वगैरे कोठें कांहीं नसून चोहोंकडे स्वस्थता होती व ती अशीच चालू राहील असें सर्वांस वाटत होतें. परंतु एप्रिल महिन्यांत लार्ड नार्थब्रूक स्वदेशास गेले व त्यांच्या जागीं लिटनसाहेब विराजित झाले. १८७७ त महाराणी विक्टोरिया यांस केसर-इ-हिंद हा किताब देण्यासाठीं दिल्ली येथें बडा दरबार झाला व त्याच वेळीं दक्षिण हिंदुस्थानांत लाखों मनुष्यांचे दुष्काळानें बळि पडले. असा भयंकर दुष्काळ या देशांत क्वचित्च झाला असेल. अन्नावांचूनीं उपाशीं मरणाऱ्या राजनिष्ठ प्रजेस उदारबुद्धीनें अन्नदान देण्याचें सोडून, लिटनसाहेबांनीं कोट्यावधि रुपये खर्चाची एक नवीनच युक्ति शोधली:—अर्थात् अफगाणिस्थानचें दुसरें युद्ध!

कान्सरवेटीव पक्षानें अफगाणिस्थानाच्या वायव्येकडील सरहद्द ठरवून टाकण्याचें सोडून दिलें, व अफगाणिस्थानांत आपला रेसिदेंत सतत असावा असा दुराग्रह धरिला. या रेसिदेंताच्या बाबतींतच १८०९ पासून पक्के अनुभव आले असतांही लिटनसाहेबांनीं पूर्ण विचार केला नाहीं. खुद्द शेअरअल्ली कदाचित् कबूल झाला असता, परंतु आपल्या जीवाची आशा त्याला सोडावी लागेल, हें समजूनच आमच्या सरकाराचें म्हणणें त्यानें मान्य केलें नाहीं. तो अपमानसहन न होतां लार्ड लिटन यांनीं नवाब अबदुल हुसेनखाननामक आपल्या वकिलाला मोठ्या थाटानें काबुलास पाठ-

विलें. अमीरानें त्याचा सत्कार केला व नजराणा देऊन निरोप दिला. रेसिदेंत ठेऊन घेण्यास मात्र तो कबूल होईना. या वेळेस रशियाकडूनही एक वकील आला होता. त्याला नजराणा वैगैरे कांहीं मिळाला नाहीं.

आपलें म्हणणें नाकबूल करून रशियाच्या वकिलासही आपल्या दरबारांत येऊं दिलें, हें वर्तमान कळतांच लढाई करून अफगाणिस्तान ताब्यावर आणण्याचा आमच्या सरकारानें निश्चय केला.

ही लढाई सुरू करण्यास योग्य कारण नवतें हें सहज देखील. अमीराचें वर्तन रशियाशीं व इंग्लिशांशीं येणेप्रमाणें होतें:—

१ त्यानें रशियाच्या वकिलाचें स्वागत केलें.	१ त्यानें त्यापूर्वी अनेकवेळा व नंतर लगेच इंग्लिश वकिलांचेंही स्वागत करून त्यांस नजराणा दिला.
२ त्यानें रशियाशीं सख्यत्वाचा तह केला.	२ असे तह त्यानें इंग्लिशांशीं ही केले होते व तो करण्यासही तयार होता.
३ रशियाकडून रेसिदेंत ठेवण्याचें मागणें नवतें.	३ हिंदुस्थानसरकारानें रेसिदेंत ठेवलाच पाहिजे असा आग्रह धरिला.

लढाई देण्याच्या मनांत निश्चय करून लिटन साहेबानीं काबूल येथें एक मिशन पाठविलें. या मिशनाबराबर कांहीं फौजही दिली होती. तेव्हां अशा मिशनास आपल्या स्वतंत्र देशांत न घेण्याचा अफगाणांनीं निश्चय केला व आल्फिमस्जिद येथें लढाईसच प्रारंभ झाला म्हटल्यास हरकत नाहीं. ही राशियानिमित्त सुरू झालेली लढाई सर्वांच्या स्मरणांतच असेल, म्हणून जास्त हकिकत देण्याचें कारण नाहीं. तथापि संदर्भाकरितां त्याचा गोषवारा देतों:

सुमारें ९०००० फौज पेशावर, कुरम व केटा या तीन द्वारांनीं अफगाणिस्थानांत शिरली. १८७८ च्या दिसेंबर महिन्यांत शेअरअल्लीनें काबूल सोडिलें, त्याबरोबर अयुबखानानें राज्य आपणाकडे घेतलें. जानेवारी १८७९ त कंदाहार घेत-

लें व पुढें लवकर शेअरअल्ली मरण पावल्याची बातमी कळली. अयूबाला अमिरी मिळाल्यावर त्यानें इंग्लिशांशीं गंडामक येथें तह केल.. त्यांत, इंग्लिशांनीं खैबर घांट, आणि कुरम व पिशिनखोरीं आपल्या ताब्यांत ठेवावीं; काबूल येथें पाहिजे तो रेसिदेंत नेमावा; अमीराचा स्नेह राखून त्यास सालिना ६ लक्ष रुपये द्यावे व वरील जागांचें रक्षण करण्यापुर्ती फौज ठेऊन बाकीची परत न्यावी, असें ठरलें. असा तह ठरल्यावर जुलैच्या ८ व्या तारखेस इंग्लिश सैन्य परतूं लागलें.

याप्रमाणें रेसिदेंत ठेवण्याचा हट्ट पुरा होऊन राजकार्यधुरंधर लिटन साहेबांस अत्यानंद झाला व त्यांनीं सर क्याव्हग्यारी यांना रेसिदेंत नेमिलें. रेसिदेंत अयूबखानानें नेमिला, त्या मामुल शिरस्त्याप्रमाणें त्याच्या सरदारांस व लोकांस ती गोष्ट आवडली नाहीं. त्यांनीं आगष्ट महिन्यांत काबुलास दंगा करून रेसिदेंतास व त्याच्या बरोबरीच्या मंडळीस ठार मारिलें ! रेसिदेंत ठेवल्याबद्दल अफगाण लोक इतके संतापले होते कीं, त्यांच्या भीतीनें आपल्या मुलास घेऊन अयुबखान पळून गेला. हें झाल्यावर पुनः जनरल राबर्टस्(हल्लींचे कमांडर-इन्-चिफ्)ह्यांनीं काबूल घेतलें व अफगाण लोकांस बरेंच शमाविलें, तथापि अयुब गेल्यापासून साऱ्या देशांत गडबड व बेबंदशाही सुरू होऊन सगळ्या लोकांनीं इंग्लिशांविरुद्ध शस्त्रें घेतलीं व जीवाविषयीं निराश होऊन वेड्याप्रमाणें ते लढूं लागले. इंग्लिशांनीं एखादा अमीर नेमावा ह्मणून यत्न केले पण व्यर्थ झाले; व अफगाणिस्थानाचा बंदोबस्त होईना. इतक्यांतं १८८० त लिबरल पक्षाची सरशी झाली व त्यांनीं त्या देशांतून आपला पाय काढण्याचा निश्चय केला; कारण तेथील सर्व लोकांस थंड करून व्यवस्था करण्यास व पुढें तशी राखण्यास निदान ९०।९० हजार फौजेची जरूरी होती; व असा अतोनात खर्च देण्याची हिंदुस्थानास ताकदच नवती, व इंग्लिशांनीं दिला नसता. ह्या लढाईपासून निष्पन्न एवढेंच झालें कीं, अफगाणिस्थान स्वतंत्र व तिन्हाईत स-

मजावयाचें अशी रशियाशीं चालेलली वाटाघाट खोटी ठरली आणि त्यामुळें त्या राष्ट्राला मात्र रागास आणिलें.

अयुबखान हिरातेस होता व तो इंग्लिशांच्या मताप्रमाणें चालण्यास कबूल नवता, ह्मणून आमच्या सरकारानें काबूल वगैरे प्रांत, अबदुल राहिमान खानास देऊन त्यास अमीर केलें. हा अबदुल राहिमानखान शेअरअल्लीचा आत होता, परंतु त्यास १८६९ त हद्दपार केलें होतें. तेव्हांपासून तो बुखारा येथें रशियन लोकांकडून पेनशन घेऊन स्वस्थ राहिला होता ! वरील संधि मिळतांच त्यानें अफगाणिस्थानांत प्रवेश केला. त्याला अमीर नेमला असें कळतांच अयुबखानानें हिरातेकडून कंदाहारावर स्वारी केली व इंग्लिश फौजेचा पराभव केला. त्याचें जनरल रॉबर्टस् यांनीं पारिपत्य केलें व लवकरच अफगाणिस्थानांतून इंग्लिश फौज परतली व कंदाहार सोडून दिलें. मागें अमीरानें आपल्या राज्यांत बरीच व्यवस्था केली व अयुबखान इराणांत पळून गेल्यामुळें हिरात शहर ही त्याच्या ताब्यांत आलें. कंदाहार आपल्या ताब्यांत ठेवावें ह्मणून पुष्कळांचें ह्मणणें होतें, परंतु लिबरल मंडळीनें,त्याच्या ठेवण्यापासून कांहीं उपयोग नाहीं व खर्चाचें व्यर्थ होणार; इत्यादि शहाणपणाच्या विचारावर तें सोडून दिलें.

पुढें ही दोनचार वर्षें स्वस्थपणानें जात असतां मागल्या वर्षापासून रशियाची गडबड सुरू झाली. मागील प्रकरणांत रशियानें १८८४च्या फेब्रुवारी महिन्यांत मर्व्ह घेतलें ह्मणून सांगितलेंच आहे. तें शहर घेतल्यामुळ अफगाणिस्थानचे वायव्येकडे झाराची व अमीराची सीमा मिळाली, परंतु ती कोठें मिळाली हा कांहीं निर्णय करितां येईना. कारण अफगाण लोकांनाच हिरातेच्या उत्तरेस आपला अंमल कोठपर्यंत आहे हें पक्कें माहित नतें. मर्व्ह घेण्यापूर्वी रशियानें ही सरहद्द पक्की ठरवावी ह्मणून चविलें होतें, परंतु इंग्लंदाकडून त्याचा विचार झाला नाहीं. पुढें मर्व्ह घेतल्यामुळें रशियास ती हद्द ठरविणें भाग पडलें.

या सरहद्दीच्या तंट्या संबंधाची पढील सर्व हकिगत चार्लस मार्विहन, व्हांबे, मालेसन वगैरे मंडळीच्या लेखांवरून घेतली न-

सून मध्यएशियाप्रकरणावर प्रसिद्ध झालेल्या; पार्लमेतांच्या 'ब्ल्युबुकां 'वरून घेतली आहे. त्यां शिवाय इंग्लंदांतील 'पॉल-मॉलग्याझेट' नांवाच्या एका निःपक्षपाती प्रसिद्ध वर्तमानपत्राच्या या प्रकरणावरील लेखाचाही बराच उपयोग केला आहे.

सरहद्दीसंबंधाचा प्रश्न १८७३ तच सुरू झाला असें मागें सांगितलें आहे. रशियाच्या पुढच्या चालीस कांहीं तरी ठरीव मर्यादा करण्याच्या उद्देशानें लार्ड ग्ल्यानविल यांनीं खटपट चालविली होती. त्या सालीं अफगाणिस्थानाच्या सरहद्दीवर जरी रशियन पोंचले नवते तथापि तेथपर्यंत ते लवकरच पोंचतील असा संभव होता. आजपर्यंत या दोन्हीं राष्ट्रांचा असा एक सामान्य समज होता कीं, प्रत्येकानें आपल्या आवाक्यांत येणाऱ्या व आसपास असणाऱ्या लहानसान राज्यांशीं पाहिजे तो संबंध ठेवावा व त्यांत दुसऱ्या राष्ट्राने हात घालूं नये. या समजुतीवरच हिंदुस्थानांत जीं राजकारणें इंग्लिशांनीं केलीं, त्यांत रशियानें ढवळाढवळ केली नाहीं इतकेंच नव्हे, तर तुह्मीं काल सिंध घेतलें, आज पंजाब घेतलें, आतां थांबणार कोठें? असा प्रश्न रशियानें इंग्लंदास विचारलेला आढळत नाहीं. परंतु मध्य एशियेंतून जेव्हां रशियन लोक बाहेर पडून पुढें येऊं लागले तेव्हां तशा तऱ्हेचा प्रश्न आमच्या सरकारानें श्वेतझारास विचारिला. त्यानंतर इंग्लंद व रशिया यांच्यामध्यें अफगाणिस्थान स्वतंत्र व तिऱ्हाईत ठेवावें असा बेत झाला, ह्मणून त्याच्या हद्दी ठरविण्याची सहजच जरूरी पडली. अफगाण किंवा मध्य एशियेंतील इतर कोणत्याही लोकांच्या राज्याच्या हद्दी ठरलेल्या नसावयाच्याच; कारण हे रानटी लोक आपसांत नेहमीं भांडत व युद्धें करीत यामुळें केव्हां केव्हां त्यांच्या हद्दी पुढें जात व केव्हां केव्हां त्या मागें येत. याप्रमाणें अफगाणिस्थानच्या वायव्य व उत्तर दिशांस नेहमीं गडबड चाले, यामुळें सीमांचा निर्णय करणें बरेंच कठीण होतें. १८७३ सालीं रूस सरकारानें इंग्लंदाला कळविलें कीं, दोस्तमहमंदाचा जेथें मजबूद व पक्का अंमल होता, तेवढे प्रदेश मात्र अफगाणि-

स्थानांत गणिले जावेत; त्याच सालीं बदकशान व वखान प्रांत अफगाणिस्थानचे आहेत असें राशियानें कबूल केलें. पुढें त्यानंतर बल्क वगैरे दुसरे पांच प्रांत ही अफगाणांचे आहेत असे राशियानें मानलें. १८७३ पासून पुढें हें सरहद्दप्रकरण तसेंच राहून अफगाणयुद्ध मध्येंच उद्भवलें. तें थंड होऊन अमीर अबदुलराहिमान गादीवर येतांच तो प्रश्न पुनः सुरू झाला. १८८३च्या सुमारास बदकशान प्रांताच्या अफगाणसुभेदारानें बुखारासंस्थानाला लागून शिंगान व रोशाना नांवाचे लहान स्वतंत्र परगणे होते, त्यांवर स्वारी केली. त्याबरोबर रूससरकारानें ती गोष्ट इंग्लिशांस कळविली व त्यांच्यामार्फत अमीरास ही अशी सूचना दिली कीं, त्यानें दोस्तमहमद व शेअरअल्ली यांच्या ताब्यांत जेवढा मुलुख होता त्याच्या पलिकडे जाऊं नये. त्यावेळीं सरहद्द ठरवून टाकावी म्हणून राशियाचे म्हणणें होतें, परंतु ती ठराविल्यास त्या हद्दीपर्यंत राशिया आपली चाल करील अशा भीतीनें तो प्रसंग तसाच गेला. पुढें कर्मधर्मसंयोगानें रशियानेंच कास्पियनपासून चाल केली व मर्व्ह ही घेतलें.

सरहद्दीचा प्रश्न निघाल्यावर आमच्या नामदार व्हाइसरायांनीं आपल्या देशाची हद्द नीट ठरवावी म्हणून अमीरास कळविलें. अमीरानें उत्तर दिलें कीं 'मला ही नीटशी माहीत नाहीं, याकरितां तुम्हीं एकादा माझ्या देशाचा नकाशा द्या म्हणजे त्याप्रमाणें आपली सीमा ठरवितों.' आमच्या सरकाराजवळ जे नकाशे होते ते तरी विश्वसनीय व खात्रीलायख माहितीवरून तयार केले होते असें नाहीं; तेव्हां या हद्दीचा तंटा, जाग्यावरच माहिती करून निकाल केल्याशिवाय तुटावयाचा नाहीं, असें लक्षांत आणून, इंग्लिशसरकारानें रशियास कळविलें कीं, एक तुमचा, एक आमचा व एक आफगाण, असे तीन कमिशनर नेमून अफगाणिस्थानच्या वायव्येकडील सीमा ठरवावी. ही सरहद्द आक्सस नदीच्या कांठावरील खोजासाले शहरापासून पश्चिमेकडे ठरवावी व तेवढीच कमिशनरांनीं पहाणी करावी असें इंग्लिश सरकारानें सुचविलें. खोजासालेकडून पश्चिमेकडे असें म्हटलें, परंतु पश्चिमे-

कडे सराक्सपर्यंत किंवा अमुक एक ठिकाणापर्यंत असें स्पष्ट सांगितलें नवतें. रशियानें, इंग्लिशांची सूचना मान्य केली, परंतु अफगाणकमिशनर मात्र घेतला जाणार नाहीं, असा हट्ट धरिला व त्याला आमच्या सरकाराची कबुली मिळाली.

*खोजासालेपासून पश्चिमेस सराक्सपर्यंत एक रेषा काढ ला ह्मणजे ती अफगाणहद्द झाली, असें इंग्लिशांनीं अमीरास दिलेल्या नकाशांत, त्यास समजविलें होतें. रशियाचें ह्मणणें असें होतें कीं, खोजासालेपासून मर्वाब नदीवरील बालामर्वाबपर्यंत, व तेथून पुढें इराणच्या सीमेजवळ हेरिरुद नदीवरील झुलाफिकार नांवाच्या खोऱ्यापर्यंत मर्व्ह येथील तकीमन लोकांची हद्द आहे व तेथें अमीराचा अंमल कधींच नव्हता; ह्मणून मर्व्ह घेऊन तकीमन लोकांस आपल्या ग - णाखालीं घेतल्यामुळें ह्या प्रदेशावरही रशियाचा अम्मल अ ैं वा. ही सीमा साराक्स व मर्व्हपासून पुष्कळच पुढें येते, व झुलफिकार व बाला—मर्वाबपासून हिरात शहराशीं अनुक्रमें १०० व १४० मैल अंतर रहातें. रशियाची सीमा हिरातच्या जवळ आल्यास चांगलें नाहीं, त्यापासून त्या शहरास व अफगाणिस्थानास धोका पोंचेल व कदाचित् या देशावर स्वारी करण्यासही रशियास सोपें पडेल, असें वाटून सरहद्द ठरविण्याविषयसर्वांची उत्सुकता झाली. जो हा तंट्याचा प्रदेश आहे, त्याच

---

* या दोन प्रकरणांत आलेल्या प्रसिद्ध स्थळांचीं परस्परांपासून अंतरें येणेंप्रमाणें आहेत.

सक्कर	पासून	खिलात	मैल. २९०	बालामर्वाब	पासून	मर्व	—मैल १२५
,,	,,	क्वेटा	२५०	,,	,,	झुलफिकार	१००
खिलात	,,	,,	११०	,,	,,	पजदे	१२०
क्वेटा	,,	कंदाहार	१४३	,,	,,	बल्क	२१०
,,	,,	देरागाजीखान	२८५	,,	,,	खोजासाले	२४५
देरागाजीखान	,,	कंदाहार	३२०	गझनी	,,	काबूल	८५
कंदाहार	,,	गिरकिश	७५	काबूल	,,	जलालाबाद	१०४
गिरकिश	,,	हिरात	२९४	जलालाबाद	,,	पेशावर	८८
हिरात	,,	मश्द	२१५	खोजासाले	,,	समरकंद	२०१
,,	,,	सराक्स	१३६	समरकंद	,,	बोखारा	१६०
,,	,,	बालामर्वाब	१४०	सराक्स	,,	अस्काबाद	१६०

उभयपक्षांच्या कमिशनरांकडून पक्का निर्णय होईपर्यंत अर्थात्च रशियानें किंवा अफगाणिस्थानानें तेथें जाऊन आपला अम्मल बसवूं नये, हें उघड होतें. परंतु अमीरास वर सांगितलेला नकाशा मिळतांच त्यानें आपली फौज पाठवून बालामर्घाबचा ताबा घेतला. त्याबरोबर रूससरकारानें इंग्लिश सरकाराकडे अमीराच्या बेकायदेशीर वर्तनाबद्दल तक्रार केली, परंतु त्याला नीट उत्तर मिळालें नाहीं. बालामर्घाब घेतल्यानंतर, आपली हद्द साधेल तितकी पुढें ढकलण्याच्या उद्देशानें, रशियन व इंग्लिशांमध्यें काय वादविवाद चालले आहेत या गोष्टीकडे दुर्लक्ष करून, अमीरानें आपले लोक पुढें पाठविण्यास सुरवात केली, व मर्घाब व कुप्क नद्यांच्या संगमावरील पेंजदे नांवाचें गांव काबीज केलें. मर्व्हपासून दक्षिणेकडे जो वालुकामय प्रदेश पसरला आहे त्यांत पेंजदे टापूच काय तो सुपीक आहे. १८९७ पासून तेथें सारिक टर्कोमन लोक रहातात व तेथें दोस्तमहमद किंवा शेअरअल्ली यांचा अंमल चालत नवता. ते लोक बहुतेक अंशी स्वतंत्र होते इतकेंच नव्हे तर त्यांचा अफगाण लोकांशीं पक्का द्वेष आहे. अफगाण लोकांस सारिक लोकांपुढें जाण्याची बिलकुल छाति होत नाहीं इतकी त्यांची त्यांस भीति आहे. पेंजदेवर अफगाणांचा डोळा आहे अशी तक्रार रूस लोकांनीं केली होती व हे सर्व तंटे कमिशनकडून संपवावे असें ठरत होतें, इतक्यांत अफगाणांनीं पेंजदेवर चाल करून तें गांव आपल्या ताब्यांत घेतलें. ह्यावेळेस सारिक लोक आपणांस आश्रय द्यावा ह्या हेतूनें मर्व्ह येथील रशियन अधिकाऱ्याकडे गेले होते; तेवढीच संधी अफगाणांनीं साधून, हा सगळा पुढें झालेला घोंटाळा उत्पन्न केला. पेंजदे घेतल्याचें वर्तमान समजतांच रूससरकारानें पुनरपि तक्रार केली, व वादग्रस्त प्रदेशांत अमीरानें चाल केली, ही चूक केली असेंही दाखविलें; शेवटीं निरुपाय झाल्यामुळें कमिशनाची वाट पहात न बसतां, अफगाणलोकांच्या बेकायदेशीर वर्तनास हरकत करण्यासाठीं, पुढें दोन महिन्यांनीं, हेरिरुद नदीवरील पुलइखातुम व झुलफिकार येथें आपले शिपाई पाठविले; व कमिशनकडून वादग्रस्तहद्दीचा नि-

काल हाईपर्यंत तीं स्थळें आपणाकडे घेतलीं. या वेळेस अमलंचूया व रूस सरकारामध्यें, सरहद्दीवरील केवळ्या पट्टचाची कमिशननें पहाणी करावी, ह्याबद्दल पत्रव्यवहार चालू होता. इतक्यांत रशियाचा कमिशनर जनरल झेलेनाय् ह्याची प्रकृति बिघडली त्यामुळें कमिशनचें काम ज्यानेवारींत (१८८५) सुरू करावें असें रशियानें सुचविलें. रशियाचें ह्मणणें असें होतें कीं, पंजदेयेथील सारिक तर्कोमन अफगाण अंमलांत नवते; ते बडे लुटारू असल्यामुळें त्यांना आपल्या ताब्यांत घेतल्याशिवाय आपली सरहद्दीवर शांतता रहाणार नाहीं; आणि शिवाय ते स्वतःच झाराच्या बावळ्या खालीं येण्यास खुषी आहेत.

या कमिशनला ज्या सूचना होत्या, त्यांत मुख्य अशी होती कीं, वादग्रस्त सीमेचा निकाल लावतांना, त्या प्रदेशांत रहाणाऱ्या निरनिराळ्या जातींच्या स्वभावाकडे, त्यांच्या आपसांतल्या स्नेहसंबंधाकडे व द्वेषांकडे पुरी नजर ठेविली पाहिजे. कारण कित्येक जातींचें आपसांत व अफगाणांशीं अति वैमनस्य आहे, यासाठीं त्यांस झाराच्या किंवा अमीराच्या ताब्यांत देणें तें, सरहद्दीवर जेणेंकरून शांतता राहील अशा रीतीनेंच दिलें पाहिजे इकडील कमिशनर सर पितर लंस्देन यांस आमच्या सरकारची अशी ही एक सूचना होती कीं, जो मुलुख फायदेशीर नसून संभाळणें अमीराला जड जाईल, तेवढा रशियानें घ्यावा, परंतु लढाईच्या प्रसंगीं वगैरे उपयोगी पडणाऱ्या महत्वाच्या जागा अमीरासाठीं ठेवाव्या.

कमिशननें पहाण्याच्या पट्टयाबद्दल ह्या सुमारास सरकारांत चरचरीत लेख सुरू झाले. इंग्लिशांनीं कागी ला पट्टा रशियास पसंत होईना व रशियानें दाखविलेला प इंग्लंदास पसंत होईना. संशयित मर्यादा जाईल तितकी हिराते जवळ जावी असा रशियाचा बेत आहे असें दिसतांच इंग्लंदानें ती सरहद्द फारच मागें ढकलली. येणेंप्रमाणें पत्रोपत्रींच वादविवाद चालून, प्रकरण लढाईशिवाय संपत नाहींसें दिसलें. रशियाचा डोळा हिरातेवर आहे, असें पुष्कळांस

भासलें व तसें भासण्यास दुसरें एक सबळ कारण झालें. इंग्लंदानें जेव्हां सरहद्द मागें घेण्याची सूचना केली तेव्हां रूसस्त्र कारास असा संशय आला कीं, पेंजदे, पुलइ-खातुम् वगैरे गांवें अफगाणिस्थानाचींच आहेत, असा इंग्लंदाचा समज आहे व म्हणूनच अफगाणांच्या बेकायदेशीर वर्तनास इंग्लंदाकडून हरकत झाली नाहीं. हा संशय येतांच रूसलोकांनीं आपली फौज सरहद्दीवर तयार केली व अफगाण लोकांनीं पुढें चाल चाफल्यास लढाई करूं असें साफ सांगितलें. हा खरा वृत्तान्त बाहेर पडतां रशियाची तयारी अफगाणिस्थानावर हल्ला करून इंग्लिशांशीं लढाई करण्याची आहे, असा वर्तमानपत्रांतून वगैरे बोभाटा झाला. ह्यामुळें आमच्या सरकारास हें प्रकरण शांत रीतीनें तडीस जाण्याची निराशा वाटून लढाईची जारी तयारी सुरू झाली.

अफगाणिस्थानच्या लोकांचें व आपलें सख्य कसें आहे हें पक्कें ठ्य माहित असतांही, ह्या सरहद्दप्रकरणांत इंग्लंदानें वाजवीपेक्षां जास्त मन घातलें व अफगाणांच्या हक्कांचें संरक्षण व्हावें ह्मणून्यांन, लागेल तितकें द्रव्य व रक्त खर्च करण्यास आपण तयार तक्का हों असें जगास दाखविलें. कदाचित् लढाईचा प्रसंग आसंपड्यास अमीर व त्याची प्रजा यांनीं विश्वासघात करूं नये करण्यासून अमीराचा आपणावर किती भरंवसा आहे हें पहाणें आपारूर होतें; कारण अमीर आमच्या खांकेतला आहे असें च्य। शियाला सांगितलें खरें, परंतु खुद्द अमीराचें मन कळलें नवतें झालेल्याच्याशीं कांहींच करार झाले नवते! तेव्हां हें लंगडें रूससत्र नीट उभें करण्यासाठीं, आमचे व्हाईसराय लार्ड डफरीन यानें ह्मणीं अमीराची भेट घ्यावी असें ठरलें, व त्याप्रमाणें रावळपिंडी पाय्येथें दरबार भरवून अमीराशीं आपला संबंध पक्का करून कांचण्याची तयारी झाली. आमंच्या सरकारच्या निमंत्रणास हि अमीरानें अनुमोदन दिलें व ता० ३० मार्च रोजीं अमीर अबदुल्लरहमान पिंडीस दाखल होणार असें जाहीर झालें. त्याप्रमाणें त्याची स्वारी तारीख ३१ रोजीं येऊन

पोंचली. अमीराचा मुक्काम आमच्या देशांत आठवारा दिवस होता. तितक्या अवकाशांत आमच्या सरकारानें लाखों रुपये खर्चून आपल्या पाहुण्याचा सत्कार उत्तम रीतीनें केला व फौजेच्या कवायती करून इंग्लंदाचें बल कसें आहे तें दाखविलें. अमीरानें, फार खुष होऊन, आपण इंग्लंदाचा पूर्ण स्नेही आहों असें भरदरबारांत सांगितलें व आमच्या विजयिनी महाराज्ञी विक्टोरिया ह्यांचें सैन्य सर्वत्र अजिंक्य असो, असा दुवा मागितला. 'ज्या अर्थी अफगाणिस्थानच्या बाह्य शत्रूंचें निर्दलन करण्याचें इंग्लंदानें अभिवचन दिलें आहे त्या अर्थी अफगाणलोकही ब्रिटिशसरकारच्या पक्षाचे होऊन त्यांच्या बरोबर शत्रूंशीं लढण्यास तयार आहेत,' असें त्यानें बोलून दाखविलें व आमच्या सरकारानें नजर दिलेली तरवार उचलून 'ह्या तरवारीनें मी महाराणी साहेबांच्या शत्रूंशीं लढेन' असें ह्मटलें. अमीरानें आपणास कांहीं पदवी पाहिजे, अशी इच्छा दर्शविल्यावरून त्यास जी. सि. एस्. आय्. ही पदवी दिली. ह्याप्रमाणें सर्व समारंभ झाल्यावर ता० १२ एप्रिल रोजीं अमीर अफगाणिस्थानास परतला.

" त्याच दिवशीं सायंकाळीं रशियनलोकांनीं पेंजदेवर हल्ला केल्याची बातमी मला पोंचली, ती मी अमीरास कळविली, परंतु आह्माला वाटलें होतें तितकें त्यानें आश्चर्य दाखविलें नाहीं. आपल्या देशावर स्वारी झाल्यास, शत्रूस मागें ढकलण्यांत प्राण खर्च झाले तरी करूं, असा आपला निश्चय त्यानें कळविला; युद्धप्रसंग टाळण्याविषयीं व सरहद्दप्रकरण शांत रीतीनें मिटवावें ह्मणून त्याची फार इच्छा आहे, तथापि आपली प्रजा आपल्या पोराबाळांसाठीं व देशासाठीं प्राण खर्चीं घालील असें त्यानें ह्मटलें." अशी तार ता० १३ एप्रिल रोजीं व्हाईसराय साहेबांकडून इंग्लंदांत गेली. ता० ४ रोजीं पेंजदेविषयीं संभाषण निघालें होतें, त्यावरून अमीराचा त्या गांवाविषयीं फारसा हट्ट दिसला नाहीं व सारिक लोक बहुधा आपल्या विरुद्ध जातील, असेंही त्यानें सांगितलें.

इंग्लंदांत दोन्ही राष्ट्रांच्या वकीलांचीं तंटा मिटाविण्याविषयीं भाषणें होत होतीं व इकडे अमीर या देशांत येण्याच्या तयारींत होता,

इतक्यांत खुद्द सरहद्दीवर मोठी गडबड उडाली. पेंजदे येथें असलेल्या अफगाण शिपायांनीं पुढें जाण्याविषयीं हालचाल केली व रशियन सैन्याच्या अधिकाऱ्यांच्या वेळेवर केलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष केलें. ह्यावेळीं सरहद्दीवर इंग्लिशांचें कमिशन होतें व त्यांतले लोक तेथील प्रदेशाची पाहणी करीत होते. पाहिजे तें केलें तरी इंग्लिशांचें आपणास पाठबळ आहे, असें अफगाणांना वाटलें कीं काय, हें खात्रीनें सांगतां येत नाहीं, परंतु त्यांचें वर्तन जास्त उर्मटपणाचें होऊं लागलें. त्यांनीं आपल्या शक्तीवर लक्ष न ठेवतां व रूस लोकांच्या धाकास न जुमानतां, पेंजदेपासून पुढें चाल करण्यास सुरुवात केली. त्या बरोबर जी रशियन फौज जनरल कॉमराफ याच्या हाताखालीं होती तीही युद्धास तयारी झाली. शेवटीं ता० ३० मार्च रोजीं अफगाणांचें वर्तन पाहून रूस लोकांनीं त्यांच्यावर हल्ला केला व थोड्या अवकाशांत अमीराच्या ९०० शिपायांची कत्तल केली; सामानसुमान, तोफा व निशाणें वगैरे घेतलीं, व पेंजदेतून अफगाणांस हांकून लाविलें. ही लढाई झाली त्याच दिवशीं अमीर इकडे आला व वर उल्लेख केलेली बातमी याच लढाईविषयीं होती.

ही बातमी जगांत पसरतांच, इंग्लिशांनीं लढाई केलीच पाहिजे असें झालें. परंतु चार दिवसांनीं या लढाईचा खरा प्रकार कळतांच रूस लोकांना दोष देण्यास जागा उरली नाहीं, यामुळें युद्धप्रसंग टळला व पुनरपि तहाचीं बोलणीं सुरू झालीं. त्यावेळीं इंग्लंदांत लिबरल पक्षाच्या हातांत राज्यसूत्रें होतीं यामुळें हें प्रकरण उतावीळपणानें युद्धावर गेलें नाहीं. हें झाल्यानंतर पुढें लवकरच लिबरल पक्षानें राजीनामा दिला व कान्सरवेटीव पक्षाची सरशी होऊन लार्ड सालिसबरी व लार्ड चर्चिल वगैरे मंडळी पुढें आली. त्यांनीं ही ग्ल्याडस्टन, त्यांचा मंडळीनें सुरू केलेलीं तहाचीं भाषणें चालवलीं व ता. १० सप्टेंबर १८८९ रोजीं, उभय राष्ट्रांमध्यें होणाऱ्या तहाचा खर्डा तयार होऊन त्यावर लार्ड सालिसबरी व एम्. स्टॉल यांच्या सह्या झाल्या. सरहद्दीवरील कमिशनचे कामाची (जें नुकेंच सुरू झालें आहे) समाप्ति, झाल्यावर, या

खर्ज्याच्या अनुरोधानें राशिया व इंग्लंदामध्यें पक्का व मजबूद तह होईल. हें कमिशन संपण्यास ७।८ महिने लागतील. राशियाशीं तह होऊन, हीं दोन्ही युरोपीयन राष्ट्रें शांत रीतीनें व स्नेह भावानें चालतील अशी आमची अंतःकरणापासून इच्छा आहे.

वरील एकंदर हकिगत आधारपूर्वक लिहिली आहे. ती देण्याचा उद्देश, एवढेंच उघड करून दाखविण्याचा होता कीं, राशिया व इंग्लंद यांमध्यें लढाई करण्यासारखा मुळींच बेबनाव नसून, मध्यें जी गडबड उडाली होती तिचें कारण परस्परांविषयीं असलेला गैरसमज होय. अशा गैरसमजानें मोहरीचा मेरू करून, एकमेकांचें म्हणणें नीट समजून न घेतां, लढाई सुरू करून कोट्यावधि रुपये व लाखों जिवांची आहुति करण्यास तयार व्हावें, हें चतुर राजकार्यकुशलांचें काम नव्हे; हें लक्षांत बाळगूनच आमच्या सरकारचें वर्तन व्हावें अशी आमची इच्छा आहे. योग्य कारणें झाल्याशिवाय लढाई करून आपल्या राष्ट्रास पेंचांत पाडणें हें महापातक आहे; यासाठीं पक्षपाती, मतलबी व उताविळ लोकांच्या ओरडींत मन घालून युद्धास तयार होण्यापेक्षां, धिमेपणानें व थंडाईनेंच सर्व प्रकरण मिटवावें हें उभयपक्षांना हितकर आहे व याच प्रमाणें आमच्या सरकारची ही इच्छा आहे, हें पाहून आम्हांस अत्यानंद वाटतो.

तथापि रूस सरकारानें आपली महत्वाकांक्षा पुरी करण्यासाठीं जर गडबड केली व इंग्लंदाचा अपमान केला तर अथात्च लढाई केली पाहिजे. दुर्दैवेंकरून असा प्रसंग आल्यास या देशांतील लोकांनीं,व राजेरजवाड्यांनीं आपलें तनमनधन खर्चून आमच्या सरकारास मदत करणें वाजवी आहे व त्याप्रमाणें वर्तण्यास आम्ही किती उत्सुक आहों,हें नुक्तेंच व्यक्त झालें आहे.हें पुस्तक जे वाचतील त्यांची खात्री होईलच, कीं, हिंदुस्थानांत ब्रिटिश सरकारच्या अंमलाखालीं ज्या स्वातंत्र्याचा, स्वस्थतेचा, व विद्येचा यथेच्छ उपभोग आम्हीं घेत आहों, त्याचा लेशही श्वेत झाराच्या जुलमी सत्तेंत मिळणार नाहीं. यासाठीं हिंदुस्थानचें या परराष्ट्रापासून संरक्षण करण्याविषयीं सर्वांनीं झटलेंच पाहिजे.

हें संरक्षण करण्याचे अनेक उपाय पुढें आले आहेत. 'शास्त्रीय सीमा' धरून कंदाहार येथें आपलें सैन्य ठेवावें, किंवा अफगाणिस्थानच्या पश्चिम व उत्तर हद्दीवर अफगाण व इंग्लिश फौजेचे पहारे ठेवावे, किंवा या देशांत ३० हजार फौज जास्त ठेवावी व सरहद्दीवर तटबंदी करून, सैन्याचा व सामग्रीचा पुरवठा वक्तशीर होण्यासाठीं नवीन आगगाडीचे व पाय रस्ते बांधावे, अशा अनेक सूचना आल्या आहेत. या पुस्तकांत दिलेल्या नकाशांत हे रस्ते कोणते व कोठें व्हावयाचे आहेत, तें दाखविलें आहे. या सूचनांपैकीं अफगाणिस्थानांत पुढें जाण्याची सूचना गैर आहे. हिंदुस्थानची स्वाभाविक सीमा जी सुलेमान पर्वत, ती धरून तेथें मजबुदी करावी हें म्हणणें मात्र उत्तम आहे; पुढें जाण्यांत अर्थ नाहीं, व कदाचित् कंदाहार घेतल्यास, रशियाला हिरात पकडण्यास सबब मिळेल. आपल्या देशाच्या सरहद्दीचा बंदोबस्त करावा व फौज फार न वाढवितां राजनिष्ठ प्रजेला 'व्हालंटीयर' होण्याची परवानगी द्यावी हें आमच्या सरकारचें कर्तव्यकर्म आहे. फौजेचा अतिशय खर्च सोसण्याची ताकद आमच्या देशाला नाहीं हें समजून, देशांतल्या लोकांच्या व्हालंटीअर पलटणी तयार कराव्या हें योग्य दिसतें. दुस्ती सूचना एवढीच आहे कीं, सरकारानें अफगाणिस्थानांत आपलें अंग फार न ठेवितां, आपली सरहद्द मजबूद करून बसावें, अफगाण लोकांपेक्षां हिंदुस्थानच्या प्रजेवर जास्त विश्वास ठेवावा, प्रजेच्या योग्य मागण्या देऊन तीस संतुष्ट ठेवावें, आणि क्वेटापासून पुढें कंदाहारपर्यंत १४३ मैल जास्त रेलवे न करितां, तो पैसा या देशाच्या हद्दीला मजबुदी आणण्यांत खर्च करावा; असें केल्यानें हिंदुस्थानच्या राज्यास परशत्रूपासून कांहींच अपाय होणार नाहीं.

समाप्त.

परिशिष्ट अ. *

या कोष्टकावरून युरोपखंडांतील उद्योगी लोकांला फौजेचा किती अवाढव्य खर्च सोसावा लागतो हें दिसेल, शिवाय युरोपांत लढाईची कशी कडेकोट तयारी होत आहे तेंही कळेल.

देशाचें नांव.	लोकसंख्या.	एकंदर वसूल. (पौंड)	खर्च. (पौंड)	कर्ज. कोटि पौंड.	फौज व आरमार खर्च कोटि पौंड.	तयार फौज. लक्ष-हजार.	एकंदर. लक्ष-हजार.	लढाऊ गलबतें. लोखंडी, साधीं.		शेरा.
ग्रेनब्रितन व आयर्लंड.....	३,५०,२६,१०८	८,७२,०५,१८४	८६९९९५६४	७२	३	१—२०	५—४५	६०	३००	खुषी असल्यास फौजेंत शिरावें, जुलूम नाहीं.
फ्रान्स.....	३.७६.७२,०४८	१४,२३.३७०४६	१४२३२६६२०	९०	३॥	५—१९	३७—५०	५६	२४६	ह्या देशांत सामान्यतः २० पासून ४० वर्षांच्या प्रत्येक पुरुषानें फौजेंत शिरलेंच पाहिजे.
जर्मनी.....	४,५२,३४,०६१	११,२३,२१२३२	११२३२११२०	३०	२	४—४५	५६—७०	२४	५३	
रशिया.....	८,५०,५८,४१५	११.२१.८०५८२	११४५७१०५७	६८	३।	७—७०	३२—...	३१	२२९	
आस्त्रिया...	३ ७७,८६,३४६	८.९०,९२,०००	९३९४६०००	४७	१।	२—९०	१०—२६	१३	४३	
तुर्कस्थान (फक्त युरोपांतील)	८६,३१,३६९	१,१९,०४,२४०	१३०१०४३७	१५	·॥·	१—५०	५—...	२०	१२	
इटाली.....	२,८४,५९,४५१	६.१७,७४,४४६	६१४८९०४०	४५	२	४—८०	२७—८५	१९	७०	
स्पेन.....	१.६०,६१,८५९	३,२०,९५,०९१	३२९६५६१५	२४	·॥॥·	१—२५	४—...	७	६८	

आमच्या खंडांत सियाम, जपान व इराण ह्या देशांत फौजेंत नोकरी करण्याबद्दल युरोपाच्या कित्यावर सक्तीचे नियम केले आहेत आणि चीनांतही तोच प्रकार सुरू होत आहे असें ह्मणतात.

* 'Brights' Almanack for 1885.